
# डॉक्टर चाणक्य

## डॉ. शशांक परुळेकर



# डॉक्टर चाणक्य

डॉ. शशांक परुळेकर

ई साहित्य प्रतिष्ठान

© शशांक व्यं. परुळेकर

प्रथम आवृत्ती २६ डिसेंबर २०१६

मुखपृष्ठ व अक्षरजुळणीः डॉ. शशांक परुळेकर

**लेखकाशी संपर्कः**

ई-मेलः communicate.svp@gmail.com

**सूचनाः**

सर्व हक्क लेखकास्वाधीन. भारतीय आणि आंतरदेशीय कॉपीराईट कायद्यान्वये संरक्षित. या पुस्तकाचा कोणताही भाग लेखकाच्या पूर्वपरवानगीशिवाय पुनर्मुद्रित, फोटोकॉपी, इलेक्ट्रॉनिक, नाट्य अथवा चित्रपट या प्रकारे वापरण्यास मनाई आहे.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २६ डिसेंबर २०१६


- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

ज्याच्या आशीर्वादाने येथवर पोह्योचलो, त्या परमेश्वराला अर्पण

या कादंबरीतील सर्व व्यक्ती व प्रसंग काल्पनिक आहेत.

# मनोगत

एम्.डी.ची परिक्षा उत्तीर्ण होऊन स्त्रीरोगतज्ज्ञ झालो तेव्हा जग जिंकल्याचा आनंद झाला होता. वैद्यकीय शिक्षणाचे मोरपंखी दिवस संपले होते आणि आता डॉक्टरकीत कारकीर्द करायची होती. एकीकडे गंमतजंमत करायचे दिवस सरले आणि आता ते परत येणार नाहीत याची हुरहुर होती, तर दुसरीकडे भविष्याचा वेध घ्यायचा उत्साह होता. पुढचं पहिलं पाऊल टाकलं त्याला आता तेहतीस वर्षं झाली. कामाच्या नादात वेळ कसा गेला ते कळलंच नाही. वैद्यकीय कॉलेजात लेक्चरर म्हणून कारकीर्दीची सुरुवात केली तेव्हापासून मला जाणवायला लागलं की ते शिक्षण यशस्वीपणे पार पाडून एक चांगला डॉक्टर होण्यासाठी फक्त बुद्धिमत्ता आणि परिश्रम पुरेसे नसतात, तर त्यांच्यापलिकडचं काहीतरी लागतं, जे विद्यार्थ्यांना कोणी सांगत नाही. ते मुलांना आणि त्यांच्या पालकांना कळावं म्हणून मी डॉक्टरबाबू हे माझं पहिलं पुस्तक लिहिलं. ते ग्रंथालीने प्रकाशित केलं त्याला सोळा वर्षं झाली. ते मी हलक्याफुलक्या भाषेत लिहिलं होतं. विद्यार्थीदशेतल्या गंमतीजमती त्यांत होत्या. ते वाचकांना भावलं. डॉक्टरकी करताना पुढे अनेक अनुभव आले. तेव्हा वाटलं होतं की ते अनुभव चितारले तर वाचकाला कदाचित ते नीरस वाटतील. पण आता त्याच आयुष्याकडे मागे वळून एका त्रयस्थाच्या नजरेने बघताना वाटतय की त्यातही एक गंमत होती, आणि ती विद्यार्थीदशेतल्या गंमतीपेक्षा काही कमी नव्हती. रुग्णालयात जाणारे रुग्ण आणि तिथे शिकणारे विद्यार्थी यांना तिथे दिसणाऱ्या विश्वापेक्षा एक वेगळं विश्व तिकडे असतं.

त्याचं दर्शन सामान्य लोकांना करून द्यावं या इच्छेने मी हे पुस्तक लिहिलं आहे. वाचकाला विनाकारण गंभीर करावं असं मला कधीच वाटलं नाही, म्हणून हलक्याफुलक्या भाषेत लिखाण केलं आहे. घटकाभराच्या मनोरंजनासाठी ही कादंबरी वाचायला हरकत नाही. पण त्या शब्दांआड दडलेल्या, कधी मनाला चटका लावणाऱ्या, कधी गळा दाटून आणणाऱ्या, कधी प्रक्षुब्ध करणाऱ्या भावना वाचकाला जाणवल्या तर मला जास्त आनंद होईल.

जसं डॉक्टरबाबू हे माझं आत्मचरित्र नव्हतं, तसंच हे सुद्धा नाही. डॉक्टरबाबूत होती त्यातली काही पात्रं याही कादंबरीत आहेत. पण या कादंबरीचा आनंद घेण्यासाठी आधी डॉक्टरबाबू वाचलेलं असण्याची अजिबात गरज नाही. या कादंबरीतल्या सर्व घटना आणि मधे मधे उल्लेख असलेला परमेश्वर सोडून सर्व पात्रं पूर्णपणे काल्पनिक आहेत. तरीही एखाद्या व्यक्तीशी कोणत्याही पात्राचे साधर्म्य आढळलं, तर तो निव्वळ योगायोग समजावा.

शशांक परुळेकर

# लेखकाविषयी थोडंसं



डॉक्टर शशांक परुळेकर के.ई.एम्. हॉस्पिटल आणि सेठ जी.एस्.मेडिकल कॉलेजात स्त्री आणि प्रसूतीरोगविभागाचे प्राध्यापक आणि प्रमुख आहेत. दिवसभर रुग्णसेवा आणि सायंकाळी वाचन आणि लिखाण असा त्यांचा दिनक्रम असतो. वैद्यकीय विषयांवर त्यांची वीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. स्त्री आणि प्रसूतीरोगावरच्या इंटरनॅशनल जर्नलचे ते संस्थापक संपादक आहेत. वैद्यकीय शिक्षण घेतांना आलेले अनुभव त्यांनी 'डॉक्टरबाबू' या पुस्तकात हलक्याफुलक्या शैलीत मांडले होते. एम्.डी.ची डिग्री घेतल्यावर रुग्णसेवा आणि वैद्यकीय अध्यापन करताना येणाऱ्या अनुभवांचे चित्रण त्यांनी त्याच शैलीत या पुस्तकात केले आहे.

अंडरग्रॅड्सचा घोळका लेक्चरहॉलकडून निघाला होता. हॉस्पिटलमध्ये रस्ता अडवून चालू नये हे त्यांना कधीच कळत नसे. चारचार जण एका आडव्या रांगेत असे ते चालत. घाई हा शब्दही त्यांना माहीत नसे. ते चालताहेत की एका जागीच पाय हलवताहेत असा प्रश्न त्यांना बघून पडत असे. मी आणि राजेश एका बाजूला झालो. आरेमो म्हणून सिनियर असलो तरी गप्पांमध्ये रंगलेल्या त्या मुलामुलींना समोरून कोण येत आहे याचे भान असायचंच असं नव्हतं. त्यांच्या पलिकडे जोशीबाई डिपार्टमेंटच्या ऑफिसकडे जातांना दिसत होत्या.

"जोशीबाईंच्या लेक्चरला येव्हढी गर्दी कशी काय असते रे?" मी म्हटलं. "त्या शिकवतात त्यात काही दम नसतो. इंग्रजी सुद्धा थातूरमातूरच बोलतात."

"पंचाहत्तर टक्के हजेरी असणं कंपल्सरी आहे ना" राजेश म्हणाला.

"अरे, पण साठ जणांच्या जागी सत्तर मुलं तरी दिसताहेत" मी म्हटलं.

"सिनियर बॅचची मुलं पण येतात त्यांच्या लेक्चरला."

"काय वेड लागलंय की काय त्यांना" मी म्हटलं. जोशीबाई शिकवायच्या ते ऐकलं की त्या विद्यार्थी असताना त्यांच्या

पुस्तकांत काय होतं ते ती जुनी पुस्तके न वाचताच समजत असे. शास्त्र जोशीबाईंना मागे ठेवून बरेच पुढे निघून गेलं होतं. जुनं ते सोनं या विश्वासावर जोशीबाई आपलं जुनं ज्ञान मुलांना देत असत. अशा त्यांच्या लेक्चरना मुलांनी येवढी गर्दी करावी हे काही बरोबर वाटत नव्हतं.

"तसंच समज" राजेश म्हणाला.

"म्हणजे?"

"अरे, त्यातली काही जणं बाईंचं लेक्चर बघायला येतात, ऐकायला नाही."

त्याला काय म्हणायचं होतं ते एका मिनिटाभरानंतर माझ्या ध्यानात आलं. गोरापान रंग, पाच फूट सहा-सात इंच उंची, बऱ्यापैकी चेहेरपट्टी, थोडेसे घारे डोळे, बांधेसूद शरीर, अंगालगत नीट बसलेल्या महागड्या साड्या, स्लीवलेस ब्लाऊज, मेकपचा योग्य वापर, आणि मंदसं पर्फ्यूम असा त्यांचा थाट असायचा. वयाप्रमाणे म्हणा किंवा घरच्या सुबत्तेमुळे म्हणा, शरीर जरा जास्तच गोल झालं होतं, ज्यामुळे त्या अधिक आकर्षक दिसायच्या असं बरेच जण म्हणायचे.

"अरे, पण बाई पस्तीस-चाळीस वयाच्या, तर ही पोरं विशीच्या आंतली. ती बाईंकडे अशा नजरेने कशी बघत असतील?"

"मुलं तेरा-चौदाव्या वर्षी वयांत येतात. विशीच्या सुमाराला त्यांचे हार्मोन्स ऑप्टिमम लेव्हलला असतात. तुला माहीत नाही? स्कॉलर ना रे तू?"

"अम्..." स्कॉलर असलो तरी या विषयाचा अभ्यास मी केलेला नव्हता.

"पण तू म्हणतोस ते खरं कशावरून?" मी म्हटलं.

"त्यांच्या हातांत वह्या आहेत का? नाहीत. कारण ते नोट्स वगैरे घेतच नाहीत. मग करतात काय असं वाटतं तुला? मी एका दोघांना विचारलं सुद्धा. त्यांनीच मला सांगितलं ते लेक्चर बघायला जातात म्हणून."

"आणि जोशीबाईना कळलं तर?"

"नाही कळणार त्यांना. त्या जरा चमट आहेत."

त्या जरा चमट आहेत हे मला माहीत नव्हतं. राजेश मला एक वर्ष सिनियर होता. त्याला अनुभवाने ते समजलं असणार. एव्हाना मुलं निघून गेली होती. आम्ही डिपार्टमेंटच्या ऑफिसच्या दिशेने निघालो. ऑफिसमध्ये जोशीबाईंचा बऱ्याच वरच्या पट्टीत तणतणण्याचा आवाज येत होता. ज्यांनी जोशीबाईंना पुर्वी पाहिलेलं नव्हतं त्यांना त्या आवाजावरून त्यांच्या व्यक्तीमत्वाचा अंदाज येणं कठीण होतं. ज्यांनी त्यांना पूर्वी पाहिलेलं होतं त्यांना ते जोशीबाईंचं तणतणणं होतं हे खरं वाटलं नसतं.

"बाई का तणतणताहेत?" मी विचारलं.

"नेहमीचंच रे" राजेश म्हणाला. "त्यांना स्वतःचं युनिट हवंय."

"इथे तणतणून युनिट कसं मिळेल?" मी म्हटलं.

"ते तुला मला समजतंय पण त्यांना समजत नाहीये ना. तिथेच तर सगळा लोचा आहे. आणि युनिट म्हणजे काय त्यांना खाऊ वाटला काय? एका दिवशीची सकाळ आणि दुपारची ओपीडी चालवायची, येणाऱ्या सगळ्या पेशंटांची संपूर्ण जबाबदारी पेलायची म्हणजे रोज दुपारी सगळ्या बाया स्टाफरूममध्ये सहभोजन करतात आणि दर महिन्यातून एकदा पार्टी करतात तशी गोष्ट नाहीये हे त्यांना समजत नाही

ही त्यांची मोठी ट्रॅजेडी आहे. सध्या ऑननरी डॉक्टर सगळी जबाबदारी पेलताहेत म्हणून त्या मजेत आहेत. स्वतःच्या डोक्यावर ते पडलं की समजेल."

ऑनररी आणि फुलटायमर यांचं विळ्याभोपळ्यायेवढं सख्य होतं. विभागप्रमुख आणि प्रोफेसर वगैरे मोठी पदं वर्षानुवर्षं ऑनररींकडे होती. सगळ्या युनिटांचे प्रमुख ऑनररीच होते. ही मंडळी कुशल आणि हुशार अशी डॉक्टर मंडळी असायची. त्यांचा स्वतंत्र व्यवसाय असायचा, ज्यांत त्यांचं प्रचंड उत्पन्न असायचं. नगरपालिका त्यांना मानद डॉक्टर म्हणून आपल्या हॉस्पिटलांमध्ये नेमत असे, जेणेकरून त्यांच्या कौशल्याचा फायदा गरीब रुग्णांना व्हायचा. खाजगी प्रॅक्टीसवर पोटपाणी अवलंबून असल्यामुळे ते तिथे जास्त लक्ष द्यायचे. नगरपालिकेच्या रुग्णालयाला ते दिवसाकाठी फारफार तर दोन-तीन तास देऊ शकायचे. तेवढ्या काळात ते सर्व महत्वाची कामं पार पाडायचे. उरलेली साधी कामं फुलटायमर म्हणजे पूर्णवेळ डॉक्टर आणि आम्ही आरेमो म्हणजे निवासी डॉक्टर करायचो. आपला दर्जा दुय्यम असणं जोशीबाई आणि त्यांच्या फुलटायमर मित्रमैत्रीणींना झोंबत असे. जरा फुरसत मिळाली की त्यांच्या या दुःखाला वाचा फुटत असे.

"पण चारच तर युनिटं आहेत" मी म्हटलं. भडभडे सोमवार आणि शनिवार, राजे मंगळवार आणि शुक्रवार, काळे बुधवार आणि पारकर गुरुवार. जोशीबाईंसाठी मोकळा दिवस आहे कुठे?"

"भडभडे रिटायर झाले की त्यांचं युनिट आपल्याला मिळावं असं त्या म्हणतायत."

"पण त्याला अजून चार वर्षं आहेत. त्याची चर्चा आजपासून कशाला?"
"तसं केलं तर दुःख तात्पुरतं विसरायला होतं. दारूच्या नशेत माणसं दुःख कसं बुडवतात? नशा उतरली की दुःख परत हजर होतं. तसं बाईंचं आहे. म्हणून तर त्या मधून मधून अशी तणतण करतात."
आम्ही डिपार्टमेंटच्या ऑफिसच्या दाराशी पोचलो होतो. आतमध्ये जोशीबाई कपाळाला आठ्या घालून संजय पोत्रेबरोबर बोलत होत्या. संजय भडभड्यांचा लेक्चरर होता. त्याचं तोंड बघून त्याला ते ऑफिस सोडून इतर कोठेही असलं तरी चालेल असं वाटत होतं असं दिसत होतं. पण जोशीबाई इतर कोणाचं तोंड बघण्याच्या मनःस्थितीत दिसत नव्हत्या. तो बिचारा मधून मधून हुंकार देत होता. बोलायचं काम जोशीबाईच करत होत्या.
"मी म्हणते असं काय मोठं आहे या ऑननरींमध्ये?" जोशीबाई म्हणाल्या.
ऑननरींमध्ये बरंच काही होतं हे आम्हाला सगळ्यांना माहीत होतं. संजय गप्पच राहिला.
"असं काय त्यांना येतं की ते आम्हाला येत नाही?" जोशीबाई म्हणाल्या.
मोठी यादी करून दाखवायची ती वेळ नव्हती हे संजयला माहीत होतं. तो परत गप्पच राहिला.
"आम्ही नऊ वाजता येतो आणि चार वाजेपर्यंत मरेपर्यंत काम करतो. हे ऑनररी जेमतेम दोन तास काम करतात" जोशीबाई म्हणाल्या.

'सौ सोनारकी एक लोहारकी' ही म्हण मला आठवली. जोशीबाईंनी तेव्हा माझं काही बिघडवलं नव्हतं. पण आपला काही संबंध नसला तरी प्रत्येक गोष्टीत बरोबर काय आणि चूक काय हे ठरवायची माझी जुनी खोड होती. अर्थात तोंड न उघडण्याचा शहाणपणा माझ्यात होता. मीही गप्पच राहिलो. प्रोफेसरसमोर निवासी डॉक्टरने तोंड उघडणं धोकादायक ठरेल हे आम्हा सगळ्यांना कोणीही न शिकवताच समजलेलं होतं.

"आम्ही सगळी फालतू कामं करतो आणि भाव हे ऑनररी खाऊन जातात. आम्ही फक्त गधामजूरीच करायची काय?" जोशीबाई म्हणाल्या.

"हूं" संजय म्हणाला.

बघावं तेव्हा स्टाफ रूम, कँटीन, स्वतःचं ऑफिस, आणि इतर वेळी फॅशन शो मध्ये हातावर साडीचा पदर धरून चालावं तशा चालणाऱ्या जोशीबाई गधामजूरी करत असतील असं कोणालाही वाटलं नसतं. त्यांना ऑनररींच्या तुलनेत अगदीच कमी भाव मिळत होता हे मात्र सत्य होतं. ते तसं का होतं हे आत्मपरीक्षण केलं तर त्यांना नक्की समजलं असतं. असो.

"मी म्हणते, मी प्रोफेसर आहे. मला माझं स्वतःचं युनिट हवं. मी एका ऑनररीच्या हाताखाली का म्हणून काम करायचं?"

संजयचा चेहरा धास्तावला. स्वतंत्रपणे काम करताना जोशीबाई बराच गोंधळ घालतील अशी भिती आम्हा सर्वांनाच वाटत असे. युनिटच्या मुख्य असणाऱ्या वरिष्ठांनी सांगितलेलं काम पार पाडणं वेगळं आणि कधी काय करायचं ते स्वतः ठरवून पार पाडायचं हे वेगळं, हे आम्हा आरेमोंनाही समजायचं. ओव्हरकॉफिडन्समुळे जोशीबाईंना ते समजत नसावं.

"आता आणखी चार वर्षांनी भडभडे रिटायर होतील. तेव्हा मी त्यांचं युनिट माझ्यासाठी मागणार आहे."

"चार वर्षं म्हणजे बराच मोठा कालखंड वाटतो ना मॅडम?" आमच्या लिपिक पोंक्षेबाई म्हणाल्या. त्यांच्या आवाजात असणारा आनंद जोशीबाईंना जाणवला नाही, पण आम्हाला जाणवला. जोशीबाईंचा मोफत स्त्रीरोगांवरचा सल्ला आणि चहा घेऊनही पोंक्षेबाई त्यांच्या बाजूने दिसत नव्हत्या. कदाचित नजरेला सुंदर दिसणाऱ्या आणि नवऱ्याच्या पैशांवर का होईना, श्रीमंत असणाऱ्या जोशीबाईंचा त्यांना मत्सर वाटत असावा.

"हूं. काय करणार, नशीब आपलं" जोशीबाई हताश स्वरात म्हणाल्या.

नशीब त्या पेशंटांचं, असं माझ्या मनांत आलं. त्या थोर, ज्ञानी, कार्यकुशल अशा ऑनररी डॉक्टरांच्या पंक्तीत जोशीबाईंनी जाऊन बसावं असं कोणालाच वाटत नव्हतं. अर्थात त्यामुळे जोशीबाईंचं अस्तित्वात येणं थांबलेलं नव्हतं. रुग्णांच्या काळजीपेक्षा काही वेगळीच समीकरणं नगरपालिकेच्या मेडिकल कॉलेजांत होणाऱ्या नियुक्त्यांत कारणीभूत असावीत हे आम्हाला तेव्हा माहीत नव्हतं.

***

डिपार्टमेंटचं ऑफिस नऊ वाजता उघडायचं आणि चार वाजता बंद व्हायचं. कॉलेजचं ऑफिस नगरपालिकेच्या इतर ऑफिसांसारखं साडेदहाला उघडायचं आणि साडेपाचला बंद व्हायचं. तो दिवस इतर दिवसांसारखा नव्हता. डिपार्टमेंटचं ऑफिस नेहमीप्रमाणे चार वाजता बंद झालं. ऑनररी मंडळी

दोन वाजण्यापूर्वीच पसार झाली होती. जोशीबाई आणि इतर फुलटायमर मंडळी चारच्या ठोक्याला किंवा त्यापूर्वी काही वेळ घरी गेली होती. आम्हा आरेमोंचं राज्य सुरू झालं होतं, जे दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजेपर्यंत चालणार होतं. डोक्याला वरिष्ठांचा ताप नसल्यामुळे जरा सुखावलेले आम्ही जरा ऐसपैस बसून कामं हातावेगळी करत होतो. ऑफकॉल असणाऱ्यांना घरी जायचं होतं आणि त्यापूर्वी काही कामं संपवायची होती. साडेचार वाजता कॉलेजच्या शिपायाने कॉलेजच्या आणि आमच्या डिपार्टमेंटच्या नोटिसबोर्डावर एक नोटीस आणून लावली. एरवी ती दुसऱ्या दिवसापर्यंत आम्हाला दिसलीही नसती. पण त्याला नोटीस लावताना प्रीतीने पाहिलं आणि उत्सुकता म्हणून जाऊन ती वाचली. नोटीस सनसनाटी होती. हां हां म्हणता ती बातमी वाऱ्याच्या वेगाने पसरली. जोशीबाईंच्या कोणत्यातरी चमचाने त्यांना ती कळवली. एरवी बाई कॅम्पसमध्येच असणाऱ्या आपल्या घरी गेल्या आणि साडी बदलून घरच्या गाऊनमध्ये घुसल्या, की परत साडी नेसून हॉस्पिटलात येत नसत. पण बातमी अशी होती की बाईंनी रोजची सवय मोडली. बाई स्वतःच्या डोळ्यांनी बातमी वाचायला आल्या. आता काय होणार ते बघायच्या उत्सुकतेने सगळे आरेमो नोटीसबोर्डाच्या आसपास जमले होते. बाईंनी आणि त्यांच्या बरोबर प्रीतीने ती नोटीस वाचली.

'रुग्णसेवा आणि अध्यापन चांगल्या प्रकारे पार पाडण्यासाठी खाली नमूद करण्यात आलेले बदल करण्यात येत आहेत. शुक्रवारचे युनिट डॉक्टर मेहता यांच्या ताब्यात राहील. शनीवारचे युनिट डॉक्टर दोशी यांच्या ताब्यात राहील. डॉक्टर

मेहता आणि डॉक्टर दोशी उद्यापासून हा कार्यभार स्वीकारतील.' खाली विभागप्रमुख भडभडे आणि कॉलेजचे डीन यांच्या सह्या होत्या.

जोशीबाईंचा चेहरा भयंकर दिसायला लागला. एकतर चेहऱ्यावर मेकप नव्हता. त्यात संतापाची भर पडली. दोन नवी युनिटं बनली आणि त्यांत बाईंचा नंबर लागला नाही म्हणजे काय.

"बाई आता फिट येऊन पडतील बघ, लागली पैज?" राजेश म्हणाला. कोणी पैज लावायला तयार झालं नाही.

"काहीतरी गोलमाल आहे" राजेश म्हणाला. "ऑनररींची चालबाजी दिसतेय."

"ते कशाला चालबाजी करतील?" मी म्हटले.

"अरे, सगळे ऑनररी फुलटायमर्सच्या विरुद्ध असतात. भडभडे रिटायर झाले की फुलटायमर असणाऱ्या जोशीबाई जोर करतील आणि त्यांना युनिट मिळालं तर एका असिस्टंट ऑनररीला युनिट मिळणार नाही. भडभडे जाण्यापूर्वी आपल्या गोटातल्या मंडळींचं भलं करून घ्यावं - भले ते न्याय्य असो किंवा नसो - या विचाराने त्यांनी ते करून घेतलं असावं. त्यातून जोशीबाई त्यांना अजिबात आवडत नाहीत. त्यांना धडा शिकवून झाला. एका दगडात दोन पक्षी मारले."

"पण डीन त्यांच्या बाजूचे कसे?"

"डीनना कार्यक्षम डॉक्टर हवे असतात, आणि नगरपालिकेलाही तेच हवं असतं. नुसती पोकळ बडबड काय कामाची?"

तिथे जोशीबाई फुटाण्यासारख्या उडत होत्या.

"हा अन्याय आहे. आपण काहीतरी केलंच पाहिजे" जोशीबाई म्हणाल्या.

कोणी काहीच बोललं नाही किंवा काही करण्याच्या दृष्टीने काही हालचालही केली नाही. जे काही केलं पाहिजे ते आपल्याला स्वतःलाच केलं पाहिजे हे जोशीबाईंना उमगलं. इतर पूर्णवेळ डॉक्टर आपापल्या घरी गेलेले होते. ऑनररी मंडळींसारखी पूर्णवेळ डॉक्टर मंडळीत एकजूट नव्हती. त्यामुळे त्या वेळेला बोलावलं तरी ती मंडळी जोशीबाईंसाठी परत हॉस्पिटलात आली नसती आणि आली असती तरी त्यांनी जोशीबाईंसाठी काही केलं नसतं हे जोशीबाईंना जाणवलं असावं. युद्धाची तयारी करायला बाई घरी गेल्या. पंधरा मिनिटांत तयार होऊन परत आल्या.

"मी हेड ऑफिसला जाते आहे. माझ्या घरी पेशंटसाठी फोन करू नका" असं जातांना त्या आम्हाला बजावून गेल्या.

"कांजिवरम सिल्क आहे" आमच्यातली एक जाणकार आरेमो म्हणाली. निवासी डॉक्टर असली तरी ती प्रथम एक स्त्री होती आणि साड्यांचे प्रकार तिला चांगले समजत असत असं सगळ्यांचं मत होतं.

"मॅडम दिसताहेत मात्र क्लास" असं दुसरी आरेमो म्हणाली.

"मेकप पटपट लावला तरी चांगला झालाय" एक आरेमो म्हणाला. सामान्यपणे सुंदर स्त्री दिसली की पब्लिक हॉस्पिटलमधल्या पुरुषांची कार्यकारणशक्ती हरपत असे. सुंदर दिसणाऱ्या स्त्रीने मेकप लावलाय हे समजणाऱ्या त्या पुरुषश्रेष्ठाला सलाम केला पाहिजे हे माझ्या लक्षात आलं आणि मी त्याला मनातल्या मनात सलाम करून टाकला.

"बाईंचं काम आज होत नाही, लागली पैज?" राजेश म्हणाला. नेहमीप्रमाणे कोणीच त्याच्याबरोबर पैज लावली नाही. जरी

कोणी पैज लावली नाही तरी काय होतं याची उत्सुकता मात्र सर्वांनाच होती. जोशीबाई रात्री साडेआठ वाजता परत आल्या. प्रवास करून शिणल्या होत्या, पण चेहऱ्यावर विजयी हास्य होतं.

"काय झालं मॅडम?" चमची म्हणाली.

"कमिशनरनाच जाऊन भेटले" बाई म्हणाल्या. "तसे बिझी होते ते. पण त्यांच्या सेक्रेटरीची ओळख काढली आणि भेट झाली."

"तुम्हाला युनिट मिळालं?"

"छे गं! त्या दोघांना युनिटं दिली होती ते रद्द झालं. मी सगळं काही त्यांना नीट समजावून सांगितलं. त्यांनी पण ते लक्षपूर्वक ऐकलं."

खरं तर कमिशनर वगैरे मंडळी खूप बिझी असायची आणि आगाऊ अपॉइंटमेंट घेतल्याशिवाय भेटत नसत असं आम्ही ऐकून होतो. पण जोशीबाई अशा तयारीने गेल्या होत्या की महर्षी विश्वामित्रांनीही त्यांचं म्हणणं लक्षपूर्वक ऐकलं असतं.

"मग काय म्हणाले ते?"

ती आरेमो जोशीबाईंची खबरी होती असणार. कुतूहल सगळ्यांनाच होतं. पण संभाषण मात्र ती एकटीच पार पाडत होती.

"काय म्हणणार? न्याय माझ्याच बाजूला होता. एचोडी आणि डीन यांची मनमानी चालवून घ्यायला हे काय कलियुग आहे काय?"

"मॅडम, पण हे कलियुगच आहे" कोणीतरी म्हणालं. त्याच्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकून जोशीबाईंनी त्याला गप्प केलं.

"कमिशनर म्हणाले, तुम्ही काही चिंता करू नका. मी बघतो काय करायचं ते. मला फुरसतीने परवा संध्याकाळी पाच वाजता भेटा. तेव्हा मी मोकळाच आहे.'

"आणि तोपर्यंत काय मॅडम?"

ते म्हणालेत ना, चिंता करू नका म्हणून? झालं तर मग" जोशीबाई जराशा चिंतातूर आवाजात म्हणाल्या.

"सरांना सांगितलंत?" सर म्हणजे जोशीबाईंचे यजमान, प्रख्यात ऑर्थोपेडिक सर्जन डॉक्टर जोशी होते.

"छे ग! ते रात्री बारा-साडेबारा वाजता येतील. त्यांना वेळ कुठे आहे?"

"येव्हढी सुरेख बायको असताना जर या माणसाला तिच्यासाठी वेळ नाही, तर तो एक तर खूपच बिझी असेल, अरसिक असेल, किंवा इतर कोणासाठी वेळ देत असेल असं वाटतं" राजेश पुटपुटला. आमच्या हॉस्पिटलला रामराम करून प्रायव्हेट प्रॅक्टीसमध्ये घुसण्यापूर्वीची त्यांच्या नवऱ्याच्या रसिकतेची वर्णनं लोक चवीचवीने करत असत, त्याबद्दल बहुतेक राजेश बोलत होता. नशीबाने ते जोशीबाईंना ऐकू गेलं नाही.

***

अरे, नोटिसबोर्डावरची नोटीस गेली" राजेशने दुसऱ्या दिवशी सक्काळी बातमी आणली. सकाळी नऊ वाजता नोटीस गेली म्हणजे जोशीबाईंनी सॉलिडच जादू केलेली दिसत होती. हीच जादू त्यांनी डॉक्टर भडभड्यांवर केली असती तर त्यांना

स्वतःचं युनिट कधीच मिळून गेलं असतं असं माझ्या मनांत आलं. मी राजेशला तसं म्हटलं.

"अरे, त्यांनी तसा प्रयत्न केला होता. पण त्यांत त्या असफल झाल्या."

"पण का? भडभडे तसे उमदे आणि रसिक आहेत असं ऐकतो."

"पण सरळमार्गी आणि प्रामाणिक आहेत. त्यांच्यावर हीच जादू दोशीमॅडमनी आधीच केलीय, तुला माहीत नाही?"

"नाही रे" मी म्हटलं.

"जरा डोळे उघडे ठेवायला शिका साहेब" तो म्हणाला. "अभ्यास एके अभ्यास आणि पेशंट एके पेशंट करून तू चांगला डॉक्टर बनशीलही, पण आयुष्यात पुढे जाण्यासाठी इतर बरंच काही यावं लागतं."

"मी फार हुशार आहे असं मला इतके दिवस वाटायचं तो माझा भ्रम होता तर. राजेश माझ्यापेक्षा बराच जास्त ज्ञानी दिसत होता. केवळ परीक्षेत कमी मार्क मिळविणाऱ्यांना कमी लेखू नये हे तात्पर्य मी तेव्हा काढलं.

"पण ते सरळमार्गी आहेत असं तू म्हणतोस, तर त्यांच्यावर दोशीमॅडमची जादू कशी काय चालली?" मी विचारलं. "ते विवाहीत आहेत. अगदी सोन्यासारखा नसला तरी त्यांना एक मुलगा आहे."

"मग काय झालं? घरी ते पत्नीशी एकनिष्ठ आहेत, तर इथे दोशीमॅडमशी एकनिष्ठ आहेत. तुझ्या मर्यादेची रेषा घराच्या उंबरठ्यावर आहे म्हणून त्यांची तशीच असली पाहिजे असं थोडंच आहे? त्यांची रेषा थोडी पलिकडे आहे एवढंच. पण त्यांची नीतीमूल्यं ते त्या रेषेनुसार व्यवस्थित पाळतात.

जोशीबाईंनी प्रयत्न केला तेव्हा त्यांनी हे असं करण्याऐवजी वाचन करा आणि काम सुधारा असा सल्ला त्यांना दिला."

"चल रे, काहीतरीच काय? तुला कसं कळलं?"

"जुनी गोष्ट आहे. आपण तेव्हा एम्.बी.बी.एस्. ला होतो. एक दिवस जोशीबाई स्टाफरूममध्ये फारच लाडेलाडे करत होत्या. शेवटी भडभड्यांची सटकली. तेव्हा त्यांनी बाईंना असं सांगितलं. त्यांना चहा नेऊन देणाऱ्या सर्व्हंटने ते ऐकलं आणि विशालला सांगितलं."

"सर्व्हंटसमोर असं काही कसं बोलतील ते?" मी म्हटलं.

"का नाही? आपल्यासमोर नाही का ही मंडळी काहीही बोलत? त्यांच्या जगात दोनच प्रकारची माणसं असतात - एक ते स्वतः आणि दुसरे इतर. इतरांचं अस्तित्व असून नसण्यासारखंच असतं. जर ही मंडळी इतरांना उद्देशून काही म्हणाली तरच ते त्यांना ऐकू जाईल, नाहीतर नाही असा त्यांचा एक विचित्र समज असतो."

त्याचं हे म्हणणं एकदम खरं होतं. आमच्यासमोर बोलताना ही मंडळी फारसं तारतम्य दाखवत नसत. जेवढं आयुष्यातलं वैफल्य जास्त, तेवढं ते तारतम्य कमी असायचं. बोलून वैफल्य जायचं नाही, पण त्याची धार तेवढ्यापुरती का होईना, कमी होत असावी. साड्या, दागिने आणि पार्ट्या यांवर बोलणं नसायचं तेव्हा जोशीबाई त्यांच्या वैफल्यांवर बोलायच्या.

तर जोशीबाईंनी अर्धी लढाई जिंकली. रिट पिटिशनवरसुद्धा येवढ्या झटपट निकाल मिळत नसावा. दोशीमॅडम, मेहतासर आणि भडभडे यांची या सगळ्यावर काय प्रतिक्रिया झाली ते काही आम्हाला समजलं नाही. पण त्यांच्या त्या चालीला

स्थगिती मिळाली. युनिटं चारच राहिली. 'ना मला ना तुला' अशा प्रकारे दोशी आणि मेहता युनिटशिवाय राहिले, पण त्यांनी जोशीबाईंनापण युनिट मिळू दिलं नाही.

गुरुवारची संध्याकाळ आली. जोशीबाई हेडऑफिसला जायला निघाल्या.

"काय मॅडम, आज एकदम छान दिसताय. ब्लाऊझ एकदम मॅचिंग आहे" ती जातकुळीवाली आरेमो म्हणाली. ब्लाऊझ मॅचिंग असण्यात येवढं मोठं ते काय असं पुरुष वाचकसुद्धा म्हणतील. पण आमच्या हॉस्पिटलातल्या वयस्क डॉक्टरांचे ब्लाऊझ भलत्याच रंगांचे असायचे, हे लक्षांत घेतलं तर जोशीबाईंची फॅशन सेन्स लक्षांत येईल.

"हूं" जोशीबाई खुशीत म्हणाल्या. "हेड ऑफिसला जातेय. कमिशनरना भेटायचंय."

"पेढे घेऊन चाललात?"

"जाताना रस्त्यात घेईन."

रात्री पावणेनऊ वाजता जोशीबाई मूडमध्ये परत आल्या. कसलंतरी गाणंपण गुणगुणत होत्या, पण कोणतं ते काही कळलं नाही.

***

जोशीबाईंमध्ये लढाऊ वृत्ती होती याबद्दल मात्र संशय घायला जराही जागा नव्हती. पुढचं रिकामं होणारं युनिट आपल्यालाच मिळालं पाहिजे, कारण आपण फुलटाईम प्रोफेसर आहोत असं त्यांचं म्हणणं होतं, आणि ते त्यांनी विविध व्यासपीठांवर वेळोवेळी मांडलं. त्यांतलं पहिलं व्यासपीठ म्हणजे आमची

स्टाफरूम. ऑपरेशन करून दमलेले डॉक्टर पुढच्या ऑपरेशनपूर्वी जरा उसंत घेण्यासाठी तिथे बसत. घरून दमून कामावर आलेल्या डॉक्टरणी हॉस्पिटलचं काम सुरू करण्यापूर्वी चहा-कॉफी प्यायला तिथे बसत. ज्यांचा वेळ जायचा नाही अशी डॉक्टरमंडळी वेळोवेळी विरंगुळा म्हणून तिथे बसत. जेवण्याच्या वेळी बरीच जणं तिथे सहभोजनासाठी बसत. जोशीबाई या सर्व कारणांसाठी स्टाफरूममध्ये बसायच्याच. पण एरवी कधी तिथे श्रोतृवर्ग आहे असा सुगावा लागला तर हातातलं काम सोडून त्या तिथे पोचायच्या आणि आपलं म्हणणं हिरिरीने मांडायच्या. एक-दोनदा ऐकायला ते ठीक वाटायचं, पण मग त्याच त्या गोष्टीचा ऐकणाऱ्याला कंटाळा यायचा. पुढेपुढे तर जोशीबाईंनी स्टाफरूममध्ये प्रवेश केला की हजर असणारी मंडळी एक एक करून उठून जायला लागली. ऑनररी मंडळी स्टाफरूममध्ये सापडली की जोशीबाईंना स्फुरण यायचं. त्यांच्या वक्तृत्वाला बहर यायचा. फुलटायमर मंडळी निदान तिथून उठून कॅन्टीन किंवा कट्ट्यावर जाऊन बसू शकायची. बिचारी ऑनररी मंडळी पडली वलयांकित. ती काही कॅन्टीन किंवा कट्ट्यावर जाऊन बसू शकत नव्हती. ती तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करत निघून जाण्याची वेळ येईपर्यंत तिथेच बसून राहायची. अर्थात मंडळी तशी उस्ताद होती. जोशीबाईंसारखं हॉस्पिटलच्या आवारातच राहून आणि तिथेच फिरून त्यांची वृत्ती कूपमंडूक झालेली नव्हती. बाहेरच्या जगात वावरून त्यांना व्यापक अशी दृष्टी आलेली होती. तिरकस किंवा सरळ बडबड करून डोकं पकवणाऱ्या माणसाबरोबर कसं वागायचं याचे त्यांचेही ठोकताळे होते. मी

स्वतः अनुभवलेला हा प्रसंग अगदी सूचक आहे. स्टाफरूमध्ये व्यासपीठ काबीज करून जोशीबाई आपली बाजू मांडत होत्या. अनैच्छिक श्रोते होते दोशीमॅडम आणि मेहतासर.

"काही माणसांना मुळी न्यायबुद्धीच नसते" जोशीबाईंनी सुरुवात केली. "ती स्वार्थीपणे सदैव स्वतःच्या फायद्याचाच विचार करत असतात."

ती दोन माणसं गप्पच राहिली.

"गुणवत्ता ही काही ठराविक माणसांचीच मक्तेदारी नसते. इतर माणसंही कर्तबगार आणि हुशार असतात. त्यांनाही त्यांचे हक्क असतात हे सर्वांना कळायला हवं."

मेहतासर हातातलं वर्तमानपत्र शांतपणे वाचत राहिले. दोशीमॅडमनी ब्रिटिश जर्नल बरोबर आणलं होतं ते चाळायला सुरुवात केली.

"वास्तविकपणे आम्ही फुलटायमर नऊ ते चार काम करतो म्हणून हे हॉस्पिटल चालतंय. पण काही माणसं या गोष्टीकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष करतात" जोशीबाईंनी त्या दोघांना डिवचायचे प्रयत्न चालूच ठेवले.

"मेहुल, हे आर्टिकल तू वाचलंस का? गर्भाशयाच्या कॅन्सरचं निदान करण्यावर आहे" दोशीमॅडम मेहतासरांना म्हणाल्या. हळूहळू चढत जाणारा जोशीबाईंचा आवाज त्यांच्या खिजगणतीतही नव्हता.

"कुठचं?" मेहतासर म्हणाले. मग त्यांनी ते जर्नल आपल्या ताब्यात घेतलं आणि ते आर्टिकल वाचायला सुरुवात केली.

"ही माणसं तर इतकी अप्पलपोटी असतात की स्वतःचा हेतू साध्य करण्यासाठी ती सगळे नियम बासनात गुंडाळून

ठेवतात. पैसा आणि सरकारी ओळखी यांच्या जोरावर कायदा हवा तसा वाकवायचं तंत्र त्यांना छान जमतं." जोशीबाईंचा आवाज टिपेला पोचला होता. आपण येवढं जीव तोडून बोलतोय आणि ही दोघं आपल्याकडे साफ दुर्लक्ष करतात म्हणजे काय? त्यांच्या रागाने लालबुंद झालेल्या चेहऱ्याकडे न बघता मेहतासर म्हणाले,

"इंटरेस्टिंग. हा कन्सेप्ट नवाच आहे."

आपल्याला उद्देशून त्यांनी हे म्हटलेलं नाही हे समजण्यायेवढ्या जोशीबाई शुद्धीवर नव्हत्या. मोठ्या फणकाऱ्याने त्या उठल्या आणि तरातरा निघून गेल्या.

"नीना, ती सारखी 'माणसं माणसं' असं म्हणत होती, पण ती माणसं म्हणजे नक्की कोण ते काही म्हणाली नाही" मेहतासर सस्मित मुद्रेने म्हणाले.

"काय माहित. तशी ती पहिल्यापासून थोडी विचित्रच आहे. कधीकधी फारच असंबद्ध बोलते" दोशीमॅडम म्हणाल्या.

कोणाला थेट काही बोलण्याचं धैर्य जोशीबाईंना नसायचं. पण बोलायचं तर असायचं. मग त्या त्या व्यक्तीसमोर 'माणूस' या अनामिक व्यक्तीला त्या बोल बोल बोलायच्या. कमकुवत आणि संवेदनशील मनाच्या माणसांना ते बोलणं जिव्हारी लागायचं. कोणी भांडायला उठलं तर 'मी तुम्हाला उद्देशून तसं म्हटलंच नव्हतं, मी तिसऱ्याच व्यक्तीबद्दल तसं म्हणत होते' असं म्हणायला त्या मोकळ्या रहायच्या. निष्पाप माणसांना त्या काय बोलतात ते कळायचंच नाही. असेल काहीतरी असं समजून ती तो विषय मनातून काढून टाकायची. तुम्ही नक्की कोणाबद्दल बोलताय, असं विचारणं त्यांच्या शिष्टाचारात बसत

नसे. कुठूनच त्रास होत नाही हे लक्षात आल्यामुळे जोशीबाईंनी ही संभाषणाची पद्धत पक्की धरून ठेवली होती.

मी आरेमो म्हणजे त्या खोलीतल्या फर्निचरचा एक भाग आहे किंवा काहीही न समजणारा एक मुका प्राणी आहे असं समजून ती तिघं वागत होती, म्हणून मला हा इंटरेस्टिंग प्रकार पाहता आला. वास्तवात परतल्यावर मी तसा नाही हे त्यांच्या ध्यानात येईल, आणि त्यापूर्वीच आपण येथून निघून जावं या विचाराने मी हलक्या पावलांनी आणि शरीराची फारशी हालचाल न करता तेथून बाहेर पडलो.

***

तृतीय आणि चतुर्थ श्रेणी कामगारांची युनियन असते तशी फुलटायमर डॉक्टरांची युनियन नसते. त्यांना युनियन करण्याची परवानगी नसावी, नाहीतर त्यांनी युनियन कधीच केली असती. अर्थात सर्व जण बुद्धीजीवी असणाऱ्या आणि आपण स्वतः तेवढे शहाणे असं समजणारे अनेक जण सदस्य असणाऱ्या या युनियनमध्ये एकजूट कधीही दिसली नसती. युनियन नसली तरीही कोणीतरी या डॉक्टरांची एक असोसिएशन बनवली होती. तिची एकही मिटिंग न होता वर्षेच्या वर्षे उलटत असत. ही असोसिएशन आपल्यावरील अन्याय दूर करेल असं जोशीबाईंच्या मनाने घेतलं. शेवटच्या मिटिंगच्या वेळी पदाधिकारी कोण होते याचा त्यांनी शोध लावला. मग त्यांच्याकडे जाऊन त्यांनी आपली व्यथा मांडली. या असोसिएशनचं पुनरुज्जीवन केलं तर फुलटायमरना आपले प्रश्न मांडायला एक प्रभावी व्यासपीठ मिळेल आणि एकजुटीने

प्रश्न मांडले तर ते सुटतील असं व्यापक आवाहन त्यांनी आमच्या डिपार्टमेंटच्या लोकांना केलं. मग त्यांनी इतर डिपार्टमेंट्समध्ये जाऊनही असाच प्रयत्न केला.

"इथे कोणाला वेळ आहे असोसिएशनच्या मिटिंगाना जायला?" विशाल म्हणाला. "भडभडे जेमतेम दोन तास हॉस्पिटलात असतात. जवळजवळ सगळी कामं मलाच पार पाडावी लागतात."

इतर बऱ्याच जणांनीही तसंच म्हटलं.

"असोसिएशनच्या मिटिंगांना जायचं तर आपल्याला मेम्बरशिपची फी भरावी लागेल का?" नंदिता पुटपुटली. ती दोशीमॅडमची लेक्चरर होती. मॅडमचा प्रॅक्टिकल स्वभाव तिच्यात उतरला होता.

"असोसिएशनला म्हणावं आधी आमच्या पगारवाढीचा प्रश्न सोडवा. जोशीबाईंच्या युनिटचा प्रश्न त्या मानाने दुय्यम आहे" निनाद म्हणाला.

"पण जोशीमॅडम अगदी मागे लागल्या आहेत की मिटिंगला या आणि आपल्या बाजूने मतदान करा" नंदिता म्हणाली.

"आमच्या सर्वांची मेम्बरशिपची फी त्या भरतात का विचारा त्यांना" निनाद म्हणाला. तो एकदम प्रॅक्टिकल होता. तेवढीच मेम्बरशिप तरी फुकटात पडेल असा त्याचा सरळ हिशेब होता.

"पण इतकी वर्षं जोशीबाई काय झोपल्या होत्या का?" परवेझ म्हणाला. "दोशीमॅडम आणि मेहतासरांना युनिटं मिळाल्यावर त्यांना जाग आली? आणि तेव्हाच असोसिएशनची आठवण

आली? डॉक्टरांची ही असोसिएशन जिवंत रहावी म्हणून इतकी वर्षं काय प्रयत्न केले त्यांनी?"

एखाद्या गोष्टीचा सर्वात महत्वाचा धागा परवेझ अगदी अचूक पकडायचा. सर्व मंडळींनी येवढा उहापोह केला खरा, पण असोसिएशनच्या मिटिंगला कोणीही गेलं नाही. येवढंच काय, त्या मिटिंगला अख्ख्या हॉस्पिटलमधून असोसिएशनचे दोन पदाधिकारी आणि दस्तुरखुद्द जोशीबाई अशी तीनच माणसं पोचली. मिटिंग संपवून परत आल्यावर जोशीबाईंनी स्टाफरूमच्या व्यासपीठावर परत एकदा थयथयाट केला. माणसं कशी तोंडदेखलं गोडगोड बोलतात, पण प्रत्यक्ष मदत करायला कोणीही येत नाही वगैरे बरंच काही त्या बोलल्या. या वेळी त्या फुलटायमर माणसांबद्दल बोलत होत्या. ऐकणारी माणसं एकएक करून उठून निघून गेली. स्टाफरूमबाहेरच्या कॉरिडॉरमध्ये स्टाफरूमपासून सुरक्षित अंतरावर ती थांबली.

"काय कटकट आहे रे बाईची" निनाद म्हणाला. "डोक्यात जाते नुसती."

"मला तर बाई त्या आल्या की भितीच वाटायला लागते. बोलायला लागल्या की त्या थांबतच नाहीत" नंदिता म्हणाली.

"आणि सारखं 'माणसं माणसं' काय करते बाई? सरळ तुम्ही असं म्हणता येत नाही?" निनाद गुरगुरला. "बोलून तर घ्यायचं, पण नामानिराळं रहायचं. एकदम बेकार सवय आहे. हिचा नवरा तिला कसा काय सहन करतो कोण जाणे."

कदाचित म्हणूनच तो रात्री बारा-साडेबारा वाजता घरी येत असेल, असं मला म्हणायचं होतं. पण वडील माणसं बोलतात

तेव्हा तोंड बंद ठेवायचं याची मला जाण होती. मी तोंड बंदच ठेवलं.

"म्हणूनच तिचा नवरा रात्री बारा-साडेबारा वाजता घरी येत असणार" परवेझ म्हणाला.

"पण आपल्याकडे तिचं काम आहे आणि तरीही आपल्यालाच ती नावं ठेवते? बाईला अगदीच डोकं नाही असं दिसतं" निनाद म्हणाला.

"बाई बोर करू नका असं म्हणावसं वाटतं, पण धाडस होत नाही" नंदिता म्हणाली.

"तुम्हाला वाटतंय त्याहून प्रश्न गहन आहे. लेको, बाई जिंकली आणि तिला स्वतःचं युनिट मिळालं, तर उद्या भडभडे रिटायर झाल्यावर आपल्याला एचोडी करा म्हणेल. ती एचोडी झाली तर किती त्रास देईल याचा विचार केलाय का तुम्ही?"

मंडळी गप्प झाली. परवेझ द्रष्टा होता हे सर्वांना ठाऊक होतं. माझ्या मनांत पाल चुकचुकली. या वेळी तरी त्याची चूक झालेली असावी असं माझ्या मनात आलं. तसं प्रत्येकाच्याच मनात आलं असावं अशी त्यांची तोंडं दिसत होती.

***

दरम्यानच्या काळात कमिशनर बदलले. त्यामुळे जोशीबाईंना युनिट द्यायचं कार्य त्यांच्या हातून झालं नाही. जाण्यापूर्वी त्यांनी तेही काम मनात आणलं तर केलं असतं, पण बाईंनी केली तेवढी जादू पुरेशी नसावी. इथे तर बोलण्यासारखी सगळी व्यासपीठं बाईंनी वापरून झाली होती. पत्रामागून पत्रं हेडऑफिसच्या पत्त्यावर रवाना होत होती. पण परिस्थिती मात्र

जैसे थे होती. ऑनररी डॉक्टरांची लॉबी बरीच स्ट्रॉन्ग होती. हेड ऑफिसमध्ये त्यांचं बऱ्यापैकी वजन असावं. इथे जोशीबाईंना काहीच मार्ग दिसत नव्हता.

"अन्यायाचा निषेध म्हणून जोशीबाई राजीनामा देणार आहेत म्हणे" नंदिताने बातमी आणली.

"खरंच?" दोघं तिघं एकदम म्हणाले.

"चल रे, बाई राजीनामा देणार नाही" परवेझ म्हणाला. तो म्हणाला त्या अर्थी त्या नक्कीच राजीनामा देणार नाहीत असं माझ्या मनात आलं आणि उत्फुल्लित झालेलं माझं मन निराश झालं.

"कशावरून?" निनादला प्रत्येक गोष्टीचा पुरावा लागायचा.

"हॉस्पिटलच्या निवासस्थानात रहाताहेत. राजीनामा दिला तर रहातील कुठे? त्यांच्या मिस्टरांनी अजून कुठेही जागा घेतलेली नाही. शहरात कोणाच्या घरी जाऊन रहाण्यासारखे त्यांचे कोणी नातेवाईक नाहीत. त्या इथेच रहाणार आणि स्वतःचं युनिट मिळेपर्यंत आपल्याला सगळ्यांना पिडत रहाणार."

हे बरिक खरं होतं. जोशीबाई हातात डिग्री आणि कपड्यांची एक बॅग घेऊन शहरात आल्या होत्या. आमच्या हॉस्पिटलात सिनियर आरेमो म्हणून कामाला लागल्या होत्या, ज्यामुळे पोटापाण्याचा आणि रहाण्याचा असे दोन्ही प्रश्न तात्पुरते तरी सुटले होते. पुढे त्यांना नशीबाने हात दिला. आरेमोंचा संप झाला. सर्वांबरोबर बाई पण संपावर गेल्या. मग त्यांनी विचार केला. भले न्याय आरेमोंच्या बाजूने असो, न्यायाने पोट भरत नाही आणि रहायला जागाही मिळत नाही. एकजूट वगैरे गोष्टी नैतिकतेच्या गप्पा मारायला ठीक असतात. पण शेवटी प्रत्येक

जण आपल्याला पाहिजे ते करायला स्वतंत्र असतो. जर आयुष्यातले प्रश्न सुटत असतील तर नीतीमुल्ये खड्ड्यात गेली तरी चालतं. अशा समविचारांच्या इतर दोन आरेमोंबरोबर जोशीबाईंनी संप मोडला. तिघं कामावर हजर झाले. संप फुटला म्हणून हॉस्पिटलने मोठा गाजावाजा केला. आता जे कामावर येणार नाहीत त्यांच्यावर कारवाई करू असं जाहीर केलं. इतर बरेच आरेमो घाबरले आणि कामावर रुजू झाले. संपाचे तीन तेरा झाले. मागण्या मान्य होणं राहिलं दूर, उलट शिक्षा होऊ नये म्हणून गयावया करण्यापर्यंत पाळी गेली. आरेमोंचं त्यांच्या नशीबांत लिहिलं होतं ते झालं. त्याला जोशीबाई काय करणार? त्या संपफोड्या तिघांचं मात्र भलं झालं. तिघांना हॉस्पिटलने पूर्णवेळ लेक्चररच्या नोकऱ्या दिल्या. हॉस्पिटलच्या आवारातल्या निवासस्थानात रहायला जागा दिल्या. आयुष्य नव्हत्याचं होतं झालं. कंबरडं मोडलेले संपकरी आरेमो त्यांच्यावर खुन्नस ठेवून होते. पण त्यांना विचारतो कोण? बाईंचं काहीही बिघडलं नाही. ती पोरं कालपरत्वे आपापल्या परिक्षा पास करून आपापल्या मार्गाने गेली. नवीन आलेल्या आरेमोंना भूतकाळाची जाणीव नव्हती. जोशीबाई एकदम उजळ माथ्याने आपला मोठेपणा मिरवू लागल्या. ते आजच्या घडीपर्यंत सुखेनैव चालू होतं.

जोशीबाईंना नशीबाने परत एकदा हात दिला. त्या ज्यांच्या युनिटमध्ये काम करत असत ते पारकरसर ऑनररी होते. ते खाजगी प्रॅक्टीसमध्ये अतिशय बिझी असत. राजमाता रुग्णालयासाठी द्यायला त्यांच्याकडे फारसा वेळ नसायचा. त्यांची प्रॅक्टीस मध्य आणि दक्षिण अशी शहराच्या दोन

भागात विभागलेली होती. मध्यावरच्या क्लिनिकपासून आमचं हॉस्पिटल १०-१५ मिनिटांच्या अंतरावर होतं. तेव्हा मध्य क्लिनिकमधून दक्षिण क्लिनिककडे जाताना ते राजमातात थांबायचे. त्यांना दाखविण्यासाठी जे पेशंट आम्ही थांबवून ठेवलेले असायचे त्यांना ते बघायचे, आणि लगेच दक्षिण क्लिनिकला जायचे. तरुण होते तेव्हा ही धावपळ त्यांना आवडायची आणि झेपायची सुद्धा. पण वयाची पन्नाशी उलटली आणि सरांना ही धावपळ नकोशी वाटायला लागली. आता ही दगदग कमी करा असं त्यांच्या सौभाग्यवती त्यांना म्हणायला लागल्या. एकदा सकाळी साडेसहा वाजता मी त्यांना फोन केला. तो त्यांच्या सौभाग्यवतींनी उचलला.

"हॅलो, डॉक्टर पारकर आहेत का?" मी विचारलं.

"हो, आहेत. आपण कोण?"

"मी राजमाता हॉस्पिटलातून त्यांचा रजिस्ट्रार बोलतोय."

"ते आंघोळ करताहेत. काही निरोप देऊ का?"

"एका पेशंटचं सिझेरियन करायला लागेल असं मला वाटतंय. त्यांना विचारायचंय."

"थांबा हं, मी त्यांना विचारते" असं म्हणून त्या गेल्या. मग बाथरूमच्या दारावर हाताने ठोकल्याचा आवाज आला.

"अहो, ऐकलंत का, तुमच्या रजिस्ट्रारचा राजमातातून फोन आहे."

"......" पारकर काय म्हणाले ते काही ऐकू आलं नाही.

"एका पेशंटचं सिझेरियन करायचंय असं म्हणताहेत" सौभाग्यवतींनी माहिती पुरवली.

"...."

"बरं. आता हॉस्पिटल सोडा म्हणून मी कधीची सांगतेय, पण ऐकाल तर ना?" त्या म्हणाल्या. बाथरूमच्या दारापासून फोनपर्यंत यायला लागेल तेवढा वेळ गेला. मग त्यांचा आवाज आला, "त्यांनी तुम्हाला सिझेरियन करायला सांगितलंय."

"थँक्स. गुड डे" असं म्हणून मी फोन ठेवला. काहीही जास्त माहिती न विचारता पारकरांनी मला सिझेरियन करायला सांगितलं त्या अर्थी त्यांना माझ्या ज्ञानाची आणि कर्तृत्वाची जाणीव झाली असणार असं वाटून माझी छाती इंचभर फुगली. माझा हा गोड गैरसमज बरेच दिवस टिकून होता. कालांतराने माझ्या लक्षात आलं की कदाचित त्यांना तेवढं बोलायलाही वेळ नसेल आणि मी तसा ठीक आहे येवढं माहीत असल्यामुळे त्यांनी मला सिझेरियन करायची परवानगी देऊन टाकली असेल.

तर सांगायचा मुद्दा हा की पारकरांना फुकट घालवायला अजिबात वेळ नव्हता. अशा परिस्थितीत नगरपालिकेने हॉस्पिटलच्या समोरच्या डांबरी रस्त्याचं कॉँक्रीटीकरण करायला घेतलं. रस्त्याची एका वेळी एक बाजू बंद करून दुसरी बाजू टप्प्याटप्प्याने पूर्ण करायची आणि मग दुसरी बाजू बंद करून पहिली बाजू पूर्ण करायची असा तो साधारण सहा महिन्यांचा कार्यक्रम होता. त्यामुळे तिथे रोज ट्राफिक जॅम व्हायला लागला. जे अंतर पारकर रोज दहा मिनिटांत पार करायचे, त्याला आता चाळीस पन्नास मिनिटे लागायला लागली. सौभाग्यवतींनी अनेकदा सांगून काही उपयोग झाला नव्हता, पण नगरपालिकेने तेच काम एका आठवड्यात करून दाखवलं. पारकरांनी राजमाता हॉस्पिटल सोडायचं असं ठरवलं.

"अरे, पारकर हॉस्पिटल सोडून चाललेत" निनादने बातमी आणली.

"पण त्यांची पाच वर्षं शिल्लक आहेत ना."

"हो. पण ते चाललेत."

"वेळ मिळत नाही त्यांना. प्रायव्हेट प्रॅक्टीस आणि इथे असं दोन्ही सांभाळताना फार त्रास होतो असं म्हणतात ते."

मी जाऊन त्यांना स्वतःच विचारलं "सर, तुम्ही हॉस्पिटल सोडून जाताय का?"

"हो, येत्या एक तारखेपासून" ते म्हणाले.

"सर, पण असे अकस्मात का चाललात? अजून आमचं एम्.डी. व्हायचंय. आम्हाला तुम्ही हवे आहात. अजून खूप शिकायचंय तुमच्याकडून" मी म्हटलं. ते जरासे गहिवरले.

"होय रे. माझी जाण्याची इच्छा नाहीये. पण नाईलाज आहे. रोज येथे येण्याजाण्यात दीड तास जातो. रस्ते दुरुस्तीचं काम चालू आहे ना" ते म्हणाले.

"सर, ते काम काय संपेल लौकरच" मी म्हटलं.

"छे रे. सहा महिने तरी लागतील" ते म्हणाले.

रोज दीड तास म्हणजे सहा महिन्यांत सरांचं किती आर्थिक नुकसान झालं असतं याची मला कल्पना होती. मी गप्प झालो. सरांचं म्हणणं खरं निघालं. काम संपायला साडेसात महिने लागले. इथे रस्ता डांबराचा की कॉन्क्रीटचा याचं जोशीबाईंना काही सोयरसुतक असायचं काही कारण नव्हतं. पण कॉन्क्रीटीकरणामुळे त्या फार खूश झाल्या. पारकर सोडून गेल्याबरोबर जोशीबाईंनी धावपळ केली, हेड ऑफिसला चकरांमागून चकरा मारल्या आणि पारकरांचं रिकामं झालेलं

युनिट स्वतःच्या नावावर करून घेतलं. पारकरांसारखा धुरंधर शल्यतज्ज्ञ हॉस्पिटल सोडून गेल्यामुळे हॉस्पिटलमधल्या रुग्णांचं आणि विद्यार्थ्यांचं अपरिमित नुकसान झालं. आता त्यांच्या युनिटची सूत्रं जोशीबाईंच्या हातात गेल्यामुळे झालेली पोकळी भरून निघणार की जास्त नुकसान होणार अशी भिती माझ्या आणि इतर आरेमोंच्या मनांत दाटून आली. परवेझने द्रष्टेपणाने केलेलं भाकीत खरं झालं तर काय करायचं हे आमच्यापैकी कोणालाच माहीत नव्हतं. किंबहुना काही करण्याची ताकद कोणामध्ये असेल असं वाटत नव्हतं.

"सत्याचा विजय झाला. माझ्या कर्तृत्वाला आणि मेहनतीला उशीरा का होईना न्याय मिळाला" हातांत सूत्रं घेतल्यावर जोशीबाईंनी जाहीर केलं. याचे रुग्णसेवेवर काय परिणाम होतील ते कालांतरानेच समजलं असतं. पण त्याचे डिपार्टमेंटमधल्या इतरांवर काय परिणाम झाले ते मात्र लगेच दिसले.

"कॉन्ग्रॅट्स" मेहतासर जोशीबाईंना म्हणाले. "तू केलेल्या धडपडीचं चीज झालं." मेहतासरांची वागण्याची पद्धत छान होती याबद्दल शंका घ्यायला काही जागाच नव्हती.

"अगं मी नेहमी लक्ष्मणला म्हणायचे की तिला एक दिवस युनिट मिळणार" दोशीमॅडम म्हणाल्या. लक्ष्मण हे त्यांच्या नवऱ्याचं नाव. त्या जोशीबाईंबद्दल लक्ष्मणबरोबर बोलणार नाहीत आणि त्यांना युनिट मिळणार असं भाकीत तर कधीच करणार नाहीत याबद्दलही शंका घ्यायला काही जागाच नव्हती.

"बाईला युनिट मिळालं हे एक दृष्टीने बरं झालं. ती आता सारखी पकवत रहाणार नाही" विशाल, निनाद आणि नंदिता यांनी हेच वाक्य जरा शब्दरचना आणि व्याकरण इथेतिथे करून म्हटलं. लेक्चरर मंडळींना या गोष्टीमुळे फारसा फरक पडणार नव्हता. फरक पडणार होता तो आरेमोंना.

***

जोशीबाईंनी युनिटची सूत्रं हातात घेतली आणि त्यांच्या वागण्याबोलण्यात एकदम फरक पडला. आपल्या विषयावरचं आपलं प्रभुत्व सर्वांना दिसलं पाहिजे असं बहुतेक त्यांच्या मनाने घेतलं. मग वॉर्डमध्ये राऊंड घेताना आरेमो हे त्यांचे पहिले बकरे ठरले. मी तेव्हा एम्.डी. च्या परिक्षेची तयारी करत होतो. बाईंनी मला पहिला बकरा करायचं ठरवलं.

'इश," त्या माझ्याबद्दल बोलताना ऐकलेल्या निनादनं मला त्यांची एकदा नक्कल करून दाखवली होती. "तो इतका काय अभ्यास करतो. आम्ही नाही बाई येवढा अभ्यास केला कधी. पण एम्.डी. झालोच ना?"

अभ्यास करणं या गोष्टीला वाईट म्हणणाऱ्या जोशीबाईंची त्यांच्याहून सोळा वर्षांनी लहान असूनही मला तेव्हा कींव आली होती. एका शिक्षकाने विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यास प्रोत्साहन द्यायचं सोडून नावं ठेवायची हे मला तेव्हा कल्पनातीत वाटलं होतं. पण कल्पनातीत गोष्टी करण्यात जोशीबाईंचा हातखंडा होता. अशा घासू पोराला आपलं ज्ञान दाखवण्याचा मोह व्हावा ही अशीच एक कल्पनातीत गोष्ट.

"सांग बरं, पहिल्या तीन महिन्यांनंतर वारंवार गर्भपात होत रहाण्याची कारणं कोणती?" बाईंनी विचारलं.
मी पटापट पाच सहा कारणं सांगितली.
"आणखी काही?" त्यांनी विचारलं.
मी आणखी दोन कारणं सांगितली.
"आणखी काही?" त्यांनी विचारलं.
"आणखी काही नाही" मी म्हटलं.
"कॉर्पस ल्युटियम इन्सफिशियन्सी?" त्यांनी विजयी मुद्रेने म्हटलं. येव्हढा हुशार म्हणवतो स्वतःला, पण मला याच्याहून जास्त ज्ञान आहे पहा, असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर होता. वरिष्ठांनी मूर्खपणा केला तरी तो शहाणपणा आहे असं म्हणून त्यांचं कौतुक करायचं असतं हा शहाणपणा मला तेव्हा कोणी शिकवला नव्हता.
"या आजारात पहिल्या दीड महिन्यात अॅबोर्शन होतं मॅडम, तीन महिने उलटून गेल्यावर नाही" मी ताडकन म्हटलं. बाईंचं तोंड गोरंमोरं झालं तेव्हा मला जरासं वाईट वाटलं, पण त्याला इलाज नव्हता. तो विषय तसाच सोडून बाईंनी राउंड पुढे सुरू केली. मी ती गोष्ट विसरून गेलो, पण बाई काही विसरल्या नाहीत.
'अगं नंदिता, कसा बोलतो ना तो! त्याच्या बरोबर बोलायची भितीच वाटते" जोशीबाईंनी नंदिताकडे आपलं मन मोकळं केलं. नंदिताच ती, तिने 'असं का म्हणता मॅडम?' असं लगेच विचारलं. मग जोशीबाईंनी तिला सगळी गोष्ट सांगितली. नंदिताने त्यांना अनुमोदन दिलं, आणि स्टाफरूमबाहेर पडल्यावर सगळ्यांना ही गोष्ट सांगून टाकली.

"साल्या कॉन्ग्रॅट्स" माझ्या पाठीवर दणकट थाप ठोकून निनाद म्हणाला. "तू रजिस्ट्रार असून एक प्रोफेसर तुझ्याबरोबर बोलायला भितात."
"चल पार्टी दे" संजयची फर्माईश आली.
मी हसलो. "लेको, पार्टी तुम्ही द्या मला. गोष्ट ऐकून मनोरंजन तुमचं झालं की माझं?"
"अरे हा कंजूस काय पार्टी देणार? त्याचा सगळा जोर त्याच्या मेंदूत आणि तोंडात आहे. खिशात नाही" निनाद म्हणाला. असं म्हणून माझी अस्मिता चेतवली तर मी पार्टी देईन असा त्याचा होरा दिसत होता.
"सोड रे. कंजूस म्हण नाहीतर दिलदार म्हण. जोशीबाईंचा पोपट केला म्हणून पार्टी द्यायला मला वेड नाही लागलंय" मी म्हटलं. "कमकुवत प्रतिस्पर्ध्यावर मात केली तर काय येवढं मोठं काम केलं? तू सुद्धा करशील बाईंचा पोपट." मला कंजूस म्हणणाऱ्या निनादला आपली विकेट उडाली हे आजूबाजूची तमाम मंडळी हसली तेव्हा कळलं. तोंडातल्या तोंडात काहीतरी पुटपुटत तो निघून गेला.
"लेका, संभाळ स्वतःला. बाई डूख धरेल तर कठीण जाईल हां" परवेझ म्हणाला.
माझं प्राक्तन म्हणून मी जोशीबाईंचा पोपट केला, अगदी विचार न करता केला. त्या क्षणी अतीव समाधान झालं खरं, पण बाईने डूख धरला तर त्रास नक्कीच झाला असता. प्राक्तन म्हणून त्याचाही स्वीकार करायचा असं मनाशी म्हणून मी जरासा हसलो आणि तो विषय तेथेच सोडला. जोशीबाईंनी परत माझ्या ज्ञानाची परिक्षा घ्यायचा प्रयत्न मात्र केला नाही.

***

काळ पुढे सरकत राहिला. आपल्या स्वतःच्या युनिटमध्ये जोशीबाई सुस्तावल्या. लोकांना पकवणं बंद झालं. 'सुटलो' असा निश्वास तमाम मंडळींनी सोडला. पण भडभड्यांची सेवनिवृत्तीची तारीख जवळ यायला लागली तसतशी जोशीबाईंची सुस्ती उडायला लागली. आता भडभडे गेले की आपण एचोडी म्हणजे विभागप्रमुख व्हायचं असं त्यांच्या मनाने घेतलं. मेहता आणि दोशी हे दोघेही आपल्यापेक्षा सिनियर असणार हे त्यांना माहित होतं. खरं तर मेहतासर एचोडी व्हायला योग्य होते आणि नंबरही त्यांचाच होता. पण आपण फुलटायमर आहोत तर ही मंडळी ऑनररी आहेत. म्हणून आपणच एचोडी व्हायला पाहिजे असं त्यांचं म्हणणं होतं. त्यांनी परत एकदा वेगवेगळी व्यासपीठं गाजवायला सुरुवात केली.

"मी म्हणते एचोडी फुलटायमरच व्हायला पाहिजे" एकदा त्या स्टाफरूममध्ये मोठ्या आवेशाने म्हणाल्या.

"म्हणजे तुम्हीच ना मॅडम?" संजय पुटपुटला.

"नाही. मला तसं म्हणायचं नाही. हा तत्वाचा प्रश्न आहे. मी काय किंवा इतर कोणी काय, जो कोण एचोडी होणार तो फुलटायमरच असला पाहिजे. ऑनररी डॉक्टर असतातच इथे कितीसा वेळ? ते काय काम करणार?"

"भडभडे सर..." येवढं बोलून नंदिता थांबली. ते ऑनररी आहेत पण एचोडीची कामं व्यवस्थित पार पाडताहेत ना, असं तिला बहुधा म्हणायचं होतं. पण जोशीबाईंनी तिला असा काही खुन्नस दिला की तिचं तोंड बंदच झालं.

"पण मॅडम, समजा मेहतासर एचोडी झाले तर? नाही तरी ते आणि दोशीमॅडम एकाच वेळी रिटायर होतील. मग तुमचाच नंबर लागेल" परवेझ म्हणाला. तो जसा समजूतदार होता, तसा द्रष्टा पण होता. बिकट परिस्थितीत योग्य मार्ग कोणता हे त्याला अचूक समजत असे.

"चल रे! तोपर्यंत का म्हणून थांबू मी? त्यांना रिटायर व्हायला अजून तीन वर्षं आहेत. न्याय माझ्याच बाजूचा आहे. मला युनिट मिळविण्यासाठी किती झगडावं लागलं होतं आठवतंय? तेव्हा न्यायाचाच विजय झाला होता" बाई म्हणाल्या.

तेव्हा रस्त्याचं कॉन्क्रीटीकरण सुरू झालं आणि डॉक्टर पारकर गेले म्हणून तुम्हाला युनिट मिळालं, न्याय म्हणून नव्हे, असं बोलायची मला इच्छा झाली. मी ती महत्प्रयासाने दाबली.

"मॅडम, आता कॉन्क्रीटचा रस्ता कमी पडतो म्हणून त्याच्यावर फ्लायओव्हर बांधणार आहेत. ते काम सुरू झालं की दोशीमॅडम आणि मेहतासर दोघेही हॉस्पिटल सोडून जातील बघा. मग काहीही झगडा न करता तुम्ही एचोडी व्हाल बघा" परवेझ निष्पाप चेहऱ्याने म्हणाला. जोशीबाईंनी त्याच्याकडे रोखून बघितलं. तो सरळ बोलतोय की कुत्सितपणे म्हणतोय याचा त्यांना अंदाज आला नाही. शेवटी त्यांनी ते ठरवण्याचा नाद सोडला.

"ते काही नाही. मी तत्त्वासाठी भांडणारच" बाईंनी जाहीर केलं.

मग जोशीबाईंनी कमिशनरना एक लंबचौडं पत्र लिहिलं. मी हुशार म्हणून त्यांनी ते मला वाचायला दिलं. मी ते गंभीर तोंडाने वाचलं. वाचून झाल्यावर त्यांच्याकडे गंभीरपणे पाहिलं.

"काय वाटतं? कसं आहे?" त्यांनी मला विचारलं.

"बरोबर आहे" मी म्हटलं. खरं तर बाईंचं व्याकरण कच्चं होतं. स्पेलिंगच्या चुकापण बऱ्याच होत्या. पण त्या चुका दुरुस्त कराव्या असं काही मला वाटलं नाही. येवढ्या खालच्या मनोवृत्तीच्या बाईला आपणहून कसली मदत करणं माझ्याच्याने झालं नसतं. त्यातून त्यांच्या कामावर कोणी सुधारणा सुचविलेलं त्यांना आवडत नसे हे मला माहीत होतं.
"सगळे मुद्दे आलेत ना?" त्यांनी विचारलं.
"तुम्ही पत्र लिहिल्यावर काय बिशाद आहे सगळे मुद्दे न येण्याची" मी म्हटलं. जर त्या एचोड्डीच्या पोस्टसाठी लायक असत्या तर मी आणखी दोन मुद्दे सुचवले असते. पण येवढ्या महत्त्वाच्या जागेवर त्यांनी बसावं हे मला पटत नव्हतं. पुढे याहून जास्त महत्त्वाच्या जागांवर अशीच कोत्या मनाची आणि कर्तृत्वहीन माणसं अधिकार गाजवताना आपल्याला बघावी लागतील याची मला तेव्हा कल्पना नव्हती.
"पण भाषा चांगली वाटतेय ना" बाईंनी विचारलं. त्यांना बहुतेक कसलंच रिस्क घ्यायचं नव्हतं. इतका वेळ मी मोठ्या निग्रहाने बाळगलेला संयम वाऱ्याच्या झुळुकेनं सावरीच्या कापसाची म्हातारी उडावी तसा उडून गेला.
"तेवढ्या स्पेलिंगच्या सहा चुका आहेत त्या सुधारल्या तर बरं" मी म्हटलं. "आणि या एका वाक्यात क्रियापद घालायचं राहिलंय. सगळं पत्र वर्तमानकाळात आहे, पण हे एक वाक्य भूतकाळात आलंय. येवढ्या गोष्टी सुधारल्या तर पत्र एकदम झकास होईल बघा."
"उं! असल्या गोष्टींना फारसं महत्त्व नसतं." जर तुम्हाला सुधारणा करून नको होत्या तर मला पत्र दाखवून माझं मत

विचारलंत कशाला, असं मी मनातल्या मनात म्हटलं. मी चुका दाखवल्या म्हणून बाई डूख धरेल हे माझ्या लक्षात आलं होतं. झालं तेवढं नुकसान पुरे झालं अशा सूज्ञ विचाराने मी तिथून काढता पाय घेतला. बाईंनी नंतर ते पत्र आमच्या टायपिस्टला टाईप करायला दिलं तेव्हा म्हटलं,

"अगं कुंदा, जर कुठे स्पेलिंग चुकीचं पडलं असेल तर दुरुस्त कर हां. घाईघाईने लिहिलं तेव्हा चुका झाल्या असतील."

बिचाऱ्या टायपिस्टला भिती पडली की जर चुका राहून गेल्या तर आपल्याला ओरडा पडेल. मी हजेरीपटावर सही करायला गेलो तेव्हा तिने मलाच ते पत्र दिलं आणि म्हणाली,

"सर, याच्यात स्पेलिंग कुठे चुकलं असेल तर पहा ना. जोशीमॅडमनी दिलंय."

"अहो, त्यांच्या कशा चुका होतील? प्रोफेसर आहेत त्या" मी म्हटलं. कुंदाबाई बहुधा माझा स्वभाव ओळखून होत्या. त्या नुसत्याच हसल्या. मग मी पटापट त्या सहा चुका दुरुस्त केल्या. जोशीबाई घालायला विसरलेलं क्रियापद कुंदाबाईंनी घातलं होतं. भूतकाळाचा वर्तमानकाळ झाला नव्हता, तो मी करून दिला.

"थँक यू सर" कुंदाबाई म्हणाल्या. मी ते काम कुंदाबाईंसाठी केलं की जोशीबाईंसाठी केलं हे काही सांगता येत नाही, पण माझ्या मते ते कुंदाबाईंसाठी होतं. जोशीबाईंवर माझे उपकार झाले हे जोशीबाईंना कळलंच नाही. ते परमेश्वराच्या दफ्तरी नोंदलं गेलं असेल. कुंदाबाई पत्रावर जोशीबाईंची सही घ्यायला गेल्या, तेव्हा मी त्याची कार्बन कॉपी वाचून पाहिली. मी करून दिलेल्या दुरुस्त्या कुंदाबाईंनी केल्या होत्या खऱ्या, पण नव्या

तीन चुका केल्या होत्या. आता त्यांना ते पत्र परत टाईप करावं लागणार असं माझ्या मनात आलं. किमान चुकांवर पांढरा रंग लावून तेवढाच भाग तरी परत टाईप करावा लागला असता. पण त्यांचं नशीब जोरावर होतं. जोशीबाईंनी पत्रावर सही ठोकली, आणि पोस्टात टाकायला म्हणून कुंदाबाईंच्याच हवाली केलं. ते पत्र घेऊन त्या परत आल्या, तेव्हा मी विचारलं,

"काय म्हणाल्या मॅडम?"

"चांगलं केलंय म्हणाल्या. आता मला ते शिपायाला सांगून पोस्टाच्या पेटीत टाकायचंय."

कमिशनरना पाठवायचं पत्र डीनची सही घेऊन डिस्पॅचने पाठवावं लागत असे, या गोष्टीचं जोशीबाईंना बहुधा विस्मरण झालं असावं.

"अहो, पण अशी पत्रं डीनची सही घेऊन डिस्पॅचने पाठवावी लागतात ना?" मी विचारलं.

"मी पण मॅडमना तेच म्हटलं. तर त्या म्हणाल्या, तू पाठव ते पोस्टाने. मी नंतर कमिशनरना फोन करेन" कुंदाबाई म्हणाल्या.

म्हणजे सगळे नियम आमच्यासारख्या सामान्य माणसांसाठी असायचे तर. मोठ्या मंडळींना मनाला वाटेल तसं करायची मुभा होती.

पांडू शिपाई पत्र आणि स्टँपसाठी पैसे घेऊन पोस्टात गेला. खरं तर पांडूला पाठवण्यात कुंदाबाईंनी मोठी चूक केली होती. पांडूच्या गरजा त्याच्या उत्पन्नापेक्षा मोठ्या होत्या. त्यामुळे तो जमेल तिथून पैसे काढायला बघत असे. कँटीनमधून कॉफी

आणायला पांडूला पाठवलं की कॉफी येत असे, पण उरलेले सुटे पैसे मात्र येत नसत. कोणी त्याला खुशीने उरलेले पैसे देऊन टाकणं वेगळं आणि त्याने खुशीने स्वतःच ते घेऊन टाकणं वेगळं. स्टँपचे पैसे पांडू सत्कारणी लावणार आणि पत्र कचरापेटीत टाकणार अशी माझी अटकळ होती. खरं तर त्याला पोस्टातून स्टँप आणायला सांगायला हवं होतं. मग स्टँप चिकटवून आपणच ते पोस्टाच्या पेटीत टाकायला हवं होतं. पण जोशीबाईंसाठी तेवढी मेहनत करायची कुंदाबाईंची तयारी नसावी. त्यामुळे पांडूच त्या कामासाठी रवाना झाला. जमलं असतं तर आम्ही पांडूच्या पाठी कोणाला तरी तो काय करतो ते बघायला पाठवलं असतं. दुर्दैवाने असं कोणी उपलब्ध असतं तर आम्ही त्याच माणसाला पोस्टात पाठवलं असतं. पांडूने आमचा अपेक्षाभंग केला नाही. त्याने पत्र कचरापेटीत टाकलं की रद्दीत विकलं ते काही समजलं नाही. पण ते कमिशनरना पोचलं नाही हे नक्की. बरेच दिवस झाले तरी पत्राचं उत्तर नाही म्हणून जोशीबाईंनी कमिशनरच्या ऑफिसला फोन केला. तेव्हा असं पत्र आलेलं नाही असं त्यांच्या स्वीय सहायकाने सांगितलं. बाईंनी स्टाफरूममध्ये येऊन आग पाखडली. पोस्टाचा कारभार एकदम गलथान आहे असं जाहीर केलं. दिवाळीला पोस्त मागायला येतात पण साधं एक पत्र धडपणे पाठवत नाहीत वगैरे काहीबाही बोलल्या.

"मॅडम, कुठेतरी अडकलं असेल. पोचेल ते. जरा थांबा" नंदिता म्हणाली.

"जरा म्हणजे किती थांबणार?" जोशीबाई चिडून म्हणाल्या.

"अजून आठवडा- पंधरा दिवस थांब गं" दोशीमॅडम म्हणाल्या.

"हूं!" जोशीबाई फणफणल्या. "तेवढ्या वेळात नाही पोचलं तर?"
"मॅडम, धीर धरा. आजच्या पेपरात तुम्ही नाही वाचलं, की दुसऱ्या महायुद्धात एका जपानी सैनिकाने त्याच्या सहकाऱ्याला पाठवलेलं पत्र इतक्या वर्षांनी अमेरिकेला जाऊन शेवटी जपानला पोचलं आणि त्याला मिळालं. तुमचं पत्र जाऊन तर अवघा एक महिनाच झालाय," निनाद म्हणाला. या गोष्टीवर आम्ही नंतर पोट धरून हसलो. पण जोशीबाईंना त्यातला विनोद समजला नाही.
"गप रे" त्यांनी निनादला चापलं. "मला नाही थांबायचं."
जोशीबाईंनी पत्र परत पाठवायचं असं ठरवलं. त्या आता तरी स्पेलिंग्स दुरुस्त करून पाठवतील अशी मला आशा वाटत होती. पण त्यांनी जुन्याच पत्राची कार्बन कॉपी होती तीच पाठवली. पत्र परत पांडूच्या हातात दिलं. पांडू पोस्टात जायला निघाला. तेव्हा मात्र मला रहावेना. जोशीबाईंसाठी नव्हे तर पांडूच्या इमानदारीची परिक्षा म्हणून तरी या प्रकरणाचा छडा लावायचाच असं माझ्या मनाने घेतलं. पोस्टऑफिस हॉस्पिटलच्या मागे होतं. मी एप्रन स्टाफरूममध्ये टांगून पांडूच्या पाठी निघालो. हॉस्पिटलात असणाऱ्या रुग्णांच्या आणि त्यांच्या नातेवाईकांच्या गर्दीमुळे मी पाठलाग करतोय याचा पांडूला पत्ता लागला नाही. तो हातात पत्र धरून सरळ चालला होता. गेटबाहेर पडल्यावर त्याने हातातलं पत्र बोळा करून रस्त्याच्या कडेला भिरकावलं, आणि चपळाईने पाठीमागच्या झोपडपट्टीकडे रवाना झाला. पहिल्या धारेचा एक पेग पोटात रिचवून हॉस्पिटलात परतायचा त्याचा बेत असावा. मी ते चुरगळलेलं पत्र उचललं, खिशात ठेवलं आणि

हॉस्पिटलात परतलो. जेवायची वेळ झाली होती. मी डबा खायला गेलो. परवेझ, निनाद वगैरे मंडळी डबा खात बसली होती.

"काय रे, पांडूने पत्र नीटपणे पोस्टात टाकलं का?" परवेझने विचारलं.

"छे रे! तो पोस्टऑफिसात गेलाच नाही. त्याने ते पत्र बोळा करून गेटबाहेर रस्त्याच्या कडेला टाकलं आणि तो बहुधा एखादा पेग मारायला म्हणून पाठच्या झोपडपट्टीकडे गेला" मी म्हटलं.

"पण पुरावा आहे का?" आमच्या वकिलाने म्हणजे निनादने विचारलं. "त्याने दुसराच कागद बोळा करून टाकला असेल आणि तो पोस्टात नंतर जाणार असेल."

उत्तरादाखल मी खिशातून ते चुरगळलेलं पत्र काढलं आणि टेबलावर पसरून सपाट केलं. "हे आहे ते पत्र. आपण याला एक्झिबिट ए असं म्हणूया."

मी खिशातून हातबॉम्ब काढला असता तरी त्याचे डोळे येवढे विस्फारले नसते.

"जोशीबाईंना सांगायला हवं."

"कोण सांगणार त्यांना? मी पुरावा आणलाय म्हणून मीच सांगावं असं म्हणाल तर साफ सांगतो, मला जमणार नाही. जो सांगेल त्याने माझं नाव न घेता काय ते सांगायचंय."

"नाव न घेता कसं सांगणार?" निनाद म्हणाला.

"नाव कळलं तर त्या 'कसं, केव्हा, कधी, कोठे' असे असंख्य प्रश्न विचारून भंडावून टाकतील. विकतचं श्राद्ध नको रे बाबा. आणि त्या पांडूचीपण वाट लावतील ते वेगळंच" मी म्हटलं.

"बरोबर आहे. आपण काहीतरी वेगळं केलं पाहिजे" परवेझ म्हणाला.

आम्ही बोलणं बंद केलं आणि डबा खाण्यावर लक्ष केंद्रित केलं. जेवण संपतासंपता परवेझला एक भन्नाट आयडिया सुचली.

"आपण हे पत्र असंच ठेवून देऊया. सात दिवसांनी त्याचावर 'सखेद परत' असं लिहून, ते एका पाकिटात घालून हेड ऑफिसचा पत्ता मागे घालून बाईंना पोस्टाने पाठवून देऊया. पोस्टमन ते डिस्पॅचमध्ये टाकेल, आणि डिस्पॅचवाले ते डिपार्टमेंटला पोचवतील. मग त्याच्यावर ऑफिशियल वाटणारे हॉस्पिटलचे स्टॅम्पसुद्धा येतील. बाई टेन्शनमध्ये जातील."

ही आयडिया झकास होती. ठरल्याप्रमाणे सर्व घडलं. दहा दिवसांनी पत्र डिस्पॅचने आलं. बातमी वणव्यासारखी पसरली. जोशीबाईंच्या आधी ऑफिसात इतरांचीच ही गर्दी झाली. बाई लगबग आल्या. त्यांनी आपलं पत्र ताब्यात घेतलं. पाकीट उघडलं आणि पत्र वाचलं. जनता त्यांच्या तोंडाकडे मोठ्या उत्सुकतेने बघत होती. बाईंचं तोंड बघण्यासारखं झालं.

"असं कसं झालं?" बाई म्हणाल्या.

"मॅडम काय झालं?" निनादने विचारलं. खरं तर काय झालं ते बाईंपेक्षा आम्हा सगळ्यांना जास्त चांगलं माहित होतं. पण ते त्यांना समजू देणं योग्य ठरलं नसतं.

""सखेद परत आलं माझं पत्र" बाई म्हणाल्या.

"मॅडम, तुम्ही कार्बन कॉपी पाठवली म्हणून असं झालं असेल. त्यांना नेहमी मूळ प्रतच लागते" टायपिस्टबाई म्हणाल्या.

"चल गं, काहीतरी काय?" असं बाई साशंक स्वरात म्हणाल्या.

"पत्र चुरगळलेलं दिसतंय. कदाचित त्यांनी ते कचऱ्याच्या डब्यात टाकलं असेल आणि त्यांच्या पी.ए.ने ते बाहेर काढून, सपाट करून परत पाठवलं असेल" निनाद म्हणाला. बाईंनी पूर्वी पकवल्याचा सूड घेत होता तो बहुतेक.
"...." बाई गप्पच राहिल्या. त्यांचं तोंड आणखीनच बघण्यासारखं झालं होतं.
"मॅडम, तुम्ही ते डीनच्या सहीशिवाय पाठवलं म्हणून ते कदाचित परत आलं असेल. वरिष्ठांना पाठवलेली सगळी पत्रं डीनच्या सहीनेच पाठवावी असा संकेत आहे" परवेझ म्हणाला.
'चल रे, काहीतरी काय' असं त्या म्हणाल्या नाहीत कारण हा नियम त्यांना बरोबर माहीत होता. डीननी मध्ये टांग घालू नये म्हणून त्यांनी ते पत्र त्यांच्या सहीशिवाय पाठवलं होतं.
"आता?" बाई म्हणाल्या.
"मॅडम, न्याय तुमच्या बाजूचा आहे. शेवटी विजय तुमचाच होणार. तुम्ही पत्र परत पाठवा" परवेझ म्हणाला.
"असंच?" बाई म्हणाल्या.
"मग काय झाल? ठासून लिहा की तुम्ही सगळ्यात सिनियर फुलटायमर आह्मत आणि मेडिकल कौन्सिलच्या नियमाप्रमाणे एचोडी तुम्हीच व्हायला पाहिजे. ही पोस्ट ऑनररीना मिळता कामा नये."
परवेझचं डोक फिरलं की काय अशी शंका येऊन आम्ही सगळेजण त्याच्याकडे बघायला लागलो. आमच्याकडे दुर्लक्ष करून तो पुढे म्हणाला, "काम झालं की आम्हाला मोठी पार्टी द्यायला मात्र विसरू नका."

"नक्की देईन पार्टी" बाई मोठ्या आनंदाने म्हणाल्या. "कुंदा, मी आत्ता आणते नवं पत्र लिहून. मग ते पटापट टाईप कर."
"ते डीनमार्फतच पाठवा मॅडम, पोस्टाने नको" परवेझने सल्ला दिला. बाई गेल्या. सगळे जण परवेझवर तुटून पडले.
"काय रे, असली आयडिया बाईंना दिलीस. उद्या एचोडी होतील ना त्या!"
"लेको, गप्प बसा. मेडिकल कौन्सिलचं असं पत्र गेल्या आठवड्यात आलंय. मेडिसिनच्या नोटिसबोर्डावर लागलंय ते. वेगवेगळ्या सात-आठ गोष्टी त्यांत आहेत. त्यांतलीच एक ही गोष्टही आहे. मी सांगितलं नसतं तरी बाईंना ही गोष्ट कुठून तरी कळलीच असती. आणि नसती कळली तरी नियमाप्रमाणे त्याच एचोडी झाल्या असत्या. मी तुमच्या एका पार्टीची सोय लावलीय. आभार माना माझे."
आम्ही त्याचे आभार मानले.

***

नशीबाचे फेरे जोशीबाईंच्या बाजूने पडायला लागले असं दिसायला लागलं होतं. मेडिकल कौन्सिलने सांगितलं तसं करणं हॉस्पिटलला बंधनकारक होतं. भडभडे रिटायर झाले की जोशीबाई एचोडी होणार याबद्दल कोणाच्याही मनात काही शंका राहिली नव्हती. मेहतासर आणि दोशीमॅडम आता त्यांच्याबरोबर जरा आदराने वागायला लागले होते. ऑनररी आणि फुलटायमर यांच्या वर्षानुवर्षे चालत आलेल्या लढाईत इतकी वर्षं ऑनररींचं पारडं जड असायचं. मेडिकल कौन्सिलच्या नियमानुसार आता फुलटायमरांचं पारडं खाली

गेलं होतं, भले त्यांच्यात तेवढी गुणवत्ता असो वा नसो. बदलत्या काळाचे हे निर्देशक बघून भिती वाटायला लागली होती. पण झाल्या गोष्टीला काही इलाज नव्हता. मेडिकल कौन्सिलला काही सांगण्यायेव्हढे आम्ही मोठे नव्हतो. आणि आज समजतंय, तेव्हढे मोठे असणाऱ्यांचं सुद्धा मेडिकल कौन्सिल काही ऐकत नसे. असो. आम्ही जर फुलटायमर म्हणून चिकटून राहिलो असतो तर आमचा वैयक्तिक फायदा झाला असता ही एकच जमेची बाजू दिसत होती. पण चार चांगल्या माणसांचं भलं होताहोता अशा किती जोशीबाई वर चढल्या असत्या याचा विचार अस्वस्थ करणारा होता खरा.

कालांतराने भडभडेसरांचा निरोपसमारंभ पार पडला. सरांनी आम्हा आरेमोंनापण बोलावलं होतं. सर मोजकंच पण मनाला चटका लागेल असं बोलले. बोलताना त्यांचे डोळे भरून आले आणि ऐकताना आमचे. वैद्यकीय विद्यार्थी म्हणून आमच्या कॉलेजात आल्यापासून एचोडी म्हणून रिटायर होईपर्यंतचा काल त्यांनी दहा मिनिटांत आमच्या समोर मांडला. जाताना कातर झालेलं मन आमच्या समोर उघडं केलं. संस्थेचा वारसा आपल्यानंतर जपा असं म्हणून सर खाली बसले. असे एचोडी पुन्हा मिळणार नाहीत या विचाराने आम्ही दुःखी असताना सरांच्या वारसदार जोशीबाई बोलायला उभ्या राहिल्या.

"सरांना मी त्यांच्या यापुढील आयुष्यासाठी सुयश चिंतिते" बाई म्हणाल्या. "संस्थेच्या भेटीला त्यांनी वेळोवेळी येत रहावं, आम्हाला आनंदच होईल. माझ्या स्वतःच्या खूप काही योजना आहेत. त्या त्यांना दिसतीलच" असं काहीबाही त्या बराच वेळ बोलल्या. आपण उद्यापासून एचोडी होणार याची खात्री त्यांच्या

शब्दाशब्दातून ध्वनीत होत होती. एका बाजूला सर चालले याचं दुःख होतं, तर दुसऱ्या बाजूला या जबाबदारीच्या खुर्चीवर जोशीबाई बसणार याचं दडपण होतं. तो दिवस जोशीबाईंना फार छान गेला असणार, पण उद्यापासून काय होणार या विचाराने तो आम्हा सर्वांना फारच वाईट गेला. नवा दिवस उजाडला, तो काही वेगळंच घडवून गेला.

सकाळी नऊ वाजता डिपार्टमेंटचं ऑफिस उघडलं. आम्ही हजेरीपटावर सही करण्यासाठी तेथे गेलो तेव्हा एक हडकुळासा, उभट चेहऱ्याचा, सावळा, पांढऱ्या केसांचा कोंबडा पाडलेला, आणि डोळ्यांना जाड काळसर भिंगांचा चष्मा लावलेला एक माणूस तिथे हजर झाला.

"मी डॉक्टर कावळे. एचोडी म्हणून माझी आजपासून इथे नियुक्ती झाली आहे" त्याने टायपिस्टबाईंना सांगितलं. कुंदाबाईंनी लगबगीने पांडूला सांगून एचोडीचं ऑफिस उघडून घेतलं. कावळेसर एचोडीच्या खुर्चीवर विराजमान झाले. त्यांच्या नियुक्तीच्या पत्राची प्रत फाईलला लागली. रुजू झाल्याचं त्यांचं पत्र डीनकडे पाठवण्यात आलं. बातमी वणव्यासारखी पसरली. कोणाला कसलाही सुगावा न लागता येवढी मोठी गोष्ट कशी काय घडली हे कोणालाच समजेना. नंतर हळूहळू पत्ता लागला.

"अरे, मेडिकल कौन्सिलच्या नियमाप्रमाणे जर फुलटायमर एचोडी होणार तर तसं करा असं कमिशनरनी सांगितलं म्हणे" निनाद म्हणाला. "कावळेसर नगरपालिकेच्या दुसऱ्या हॉस्पिटलात प्रोफेसर होते. सेवाज्येष्ठतेनुसार ते सगळ्या प्रोफेसरांत सिनियर होते. त्यांनी पत्र टाकलं की त्यांना

नियमानुसार आपल्याकडची एचोडीची पोस्ट मिळावी. त्याप्रमाणे त्यांना एचोडीची पोस्ट मिळाली."

"म्हणजे मेहेनत केली जोशीबाईंनी आणि फळं चाखताहेत कावळेसर!" नंदिता म्हणाली.

"आपल्याला येवढ्या पकवायच्या त्याची शिक्षा त्यांना मिळाली असणार" राजेश म्हणाला.

कावळेसरांचा अवतार पाहून माझ्या मनात अशुभाची पाल चुकचुकली होती. आपण आगीतून सुटून फुफाट्यात तर नाही ना पडलो, असं माझ्या मनात आलं, आणि तसं असलं तर ती आपल्या कुठच्या कर्माची फळं म्हणायची असंही मला वाटलं.

कावळे आमच्याकडे एचोडी म्हणून आल्यानंतर महिन्याभराने आमची एम्.डी.ची परिक्षा झाली. कावळे आमच्याकडे येण्यापूर्वी ज्या हॉस्पिटलात होते त्या देसाई जनरल हॉस्पिटलमध्ये आमची परिक्षा होती. सर्व जण वाचतात ती सर्व पुस्तकं माझी वाचून झालेली होतीच, पण लायब्ररीत असलेली नवी जुनी अशी सर्व पुस्तकंसुद्धा वाचून झाली होती. त्यामुळे परिक्षेचं तसं टेन्शन नव्हतं. टेन्शन होतं ते मोटवानी मॅडमचं. त्या प्रमुख परिक्षक होत्या. त्या इतर हॉस्पिटलातल्या विद्यार्थ्यांना त्रास द्यायच्या आणि आपल्या विद्यार्थ्यांना वर खेचून घ्यायच्या असं सर्व जण म्हणत असत. त्या पूर्वी आमच्या हॉस्पिटलात होत्या आणि त्यांना ऑनररींनी फारशी चांगली ट्रीटमेंट दिली नव्हती म्हणून त्या आमच्या विद्यार्थ्यांना जास्तच छळत असत असं लोकं म्हणत असत. त्यामुळे परिक्षेत काय होणार अशी थोडीशी चिंता होती. परिक्षेच्या वेळी आम्हाला एक सरप्राईज मिळालं. बाहेरगावचे

परिक्षक आले नाहीत म्हणून विद्यापीठाने भडभडेसरांना परिक्षक म्हणून नेमलं. माझी पहिल्या दिवशीची मौखिक परिक्षा छान झाली. सर्व प्रश्नांची उत्तरे मी बरोबर दिली. एक-दोन मुद्द्यांवर माझं म्हणणं मोटवानींच्या म्हणण्यापेक्षा जास्त बरोबर निघालं. मी आनंदात हॉस्पिटलात परत जायला निघालो. तेवढ्यात मला निशाने हाक मारून थांबवलं. ती मोटवानींची लेक्चरर होती.

"अरे, थांब. तू खूप हुशार आहेस हे आम्हा सर्वांना माहित आहे. पण तू परिक्षकांबरोबर येवढ्या अरेरावीने बोलू नकोस रे. शेवटी तेच तुला मार्क देतात हे लक्षात ठेव."

"अरेरावीने? केव्हा?" मी आश्चर्याने विचारलं.

"मग काय? मोटवानी मॅडम तुझ्यावर खसकल्या आहेत. तू खूपच शहाणपणा करतोस असं त्या म्हणत होत्या."

मला धक्काच बसला. स्वतःला असलेलं ज्ञान उघडपणे सांगणं याला अरेरावी म्हणतील असं मला वाटलं नव्हतं.

"मोटवानी मॅडमनी तुला पी-प्लस ग्रेड दिलीय."

"पी-प्लस?" मला परत एक धक्का बसला. पी-प्लस म्हणजे उत्तीर्णच्या जरा वर. जी म्हणजे गुड. मला तर स्वतःला जी-प्लस ग्रेड मिळणार अशी खात्री वाटत होती.

"आणि तू जर सौम्यपणे बोलला नाहीस तर परवाच्या परिक्षेत तुला पी-मायनस मिळेल कदाचित."

"थँक्स" असं म्हणून मी बाहेर पडलो. डोकं बधिर झाल्यासारखं वाटत होतं. सत्याचा नेहमी विजय होत नाही, तर अपप्रवृत्तींचाच बऱ्याचदा होतो हे मला समजावं म्हणून देवाने

मला दिलेला तो पहिला धडा होता. सुन्न मनाने मी हॉस्पिटलात परत आलो.

"काय रे, तुझा चेहरा असा का दिसतोय? काय झालं?" परवेझ मला गेटवर भेटला. माझा चेहरा पाहून काहीतरी बिनसलंय ते त्याला बहुधा समजलं असावं. मी काय घडलं ते त्याला सांगितलं.

"हे xxx लोक विद्येच्या पवित्र क्षेत्रातही घाण करून ठेवतात" तो म्हणाला. साधारणपणे तो संतापत नसे. तोंडातून अपशब्द तर कधीच काढत नसे. त्याच्या कपाळावरची शीर फुगलेली तर मी तेव्हाच पहिल्यांदा पाहिली. आपण उगाचच सगळी गोष्ट सांगून त्याला त्रास दिला असं माझ्या मनात आलं. नाहीतरी तो बिचारा मला काय मदत करू शकणार होता?

'जाऊ दे रे" मी म्हटलं. "मी बघतो काय करायचं ते."

"बेस्ट ऑफ लक" तो म्हणाला. असे दहा परवेझ आमच्याकडे असते तर आमचं हॉस्पिटल देशातलं नंबर एकचं हॉस्पिटल झालं असतं असं माझ्या मनात आलं. मी डिपार्टमेंटच्या पायऱ्या चढत होतो तेव्हा मला जोशीबाई भेटल्या. कावळे आल्यापासून त्या आम्हा सर्वांबरोबर जरा आपुलकीने वागायला लागल्या होत्या.

"काय रे, कुठे गेला होतास?" अंगावर एप्रन नसल्यामुळे मी बाहेर गेलो होतो हे त्यांच्या पटकन लक्षात आलं असावं.

"एम्.डी. च्या परिक्षेला जाऊन आलो. एक मौखिक परिक्षा झाली. दुसरी परवा आहे."

"कशी झाली?"

"ठीक होती. पण एक प्रॉब्लेम आहे. मी उत्तरं बरोबर दिली, पण मोटवानी मॅडम मला योग्य ती ग्रेड द्यायला तयार नाहीत असं दिसतं. जी-प्लस जागी त्यांना मला पी-प्लस दिली. कारण काही समजत नाही. कदाचित त्यांचे दोन विद्यार्थी परिक्षेला बसलेयत म्हणून असेल."

"हं?" जोशीबाई म्हणाल्या.

"मॅडम, मोटवानी आणि तुम्ही पूर्वी एकत्र होता. तुमची चांगली मैत्री आहे असं ऐकतो. काय प्रॉब्लेम आहे ते तुम्ही एकदा बोलून बघता का?"

"अं...अं... मी काय बोलणार?"

स्वतःचे प्रॉब्लेम सोडवायला सगळ्या हॉस्पिटलने आपल्या पाठीशी उभं रहावं अशी अपेक्षा बाळगणाऱ्या जोशीबाई आपल्या हॉस्पिटलच्या विद्यार्थ्याला अकारण त्रास होतोय तरीही त्याबद्दल काहीच करायला तयार नव्हत्या. उगाचच त्यांना मदत करा असं म्हटलं असं माझ्या मनात आलं. "ठीक आहे" असं म्हणून मी वळलो, माझ्या खोलीवर गेलो आणि विचार करत बसलो. आतापर्यंतच्या आयुष्यात असं काही कधी घडलं नव्हतं. सक्त मेहनत करायची आणि मग तिचं फळ हे मिळणारच असा माझा अनुभव होता. ज्ञान हा यशाचा पाया असतो असं लहानपणापासून शिकलो होतो आणि त्याला छेद देण्यासारखं काही कधी घडलं नव्हतं. सत्याचाच नेहमी विजय होतो हे बोधवाक्य चिरंतन सत्य आहे असं मला वाटत आलं होतं ते चूक होतं का? चित्रपटात खलनायक असतो आणि तो हिरोवर अनेक अत्याचार करत रहातो, पण शेवटी हिरोच जिंकतो असं लहानपणापासून बघत

आलो होतो, ते खरं असतं आणि आपल्या आयुष्यात मीच हिरो असल्यामुळे शेवटी विजय हा माझाच होणार असं मी पोरकटपणे समजत आलो होतो. इतकी वर्षं इतका अभ्यास केला, इतकी पुस्तकं आणि जर्नल्स कोळून प्यायलो, इतक्या रुग्णांवर उपचार केले ते सर्व फुकट असं निदान परिक्षा सुरू असताना वाटायला नको होतं. केवळ स्वतःच्या भूतकाळातल्या कडवट आठवणींवर उतारा म्हणून म्हणा किंवा स्वतःच्या कॉलेजच्या दोन विद्यार्थ्यांना आपण वर खेचलं हा मोठेपणा मिरवता यावा म्हणून म्हणा, आपल्या मुलांच्या बरोबरच्या, आणि उमेदीच्या वयाच्या एखाद्या मुलावर येवढा अन्याय करताना त्या बाईला काहीच वाटलं नसावं ना? उद्या परमेश्वराने जाब विचारला तर काय स्पष्टीकरण द्यायचं याचा तरी त्या बाईने विचार केला असेल का? की प्रोफेसर आणि परिक्षक म्हणजे आपणच परमेश्वर असं त्या वयाला आणि पदाला पोहोचलं की वाटायला लागत असेल? डोकं विचारांच्या कल्लोळानं अगदी भरकटून गेलं होतं. सिनेमांत असतं तसं आयुष्य नसतं हे नुकतंच शिकलो होतो, नाहीतर एकट्याने जाऊन काहीतरी प्रचंड मारझोड आणि तोडफोड करून यावं म्हणून मी बाहेर पडलो असतो. तसं काही करायला जमलं नसतं ही गोष्ट वेगळी, पण एका डॉक्टरच्या मनांत असा विचार यावा यावरून परिस्थिती किती गंभीर होती हे लक्षात यावं. मनातला कल्लोळ जरासा शांत झाला तेव्हा असा विचार करून काही साध्य होणार नाही हे माझ्या ध्यानात आलं. जरा थंड डोक्याने विचार केला तर काहीतरी मार्ग सापडेल असं मी मनाशी म्हटलं, आणि खरोखरच मला एक कल्पना सुचली.

भडभडे सरांच्या कानावर ही गोष्ट घातली तर ते नक्की आपल्याला न्याय मिळवून देतील असं माझ्या मनात आलं. सरांचा मुलगा आमच्याच कॉलेजात शिकत होता. मला ज्युनियर होता. मी अंगावर शर्ट चढवला आणि त्याला शोधायला बाहेर पडलो. लायब्ररी, कँटीन, कट्टा असं करत करत मी त्याला अर्ध्या तासानंतर शोधून काढलं.

"अरे चंदू, माझं एक काम आहे" मी म्हटलं.

"काय रे?" तो म्हणाला.

"अरे, आज माझं एम्.डी.चं पहिलं प्रॅक्टिकल झालं" असं म्हणून मी सुरुवात केली आणि त्याला काय घडलं ते सविस्तर सांगितलं. "सरांना यातलं काही माहीत नसावं असं मला वाटतं. तू सांगशील का?" मी म्हटलं.

"हो, आत्ता सांगतो" तो म्हणाला. त्याने माझ्या समोर सरांना लगेच फोन लावला. मी काय सांगितलं होतं ते सगळं सांगितलं. मग थोडा वेळ सर बोलले आणि तो ऐकत राहिला. मग त्याने 'बरं बाबा' असं म्हणून फोन खाली ठेवला, माझ्याकडे वळला आणि म्हणाला, 'बाबांना या गोष्टीची काही कल्पना नव्हती. मार्क्स द्यायचं काम त्यांनी मोटवानींवर सोपवलं होतं. पण काय करायचं ते आपण बघतो, तू काही काळजी करू नको असं ते म्हणाले."

"थँक्स, सरांना आणि तुला दोघांनापण" मी म्हटलं. मी निश्चिंत झालो. तो हसला आणि गेला. मी रूमवर परत गेलो. परमेश्वर कधी कोणत्या रूपात भेटेल सांगता येत नाही असं माझ्या मनात आलं.

माझ्या दुसऱ्या प्रॅक्टिकल परिक्षेला भडभडे सरांनी कमाल केली. चार परिक्षकांच्या रांगेत ते एका कडेला इतर तिघांकडे पाठ करून बसले, आणि एक कान माझ्या दिशेला केला. मोटवानी बाई अस्वस्थ दिसत होत्या. सरांनी मला एकही प्रश्न विचारला नाही. पण माझी उत्तरं अगदी काळजीपूर्वक ऐकली. परिक्षा छान झाली. मला कोणती ग्रेड मिळाली देव जाणे. वास्तविक रिझल्ट विद्यापीठ जाहीर करत असे. पण परिक्षेच्या शेवटी मोटवानीबाईंनी स्वतः बाहेर येऊन रिझल्ट जाहीर केला. आपल्या दोन विद्यार्थ्यांना पहिला आणि दुसरा क्रमांक मिळाला असं सुहास्य वदनाने, तर मी तिसरा आलो असं वाकड्या तोंडाने जाहीर करून त्या परत गेल्या. बाई मला नापासच करेल अशी परिस्थिती दिसायला लागली होती. सरांनी बाईंना माझ्यावर अन्याय करण्यापासून परावृत्त केलं हे त्यांचं मोठेपण. कुठे सर आणि कुठे जोशीबाई असं माझ्या मनात आलं. दुर्दैवाने सर रिटायर झाले होते तर बाई मागे राहिल्या होत्या. त्यांचीच मैत्रीण मोटवानी. मोटवानीबाईंनी मला अकारण जो त्रास दिला त्याचा बदला काही घेता आला नाही. आज त्या कुठे आहेत माहीत नाही. देवाने त्यांना काय ती शिक्षा दिली असेल असं मानून मी पुढे गेलोय, पण ती शिक्षा काय ते कळलं असतं तर जास्त बरं वाटलं असतं. गुणवत्ता असणाऱ्या आणखी विद्यार्थ्यांचं त्यांनी नुकसान करण्यापूर्वी देवाने त्यांना शिक्षा दिली असावी, आणि शिक्षा नाही तर किमानपक्षी सुबुद्धी तरी दिली असावी अशी मी आशा धरून आहे.

****

मी एम्.डी. झालो. शिक्षण घेणं हे आपलं आद्य कर्तव्य असं समजून आजवरचा प्रवास पार पाडला होता. माझ्या शिक्षणात मोठा अडथळा येईल, आणि मी बहुतेक शिक्षणाची लाईनच बदलेन असं भाकित एका मोठ्या ज्योतिषाने माझ्या लहानपणी करून ठेवलं होतं. तेही माझी कुंडली मांडून, माझे पाळण्यातले पाय वगैरे बघून नाही. त्यामुळे मी एम्.डी. पास होईपर्यंत माझ्या आईला चिंता होती. शाळेपासून मुलाने पहिला नंबर कधी सोडला नाही म्हणून काय झालं? या ज्योतिषाने वर्तवलेलं आमच्या घरातल्या इतर कोणाचंही भाकित कधीही चुकलं नव्हतं म्हणे. मी काय जगावेगळा होतो? मी डॉक्टरकी सोडून इतर कोणती लाईन निवडेन असाही विचार तिने करून झाला होता. मी एम्.डी. झालो आणि भाकित खोटं ठरलं. आई निश्चिंत झाली. मुलगा आता प्रॅक्टीस करणार आणि खूप कमावणार असं दादांना, म्हणजे माझ्या वडिलांना वाटत होतं. त्यांना माझ्याकडून नव्या  पैशाचीही अपेक्षा नव्हती. फक्त मी खूप कमावून खूप मोठा होणार असं त्यांना वाटत होतं. सुरुवातीला 'मी कोण होऊ?' असं त्यांना विचारूनच मी डॉक्टर झालो होतो. तर त्यांच्या अपेक्षेप्रमाणे प्रॅक्टीस करण्याऐवजी दुसरं काही करावं असं माझ्या डोक्यात आलंच नाही. प्रॅक्टीस म्हणजे काही खाऊ नसतो हे त्यांना माहित नव्हतं, आणि मलाही माहित नव्हतं. घराण्यात वडिलोपार्जित नर्सिंग होम नव्हतं आणि नवं बांधण्याएवढा पैसाही नव्हता.

"तू पॉलिक्लिनिकमध्ये बस" दादा म्हणाले. "आपल्या नात्यातल्या सामंतांचं हॉस्पिटल आणि पॉलिक्लिनिक आहे. भाडं द्यायचं आणि कन्सल्टिंग करायचं."

"बरं" असं म्हणून मी सामंताना भेटलो. भाडं भरलं आणि कन्सल्टिंग चालू केलं. क्लिनिकमधून घरी आलो की आई विचारायची, "आज किती पेशंट आले?"
"आज एक पेशंट आली" असं मी मोठ्या आनंदाने म्हणायचो. कारण एक तरी पेशंट येणं ही तेव्हा मोठ्या आनंदाची गोष्ट असायची.
"एकच? जाऊ दे. येतील हळू हळू" ती म्हणायची. "एकदा नाव झालं की श्वास घ्यायला उसंत मिळायची नाही."
बरोबरच्या मित्रांनी सांगितलं, "बाबा रे, तुझी गोल्ड मेडल्स बँकेत ठेव. प्रॅक्टीस हवी तर त्यांचा काही उपयोग नाही. जा आणि जीपींना भेट. पेशंट पाठवा म्हणून सांग."
"अरे, आयुष्यात कधी कोणाकडे काही मागितलं नाही. पेशंट पाठवा असं कसं सांगायचं?"
"तू त्यांना सांगितलं नाहीस तर त्यांना कसं कळणार की तू तिथे प्रॅक्टीस करतोस ते?"
ते बरोबर होतं म्हणा. मी काय मोठ्या मंत्र्याचा मुलगा किंवा सिनेनट होतो का की मला सगळ्यांनी आधीपासून ओळखावं? मी आमच्या परिसरातल्या जीपींना म्हणजे जनरल प्रॅक्टिशनरांना भेटायला सुरुवात केली. एखादा जीपी बरा निघायचा. 'चहा घेणार का?' असं विचारायचा. आता मी त्यांचं सकाळचं क्लिनिक संपायच्या वेळी त्यांना भेटायला जायचो. त्या दुपारच्या उन्हाच्या वेळी चहा कसला घेणार मी? आणि समजा घेतला आणि फुकटचा चहा पितो या रागाने त्यांनी पेशंटच पाठवले नाहीत तर? मी आपला चहा नको, पेशंट तेव्हढे पाठवा असं म्हणायचो. त्यांच्यापैकी कोणीही कधीही

पेशंट पाठवले नाहीत. म्हणजे चहाही नाही आणि पेशंटही नाही. कधी कधी असंही वाटलं की निदान चहा तरी घ्यायला हवा होता. म्हणजे प्रयत्न अगदीच पाण्यात गेल्यासारखं झालं नसतं. तिघा जणांनी मला अगदी स्पष्ट विचारलं की आम्हाला कट किती देशील. कट म्हणजे पेशंटचं जेवढं बिल होईल त्याचा एक हिस्सा त्या डॉक्टरला आपल्याकडे पेशंट पाठवल्याबद्दल द्यायचा. दलाली म्हटलं तरी चालेल - म्हणजे तो समानार्थी शब्द आहे म्हणून चालेल, त्या डॉक्टरला ते आवडेल म्हणून चालेल असं नाही. मी म्हटलं की कट द्यायला मला जमणार नाही. पण पेशंटना ट्रीटमेंट चांगली देईन. 'चांगली ट्रीटमेंट सर्वच जण देतात. तुझ्यापेक्षा कट देणारे डॉक्टर बरे' असा भाव तोंडावर आणून ते 'ठीक आहे' असं म्हणाले. त्यांच्याकडून माझ्याकडे एकही पेशंट आली नाही हे सांगायला नकोच. काही जणांनी आपण पेशंट अमुकतमुक कडे पाठवतो असं सांगितलं. मग ते माझ्या तोंडाकडे अपेक्षेने बघत राहिले. मी कटसंबंधी काही बोलतो का त्याची ते वाट बघत असावे. येवढं उच्च शिक्षण घेऊन शेवटी दलालांना हाताशी धरूनच जर प्रॅक्टीस चालवायची असेल, तर त्या शिक्षणाचा उपयोग काय हा प्रश्न मला त्या काळात रोज पडायचा. त्यांचंही तसं पाहिलं तर बरोबर असावं. दलाली ही सरसकट साहेबापासून चपराशापर्यंत सर्व जण घेतात, तर त्यांनी का बरं घेऊ नये? पाण्यात राहून माशाशी वैर करून चालत नाही म्हणतात ना? प्रत्येकात परमेश्वराचा अंश असला म्हणून प्रत्येकाने परमेश्वरासारखं वागलं पाहिजे असा नियम थोडाच आहे? त्यांनाही त्यांचा संसार होता, गरजा होत्या, आणि श्रम न

करता मिळणारा पैसा नाकारायला ते मूर्ख थोडेच होते? मूर्ख होतो मीच. प्रवाहाबरोबर वहाणं सोडून प्रवाहाविरुद्ध पोहणारा माणूस मूर्ख असतो ना? आयुष्य तडजोडीने चालवावं लागतं हे जर सत्य आहे, तर तडजोड किती प्रमाणात करायची हे कसं ठरवायचं? लागेल तेवढी तडजोड करायला ज्याला जमत नाही तो मूर्ख.

तर मी मूर्ख असल्यामुळे माझ्याकडे जीपींकडून पेशंट येईनात. रोज पन्नास-शंभर पेशंटांवर उपचार करणारा मी एखादी तुरळक पेशंट मिळायला लागल्यावर अगदी कंटाळून गेलो. सामंतांच्या हॉस्पिटलात मी चिकटून राहिलो असतो तर हळूहळू माझी प्रॅक्टीस नक्की वाढली असती. पण परमेश्वराची इच्छा काही वेगळीच होती.

राजमातात काम करून बाहेर पडणारे डॉक्टर अगदी काटेकोरपणे काम करणारे बनलेले असायचे. प्रत्येक गोष्ट अगदी १०० टक्के बरोबर झाली पाहिजे असा त्यांचा दृष्टीकोन असायचा. मी त्याच पठडीतला होतो. बाहेरच्या जगात काय चाललंय हे आम्हाला कोणी कधी सांगत नसे. त्यामुळे प्रायव्हेट प्रॅक्टीसमध्ये किती ठिकाणी तडजोड करावी लागते ते आम्हाला माहित नसायचं. सामंताच्या हॉस्पिटलात मी प्रॅक्टीस सुरू केली खरी, पण एक दिवस माझ्या लक्षात आलं की तिथली परिस्थिती रुग्णांसाठी जरा धोकादायक होती. सामंत स्वतः एम्.बी.बी.एस्. होते. ती पदवीही त्यांनी कुठच्या तरी थातुरमातुर संस्थेतून मिळवलेली होती. पण ग्रुहस्थ मोठे महत्त्वाकांक्षी होते. त्यांनी कोणाचंतरी बंद पडलेलं हॉस्पिटल चालवायला घेतलं. बरोबर पाच-सहा विषयांचे तज्ज्ञ डॉक्टर

घेतले. प्रयोगशाळा चालवायला एकाला जागा दिली. स्वतः जीपी आणि हे हॉस्पिटल असं दोन्ही चालवायला लागले. तज्ज्ञांच्या रुग्णांमुळे ते हॉस्पिटल कधी रिकामं राहिलं नाही. जर ते भरलेलं राहिलं नाही तर सामंत स्वतःच्या जीपीमधले रुग्ण हॉस्पिटलात ॲडमिट करत. पैसा कसा दिसतो ते कळल्यावर तो जास्त जास्त दिसावा अशी त्यांना इच्छा झाली. मग जमेल त्या मार्गाने कमावणं सुरू झालं. प्रयोगशाळावाल्याला पैसे दिले आणि त्याने दिलेले रिपोर्ट पेशंटला दिले असं न होता त्याने दिलेले रिपोर्ट स्वतःच्या लेटरहेडवर छापून रुग्णाला द्यायचे आणि आलेल्या पैशातला एक हिस्सा प्रयोगशाळावाल्याला द्यायचा असं व्हायला लागलं. आपल्याच हॉस्पिटलातली नर्स पेशंट म्हणून आली तरी तिलाही अशीच वागणूक मिळायला लागली. एक दिवस सामंतांनी माझ्याकडे गर्भाशय काढायची शल्यक्रिया करण्यासाठी एक पेशंट आणली. तिचं गर्भाशय सरकून खाली आलं होतं. शल्यक्रिया करणं गरजेचं होतं.

"तुम्ही किती पैसे घ्याल?" सामंतांनी विचारलं. चेहऱ्यावर बेरकीपणा होता. बेरकीपणा असण्याचं कारण माझ्या लक्षात आलं नाही. या शल्यक्रियेसाठी किती पैसे घेतात ते मला माहित नव्हतं. बाजारभावाप्रमाणे मी तुला येवढे पैसे देईन असं ते म्हणाले असते तर मला आनंद झाला असता. पण सामंत इतरांना आनंद वाटण्यासाठी जन्माला आले नव्हते. मला बाजारभाव माहित नसणार असा त्यांचा होरा असावा.

"मी पाचशे रुपये घेईन" मी म्हटलं. आपला होरा खरा निघाला याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसला. चेहऱ्यावरची रेषाही न

हलवता ते 'बरं' असं म्हणाले. शल्यक्रिया पार पडली. मी पाचशे रुपये कमावले. नंतर मी पाचशे रुपयात ती शल्यक्रिया केली म्हणून जाणकारांनी मला मूर्खात काढलं.

"अरे, तुला माहित नसणार हे त्या सामंताना नको कळायला? आपल्या परिचयातला, चांगले संबंध असणाऱ्या कुटुंबातला होतकरू मुलगा. त्याला त्यांनी असं फसवायचं?" माझी आई सात्विक संतापाने म्हणाली. तिचं म्हणणं खरं होतं. पण राजमाताबाहेरचं जग असंच असतं हे मला कधीतरी कळायला हवंच होतं. ते सामंतांकडून कळलं म्हणून खरं तर मी त्यांचे आभार मानायला हवे होते. पैशांचं नुकसान झालं म्हणून काही मी त्यांचं हॉस्पिटल सोडलं नाही. पण जेव्हा रुग्णसेवेत गोंधळ दिसायला लागले तेव्हा मात्र मी सावध झालो. एकदा तर त्यांच्या नर्सने मोठाच गोंधळ घातला.

पैसे वाचवायचे म्हणून सामंतांनी त्यांच्या हॉस्पिटलात सर्व स्थानिक शिक्षण दिलेल्या नर्सेस ठेवल्या होत्या. स्थानिक म्हणजे एस्.एस्.सी. पास किंवा नापास मुलींना ते पंधरा दिवस नर्सिंगचं प्रशिक्षण स्वतःच देत असत. मग पांढरी साडी किंवा ड्रेस चढवून त्या नर्स बनत असत. त्यांना अतिशय कमी पगारात काम करावं लागत असे. एकदा अशीच एक नर्स मला एका पेशंटची प्रसूती करायला मदत करत होती. मूल जन्मलं. त्या मुलाची नाळ कापताना त्या नर्सच्या हातून कात्री खाली जमिनीवर पडली. असं होतं कधीकधी म्हणून मी तिकडे दुर्लक्ष केलं. फक्त दुसरी कात्री घ्या असं म्हणालो. मी त्या पेशंटचं गर्भाशय आकुंचन पावलंय का ते बघत असतांना त्या नर्सने

लगेचच ती नाळ कापली. येवढ्या थोड्या वेळात दुसरी कात्री कशी आली असेल असा विचार माझ्या मनात आला.

"सिस्टर, डिलिव्हरीच्या ट्रे मध्ये दोन कात्र्या ठेवल्या होत्या का?" मी विचारलं.

"नाही" नर्स म्हणाली.

"मग आपली कात्री जमिनीवर पडली तर नाळ कापायला दुसरी कात्री येवढ्या वेळात कुठून आली?"

"ही तीच कात्री आहे" ती म्हणाली.

"पण जमिनीवर पडली तेव्हा तिला जमिनीवरचे जंतू चिकटले असतील ना? मग बाळाला जंतूसंसर्ग होईल" मी म्हटलं.

"नाही डॉक्टर. डिलिव्हरीसाठी हे गरम पाणी ठेवलंय ना, त्याच्यात मी ती कात्री बुडवून काढली."

"अहो, गरम पाण्यात बुडवून काढून कात्री निर्जंतूक होत नाही" मी म्हटलं. ती पंधरा मिनिटं उकळावी लागते, ऑटोक्लेव्ह करावी लागते, किंवा लायसॉल मध्ये अर्धा तास बुडवून ठेवावी लागते."

"सामंत सरांनी आम्हाला हे असंच शिकवलंय" ती म्हणाली.

मी त्या नवजात अर्भकाला नाळेचा जंतूसंसर्ग होऊ नये म्हणून योग्य ते उपचार केले. संध्याकाळी सामंत भेटले तेव्हा मी त्यांच्या कानावर ही गोष्ट घातली. ज्या गोष्टीचा मला प्रचंड धक्का बसला होता तिचं त्यांना काहीच वाटलं नाही.

"आमच्या नर्सेस व्यवस्थित प्रशिक्षित आहेत. तुम्ही सोडून इतर कोणत्याच तज्ज्ञाची त्यांच्याबद्दल काहीही तक्रार नाहीये" ते म्हणाले.

रुग्णहिताच्या दृष्टीने त्यांनी आपली चूक सुधारणं महत्त्वाचं होतं. तसं न करता उलट माझ्यातच काहीतरी दोष आहे असं सूचित करणारं त्यांचं सरकारी बाबूछाप उत्तर ऐकून माझ्या लक्षात आलं की आहे ती परिस्थिती बदलणं आपल्याला शक्य नाही. आपल्या पेशंटांचं काही बरंवाईट होण्यापूर्वी या ठिकाणातून बाहेर पडणं शहाणपणाचं आहे.

***

मार्ग मी काढला नाही, तर तो देवानेच दाखवला असं म्हटलं पाहिजे. नगरपालिकेच्या मेडिकल कॉलेजांमध्ये आणि हॉस्पिटलांमध्ये लेक्चररच्या पोस्ट भरण्यासाठी वर्तमानपत्रांत जाहिरात आली. राजमातात मला लेक्चररची पोस्ट मिळाली असती तर सोन्याहून पिवळं होतं. मी झटपट राजमातात पोचलो. ऑफिसच्या जवळ पोचलो तेवढ्यात हाक आली,

"काय रे, आज इथे कुठे?"

मी वळून पाहिलं तर मनाली. मनाली कावळ्यांची लेक्चरर होती म्हणून नव्हे तर आधीपासूनच खराब स्वभावाची होती. मी तिचं कधी घोडं मारलं नव्हतं. पण माझी आरेमोची पोस्ट संपली तेव्हा आनंद झालेल्यांत तिचा बराच वरचा नंबर होता.

"सहज" मी म्हटलं. मी कशासाठी तिथे गेलो होतो हे तिला कळलं तर ती नरटी लावेल असा अशास्त्रीय विचार माझ्या मनात आला.

"हूं!" असा आवाज काढून ती तिथून गेली. माझ्यावर विश्वास न ठेवणाऱ्यांतही तिचा बराच वरचा नंबर होता.

मी ऑफिसात गेलो. लेक्चररच्या पोस्टचा फॉर्म विकत घेतला. किती पोस्ट रिकाम्या आहेत म्हणून चौकशी केली. राजमातात दोन पोस्ट रिकाम्या होत्या. त्यातली एक मला मिळणार असं वाटून माझ्या मनाला खूप गुदगुल्या झाल्या. हवेत जवळपास तरंगत तरंगतच मी घरी आलो. देवाला नमस्कार करून मांडी ठोकून बसलो. फॉर्म भरला. सर्टिफिकिटं गोळा केली आणि त्यांच्या फोटोकॉप्या काढून आणल्या. फॉर्मला जोडल्या.

"अरे येवढ्या गडबडीने फॉर्म का भरतो आहेस? आई म्हणाली. नीट काळजीपूर्वक बघून फॉर्म भर."

"हो ग!" मी म्हटलं.

"शेवटची तारीख कधी आहे?"

"अजून महिना आहे."

"मग येवढी घाई कशाला? फॉर्म पहिला भरलास म्हणून तुला पहिली पोस्ट नाही द्यायचे ते. नीट व्यवस्थित भर काय ते."

"हो ग!" मी म्हटलं. घाई करण्याचं काही कारण नव्हतं हे खरं. पण लेक्चरर व्हायची मला येवढी घाई झाली होती की फॉर्म पटकन भरून मोकळं व्हायचं असं माझ्या मनाने घेतलं होतं.

"लेक्चरर झालास तर प्रॅक्टिस बंद करावी लागेल ना?" ती म्हणाली.

"हो" मी आनंदात म्हटलं. प्रॅक्टिस हा प्रकार माझ्या पचनी पडला नव्हता हे माझ्या धावपळीचं खरं कारण होतं. मी हाडाचा शिक्षक होतो हे मला कळलं नसलं तरी आतून जाणवलं होतं हे नक्की. म्हणून आपल्या आवडत्या कॉलेजात लेक्चरर होण्याच्या कल्पनेने मी येवढा उल्हसित झालो होतो.

"बरं होईल बाबा. प्रॅक्टीससाठी चार ठिकाणी धावपळ करणं तुला जमलंच नसतं."

खरं तर लेक्चरर आणि पुढे असोशिएट प्रोफेसर आणि प्रोफेसर झाल्यावरही कामाचा ताण आणि दगदग खूप झाली असती. पण त्याची आईला कल्पना नव्हती. प्रॅक्टिस करताना मुलगा मनाने विझल्यासारखा दिसतो हे मात्र त्या माउलीला पक्कं जाणवलं होतं.

मी दुसऱ्या दिवशी राजमाताच्या ऑफिसात जाऊन फॉर्म भरला.

"काय डॉक्टर, लेक्चरर म्हणून येताय काय आमच्याकडे?"

"तुम्ही घेतलंत तर" मी हसून म्हतलं. सावंत राजमातात क्लार्क होते. आमच्या शेजारच्या इमारतीत रहायचे. स्वभावाने चांगले होते. कोणालाही ऑफिसच्या कामात मदत करायला नेहमी तयार असायचे.

"पण तुमच्या कावळ्यांना दुसरेच कोणी हवे आहेत म्हणे" ते म्हणाले.

"दुसरेच की दुसऱ्याच?" मी हसून म्हटलं. कावळ्यांचं बाईलवेड हॉस्पिटलमध्ये सगळ्यांना एव्हाना समजलं होतं. सावंतही हसले.

"सांभाळा. नगरपालिकेत तुमची कारकीर्द सुरू होण्यापूर्वीच आपण संपवणार असं ते काल म्हणत होते."

"काल? मी आज फॉर्म भरतो आहे. त्यांना काल कसं कळलं की मला लेक्चरर व्हायचं आहे?"

"काय माहित? ते त्यांच्या लेक्चररबरोबर आले होते तेव्हा म्हणत होते."

अच्छा, म्हणजे मनालीने काडी लावली होती तर.

"पण त्यांच्या हातात काय असतं?" मी विचारलं.

"ते एचोडी म्हणून इंटरव्ह्यू घ्यायला जातात. सगळ्या कॉलेजांचे डीन सुद्धा असतात. आणि एक असिस्टंट कमिशनर असतात."

मी मनातल्या मनात कपाळाला हात लावला. विमान हवेतून एकदम जमिनीवर आलं. मी काहीच बोलत नाही असं बघून त्यांनीच सूचना केली,

"आपल्या डीनना भेटून बघा. त्यांची मदत होईल कदाचित."

"डीनना असं सरळ जाऊन भेटायचं? त्यांना किती कामं असतील."

"तुम्ही भेटून तर बघा. हॉस्पिटलात चांगली माणसं घेण्याकडे त्यांचा कल आहे."

"थँक यू" असं म्हणून मी निघालो.

***

डीनच्या ऑफिसात गेलो तेव्हा कळलं की ते पंधरा दिवसांच्या सुट्टीवर आहेत. माझं तोंड फार पडलं असावं.

"अर्जंट काम असेल तर घाणेकर मॅडमना भेटा. त्या तात्पुरतं डीनचं काम बघताहेत" डीनचा मामा म्हणाला. डीनच्या शिपायाला मामा म्हणत. हा मामा चांगल्या स्वभावाचा दिसत होता. माझं काम फार महत्त्वाचं होतं खरं, पण अर्जंट मात्र नव्हतं. ते स्वतः डीनच करू शकले असते. घाणेकर मॅडमना ती पॉवर नव्हती.

"नको, मी पंधरा दिवसांनी येतो" मी म्हटलं.

पंधरा दिवस म्हणजे केवढा मोठा कालखंड असतो हे मला तेव्हा कळलं. यश मिळवण्यासाठी जे अनेक गुण लागतात, त्यात सबुरी हा एक गुण असतो हे मी त्या वेळेपर्यंत शिकलो नव्हतो. एखादी गोष्ट करायची तर ती ताबडतोब करायची, योग्य वेळेची वाट बघत थांबायचं नाही असं माझं धोरण असायचं. मला कोणी पद्धतशीरपणे घडवलं नव्हतं. जसं जमेल तसा माझा मीच घडलो होतो. ते यशाची खात्री देणारं नसतं हे मला कोणी सांगितलं नव्हतं. आता इलाज नव्हता म्हणून सबुरीचा मार्ग धरावा लागला होता. त्या काळात मी किती कासावीस झालो ते माझं मलाच माहित.

एम्.डी.चा अभ्यास करताना डोकं फार पिकलं की आम्ही कॉलेजच्य कँटीनमध्ये जात असू. खायची वेळ असली तर काहीतरी खायचं. नाहीतर एक चहा मारायचा, आणि डोकं थोडं हलकं झालं की परत लायब्ररीत जायचं आणि अभ्यासाला लागायचं असं आमचं रूटीन झालं होतं. आताही मेंदूला जरा मुंग्या आल्यासारखं वाटलं आणि माझी पावलं कँटीनकडे वळली. माझी पूर्वीची आवडीची जागा पकडली. त्या खिडकीकडच्या जागेवरून बाहेरची गंमत छान दिसत असे. आता जगात गंमत असते याचाही विसर पडलेला असताना केवळ जुन्या सवईने मी त्या जागेवर जाऊन बसलो. एक चहा मागवला आणि मेंदूच्या मुंग्या जायची वाट बघायला सुरुवात केली.

"सर, तुम्हाला मॅडम बोलावताहेत" एक आरेमो मला जरा अदबीने म्हणाला. तो अगदीच कोवळा दिसत होता. पहिल्या वर्षाचा असावा. त्याने दाखवलेल्या दिशेला पाहिलं तर

जोशीबाई. त्या अगदी सुरेखसं हास्य करत माझ्याकडे बघत होत्या. हातवारे करून त्यांनी मला बोलावलं. मी उठलो आणि माझा चहाचा कप हातात घेऊन त्यांच्या टेबलावर जाऊन बसलो. त्यांच्याबरोबर त्यांची लेक्चरर नंदिता आणि दोन आरेमो होते.

"ये रे, बस" त्या मोठ्या प्रेमाने म्हणाल्या. मेंदूला मुंग्या आलेल्या असल्या तरी जोशीबाई येवढ्या प्रेमाने बोलताहेत त्यात काही तरी काळंबेरं असणार हे माझ्या लक्षात आलं.

"तू नंदिताला ओळखतोस ना? ती आता माझ्या युनिटमध्ये आहे" जोशीबाई म्हणाल्या.

मी तिच्याकडे बघून स्मितहास्य केलं. तिनेही केलं.

"तू काय करतो आहेस सध्या?" जोशीबाईंनी विचारलं.

"लेक्चररच्या पोस्टसाठी फॉर्म भरलाय. आता इंटरव्ह्यूची वाट बघतोय" मी म्हटलं.

"छान, छान. तू तसा पहिल्यापासून अभ्यासू वृत्तीचा होतासच. वैद्यकीय शिक्षक व्हायला तू अगदी योग्य आहेस" बाई म्हणाल्या.

'इश! तो इतका काय अभ्यास करतो? आम्ही नाही बाई असा अभ्यास केला कधी. पण एम्.डी झालोच ना?' असं त्यांनी माझ्याबद्दल निनादकडे म्हटलं होतं ते मला पटकन आठवलं. दुःख त्या गोष्टीचं नव्हतं, तर हा पोरगा अगदी बावळट आहे, आणि आपण त्याच्या अपरोक्ष त्याच्याबद्दल कायकाय बोलतो याची त्याला कल्पना नसणार असं त्यांनी समजण्याचं होतं.

"थँक यू" मी सस्मित मुद्रेनं म्हटलं.

"आता कुठे जातोयस?" त्यांनी विचारलं.

"घरी" मी म्हटलं.

"मग आधी माझ्या ऑफिसात येऊन जा. वेटर, याचं बिल माझ्या बिलात टाक."

बाईंनी चहा पाजला म्हणून नव्हे तर कँटीनमध्ये सर्वांसमोर न बोलण्यासारखं त्यांना काय बोलायचं होतं या कुतूहलापोटी मी त्यांच्याबरोबर त्यांच्या ऑफिसात गेलो.

"बस."

मी बसलो. काही बोललो नाही, कारण त्यांनी मला बोलावलं होतं, तेव्हा प्रथम बोलणं हे त्यांचं काम होतं.

"मी काय म्हणते की तू आता लेक्चरर होणार आहेस. तेव्हा तू काहीतरी शैक्षणिक कार्य करायला हवं."

"हूं" मी म्हटलं.

"माझ्याकडे एक प्रकाशक आहे. तुझ्याकडे तुझ्या एम्.डी.च्या नोट्स असतील ना?"

"हो आहेत" मी म्हटलं. माझ्या नोट्स डिपार्टमेंटमध्ये फेमस होत्या. तेव्हा आमच्या मध्यवर्ती, डिपार्टमेंटच्या आणि ब्रिटिश कौन्सिलच्या लायब्ऱ्यांमध्ये उपलब्ध असलेल्या सगळ्या पुस्तकांचा आणि जर्नल्सचा तो आटीव अर्क होता. त्या नोट्सवर माझं जिवापाड प्रेम होतं आणि मी त्या अगदी संभाळून ठेवल्या होत्या.

"तर तुझ्या नोट्सवरून आपण एक पुस्तक लिहूया" जोशीबाई म्हणाल्या.

मेंदूच्या मुंग्या क्षणात गेल्या. आपण एखादं पुस्तक लिहावं असं माझ्या मनात कधीच आलं नव्हतं. जोशीबाईंना येवढी छान कल्पना सुचली की ती त्यांना प्रकाशकाने दिली देव

जाणे. पुस्तक लिहिणं त्या मानाने सोपं असतं, त्याच्यासाठी एक प्रकाशक मिळवणं खूपच कठीण असतं हे सत्य मला त्या वयात माहित नव्हतं. केवळ आपण जमवलेलं ज्ञान आपल्या डोक्यात आणि कपाटात ठेवून देण्यापेक्षा त्यावर एक पुस्तक लिहून ते हजार जणांपर्यंत पोचवणं ही कल्पना मला आवडली.

"बरं" मी म्हटलं.

"मी प्रकाशकाला बोलवून घेते. आपण अँग्रीमेंट वगैरे करूया. मग पुस्तकात कायकाय लिहायचं ते ठरवूया."

"बरं" मी म्हटलं.

"तुझा फोन नंबर मला देऊन ठेव. प्रकाशक कधी येणार ते ठरलं की मी तुला फोन करते."

"बरं" मी म्हटलं. माझा फोन नंबर मी त्यांना लिहून दिला आणि परत हवेत जवळजवळ तरंगत घरी जायला निघालो. इतके दिवस आपण प्रख्यात लेखकांची पुस्तकं वाचायचो. आता आपण स्वतः लेखक बनणार ही कल्पना इतकी सुखद होती, की मनाची मरगळ कुठच्या कुठे पळून गेली.

"कोणाला येवढ्यात बोलू नकोस हां पुस्तकाबद्दल" मी निघताना जोशीबाईंनी मला बजावलं होतं. त्या कोणामध्ये आपले आई वडील धरायचे नसतात येवढी जाण मला तेव्हा होती. मी घरी येऊन सगळी गोष्ट अगदी खुलासेदारपणे आई-दादांना सांगितली. दोघांनी अगदी कौतुकाने माझ्याकडे पाहिलं. वैद्यकीय जगाचा त्यांचा अनुभव मी आतापर्यंत सांगितलेल्या गोष्टींवरच अवलंबून होता. ते जोशीबाईंना ओळखत नव्हते. त्यामुळे त्यांना हा सगळा प्रकार आवडला. आपला मुलगा

खांडेकर-फडके यांच्या पंक्तीत कदाचित बसेल असं त्यांना वाटलं. आज जोशीबाईंबरोबर लिहितोय, उद्या एकटा लिहील असंही त्यांना वाटलं. त्यांनी तसं म्हटलं तेव्हा मलाही तसं वाटलं - म्हणजे एकट्याने लिहिण्याबद्दल, खांडेकर-फडके यांच्या पंक्तीत बसण्याबद्दल नव्हे. मी काही ललित लेखन करणार नव्हतो. जगात वैद्यकीय विद्यार्थी किती असतात आणि त्यातले किती जण आपलं पुस्तक वाचणार याची कल्पना जरी आई-दादा करू शकत नव्हते तरी मी करू शकत होतो."

***

एका आठवड्याने मी जोशीबाई आणि त्यांचा प्रकाशक यांना भेटलो. ग्रुहस्थ ऐसपैस आणि मोकळे ढाकळे होते. वय सत्तरीच्या पुढे होतं पण चेहरा प्रसन्न होता.

"हे श्री. सावंत आणि हे डॉक्टर विजय पाटील" जोशीबाईंनी आमची ओळख करून दिली.

"नमस्कार" आम्ही एकमेकांना म्हटलं.

"तर आम्ही दोघं एक पुस्तक लिहितो आहोत" बाई म्हणाल्या. अजून प्रास्ताविकही लिहायला घेतलं नव्हतं आणि बाई 'आपण पुस्तक लिहितो आहोत' असं जाहीर करून मोकळ्या झाल्या होत्या. या क्षेत्रात नवीन असल्यामुळे मी काही बोललो नाही. आमच्या लिखाणाच्या भागीदारीत बाई व्यावहारिक भाग संभाळताना दिसत होत्या. कार्यकारी भाग बहुधा माझ्यावर येणार याची जाणीव जेव्हा बाईंनी माझ्या नोट्सची चौकशी केली तेव्हा झाली होती. आता ही दुसरी जाणीव झाली.

"छान" सावंत म्हणाले. माझ्या कारकीर्दीच्या सुरुवातीला दोन सावंतांचा हातभार लागावा हा कोण योगायोग असं माझ्या मनात आलं.

"मग ते ॲग्रीमेंटचं कधी करता?" बाईंनी विचारलं.

"मी उद्याच कागद पाठवतो. तुम्ही बघा, सह्या करा, की झालं काम" सावंत म्हणाले. बाईंनी मागवलेला चहा प्यायल्यावर मिटिंग संपली. मी सुद्धा जाणार होतो. पण बाईंनी मला थांबवलं. मी सावंतांच्या बरोबर बाहेर पडलो आणि काहीबाही बोललो तर गोंधळ होईल अशी भिती त्यांना वाटली असावी.

"मॅडम, अजून आपण पुस्तकात काय लिहायचं ते सुद्धा ठरवलेलं नाही आणि तुम्ही त्यांना आम्ही पुस्तक लिहितो आहोत असं सांगून टाकलंत?" मी म्हटलं.

"अरे, मी त्यांना चांगली ओळखते. अजून सुरुवात नाही असं त्यांना सांगितलं तर ते काम सुरू करायला अजून सहा महिने लावतील."

या गोष्टीवर वाद घालण्याचं काही कारण दिसत नव्हतं.

"उद्या ॲग्रीमेंटवर सह्या केल्या की आपण पुस्तकात कोणकोणत्या विषयांवर लिहायचं त्याची यादी करू" बाई म्हणाल्या.

"बरं" मी म्हटलं.

मी निघालो. त्यांच्या ऑफिसबाहेर पडलो तर समोर नंदिता हजर झाली. आपण जोशीबाईंची लेक्चरर, हा कोणाचा कोण नाही, आणि आपल्याला माहित नसलेल्या गोष्टीसाठी बाईंना भेटतो म्हणजे काय असे भाव तिच्या चेहऱ्यावर दिसत होते.

उत्तरादाखल मी तिचाकडे बघून एक स्मितहास्य केलं आणि पुढे निघालो. कोपऱ्यावर परवेझ भेटला.

"काय रे, जोशीबाईंकडे काय करतोयस?" त्याने सरळ प्रश्न केला.

"कोणाला काही सांगू नकोस असं बाईंनी मला बजावलंय, असं काही मला त्याला म्हणता येईना. बऱ्याच कठीण प्रसंगात त्याने मला मोलाचा सल्ला देऊन उपकृत केलं होतं."

"बाईंनी मला त्यांच्याबरोबर एक पुस्तक लिहिण्याचं प्रपोजल दिलंय" मी म्हटलं.

"कशावर?"

"माझ्या नोट्सवर."

"मग बाईचं त्याच्यात काम काय?"

"प्रकाशक त्यांचा आहे."

"हूं." तो विचारमग्न झाला. "तू एकट्याने प्रकाशकाबरोबर बोलणं करू शकत नाहीस का?"

"बाईंचा प्रकाशक पळवणं बरं दिसणार नाही" मी म्हटलं. "आणि मी असा कोण मोठा लागून गेलो आहे? तो काही मला मी म्हणून ओळखत नाही. नव्या नटाला घेऊन कोण कधी चित्रपट काढत नाही. तसंच प्रस्थापित लेखकच प्रकाशकांना हवे असणार."

"ते बरोबर आहे. तुला सुरुवात करताना असं करावं लागेल असं दिसतं. एकदा तुझं नाव झालं की मग तुझ्याकडे रांग लागेल प्रकाशकांची. दुःख येवढंच की बाई फुकटचं श्रेय घेऊन जाणार. बरं मला असं सांग की लेखक म्हणून तुझं नाव आधी की बाईचं?"

"नोट्स माझ्या म्हणजे माझं नाव आधी असलं पाहिजे. पण आयडिया बाईंची आणि प्रकाशक त्यांचा म्हणजे बहुतेक त्यांचं नाव पहिलं येईलसं वाटतं" मी म्हटलं.

"आणि तू त्याला तयार आहेस?"

"सध्या तरी मला दुसरा पर्याय दिसत नाहीये. नुकताच एम्.डी. झालेला मुलगा पुस्तक लिहितो हे प्रकाशकाच्या पचनी पडायचं नाही. बरोबर जर प्रोफेसर असेल तर ते सोपं होईल. त्यातून आता लेक्चररच्या पोस्टचे इंटरव्ह्यू व्हायचेत. तेव्हा हे पुस्तक मला उपयोगी पडेल. जरा जास्त चांगलं इंप्रेशन पडेल" मी म्हटलं.

"हूं. तू म्हणतोयस ते बरोबर आहे. गो अहेड" परवेझ म्हणाला. परवेझने गो अहेड म्हटल्यावर पुढे जायला काहीच हरकत नव्हती.

***

आम्ही पुस्तकाच्या ॲग्रीमेंटवर सह्या केल्या. सावंतांनी बाईंचं नाव आधी घालूनच ॲग्रीमेंट बनवलं होतं. बहुतेक बाईंनी त्यांना तसं सांगितलं असावं. असो. सावंत गेल्यावर आम्ही दोघांनी मिळून पुस्तकात लिहिण्याच्या विषयांची यादी केली. बाईंनी वीस विषय निवडले. मी हो म्हटलं.

"पुस्तकाचं नाव काय ठेवायचं" मी विचारलं.

"स्त्रीरोग आणि प्रसूतीशास्त्र, आज आणि उद्या असं ठेवूया" बाई म्हणाल्या. त्यांत नाव ठेवण्यासारखं काही नव्हतं म्हणून मी हो म्हटलं. नावात काही नसतं असं माझं मत होतं. नावं भिकार असली तरी आपल्याकडचे हिंदी सिनेमे जर चालायचे

असले तर तुफान चालतात, आणि अनुरूप नावं असणारे सिनेमे दणकून आपटतात, तसंच पुस्तकांचं असतं.

"तुझ्याकडे या सगळ्या विषयांच्या नोट्स आहेत ना?" बाईंनी विचारलं.

"हो, आहेत" मी म्हटलं.

"मग त्यातल्या पहिल्या विषयाच्या नोट्स मला आणून दे. मी त्या वाचते. मग आपण लिहू" बाई म्हणाल्या.

मी त्या विषयाच्या नोट्सचं बाड बाईंना नेऊन दिलं. आपलं पोर पाळणाघरात ठेवून कामावर जाणाऱ्या मातेसारखं त्या बाडाकडे बघत बघत मी बाईंच्या ऑफिसमधून बाहेर पडलो. चार दिवसांनी बाईंना फोन केला.

"मॅडम, मी विजय. गुड मॉर्निंग."

"गुड मॉर्निंग" बाई सुरात म्हणाल्या.

"नोट्स वाचून झाल्या का?" मी विचारलं.

"अं?...." बाईंनी चार एक सेकंद विचार केला. "हं हं हं नाही वाचल्या अजून. वेळ नाही मिळाला. आता वाचते हं मी."

"बरं मॅडम, परत चार दिवसांनी फोन करतो" मी म्हटलं.

बाईंच्या कामाच्या वेगाची कल्पना आल्यामुळे मी चाराऐवजी पाच दिवसांनी फोन केला.

"मॅडम, मी विजय. माझ्या नोट्स वाचून झाल्या का असं विचारायला मी फोन केलाय."

"अरे, मी त्या नोट्स पाहिल्या. खूपच नोट्स काढल्यायस तू."

"मग लिहून झालं का?"

"अं... नाही. तू असं कर. तूच लिहून काढ. फक्त सगळ्या नोट्सचं संकलन कर. मग मी ते बघते."

पुस्तकाची गाडी पुढे सरकायची तर ते काम बाईंवर सोपवून चालणार नाही हे माझ्या लक्षात आलं. मी माझं बाड ताब्यात घेतलं. दोन दिवसांत त्याचं संकलन केलं आणि ते बाईंना वाचायला दिलं.

"परवा ये तू" बाई म्हणाल्या.

या वेळी बाईंनी दोन दिवसांत वाचायचं काम मात्र पुरं केलं.

"तसं ठीक लिहिलंयस तू" बाई म्हणाल्या. या इथे 'सुद्धा' हा शब्द घाल. आणि या इथे 'वगैरे' हा शब्द घातलायस तो काढून टाक. बरा वाटत नाही."

"बाकी सगळं ठीक आहे?" मी विचारलं.

"अं? हो."

"काही नवीन माहिती घातलीत का?" तसं असण्याची सुतराम शक्यता नव्हती हे मला माहित होतं. पण रेकॉर्डसाठी म्हणून विचारलं.

"नाही रे. तू पुरेशी माहिती घातलीयेस."

त्या तीस पानी लेखात माझ्या मते गरज नसलेल्या व्याकरणाच्या दोन 'चुका' दुरुस्त करण्यापलिकडे बाईंनी काहीही योगदान दिलं नव्हतं. या गोष्टीचा आनंद मानायचा, राग मानायचा, की एक लेख पूर्ण झाला या समाधानात दुसऱ्या लेखाकडे वळायचं हे ठरवणं मोठं कठीण काम होतं.

"आता दुसऱ्या लेखाचं काम सुरू करायचं ना?" मी विचारलं. "मी त्याच्या नोट्स आणल्या आहेत."

पाळणाघरात दुसऱ्या पोराला सोडून त्याच्याकडे मागे वळून बघत बघत मी घरी जायला निघालो. बाईंनी त्या नोट्स हरवल्या तर आपण मरून जाऊ असं माझ्या मनात आलं.

सुदैवाने बाईंनी त्या नोट्स जपून ठेवल्या. दुर्दैवाने त्या इतक्या छान जपल्या की मी त्या त्यांच्या टेबलावर जिथे ठेवून आलो होतो तिथेच त्या एक आठवड्यानंतर सापडल्या. अगदी मागच्या वेळची पुनरावृत्ती झाली. चार आणि तीन दिवसांनी असे दोन फोन झाल्यावर बाईंनी माझ्या नोट्स मला परत दिल्या आणि मलाच त्यांचं संकलन करायला सांगितलं. संकलनातली एक 'चूक' दुरुस्त केली. नवीन माहिती काहीही घातली नाही. आपल्याला काय करायचंय याची आता मला पूर्ण कल्पना आली होती. प्रत्येक लेखापायी दोन फोन, हॉस्पिटलच्या दोन फेऱ्या, आणि अमूल्य अशा नोट्सचा एका आठवड्याचा वियोग सहन करण्यापेक्षा आपण संकलित लेखच बाईंना दाखवणं सोपं पडेल असं मी ठरवलं.

"मॅडम, तुम्हाला माझ्या नोट्स वाचायला वेळ मिळत नाही. मला वाटतं मी संकलन केलेले लेखच तुम्हाला वाचायला देतो."

जरासं ओशाळवाणं हसून बाई हो म्हणाल्या. मग एक-दोन दिवसात एक लेख या गतीने मी सगळे लेख हातावेगळे केले. बाईनी व्याकरणाच्या चुका न सुधारता ते टाईप करून घेतले. टाइपिंगचे पैसे मात्र त्यांनी दिले.

"अरे, ह्या टायपिस्ट दोन ओळींमध्ये खूप अंतर सोडतो. त्यामुळे खूप पानं होतात. जर दोन ओळींमघ्ये त्याने आता सोडतो त्याच्या अर्धी जागा सोडली तर पानामागे दहा रुपये या दराने खर्च अर्धा होईल. तू बोल त्याच्याबरोबर."

खरं तर टायपिस्ट बाईनी निवडलेला होता आणि त्याचे पैसे बाईच देत होत्या. त्यामुळे त्याच्याबरोबर बाईंनीच बोलणं योग्य ठरलं असतं.

"मॅडम, मी लहान पडतो. तो माझं ऐकणार नाही. तुम्हीच बोला ना त्याच्याबरोबर" मी म्हटलं.

"नको. तू बोल. मग गरज पडली तर मी बोलेन" बाई म्हणाल्या.

मी बाईंचं म्हणणं टायपिस्टच्या कानावर घातलं.

"डॉक्टर, शास्त्रीय लेख दोन ओळींमध्ये दोन ओळींची जागा सोडूनच टाईप करायचे असतात. त्याला डबल स्पेसिंग असं म्हणतात. ते वाचायला सोपं जातं. जर एकाच ओळीची जागा सोडायची असेल, तर मी तसं टायपिंग करतो. पण मला एकूण टाइपिंग तेवढंच करावं लागणार. म्हणून मग प्रत्येक पानाचे वीस रुपये होतील."

मी हसलो. त्याचं म्हणणं एकदम बरोबर होतं. मी ते बाईंच्या कानावर घातलं.

"इश! अगदी पैसेकाढू आहे. असं करून आपला काय फायदा?" बाई म्हणाल्या.

"मॅडम, कागद कमी लागतील. राष्ट्राची तेवढी जंगलसंपत्ती वाचेल" मी म्हटलं.

"काही तरीच काय? जंगलाचा काय संबंध?" बाई म्हणाल्या.

"मॅडम, जंगलातली झाडं तोडून त्यांच्या लाकडांपासून कागद बनवतात. आपलं पुस्तक एकदम पर्यावरण वाचवणारं ठरेल."

"काही नको. आहे तसंच टाइपिंग करू दे त्याला. कागदांची संख्या अर्ध्याने कमी करेल आणि पैसे मात्र पूर्वीसारखेच घेईल. त्यांत आपलं नुकसान आहे."

बोलण्यासारखं खूप सुचलं, पण मी गप्प राहिलो. बाई बोलून बदलणाऱ्यांतल्या नव्हत्या.

दरम्यान टाइप होऊन आलेले कागद छापायसाठी गेले. त्यांची पृफं तपासायला आली. बाईंनी ती माझ्या हवाली केली. मी ती वाचून, छपाईच्या चुका दुरुस्त करून बाईंना परत केली. असं कागद टाइप होऊन येणं, छापायला जाणं, पृफं येणं असं चक्र सुरू झालं. पुस्तकाचं काम मोठ्या वेगाने सुरू होतं. त्या कामाच्या नादात आपल्याला लेक्चररच्या पोस्टच्या इंटरव्ह्यूपूर्वी डीनना भेटायचय हे मी विसरूनच गेलो. सुदैवाने एकदा मी तपासलेली पृफं बाईंना द्यायला हॉस्पिटलात गेलो होतो तेव्हा गेटपाशी मला डीन भेटले. मी पायी चाललो होतो, ते गाडीतून जात होते. मला पाहून त्यांनी गाडी थांबवली.

"अरे विजय, तू एम्.डी. झालास ना?" त्यांनी विचारलं.

"गुड मॉर्निंग सर. होय, सर" मी म्हटलं.

"युनिव्हर्सिटीच्या मेरिट लिस्टमध्ये आलायस ना?"

"होय सर" मी म्हटलं.

"मग लेक्चरर होणार की नाही?"

"मला लेक्चरर व्हायचंय सर, पण होईनसं वाटत नाही."

"का? आपल्या हॉस्पिटलला तुझ्यासारखे लेक्चरर पाहिजे आहेत. कोण म्हणतं तू लेक्चरर होणार नाहीस?"

"एचोडी कावळेसर म्हणताहेत सर. ते म्हणताहेत की नगरपालिकेतली माझी कारकीर्द ते इंटरव्ह्यूच्या वेळी सुरू होण्यापूर्वी संपवणार आहेत."

डीन अवाक झाले. कावळेसरांना ते तसे ओळखत असावेत. पण कावळे येवढ्या हीन थराला जातीलसं त्यांना वाटलं नसावं. पण ते डीन होते. कार्यकुशल होते. कोणतीही गोष्ट त्यांना फार काळ अवाक करू शकली नसती.

"ठीक आहे. ते बघू आपण. सध्या तू काय करतोयस?"

"सर, मी एक पुस्तक लिहितोय."

"पुस्तक? अरे वा! कशावर? कावळ्यांच्या कार्यपद्धतीवर?"

"नाही सर. मी माझ्या विषयावर लिहितोय. जोशीमॅडम आणि मी मिळून वीस लेख संकलित करून लिहितो आहोत."

"संकलित करून? कशाचं संकलन?"

"माझ्या एम्.डी.च्या नोट्सचं" मी बोलून गेलो. या वेळी डीन अवाक झाले नाहीत. जोशीबाईंना ते अगदी नीट ओळखत असावेत. ते फक्त चार-पाच सेकंद थांबले, आणि म्हणाले,

"त्यांतल्या महत्त्वाच्या दोन लेखांची नावं सांग."

मी महत्त्वाच्या दोन लेखांची नावं सांगितली.

"ठीक आहे. इंटरव्ह्यूला मी तुला यातल्याच एका विषयावर प्रश्न विचारतो. बेस्ट ऑफ लक."

"थँक यू सर."

गाडी निघून गेली. आता अवाक व्हायची पाळी माझी होती.

***

लेक्चररांच्या जागांचे इंटरव्ह्यू नगरपालिकेच्या मुख्यालयात व्हायचे. नगरपालिकेच्या वैद्यकीय कॉलेजांचे डीन, त्या त्या विषयांचे एचोडी, आणि नगरपालिकेचे कमिशनर किंवा असिस्टंट कमिशनर अशी सर्व मंडळी इंटरव्ह्यू घ्यायला यायची. एका मोठ्या टेबलाच्या पाठी सगळेजण बसायचे. समोरच्या एका खुर्चीवर उमेदवार बसायचा. त्याला ही मंडळी आळीपाळीने प्रश्न विचारायची, आणि इंटरव्ह्यू संपला की मार्क्स द्यायची. त्यादिवशी आमचे इंटरव्ह्यू दुपारी होते. सकाळी ऑर्थोपेडिक्सचे इंटरव्ह्यू होते. ते पार पाडून मध्यांतरात तिथेच जेवून मंडळी आमच्या इंटरव्ह्यूसाठी तयार झाली होती. एचोडी मात्र आमच्यासारखेच थेट दुपारी आले होते. मधल्या खुर्चीवर असिस्टंट कमिशनर बसले होते. कपाळाला देवाचा टिळा वगैरे लावून ते कमालीचे धार्मिक वाटत होते. नगरपालिकेत धार्मिक माणसांचं कसं जमतं हा वेडपट प्रश्न त्यावेळी मला पडला नाही, कारण त्यावेळी आपलं जमतं की नाही हा मोठा प्रश्न माझं अस्तित्व व्यापून होता. त्यांच्या बाजूला आमचे डीन होते. एका कोपऱ्यात कावळे बसले होते. इतर मंडळींना मी ओळखत नव्हतो.

"तुमची सर्टिफिकिटं बघू" एका माणसाने माझी सर्टिफिकिटांची फाईल मागून घेतली.

"विचारा त्यांना प्रश्न" असं म्हणून अकंनी (म्हणजे असिस्टंट कमिशनरांनी) कावळ्यांकडे अंगुलीनिर्देश केला. कावळे सावरून बसले.

"गर्भावस्थेत सातव्या महिन्यात रक्तस्त्राव होण्याची कारणं सांगा" ते म्हणाले.

मी पटापट कारणं सांगितली.

"कोणतं कारण आहे ते कसं ठरवायचं?"

मी पटापट तेही सांगितलं.

"प्लासेंटा प्रेव्हियाची ट्रीटमेंट सांगा."

मी तीही सांगितली. अगदी सुरुवात असण्याच्या स्थितीपासून शॉक मध्ये असण्याच्या स्थितीपर्यंत सर्व प्रकारच्या रुग्णांची ट्रीटमेंट सांगितली. ओळखीची आणि ओळख नसणारी अशी सर्व मंडळी (फक्त कावळे सोडून) खूश झालेली दिसली. मग आमच्या डीननी मला माझ्या पुस्तकातल्या एका लेखाच्या संदर्भात माहिती विचारली. लेखाचा विषय अतिशय क्लिष्ट होता. पण नुकताच तो लेख मी हातावेगळा केलेला असल्यामुळे मला त्यावर प्रभुत्वाने बोलणं अगदी सोपं गेलं.

"छान" डीन म्हणाले. "आता असं सांगा की तुमचे लेख शास्त्रीय जर्नल्समध्ये प्रसिद्ध झालेत का?"

लेक्चरर व्हायचं तर लेख प्रसिद्ध झालेले असणं आवश्यक असतं असं मला परवेझने सांगितलं होतं. त्यानुसार मी आतापर्यंत चार लेख लिहून पाठवले होते आणि नशीबाने ते प्रसिद्धही झाले होते. त्यांच्या प्रती मी त्यांना दाखविल्या.

"वा, छान. आणखी काही प्रसिद्ध केलंय का तुम्ही?"

"सर, माझं एक पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर आहे. त्याची पहिली पृफं माझ्याकडे आहेत" असं म्हणून मी प्रुफांच बाड त्यांच्याकडे दिलं. पुस्तकाचं नाव घेताच मंडळी एकदम सतर्क झाली. कावळे तर उडालेच. म्हणजे खुर्चीतल्या खुर्चीत उडाले. सगळ्यांनी माझ्या पुस्तकाचं बाड न्याहाळून पाहिलं. कावळे सोडून सगळ्यांची तोंडं सस्मित झाली. कावळ्यांच्या काळ्या

चश्म्यातून त्यांच्या डोळ्यांतला अंगार दिसला नाही, पण तो तिथे निश्चितच असावा असं त्यांच्या चेहऱ्यावरून वाटलं.

"छान, छान" अक म्हणाले. "विजय हे नाव छान आहे. माझ्या नातवाचं नाव मी विजय ठेवीन. या तुम्ही."

"थँक यू सर" असं म्हणून मी माझी फाईल, लेख आणि पुस्तकाचं बाड उचललं आणि बाहेर पडलो. मी लेक्चरर म्हणून फार आवडलो म्हणून अकंनी माझं नाव आपल्या नातवाला ठेवू असं म्हटलं असावं, किंवा कावळ्यांनी मला दिलेली धमकी आणि मानसिक त्रास त्यांना आमच्या डीनकडून समजले असावे आणि माझा मानसिक तणाव कमी करायला म्हणून ते तसं म्हणाले असावे. माझ्या नंतरच्या उमेदवारांनी मी सस्मित चेहऱ्याने बाहेर पडल्याचं पाहून आपापसात कुजबुज केली, तिकडे न पाहिल्यासारखं करून मी बाहेर पडलो.

एकच घटना बघणारे दहा जण असले तर त्यांच्याकडून त्या घटनेची दहा वर्णनं ऐकायला मिळतात. माझ्या इंटरव्ह्यूचं माझं वर्णन आणि कावळ्यांचं वर्णन यांच्यात जमीनअस्मानाचं अंतर होतं. दुसऱ्या दिवशी हॉस्पिटलात पोचल्यावर कावळ्यांनी स्टाफरूममध्ये आपल्या कंपूसमोर स्वतःचं वर्णन पेश केलं. ते तिथे असलेल्या परवेझने ऐकलं. मी जेव्हा जोशीबाईंना तपासून झालेली पृफं द्यायला गेलो तेव्हा त्याने मला पकडलं आणि विचारलं,

"काय रे, तुझा इंटरव्ह्यू कसा झाला?"

"मस्त." मी म्हटलं.

"काय काय विचारलं तुला?"

मग मी सगळ्या इंटरव्ह्यूचं वर्णन केलं. अकंचे समारोपाचे शब्दही सांगितले. त्याने ते सगळं लक्षपूर्वक ऐकलं.

"सगळं तसं ठीक दिसतंय. काल कावळ्यांनी इकडे येऊन काय काय वर्णन केलं ते ऐकलंस तर तुला चक्कर येईल.

"हं?" मी म्हटलं.

"हं! एचोडीच्या दहापैकी त्यांनी तुला शून्य गुण दिलेयत. मनाली नुसती फुटाण्यासारखी उडतेय."

"येवढी जाडी मनाली फुटाण्यासार्खी कशी उडत असेल देव जाणे. कावळे मला खाली ओढतील याची मला कल्पना होती. पण सगळी उत्तरं बरोबर असताना दहापैकी शून्य गुण? हा सारासार अन्याय आहे."

"तू लेक्चरर होणं अशक्य असं त्यांनी जाहीर केलंय."

"बघूया. अक आपल्या नातवाचं नाव विजय ठेवणार म्हणालेत. मला निवडायचं नसतं तर त्यांनी तसं म्हटलं नसतं."

"हूं. बेस्ट ऑफ लक."

"थँक यू."

"इंटरव्ह्यूचे रिझल्ट येईपर्यंत काय करणार आहेस?"

"आपली प्रॅक्टीस तर चालू आहे. पॉलिक्लिनिकचं भाडं सुटून वर थोडं उत्पन्न आहे. पुस्तकाचं कामही चालू आहे. लेक्चररची पोस्ट मिळाली की प्रॅक्टीस बंद करीन."

"आणि तुझ्याकडे प्रसूतीसाठी नाव नोंदवलेल्या स्त्रियांचं काय करणारेस?"

"नाव नोंदवलेल्या स्त्रिया?" मी हसलो. "मी सध्या फक्त कन्सल्टिंग आणि छोटीमोठी ऑपरेशनं करतोय. कोणीही

माझ्याकडे नाव घातलेलं नाही. आमच्या परिसरातले जीपी त्यांच्या जुन्या प्रसूतीतज्ज्ञांकडेच सगळ्यांना पाठवताहेत."

"तू उपनगरांत गेला असतास तर प्रॅक्टीसमध्ये श्वास घ्यायला वेळ मिळाला नसता."

"जाऊ दे रे. उपनगरांत जाणं मला शक्य नाही."

"का?"

"आई उपनगरांत जायला तयार नाही. तिथे नळाला चोवीस तास पाणी नसतं, गटारं उघडी असतात, डास असतात, आणि रेल्वेने जायला यायला खूप त्रास होतो असं म्हणते ती. तुम्हाला हवं तर तुम्ही जा, मी येथे एकटी राहीन असं ती माझ्या वडिलांना आणि मला म्हणाली."

"तू एकटा जा."

"मी कसा जाऊ रे? आईवडिलांकडे त्यांना बघायला एक तरी मूल पाहिजे ना?"

"देव बघतो रे सगळं. तू जाऊन तर बघ उपनगरांत. आई वडील येतील तुझ्या पाठोपाठ."

"परवेझ, तसं व्हायचं नाही. माझ्या आईचं मत बदलणं केवळ परमेश्वरालाच जमेल, आणि तो ते मनावर घेत नाहीये. आणि उपनगरांत काय कट द्यायला लागणार नाही?"

"लागतो रे. पण नवीन लग्न झालेली जोडपी इथल्या जागा परवडत नाहीत म्हणून उपनगरांत स्थायिक होतायत. इथे प्रसूतीयोग्य स्त्रिया कितीशा उरल्यायत?"

"जाऊ दे रे. आवड म्हणून मी या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतलं. आवड म्हणून मला लेक्चरर व्हायचंय. माझा पिंड खाजगी प्रॅक्टीसचा नाही. अडलेल्या गरिबांवर उपचार करायचे,

विद्यार्थ्यांना शिकवायचं आणि संशोधन करायचं असं आयुष्य मला आवडतं. दोन वेळचं जेवण, दोन वेळचा चहा, आणि झोपायला बिछाना येवढ्यासाठी किती पैसा लागतो? इथल्या पगारात जमेल ते."

"हूं. बघ काय काय होतं ते. मी इथली नोकरी सोडून प्रायव्हेट प्रॅक्टीस सुरू करीन म्हणतो."

मला धक्का बसला. परवेझसारखी माणसं होती म्हणून राजमाता हॉस्पिटल खंबीरपणे उभं होतं.

"सोडून जातोयस? अरे, मग आमचं काय होणार?"

"विजय, पदोन्नती होईल म्हणून खूप दिवस थांबलो मी. पण वरिष्ठ माणसं चिकटून बसलीयत. पदोन्नती होण्याची किंवा सोडून जाण्याची त्यांची काही चिन्हं दिसत नाहीयेत. राजमाताला माझी गरज असती तर त्यांनी मला पदोन्नती दिली असती. त्यांना नगाला नग असला की पुरतं. तो नग जोशीबाई किंवा कावळ्यांसारखा असला तरी त्यांना काहीही फरक पडत नाही. रुग्णांना त्यातला फरक समजत नाही. मोठ्या वयाचे डॉक्टर ते मोठे डॉक्टर आणि म्हणून चांगले डॉक्टर असं त्यांना वाटतं. मी कोणासाठी येथे रहावं?"

"अरे पण आमचं काय? अडीअडचणीला आम्ही कोणाचा सल्ला घ्यायचा?"

"आता तू तयार झालायस. तुझे निर्णय माझ्या निर्णयांइतकेच चांगले, आणि कधीकधी तर माझ्या निर्णयांपेक्षा जास्त चांगले असतात. आता तू तुझ्या स्वतःच्या पंखांनी उडायचं आहेस."

परवेझ त्याच्या कामाला गेला. माझ्या घशात आवंढा आला. त्यालाही त्याचं आयुष्य त्याला हवं तसं जगायचा अधिकार

होता. त्याला थांबवणं योग्य नव्हतं हे मला समजत होतं, पण उमजत नव्हतं. जाताना तो मला अमूल्य असं प्रशस्तीपत्रक देऊन गेला होता. ते तोंडी होतं. लेखी असतं तर मी ते फ्रेम करून लावलं असतं.

***

"अरे विजय, सॉलिड प्रॉब्लेम झालाय."
नाक-कान-घशाचा बर्वे तसा माझा मित्र कधीच नव्हता. त्याने मला रस्त्यात हाक मारून बोलणं म्हणजेही मला आश्चर्याची गोष्ट वाटली असती. त्याचा फोन आला म्हणजे खरोखर मोठी भानगड असणार असा मी कयास केला.
"काय झालं?"
"लेक्चररच्या पोस्टच्या इंटरव्ह्यूचे निकाल आलेयत. बालरोगशास्त्राचा दलाल, तू आणि मी असे तिघेजण आपापल्या विषयांत पहिले आलो आहोत."
"मग त्यात प्रॉब्लेम काय आहे?"
"आणि आपल्याला चिंपोलीच्या हॉस्पिटलात टाकलय. तळाची माणसं राजमाताला टाकलीयत."
"सर्वच विषयांत त्यांनी असं केलं असेल" मी म्हटलं.
"नाही रे. तुझा इंटरव्ह्यू झाला त्या दिवशी सकाळी अस्थिरोगशास्त्राचा इंटरव्ह्यू झाला होता. तिथपर्यंतच्या सर्व इंटरव्ह्यूचे पहिले डॉक्टर त्यांनी राजमातात टाकलेयत. स्त्रीरोगशास्त्रापासून पुढच्या सर्व विषयांचे पहिले डॉक्टर, म्हणजे आपणे तिघे चिंपोलीला टाकलेयत, आणि शेवटचे राजमाताला टाकलेयत."

"आता काय करायचं?" मी म्हटलं.

"आता आपण तिघं आज अकरा वाजता नगरपालिकेची ऑफिसं उघडतील तेव्हा अकंना भेटूया."

"तेच अक का, ज्यांनी आपले इंटरव्ह्यू घेतले होते?" मी विचारलं. ते आपल्या नातवाचं नाव विजय ठेवणार होते.

"नाही. त्यांची बदली झाली. त्यांच्या जागी औरंगाबादकर नावाचे नवे अक आलेयत. त्यांनी हा लोच्या केला म्हणे."

"मी येतो" असं म्हणून मी फोन ठेवला. चिंपोली हे उपनगरांतलं नगरपालिकेचं हॉस्पिटल होतं. तिथे लेक्चरर नेमणं हा वेडपटपणा होता, कारण तिथे वैद्यकीय विद्यार्थीच नसायचे. तिथे फक्त पेशंटच असायचे, ज्यांच्यासाठी साधे डॉक्टर नेमणं योग्य होतं. लेक्चररना रुग्णसेवा आणि विद्यार्थ्यांना शिकवणं अशी दुहेरी ड्यूटी असायची. तर अशा ठिकाणी पहिल्या नंबरचे लेक्चरर पाठवणं म्हणजे अगदीच विचित्रपणा होता.

अकरा वाजायला पाच मिनिटं असताना मी नगरपालिकेच्या मुख्यालयात पोचलो. पाठोपाठ बर्वे आणि दलालही आले. आम्ही अकंना भेटायच्या रांगेत बसलो. आमचा नंबर लागायला अर्धा तास लागला.

"या, या, डॉक्टर, बसा" अक म्हणाले. त्यांच व्यक्तिमत्व रुबाबदार आणि प्रथमदर्शनी छाप पाडणारं होतं. बरेचसे आय्.ए.एस्. ऑफिसर अशाच व्यक्तिमत्वाचे असतात हे मला नंतर कळलं. आम्ही निर्देशित केलेल्या खुर्च्यांवर बसलो.

"सर," बर्वे म्हणाला, "आम्ही तिघं आपापल्या विषयांत लेक्चररच्या इंटरव्ह्यूत पहिले आलोत. पण तरीही आम्हाला

पहिल्या क्रमांकाच्या राजमाता हॉस्पिटलात न टाकता चिंपोलीच्या हॉस्पिटलात टाकलंय, तर शेवटचा नंबर असणाऱ्यांना राजमातात टाकलय. आम्हाला राजमातात नेमणूक करून हवी आहे."

"नाही. आम्ही पहिल्या क्रमांकाच्या उमेदवारांना चिंपोलीला नेमण्याचं कारण असं की ते हॉस्पिटल वाईट अवस्थेत आहे. ते सुधारण्यासाठी आम्ही सर्वोत्तम डॉक्टरांना तिथे नेमलंय. राजमातात कमी दर्जाचे डॉक्टर नेमले तरी चालेल कारण ते हॉस्पिटल सुस्थितीत आहे."

"पण सर..."

"आम्ही आय्.ए.एस्. होतो तेव्हा पण असंच करतात. पहिल्या क्रमांकाच्या उमेदवाराला कलेक्टर म्हणून सगळ्यात दूरच्या, अविकसित ठिकाणी पाठवतात."

"सर, पण हा नियम सर्वच विषयांच्या उमेदवारांना लागू केलेला नाही. तो फक्त आमच्या तिघांच्याच बाबतीत लागू केलाय. एका दिवशी ऑर्थोपेडिक्सचे इंटरव्ह्यू सकाळी झाले तर स्त्रीरोगशास्त्राचे दुपारी झाले. ऑर्थोपेडिक्सचे पहिल्या क्रमांकाचे उमेदवार राजमातात नेमलेत, तर स्त्रीरोगशास्त्रापासून पुढचे पहिल्या क्रमांकाचे उमेदवार चिंपोलीला नेमलेयत. सर्वांना एकच नियम लागू केला पाहिजे ना?" मी म्हटलं.

"त्याचं काय आहे, आमचं पॉलिसी डिसिजन जेव्हा झालं तेव्हापासून आम्ही हा नियम लागू केला" अक म्हणाले.

"पण सर...."

"तुम्ही तरूण माणसं आहात. कामाला लागा. चिंपोली काय आणि राजमाता काय, नगरपालिकेचीच हॉस्पिटलं आहेत. काम दोन्हीकडे सारखंच आहे."

"नाही सर" बर्वे म्हणाला, "चिंपोली हे शैक्षणिक हॉस्पिटल नाहीये. तिथे वैद्यकीय विद्यार्थी नसतात. आम्ही पहिले असूनही शैक्षणिक अनुभवात मागे पडू."

"छे छे! ते शैक्षणिक हॉस्पिटल आहे. आमच्या नोंदीत तसं आहे. निघा तुम्ही. कामाला लागा."

आम्ही निघालो.

"गंडवताहेत आपल्याला" दलाल म्हणाला.

"हूं" मी म्हटलं. "पॉलिसी अशी जेवणाच्या वेळी ठरते काय, की सकाळी एक पॉलिसी आणि दुपारपासून दुसरी पॉलिसी? सर्व विषयांचे इंटरव्ह्यू झाले की याद्या बनतात आणि एकाच वेळी बाहेर पडतात. मग सगळ्यांना एकच पॉलिसी लागू व्हायला नको का?"

"मला खरं कारण माहीत आहे" दलाल म्हणाला. "औरंगाबादकरांची भाची स्त्रीरोगशास्त्राच्या यादीत तळाला आहे. तिला राजमाताला जायचंय म्हणून हे समीकरण मांडलय."

"पण सर्वांना तेच समीकरण लावायचं होतं" बर्वे म्हणाला.

"ते जमण्यासारखं नाही. मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख सचिवाचा मुलगा ऑर्थोपेडिक्सच्या यादीत पहिला आहे. त्याला पण राजमातालाच जायचय."

"मग त्यांनी आपल्या भाचीला पहिला क्रमांक द्यायचा होता. मग असा द्राविडी प्राणायाम करायला लागला नसता."

"ते जमलं नाही त्यांना. आधीचे अक सचोटीचे होते. त्यांनी तोलून मापून याद्या बनवल्या आहेत."
"तुला कसं कळलं हे सगळं?" बर्वेने विचारलं. कसं कळलं हे समजून काय फरक पडणार होता देव जाणे.
"माझे शेजारी पालिकेच्या मुख्यालयात अतिरिक्त आयुक्तांचे सचिव आहेत. त्यांना सगळं माहित असतं. पण त्यांचं नाव कुठे बोलू नका."
"आता काय करायचं?" बर्वे म्हणाला.
"कोर्टात गेलो तर आपण नक्की जिंकू" मी म्हटलं. "पण खर्च बराच होईल. वेळही खूप जाईल."
"आणि आपण जिंकलो तरी ही मंडळी उद्या आपल्याला खोट्यानाट्या भानगडीत नक्की अडकवतील. शेवटी त्यांच्याच हाताखाली काम करायचंय" दलाल म्हणाला.
"मला वाटतं आपण चिंपोलीला कामावर रुजू होऊया. काम करता करता तिथून आपला लढा चालू ठेवूया."
"हो. हे बरं वाटतं. चिंपोलीचा शैक्षणिक दर्जा काय ते सांगा असं युनिव्हर्सिटीला पत्र टाकूया" बर्वे म्हणाला.
आम्ही निघलो. चिंपोलीला पोचलो. ते प्राथमिक आरोग्य केंद्रासारखं दिसणारं हॉस्पिटल बघून रुजू न होताच परत जावं असं मनात आलं. पण लढ्याच्या सुरुवातीलाच हार मानून मागे फिरणं माझ्या रक्तात नव्हतं. देव करतो ते आपल्या भल्यासाठीच असा माझा विश्वास होता. देवावर अविश्वास दाखवून मागे फिरण्याचा करंटेपणा माझ्याकडून झाला नसता. मी कामावर रुजू झालो.

***

बाहेरून गबाळं दिसलं तरी चिंपोली हॉस्पिटल चांगलं होतं. सर्व विषयांचे तज्ज्ञ तिथे होते. त्या विषयांचे बाह्य आणि आंतररुग्णविभाग, ऑपरेशन थिएटर्स, एक्सरे, ईसीजी, लॅबोरेटरी वगैरे सर्व गोष्टी तिथे होत्या. हृदय, मेंदू वगैरे अवयवांवर शल्यक्रिया करण्याची सोय तिथे नव्हती. त्यासाठी रुग्णांना राजमातासारख्या मोठ्या हॉस्पिटलात पाठवावं लागत असे. सीटी स्कॅन, एम्.आर्.आय. वगैरे प्रगत तंत्रज्ञान तिथे उपलब्ध नव्हतं. सोनोग्राफीचं मशिनसुद्धा नव्हतं. सर्व रोगांचं निदान रुग्णांची लक्षणं आणि चिन्हं यांच्यावरूनच करावं लागत असे. ज्या जुजबी तपासण्या करून मिळायच्या त्यांची थोडीशी मदत होत असे. राजमातासारख्या हॉस्पिटलांत शिकून तयार झालेल्यांना अशा वातावरणात बुजायला व्हायचं. मला औरंगाबादकरांनी चिंपोलीला टाकून खरं तर माझ्यावर मोठे उपकार केले असं म्हटलं पाहिजे. मी ते हॉस्पिटल किती सुधारलं माहित नाही. पण त्या हॉस्पिटलने मात्र मला खूप सुधारून टाकलं. कमीत कमी सोयींमध्ये रुग्णांवर उपचार कसे करायचे ते मी तिथे शिकलो. अगदी सिरियस पेशंटांना बरं कसं करायचं ते मी तिथे शिकलो. डोक्यावर प्रोफेसर आणि असोशिएट प्रोफेसर यांच संरक्षक छत्र नसताना काम कसं करायचं हे मी तिथे शिकलो. तिथले ऑनररी डॉक्टर दोन तास काम करून निघून जायचे. मग बरोबर एक रजिस्ट्रार आणि एक हाऊसमन असे दोनच आरेमो घेऊन लेक्चररांनाच सगळा डोलारा संभाळावा लागत असे. राजमाताने मला ज्ञान दिलं, तर चिंपोलीने ते ज्ञान न भिता, गोंधळ होऊ न देता, कमीत कमी खर्चात आणि रुग्णाला कमीत कमी त्रास होऊ देऊन कसं

वापरायचं ते शिकवलं. माझ्याबरोबरच निवड होऊन राजमातात नेमणूक झालेल्या उमेदवारांच्याहून खूप जास्त अनुभव मला मिळाला त्याबद्दल औरंगाबादकरांना कुबुद्धी देणाऱ्या देवाचे आभार मानावे तेवढे थोडेच. चिंपोलीत दहा महिन्यांच्या अनुभवातून मी जे काही शिकलो ते मी राजमातात गेलो असतो तर कदाचित आयुष्यभरात शिकलो नसतो.

माझी रजिस्ट्रार होती प्रिया गद्रे आणि हाउसमन होती निशा नारकर. प्रिया समंजस होती. म्हणजे एखादी गोष्ट तिला नीट सांगितली की तिला ती नीट समजायची, आणि नंतर ती गोष्ट ती दर वेळी बरोबर पद्धतीने करायची. जे येत नाही ते चुकीच्या पद्धतीने करत रहाण्याऐवजी विचारायची. निशा फारशी समंजस नव्हती. सांगितलेली गोष्ट पुढच्या वेळी परत पूर्वीच्याच पद्धतीने व्हायची. स्वतःत बदल करणं मला वाटतं तिच्या स्वभावातच नव्हतं. एखादी गोष्ट अमुक पद्धतीने करणं योग्य असतं म्हणून ती त्या पद्धतीने करावी असं तिला कधी वाटत नसे. पण तसं केलं नाहीस तर बघ असा दम दिला तर मात्र ती गोष्ट सांगितल्याप्रमाणे व्हायची. तर अशा दोन प्रकारच्या दोघींना बरोबर घेऊन मी प्रमुख आणि उपप्रमुख नसताना युनिटचा गाडा हाकत असे.

स्त्रीरोग आणि प्रसूतीशास्त्रातलं मुख्य काम प्रसूती करणं हे असे. चिंपोलीत वर्षाकाठी दहा बारा हजार स्त्रिया प्रसूत व्हायच्या. त्यांत कधीकधी अडचणी यायच्या, आणि त्या तातडीने सोडवाव्या लागायच्या.

"विजय, दोन तास झाले. त्या मंगलाचं पूर्ण डायलेटेशन झालंय, पण ती प्रसूत होत नाहीये."

जर प्रियाने दोन तास प्रयत्न करूनही मंगला प्रसूत होत नव्हती तर तिला नक्कीच काहीतरी अडचण होती.

"चल, मी बघतो तिला" मी म्हटलं.

मी मंगलाला तपासलं. प्रसववेदनांनी आणि जोर करून करून ती अगदी थकून गेली होती. ती आपोआप प्रसूत होण्याची काही शक्यता नव्हती.

"तिला फोर्सेप्स लावावा लागेल" मी म्हटलं. "जा, कॅप-मास्क लावून वॉश अप होऊन ये."

प्रिया वॉश अप व्हायला गेली. मी स्टाफबाबा आणि आयाबाईच्या शोधात निघालो. नर्सला बाबा असं म्हणायचा तेव्हा प्रघात होता.

"स्टाफ, त्या तीन नंबरच्या कॉटवरच्या मंगलाला फोर्सेप्स लावायचाय. ट्रॉली लावता का?"

"आत्ता लावते डॉक्टर" स्टाफबाबा म्हणाली.

"आयाबाई, तीन नंबरला फोर्सेप्स लावायचाय. तयारी करा."

नर्मदाबाईंनी खरं तर नुकतीच मशेरी लावायला घेतली होती. प्रिया किंवा निशाने काम सांगितलं असतं तर त्यांनी सरळ दुर्लक्ष केलं असतं. पण त्या अनुभवी होत्या. आरेमो आणि लेक्चरर यांना एकाच पारड्यात तोललं तर गोंधळ होईल याची त्यांना कल्पना होती. मशेरी बाजूला ठेवून त्या पेशंटला फोर्सेप्ससाठी पोझिशन द्यायला उठल्या.

प्रिया आणि स्टाफबाबा तयार होऊन आल्या. मूल जन्मल्यावर घुसमटलेलं असलं तर त्याच्यावर उपचार करायला निओ आला. नवजात अर्भकांच्या डॉक्टरला निओनेटॉलॉजिस्ट या शब्दाचं संक्षिप्त रूप म्हणून निओ असं म्हणायचे.

"लाव, फोर्सेप्स्चं डावं ब्लेड लाव" मी प्रियाला म्हटलं.
प्रियाने डावं ब्लेड लावलं.
"स्टाफ, ते ब्लेड जरा धरा" मी म्हटलं.
स्टाफबाबाने वाकून एक हात लांब केला आणि ते ब्लेड धरलं.
"आता उजवं ब्लेड लाव. संभाळून. अडकत असेल तर जोर करून लावू नकोस."
प्रियाने उजवं ब्लेड संभाळून लावायचा प्रयत्न केला, पण ते लागेना.
"विजय, ब्लेड अडकतंय" ती म्हणाली.
"थांब. मी येतो" मी म्हटलं. फोर्सेप्स लावताना गडबड होऊन चालत नाही. मी पटकन वॉश अप होऊन आलो आणि मंगलाच्या मुलाच्या डोक्याला ते अडकणारं फोर्सेप्सचं उजवं ब्लेड लावून टाकलं.
"हं, आता इथे बस आणि तिला पुढची कळ आली की फोर्सेप्सचं हँडल पकडून ओढ" मी म्हटलं.
मी उठलो आणि माझ्या जागेवर प्रिया बसली.
"फार जोर लावून ओढू नकोस. बाळ आणि त्याची माता यांच्यापैकी कोणालाही इजा होता कामा नये."
वास्तविक त्या हडकुळ्या मुलीला फार जोर लावू नकोस असं सांगण्यात फारसा अर्थ नव्हता. तेवढा जोर आधी तिच्या अंगात असायला हवा होता ना. पण कोणतंही ऑपरेशन हाताखालचे डॉक्टर करत असतील तर त्यांना ते कसं करायचं याच्या सूचना देणं हे माझं काम होतं आणि ते सवयीने गरज असो किंवा नसो, आपोआप व्हायचं. त्यातून फोर्सेप्स लावणं ही तशी जोखमीची गोष्ट होती. पूर्वी फोर्सेप्स लावायला बसलं की

मुलाची डिलिव्हरी केल्याशिवाय उठणं ही मोठी नामुष्कीची गोष्ट समजली जात असे. एका हाताने ओढून मूल निघालं नाही तर दोन हातांनी ओढण्याचा प्रघात होता. तरीही मूल निघालं नाही तर एक पाय टेकू म्हणून त्या प्रसूत होणाऱ्या बिचाऱ्या बाईच्या अंगाला लावून पुऱ्या अंगाचा जोर लावून ओढण्याची आज्ञा होत असे. त्यानेही काही फायदा झाला नाही तर रजिस्ट्रार फोर्सेप्स लावणाऱ्या हाउसमनच्या खांद्यांना पाठून विळखा घालत असे आणि मग दोघे मिळून ओढत असत. आजूबाजूला तीन चार नर्सेस 'जोर कर, जोर कर' असं तारस्वरात कोरसमध्ये म्हणत असत. या धामधुमीत एकदा एका बाईने खरोखरच छान जोर केला आणि पटकन प्रसूत झाली. त्याबरोबर खेचणारे ते दोघे पाठीवर धाडकन पडले आणि ते नवजात अर्भक त्यांच्या अंगावर पडून ' टॅंहॅं टॅंहॅं' करून रडायला लागलं म्हणे. त्या कारणामुळे म्हणा किंवा स्त्री आरेमोंनी या खांद्याभोवती विळखा घालण्याच्या प्रकाराला तीव्र आक्षेप घेतल्यामुळे म्हणा, फोर्सेप्स लावण्याची ही पद्धत बंद झाली.

"विजय, बाळ निघत नाहीये" प्रिया म्हणाली. तिची एक गोष्ट मला फार आवडायची. एखादी गोष्ट करणं जर तिला जमत नसेल तर ती तसं पटकन कबूल करून टाकायची. थांब असं म्हणेपर्यंत प्रयत्न करत रहायची नाही. एखादं गणित सुटेपर्यंत प्रयत्न करणं आणि रुग्णावर शल्यक्रिया करताना प्रयत्न करणं यातला फरक तिला नीट समजलेला होता. आपल्या मर्यादा ज्याला नीट समजलेल्या आहेत तोच चांगला डॉक्टर हे माझं

ठाम मत आहे, आणि त्या दृष्टिकोनातून प्रिया चांगली डॉक्टर होती असं म्हणायला काहीच हरकत नव्हती.

"प्रिया, तू उठ. मी बघतो" मी म्हटलं. ती पटकन उठली. मी तिच्या जागेवर बसलो.

"प्रिया, तू या दिशेला ओढत होतीस" मी जरा वरच्या दिशेला बोट दाखवून म्हटलं. "त्यामुळे तुझा सगळा जोर फुकट जात होता. डब्यातून लाडू बाहेर काढायचा तर तो डब्याच्या तोंडाच्या दिशेलाच ओढला पाहिजे. डब्याच्या बाजूच्या दिशेला ओढला तर तो निघेल का?"

"नाही. पण लाडू ओढावा का लागतो. नुसता उचलून निघत नाही का तो?"

मी चमकून तिच्याकडे पाहिलं. ती मिश्किल हसली. ते मूल अडकलेलं असताना तिला विनोद सुचला याचं कारण रथाचं सारथ्य मी तिच्याकडून काढून घेतलं हे असावं. मी त्या फोर्सेप्सकडे परत वळलो. मंगलाला पुढची कळ आल्यावर योग्य दिशेला ओढून मी ते मूल सुखरूपपणे बाहेर काढलं आणि निओकडे सुपूर्द केलं.

"मी टाके मारते" प्रिया म्हणाली. मी उठलो. माझ्या जागेवर ती बसली आणि टाके मारायला लागली.

"प्रिया. संक्रांतीचे तिळाचे लाडू असतात ना, ते चिकट असतात. ते नुसते उचलून डब्यातून बऱ्याचदा निघत नाहीत. ओढावे लागतात, माहित आहे?"

"अं?" ती गोंधळली. थोडा वेळ तिने आपण मारत असलेल्या टाक्यांकडे निरखून पाहिलं. मग तिच्या लक्षात आलं की मी त्या टाक्यांबद्दल नाही तर तिच्या मघाच्या लाडू

उचलण्याबद्दल बोलत होतो. ती हसली. टाके मारणं परत सुरू झालं.

"भलत्याच दिशेला ओढलं तर कधी कधी मोठा गोंधळ होतो" मी म्हटलं. "आता तुझ्यात तेवढा जोर नाही म्हणून हरकत नाही."

"कोण म्हणतो माझ्यात जोर नाही?" ती उसळली.

मुलीच्या दंडात जोर नसला तरी डोक्यात आणि जिभेत मात्र भरपूर होता यात शंका दिसत नव्हती.

"मी म्हणतो" मी म्हटलं. "मी रजिस्ट्रार होतो तेव्हाची गोष्ट आहे. माझा एक हाउसमन होता. तो खरं म्हणजे खाशाबा जाधवांच्या आखाड्यात तयार होऊन हिंदकेसरी वगैरे व्हायला हरकत नव्हती. पण त्याच्या आईबाबांना ते कळलं नाही. त्यांनी काहीतरी गडबड केली आणि राखीव कोट्यात त्याला एम्.बी.बी.एस्.ला ॲडमिशन घेतली. माझ्या दुर्दैवाने तो माझा हाउसमन झाला. आता तू बसली आहेस तसाच तो एकदा फोर्सेप्स लावायला बसला होता. मी आता उभा आहे तसाच तेव्हा मी उभा होतो. तुला सांगितलं तसंच मी त्याला फोर्सेप्स ओढ असं सांगितलं. गडी तयारीचा होता. त्याने ओढलं. तू ओढलंस त्याच चुकीच्या दिशेला त्याने ओढलं. ती पन्नास किलो वजनाची बाई कॉटसकट ओढली ना त्याने. मग मी त्याला म्हटलं की ओढताना दोन्ही पाय कॉटच्या पायांना लाव, म्हणजे कॉट ओढली जायची नाही. त्याने दोन्ही पाय कॉटच्या पायांना पक्के लावले आणि मग ओढलं. तेव्हा कॉट जागच्या जागी राहिली, पण बाई त्याच्या दिशेला ओढली गेली. मूल होतं तिकडेच राहिलं. मग मी त्या बाईला दोन्ही

हातांनी कॉट घट्ट धरून ठेवायला सांगितलं. तिने तसं केल्यावर त्याने परत ओढलं, आणि काय सांगू..."

"काय?" प्रियाने मारत असलेला टाका अर्ध्यावरच धरला आणि माझ्याकडे उत्सुकतेनं पाहिलं. तिच्यात जोर नाही असं म्हटल्यामुळे आलेला राग गोष्ट ऐकता ऐकता गेलेला दिसत होता.

"मूल तसूभरही हललं नाही, पण बाईच्या डोक्याच्या बाजूचे कॉटचे दोन्ही पाय जमिनीपासून चार इंच वर उचलले गेले."

"आई ग!" ती म्हणाली.

"मी सॉलिड टरकलो. मी त्याला म्हटलं की तिला हळूहळू खाली ठेव. त्याने हळूहळू जोर कमी केला. कॉटचे पाय अलगद जमिनीला टेकले. मग मी तुला उठवलं तसं त्याला उठवलं, त्याच्या जागेवर बसलो आणि ते मूल फोर्सेप्सनेच बाहेर काढलं. देवाच्या दयेने बाळ आणि बाळंतीण दोघेही सुखरूप होते."

प्रियाने सुस्कारा सोडला.

"आता सांग, तेवढा जोर आहे तुझ्यात?"

तिने नकारार्थी मान हलवली. मुलीचं डोकं गरम असलं तरी वळण चांगलं होतं. तेवढा जोर तुझ्यात तरी आहे का असं एखाद्या भांडखोर मुलीने विचारलं असतं. प्रियाने मात्र तसं केलं नाही.

***

त्या दिवशी इमर्जन्सी तशी सुमारच होती. चोवीस तास हॉस्पिटलात काही न करता काढायचे म्हणजे एकदम

कंटाळवाणं काम होतं. दुपारची ओपीडी संपल्यावर मी ड्यूटी रूममध्ये जाऊन ताणून दिली होती. साडेपाच वाजता मला जाग आली. डोळ्यातली झोप जावी म्हणून एक कप चहा मारावा असं मी ठरवलं. वॉर्डात प्रिया आणि निशा असल्या तर त्यांनाही बोलवावं म्हणून मी वॉर्डात डोकावलो.

वॉर्डात काहीतरी नाट्यमय चाललं होतं. इमर्जन्सीत आलेल्या पेशंटांना तपासण्याच्या खोलीबाहेर प्रिया उभी होती. तिच्यासमोर दोन तिशीतली माणसं होती. असं दृश्य वॉर्डात नवं नव्हतं. पण त्या दिवशीची गोष्ट जरा वेगळी दिसत होती. त्या दोन माणसांचा अविर्भाव अरेरावीचा दिसत होता. प्रिया बावरलेली दिसत होती. त्या माणसांचा आवाज सर्वसाधारणपणे डॉक्टरांबरोबर बोलताना असतो त्यापेक्षा बराच मोठा होता. निशा आजूबाजूला कुठे दिसत नव्हती. अर्थात ती असती म्हणून काही फारसा फरक पडला असता अशातली गोष्ट नव्हती. प्रकरण हातघाईवर आलं असतं तर त्या दोहींचा त्या दोघांसमोर काही टिकाव लागला नसता.

"डॉक्टर प्रिया, काय चाललंय?" मी त्यांच्याजवळ पोचल्यावर गंभीरपणे विचारलं. प्रिया मागे वळली. तिचे डोळे बऱ्यापैकी चकाकत होते. खालच्या पापण्यांवरून कोणत्याही क्षणी अश्रू खाली ओघळतील अशी लक्षणं दिसत होती. मला बघून तिच्या चेहऱ्यावर एकदम संकटातून सुटल्यासारखे भाव आले. आत्ता रडू कोसळेल अशी स्थिती असणाऱ्या पंचविशीतल्या मुलीने रस्त्यात हरवलेली आई सापडल्यावर चार-पाच वर्षांच्या मुलाचं व्हावं तसं तोंड करावं याची मला गंमत वाटली. पण प्रसंग

गंभीरपणे हाताळणं जरूरीचं होतं. त्यामुळे मी चेहऱ्यावरची रेषाही हलू दिली नाही.

"अम्.... मी... अम्" ती म्हणाली.

"डॉक्टर प्रिया गद्रे, इथं काय चाललंय? तुम्हाला काही काम नाही का?"

तिने माझ्याकडे गोंधळून पाहिलं. नेहमी प्रिया अशी हाक मारणारा आपला लेक्चरर आता आपल्याला पूर्ण नावाने हाक का मारतोय, आणि ते सुद्धा नावापाठी डॉक्टर लावून, हे आधी तिला समजलं नाही. पण ती हुशार होती. मला काय म्हणायचं होतं ते शेवटी तिला बरोबर कळलं. तेच सूत्र पकडून ती म्हणाली,

"सर, एक पेशंट आलीय." मी मनातल्या मनात टाळ्या वाजवल्या. नेहमीप्रमाणे 'अरे विजय' असं म्हणाली असती तर मी तिचा वरिष्ठ अधिकारी आहे ही गोष्ट त्या दोघांना कशी कळली असती? "तिच्या पोटात अडीच महिन्यांचा गर्भ आहे. आता तिला रक्तस्राव होतोय."

"बरं, मग?" मी म्हटलं.

"तो गर्भ आता पडतोय.

"मग प्रॉब्लेम काय आहे? डी अँड सी करून टाक" मी म्हटलं. पहिल्या तीन महिन्यात गर्भपात होत असेल तर डी अँड सी ही शल्यक्रिया करावी लागत असे.

"मी तेच करावं लागेल असं म्हटलं तर हे तिचे नातेवाईक भांडायला उठलेत," त्या दोघांकडे तर्जनी करून ती म्हणाली. त्या दोघांना प्रथमच पाहिल्यासारखं आणि जे पाहिलं ते

फारसं न आवडल्यासारखं मी तोंड केलं. मी एंट्री घेतल्यापासून ते दोघं गप्प झाले होते. आता त्यांना स्फुरण आलं.

"आम्ही म्हणतो, असं कसं होईल?" त्यांच्यातला मिशीवाला म्हणाला.

"तुम्ही कोण?" मी विचारलं. वादविवादात प्रतिपक्षाला नामोहरम करण्यासाठी असे प्रश्न फार परिणामकारक असतात.

"आम्ही पुतणे. म्हणजे या आजारी बाई आहेत त्या आमची काकी."

"ठीक आहे. आता सांगा प्रॉब्लेम काय आहे?" मी विचारलं.

"आमची काकी चाळीस वर्षांची आहे. विधवा आहे. ती पोटुशी कशी राहील? आणि गर्भपात तरी कसा होईल? यांची चूक होतेय" प्रियाकडे हनुवटी करून तो म्हणाला.

"सर, तिच्या गर्भाशयाचं तोंड उघडं आहे. त्यातून गर्भ आणि रक्ताच्या गाठी हाताला लागतायत. तिचा गर्भपात होतोय यात शंका नाही" ती म्हणाली.

"मी तपासून बघतो" मी म्हटलं. वास्तविक प्रियाने वर्णन केलं होतं त्या लक्षणं आणि चिन्हांवरून तिनं केलेलं निदान अचूक होतं हे पहिली पोस्ट करणाऱ्या आरेमोलाही कळलं असतं. पण मला तिचं निदान बरोबर की चूक ते तपासून बघायचं नव्हतं. मला ते बरोबर आहे असं त्या पुतण्यांना पटवून द्यायचं होतं. मी आणि प्रिया तिला घेऊन रुग्णांना तपासण्याच्या खोलीत गेलो. मी तिला तपासलं. तिचा गर्भपात होत होता यात शंका घ्यायला जागाच नव्हती. आम्ही खोलीबाहेर आलो.

"बाईंचा गर्भपातच होतोय" मी गंभीरपणे म्हटलं. "गर्भाशय ताबडतोब साफ केलं पाहिजे. नाहीतर रक्तस्त्राव होऊन त्यांच्या जिवाला धोका निर्माण होईल."

"पण ते कसं शक्य आहे?" बिनमिशीवाला पुतण्या म्हणाला.

"खूप रक्तस्त्राव झाला तर माणूस मरणार यात अशक्य काय आहे?" मी म्हटलं. "जिवंत रहाण्यासाठी अंगात रक्त असावं लागतं."

"तसं नाही. आमची काकी चाळीस वर्षांची आहे. विधवा आहे. ती पोटुशी कशी राहील?"

गडी तिशीतला होता. बाई पोटुशी कशी रहाते ते त्याला माहित असायला हरकत नव्हती. जसं घरात नवऱ्याचं केवळ अस्तित्व असल्यामुळे बाई प्रेग्नंट होत नाही, तशीच केवळ नवरा नसला म्हणून प्रेग्नंट होणारच नाही असं काही नसतं येवढं समजण्यायेवढा तो नक्की वाढला होता. पुतणे हिंदी किंवा मराठी चित्रपट अजिबात पहात नसावे. नाहीतर आजकाल दहा-बारा वर्षांच्या मुलांना जे ज्ञान असतं ते त्या दोघांना मिळूनही नसावं असं झालं नसतं. दुसरं कोणी असतं तर त्याचं अज्ञान मी दूर केलं असतं. पण नगरपालिकेच्या मोफत हॉस्पिटलातल्या दुबळ्या दिसणाऱ्या स्त्री डॉक्टरवर अरेरावी करणाऱ्या त्या दोघांना अज्ञानातच खितपत ठेवावं असं माझ्या मनाने घेतलं.

"हे बघा, गर्भाशय साफ करायला हवं हे नक्की. गर्भपात होतोय हे आमचं निदान तुमच्या मते चूक आहे. तेव्हा आपण असं करूया. गर्भाशय साफ करून जे काही निघेल ते आपण

पॅथॉलॉजिस्टकडे तपासायला पाठवूया. जर तो गर्भ असेल तर तसं रिपोर्टमध्ये दिसेल. खरं खोटं काय ते कळेलच."

"पण आम्हाला तो गर्भ दाखवा की. लॅबोरेटरीत नंतर पाठवा" मिशीवाला म्हणाला.

"चालेल" मी म्हटलं. "वाटलं तर त्याचा एक तुकडा काढून तुम्हाला एका बाटलीत घालून देतो. तो तुम्ही बाहेरच्या पॅथॉलॉजिस्टकडून तपासून घ्या. चार-पाचशे रुपये खर्च होईल तो करा. म्हणजे आमच्या पॅथॉलॉजिस्टने खोटा रिपोर्ट दिला असं तुम्हाला वाटायला नको."

आपल्या काकीवर कितीही विश्वास असला, तरी तो सिद्ध करण्यासाठी चार-पाचशे रुपये खर्च करायला पुतणे तयार नव्हते. एकमेकांशी जराही विचारविनीमय न करता दोघं एकदम म्हणाले,

"नको, नको, इथंच तपासून घ्या."

मी मान डोलावली. बाईंना वॉर्डात ॲडमिट करून घेऊन डी अँड सी साठी त्यांची तयारी करण्याच्या सूचना मी नर्सला दिल्या. मग प्रियाला म्हटलं,

"चल, एक चहा पिऊन येऊया."

चहा पिताना प्रिया गप्पगप्पच होती.

"प्रिया, अशा माणसांच्या तोंडाला लागायचं नसतं."

"अरे, पण ते ऐकतच नव्हते. तो मिशावाला तर माझ्या अंगावरच येत होता. मला इतकी भिती वाटत होती म्हणून सांगू."

"गोष्टी या थराला जाऊ द्यायच्या नसतात. कोणी आवाज करायला लागलं तर मोठ्या डॉक्टरांना बोलावते असं

म्हणायचं. मला बोलावून घेत जा. मी बघीन काय करायचं ते. प्रकरण मारामारीपर्यंत जातंय असं वाटलं तर सिक्युरिटीला फोन करायचा. काय?"

तिने मान डोलावली."

"पॅथॉलॉजिस्टचा रिपोर्ट गर्भपात असा येणार यात काही शंकाच नाही. पण त्याला दोन आठवडे लागतील. त्या दोघांना गर्भ आजच बघायचा आहे. सक्शन आणि डी अँड सी करून जे काही निघेल ते गर्भ आहे हे आपल्याला कळलं तरी सामान्य माणसांना कळणार नाही. त्या दोघांना आजच्या आज पुरावा दिला पाहिजे. नाहीतर त्यांना आणि आजूबाजूच्या इतर पेशंटाना वाटेल की डॉक्टरांचीच काहीतरी चूक होती. नगरपालिकेच्या रुग्णालयातले डॉक्टर म्हणण्यायेवढे हुशार नसतात असं त्यांना नेहमीच वाटतं. प्रायव्हेट हॉस्पिटलचा खर्च झेपत नाही म्हणून त्यातले बरेच जण नाईलाजाने इथे येतात. पण म्हणून या हॉस्पिटलला आणि इथल्या डॉक्टरांना नावं ठेवायची संधी मिळाली तर ते ती सोडत नाहीत."

"मग काय करायचं?" तिने विचारलं.

"आपण विद्यार्थ्यांना दाखवायला म्हणून एक गर्भ काचेच्या बाटलीत घालून ठेवलाय ना, तो त्यांना दाखवायचा."

"अरे, पण तो गर्भ चांगला चार महिन्यांचा आहे. तो कसा चालेल?"

"त्याचे हात, पाय, डोकं, छाती, पोट असं सगळं काही नीट दिसतंय. तो गर्भ आहे हे पुतण्यांना नक्की कळेल. अडीच आणि चार महिन्यांच्या गर्भातला फरक कळायला ते काय

एम्.बी.बी.एस्.चे विद्यार्थी आहेत? आणि काय ग, तू परिक्षेला बसलीस तेव्हा तुला तरी हा फरक माहित होता काय?"
प्रियाला खोटं बोलणं तेवढं नीट जमत नसे. तिने वरमून नकारार्थी मान हलवली.
"झालं तर मग. ती बाटली कापडाच्या पिशवीत घालून ऑपरेशन थिएटरमध्ये नेऊन ठेव. तिच्या डी अँड सी च्या वेळी मला बोलाव. पुढचं मी संभाळतो."
वॉर्डला लागूनच आमचं ऑपरेशन थिएटर होतं. तिथे प्रियाने बाईंची डी अँड सी पार पाडली. गर्भाशयातून जे काही निघालं ते आम्ही पॅथॉलॉजिस्टकडे पाठवण्यासाठी स्पेसिमेन बॉटलमध्ये भरून ठेवलं. बाईंची तब्येत ठीक आहे अशी खात्री झाल्यावर आम्ही त्यांना ट्रॉलीवर खालून वॉर्डात नेलं. बरोबर बाईंच्या नाडीवर बोट ठेवून प्रिया आणि हातात चार महिन्यांच्या गर्भाची बाटली धरून मी होतो. पाठून दोघे पुतणे येत होते. वरात वॉर्डात आली. बाईंना एका कॉटवर झोपवल्यावर आजूबाजूच्या पेशंटांच्या साक्षीने मी तो गर्भ पुतण्यांना दाखवला.
"हा गर्भ तुमच्या काकीचं गर्भाशय साफ केलं तेव्हा निघाला" मी म्हटलं. ते दोघं डोळे फाडून त्या गर्भाकडे पहात होते. असं काही त्यांनी पूर्वी कधी पाहिलं नसावं.
"मुलगा होता" मी म्हटलं. सर्वसाधारणपणे गर्भपात झाल्यावर तो मुलगा निघाला तर लोकांना फार दुःख होत असे. पण त्या दोघांना तसं काही वाटलेलं दिसलं नाही.
"त्याच्या डोक्याची वाढ पूर्ण झालीये" मी सहज आवाजात म्हटलं. "चेहरा किती स्पष्ट दिसतोय बघा. अगदी आईच्या

वळणावर की वडिलांच्या ते समजण्यायेवढा तो स्पष्ट दिसतोय. आईच्या वळणावर नसावा."

त्या दोघांनी वाकून गर्भाचा चेहरा न्याहाळला. तो कोणासारखा दिसतो ते त्यांना कळलं असलं तर त्यांनी ते मला सांगितलं नाही.

"हा गर्भ आहे याची खात्री करण्यासाठी दोन आठवड्यांनी या. तोपर्यंत पॅथॉलॉजिस्टचा रिपोर्ट तयार होईल" मी म्हटलं. ते काहीच बोलले नाहीत. "बाईंचं स्त्री नसबंदीचं ऑपरेशन केलं तर बरं. मग परत गर्भ रहायचा नाही."

या वेळी त्यांच्या वयाचा आणि वैधव्याचा उल्लेख करून 'असं कसं होईल?' असं त्यांच्यातला एकही जण म्हणाला नाही. भले असं कसं होतं हे त्यांना कळलं नसलं तरी असं होऊ शकतं हे दोघांनाही नीट कळलेलं दिसत होतं.

"ऑपरेशन करायचं तुमचं ठरलं तर दोन आठवड्यांनी याल तेव्हा मला सांगा" असं म्हणून मी निघून गेलो.

पॅथॉलॉजिस्टचा रिपोर्ट गर्भपात असाच आला. पण तो रिपोर्ट बघायला पुतणे आणि ऑपरेशन करून घ्यायला बाई काही आल्या नाहीत. या सगळ्या प्रकरणातून पुतणे कमीत कमी एकट्या, दुबळ्या दिसणाऱ्या डॉक्टरणीवर अरेरावी करू नये येवढं तरी शिकले असावे अशी आशा आहे.

"प्रिया, काही माणसांना आपण इतरांपेक्षा जास्त शहाणे आहोत असं नेहमी वाटत असतं" तो रिपोर्ट पाहिल्यावर मी म्हटलं. "आपल्या गल्लीत ते राजे असतात. तिथे त्यांची दादागिरी चालते म्हणून ते हक्काने दादागिरी करतात. इतर ठिकाणी जेव्हा तिथले लोक दादागिरी करतात तेव्हा हे लोक नमतं

घेऊन गप्प रहातात. पण जर तिथली मंडळी कमकुवत आहेत असं त्यांना जाणवलं तर मात्र त्यांना जोर येतो. दुसऱ्याच्या गल्लीत जाऊन जोर दाखवण्याचा मजा काही औरच असतो. साधारणपणे डॉक्टर म्हणतो ते बरोबर असं सामान्य माणसं समजतात आणि वादविवाद करत नाहीत. पण जेव्हा गोष्टी त्यांच्या मनासारख्या होत नाहीत तेव्हा डॉक्टर चूक करतोय असं या असामान्य लोकांना वाटतं. त्यातून शिकाऊ डॉक्टरांना काही विशेष ज्ञान नसतं आणि योग्य ट्रीटमेंट कशी द्यायची हे त्यांना आपण सांगितलंच पाहिजे असं त्यांना वाटतं. डॉक्टर आपलं ऐकत नसेल तर ते गुंडगिरी सुरू करतात. जर शिकाऊ डॉक्टर मुलगी असेल तर सोन्याहून पिवळं, कारण गुंडगिरीला मुली जास्त घाबरतात. घाबरणाऱ्याला जास्त घाबरवायचं आणि एकटा असला तर बिनधास्त मारायचं हे अशा मंडळींचं मानसशास्त्र असतं. त्यांना वेळीच वेसण घातली नाही तर ते तोडफोड, मारझोड, जाळपोळ वगैरे करतात. आता पुढच्या वेळी तू परिस्थिती योग्य प्रकारे हाताळशील अशी मी अपेक्षा ठेवू का?"

"हो" ती म्हणाली.

***

आम्ही विद्यापीठाला चिंपोली हॉस्पिटल शैक्षणिक आहे की नाही ते कळवावे असं पत्र लिहून टाकलं होतं. विद्यापीठ उत्तर देईपर्यंत वाट बघणं येवढंच आमच्या हातात होतं. पण चिंपोली हॉस्पिटलात बरंच काही शिकायला मिळत होतं, जे पुस्तकं वाचून कधीच शिकता आलं नसतं.

"विजय, त्या किरणने अगदी कंटाळा आणलाय. काही तरी कर ना तू." काही संदर्भ न देता बोलणं हा प्रियाचा स्वभाव होता. म्हणजे तिच्या डोक्यात संदर्भ असायचा. त्याप्रमाणे गरज वाटायची तेव्हा ती बोलायची, पण मला मात्र ती कशाबद्दल बोलतेय ते काही समजायचं नाही. अंदाजाने ती काय म्हणते ते समजून उत्तर द्यायचं, आणि ते बरोबर निघालं नाही तर ती मग कशाबद्दल बोलतेयस ते विचारायचं असं माझं धोरण असायचं.

"प्रिया, आता तू मोठी झालीयेस. तुला एखादा मुलगा त्रास देतो तर त्याचा बंदोबस्त तुझा तुला करता आला पाहिजे" मी म्हटलं. मी लेक्चरर आणि प्रिया आरेमो या नात्याने रुग्णसेवेत तिला येणाऱ्या सर्व अडचणी सोडवणं हे माझं काम होतं. पण तिला किरण त्रास देतो ही तक्रार तिने माझ्याकडे आणणं म्हणजे जरा जास्तच होत होतं.

"नाही रे, तसा त्रास देत नाहीये तो" ती म्हणाली. "तसा त्रास कुठच्याही मुलीला आयुष्यात कधीही द्यायला त्याला जमणार नाही. अगदी रुक्ष आहे तो."

म्हणजे तसा त्रास दिलेला प्रियाला आवडतो की काय असा विचार माझ्या मनात आला. पण उगीच भलताच विषय नको म्हणून मी तिला तो प्रश्न विचारला नाही. "मग तुला त्रास देण्यासारखं काय करतो तो?" मी विचारलं.

"अरे तो आपल्या ऑपरेशनच्या पेशंट पळवतो."

"त्याने हिपोक्रेटसची शपथ घेतली नाहीये का? आपण दुसऱ्या डॉक्टरचे पेशंट पळविणार नाही असं त्या शपथेत आहे" मी म्हटलं.

"देव जाणे. तसा त्याचा शपथांवर विश्वास असेल असं वाटत नाही. अगदी निगरगट्ट आहे तो. स्वार्थासाठी तो आपल्या आईची देखिल खोटी शपथ घेईल."
प्रिया येवढी भडकली आहे त्या अर्थी त्याने नक्कीच आमच्या चांगल्या चांगल्या पेशंट पळवल्या असणार असं माझ्या मनात आलं.
"किती पेशंट पळवल्या त्याने?" मी विचारलं.
"आत्ता या क्षणी त्याच्या वॉर्डात आपली भागीरथीबाई ॲडमिट झालेली आहे. तिच्या सगळ्या तपासण्या पूर्ण करून आपण तिला पुढच्या आठवड्यात ऑपरेशनसाठी बोलावलं होतं."
"मग ती किरणच्या वॉर्डात कशी पोचली?"
"तिला खोकला झाला म्हणून उपचारांसाठी ती आपल्याला शोधत होती, तेव्हा ती किरणला भेटली. त्याने तिचा केसपेपर पाहिला आणि तिला सांगितलं की आपल्याकडून ट्रीटमेंट मिळण्यासाठी तिला एक आठवडा थांबावं लागेल, तर त्याच्याकडून लगेच उपचार होतील. मग त्याने तिचा केसपेपर फाडून टाकला, स्वतःच्या युनिटचा केसपेपर बनवला आणि तिला स्वतःच्या वॉर्डात ॲडमिट करून घेतलं."
"जाऊ दे ग. आपल्याकडे ऑपरेशनसाठी खूप पेशंट आहेत. एखादी गेली तर गेली" मी म्हटलं.
"विजय, हा चांगला सोकावलेला चोर आहे. मी ऑपरेशन थिएटरचं रजिस्टर तपासून पाहिलं. गेल्या महिन्यात त्याने आपल्या चांगल्या चार पेशंट चोरल्याहेत. या भागीरथीबाईंचं गर्भाशय वर खेचून बसवायचं ऑपरेशन करायचंय. ते मी करणार होते."

"अच्छा, म्हणजे तुला भागीरथीबाई काहीही करून परत हव्या आहेत तर."

तिने होकरार्थी मान हलवली. प्रिया जेव्हा तोंडाने न बोलता मानेच्या हालचालींनी बोलायची, तेव्हा भावनावेगामुळे तोंडातून शब्द न फुटल्यामुळे तसं करायची हे मला अनुभवाने ठाऊक झालं होतं.

"भागीरथीबाईंना परत मिळविण्यासाठी काहीही करायची तुझी तयारी आहे का?" मी विचारलं. तिने परत होकरार्थी मान हलवली. तिच्या अनावर झालेल्या भावनावेगाबद्दल माझी खात्री झाली. आपल्या हाताखालच्या डॉक्टरला एखाद्या गोष्टीचा येवढा मानसिक त्रास झाला, तर तो दूर करणं हे आपलं लेक्चरर म्हणून कर्तव्य आहे असं मला वाटलं. त्यातून किरण मला स्वतःला आवडत नसे हेही एक कारण होतं. आमच्या युनिटमध्ये ऑपरेशनच्या पेशंटांचा तोटा नव्हता. किरणने थोड्या पळवल्या म्हणून विशेष काही बिघडत नव्हतं. पण दुःख म्हातारी मेल्याचं नव्हतं, तर काळ सोकावतो याचं होतं.

"हे बघ प्रिया, किरणच्या बॉस साठेमॅडमना गर्भाशयाच्या कॅन्सरचं ऑपरेशन करायची भिती वाटते. अशा सगळ्या पेशंटांना त्या कॅन्सर हॉस्पिटलात पाठवतात, बरोबर?"

तिने होकारार्थी मान हलवली.

"जर भागीरथीबाईंचा पॅप स्मिअरचा रिपोर्ट कॅन्सर असा आला तर किरणला त्यांचं ऑपरेशन करता यायचं नाही."

"पण त्यांना कॅन्सर कुठे झालाय?" मान कोणत्याही पद्धतीने हलवून हा प्रश्न विचारता आला नसता म्हणून तिने नाईलाजाने तोंड उघडलं.

"ते काम माझ्याकडे लागलं" मी म्हटलं. "आपल्या ओपीडीत दर आठवड्याला कॅन्सरच्या तीन-चार पेशंट येतात. तू भागीरथीबाईंच्या पॅप स्मिअरचा नंबर घातलेली एक नवी स्लाईड मला आणून दे. तिच्यावर कॅन्सरचा स्मिअर करून भागीरथीबाईंचा सुधारित रिपोर्ट त्यांच्या वॉर्डात पोचवण्याचं काम माझं. मग किरणने त्यांना ऑपरेशन न करता डिस्चार्ज दिला, की त्यांना रस्त्यात गाठून आपल्या वॉर्डात ॲडमिट करून घेण्याचं काम तुझं. जमेल?"

"जमेल" ती उत्साहाने म्हणाली.

म्हटल्याप्रमाणे प्रियाने सगळं जमवलं. येवढ्या श्रमाने मिळवलेली पेशंट हातची गेली म्हणून किरणने कपाळाला हात लावून भागीरथीबाईंना रजा दिली आणि कॅन्सर हॉस्पिटलात जाण्यासाठी चिठ्ठी लिहून दिली. त्या घरी जात असताना प्रियाने त्यांना गाठलं आणि आमच्या वॉर्डात ॲडमिट करून घेतलं. त्यांचं ऑपरेशन प्रियानेच केलं. त्याचा आनंद साजरा करण्यासाठी आम्ही कँटीनमध्ये गेलो. नेमका तेव्हाच किरण आपला डबा घेऊन तिथे पोचला.

"अरे किरण, आमच्या एका पेशंटला खोकला होता तो तू ट्रीटमेंट देऊन बरा केलास त्याबद्दल आभार. तिचा खोकला बरा झाला नसता तर आज तिचं ऑपरेशन होऊ शकलं नसतं" मी म्हटलं.

"मी तुमच्या पेशंटला बरं केलं?" तो आश्चर्यचकित झाला. कोणासाठी काही करणं हा त्याचा स्वभावधर्म नव्हता.

"भागीरथीबाई रे" मी म्हटलं. "आज प्रियाने त्यांचं गर्भाशय वर बसवायचं ऑपरेशन केलं."

"पण तिला तर कॅन्सर..." त्याने जोरात बोलायला सुरुवात केली आणि आपली चूक समजल्यावर जीभ चावली.

"तिचा कॅन्सरचा रिपोर्ट चुकीचा निघाला" मी म्हटलं. "तुझ्या उपकारांची फेड म्हणून तुझ्या काही पेशंटांना माझ्या वॉर्डात ॲडमिट करीन म्हणतो."

तो काहीच बोलला नाही. त्यानंतर त्याने आमची एकही पेशंट पळवली नाही.

***

दुसऱ्या डॉक्टरांचे पेशंट पळवण्याचा प्रकार सर्जरी डिपार्टमेंटमध्येही होता हे मला लवकरच कळलं.

"विजय, सर्जरीच्या वॉर्डमधून एका पेशंटसाठी कॉल आला होता. मी जाऊन बघून आले."

"बरं, मग?"

प्रिया तशी हुशार होती. तिने केलेलं निदान साधारणपणे चुकत नसे. तिने रुग्णाला सुचवलेली उपाययोजनाही बहुतांशी बरोबर असे.

"चौदा वर्षांची मुलगी आहे. तिला हिमॅटोकोल्पॉस आहे."

योनीमार्गाच्या तोंडाशी असणारा पडदा अखंड असेल तर रजोस्त्राव त्याच्या मागे जमून रहातो आणि योनीमार्ग फुगतो असं त्या आजाराचं स्वरूप असतं. मग त्या मुलीला मासिक पाळी आलेली बाहेरून दिसत नाही.

"तिला आपल्या वॉर्डात ट्रान्स्फर करून घे" मी म्हटलं.

"सर्जरीचा रजिस्ट्रार मनजितसिंग तिला आपल्याकडे ट्रान्स्फर करायला तयार नाही. त्याने तिला पोटात गोळा आलाय

म्हणून ऑपरेशनसाठी स्वतःच्या वॉर्डात ॲडमिट केलंय. मी त्याला सांगितलं की तो गोळा म्हणजे रक्ताने भरलेला योनीमार्ग आहे आणि त्याच्यासाठी पोट उघडून ऑपरेशन करायचं नसतं. पण तो ऐकायला तयार नाही."

"अरे बापरे. त्याने जर तिचं पोट उघडलं तर मोठा गोंधळ होईल. चल, मी बोलतो त्याच्याबरोबर" मी म्हटलं.

मनजितसिंगने दुसऱ्या एखाद्या स्त्रीरोगामुळे आलेल्या पोटातल्या गोळ्यासाठी एखाद्या बाईचं पोट उघडलं असतं तर हरकत नव्हती. कारण त्याचं काय करायचं हे त्याला कळलं नसतं की त्याने आम्हाला बोलावलंच असतं. पण हा आजार अगदी वेगळाच होता. योनीमार्गात साचलेलं ते रक्त कोणत्याही परिस्थितीत पोटात सांडू द्यायचं नसतं. योनीमार्गाच्या तोंडावरचा पडदा कापून त्याचा निचरा खालूनच करायचा असतो. अशा मुलीचं पोट चुकून उघडलं, तर काहीही न करता ते परत शिवून बंद करायचं असतं. आता तिचं निदान आधीपासून माहित असतांना तिचं पोट उघडणं हा गुन्हा ठरला असता. मनजितसिंगला युद्धपातळीवर थांबवणं आवश्यक होतं. आम्ही धावतपळत सर्जरीच्या वॉर्डात पोचलो.

"काय मनजित, काय चाललंय?" मी विचारलं.

"बॉस, पोटात गोळा आलेली एक फर्स्टक्लास पेशंट आलीय. तिचा ऑपरेशनच्या ऑर्डर्स लिहितोय." तो मोठ्या खुशीत म्हणाला.

"मनजित, तिला हिमॅटोकोल्पॉस आहे" मी म्हटलं.

"मग काय झालं?" तो मनजित म्हणाला.

"अशा मुलीचं पोट उघडायचं नसतं. तिचं ऑपरेशन बाहेरून करायचं असतं. तू तिला आमच्या वॉर्डात ट्रान्स्फर कर."
"छे छे! खूप दिवस झाले, पोटात गोळा असलेल्या बाईचं पोट मी उघडलेलं नाही. हिला काय मस्त गोळा आलाय. तिचं पोट मीच उघडणार."
मनजितला मोह होणं स्वाभाविक होतं. त्या आजारात पोटात तयार होणारा गोळा कोणत्याही सर्जनला मोह पाडेल असाच असतो.
"सरदारजी, बाहेरून तिचं करायचं ऑपरेशन फक्त दहा मिनिटांचं असतं. तिचं हायमेन कापलं की आत जमलेलं रक्त वाहून जाईल अणि टाचणी लावलेल्या फुग्यासारखा तो गोळा सपाट होईल. तो पोट उघडून काढून टाकायचा गोळा नाहीये. अशा परिस्थितीत तिचं पोट उघडून तू काय मिळवणार?"
त्याने थोडा वेळ विचार केला. मग तो म्हणाला,
"एक आयडिया आहे. मी तिचं पोट उघडतो. तो गोळा कसा दिसतो ते बघतो. मग तुम्ही गायनॅकवाले तिचं बाहेरून ऑपरेशन करा. गोळा सपाट झाला की मी तिचं अपेंडिक्स काढतो आणि मग पोट बंद करतो."
"अरे, पण तिच्या अपेंडिक्सला काहीही झालेलं नाहीये. उगाचच का काढायचं ते?"
"त्याचं काय आहे, आम्ही चुकून एखाद्याचं पोट उघडलं आणि त्यात काहीच आजार निघाला नाही, तर आम्ही त्याचं अपेंडिक्स काढून टाकतो. म्हणजे पुढेमागे अपेंडिसायटिस झालं तर परत ऑपरेशन करायला नको. आता आपण या मुलीचं

पोट चुकून उघडलं तर मग तिचं अपेंडिक्स काढायला काय हरकत आहे?"

मनजितचं तर्कशास्त्र असामान्य दिसत होतं. पण त्या पेशंटच्या दृष्टीकोनातून त्या तर्कशास्त्राला प्रोत्साहन देणं धोक्याचं होतं.

"मनजित, तुझं म्हणणं पटण्यासारखं आहे. पण आमच्या प्रोफेसरांच्या मते तसं न करता तिचं ऑपरेशन आम्हीच करणं योग्य ठरेल. वाटलं तर तू तुझ्या प्रोफेसरांना फोन करून त्यांना काय वाटतं ते विचार."

खरं तर मी काही आमच्या प्रोफेसरांना फोन करून ही गोष्ट विचारली नव्हती. तसं करायची काही गरजच नव्हती. पण मनजितला घाबरवण्यासाठी थोडसं खोटं बोलायला काही हरकत नव्हती असं मला वाटलं. कधी आणि किती खोटं बोलायचं याचं ज्ञान प्रियाला देण्याचं कामही या निमित्तानं होत होतं. मनजितने या गोष्टीवर बराच वेळ विचार केला. शेवटी आपल्या प्रोफेसरांच्या भितीने म्हणा किंवा आपल्या हॉस्पिटलचे एका फोनकॉलचे पैसे फुकट जाऊ नयेत या सदिच्छेने म्हणा, त्याने आपला विचार बदलला.

"ठीक आहे. तू येवढं म्हणतोयस तर तिला तुमच्या वॉर्डात ट्रान्स्फर करून टाकूया" तो म्हणाला.

प्रियाने सुटकेचा निश्वास येवढ्या मोठ्याने टाकला, की तो मला तर ऐकू आलाच, पण मनजितलासुद्धा ऐकू आला. जिच्यासाठी येवढं नाटक घडलं त्या मुलीला मात्र याचा पत्ताही लागला नाही. ती चाकांच्या खुर्चीवर बसून ऑपरेशन थिएटरला जाण्याच्या तयारीत होती. त्या खुर्चीवरून ती आमच्या वॉर्डात

गेली, उठून आमच्या चाकांच्या खुर्चीवर बसली, आणि आमच्या स्टाफनर्सने तिची ट्रान्स्फर घेतल्यावर खुर्चीवरून ऑपरेशन थिएटरला गेली. तिचं ऑपरेशन मनजितऐवजी प्रियाने केलं, पण आधी होणार होतं त्यापेक्षा काही वेगळं झालं आणि आपला बराच फायदा झाला या गोष्टीचा तिला पत्ताही लागला नाही.

ऑपरेशन संपवून आम्ही परत जात होतो तेव्हा माझं लक्ष सर्जरीच्या वॉर्डकडे गेलं. मनजित एकटाच उदासवाणा बसला होता. त्या मुलीचं भलं करताना या पोराला आपण निराश केलं असं माझ्या मनात आलं.

"प्रिया, तू हो पुढं. मी जरा मनजितबरोबर थोडंसं बोलून येतो" असं म्हणून मी त्या वॉर्डात घुसलो आणि त्याच्यासमोरच्या खुर्चीवर बसलो.

"काय मनजित, तू येवढा दुःखी का? अरे आज नाही तर उद्या तुला ऑपरेशनसाठी पेशंट नक्की मिळेल" मी म्हटलं.

"काय सांगू बॉस, काही खरं नाही. तीन आठवडे झाले, मी उपाशीपोटी आहे" तो तक्रारीच्या सुरात म्हणाला.

"का बरं?" मी विचारलं. त्याच्या टीशर्टमधून स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारं त्याचं पोट पाहून हा ग्रुहस्थ तीन आठवडे काय, तीन ताससुद्धा उपाशीपोटी असावा असं वाटत नव्हतं. तो बहुतेक ऑपरेशन करायला मिळण्याबद्दल बोलत असावा असं माझ्या मनात आलं. खरं तर ऑपरेशन ही गोष्ट खाण्यापिण्याच्या गोष्टींबरोबर तुलना करण्याची नव्हती. पण सर्जन मंडळी चांगल्या ऑपरेशनला ज्यूसी म्हणायचे. एखादं रसाळ फळ ज्यूसी म्हणावं तसं ऑपरेशन कसं असेल?

पण त्यांच्या लेखी ते तसं असायचं. ऑपरेशन करायला मिळालं नाही की आपण निल बाय माउथ म्हणजे उपाशीपोटी आहोत असं ते म्हणायचे. आमचे अॅनास्थेटिस्ट म्हणायचे की सर्जन मंडळी खाण्यापिण्यावर जगत नाहीत तर ऑपरेशनं करून जगतात. त्यांचं म्हणणं निदान मनजितच्या बाबतीत तरी एकदम बरोबर होतं.

"अरे, त्याचं कारण आमचे बॉस. दर ओटीत तीन तीन केसेस ऑपरेट करतात. आमच्यापर्यंत काही पोचतच नाही. आम्ही आपले फक्त ड्रेसिंग करतो झालं."

"हं?" मी म्हटलं.

"हो ना. पूर्वी ते सगळ्या ज्यूसी केसेस करायचे. पण आता तर त्यांना सगळ्याच केसेस ज्यूसी वाटायला लागल्या आहेत. साधा हर्निया किंवा हायड्रोसिलही सोडत नाहीत."

परिस्थिती फारच कठीण दिसत होती. त्याचे बॉस डॉक्टर दाबके गेली पंचवीस वर्षं विविध प्रकारची ऑपरेशनं करत होते. पण त्यांची हौस काही भागलेली दिसत नव्हती.

"मी आता बरेच दिवस व्हेगॉटॉमीवर डोळा ठेवून आहे" तो म्हणाला. व्हेगॉटॉमी हे जठराच्या अल्सरसाठी करायचं एक महत्त्वाचं ऑपरेशन असतं. "पण दर वेळी दाबके ते ऑपरेशन स्वतःच करतात."

"एखाद्या दिवशी व्हेगॉटॉमीचे दोन पेशंट ठेवून बघ. मग त्यातला एक तुझ्या वाट्याला येईल."

"ते सुद्धा करून झालं. दाबक्यांनी दोन्ही केले."

"आता तू असं कर. व्हेगॉटॉमीचे पेशंट जमा कर. तीन जमा झाले की तिघांनाही एकाच दिवशी ठेव. मग तुला त्यातला एक नक्की मिळेल."

"आणि समजा दाबक्यांनी तीनही केले तर?"

"घाबरू नकोस. आम्ही आज तुझी नजर असलेली पोटातल्या गोळ्याची पेशंट घेऊन गेलो. आता तुला व्हेगॉटॉमी मिळवून द्यायची जबाबदारी माझी. पण तुला व्हेगॉटॉमी नीट करता येते ना?"

"म्हणजे काय? ऑफ कोर्स येते" तो म्हणाला.

"ठीक आहे. तीन पेशंट जमले की मला सांग."

या गोष्टीला तीन आठवडे झाले. मी हे सगळं जवळ जवळ विसरून गेलो होतो. पण मनजित ते विसरला नव्हता. त्या दिवशी माझी ओपीडी चालू होती तिथे मनजित मला शोधत शोधत आला.

"विजय, काम झालं. व्हेगॉटॉमीचे तीन पेशंट जमले. त्यांची ऑपरेशनं मी उद्या ठेवली आहेत."

"दाबक्यांच्या कानांवर घातलस?"

"हो."

"मग काय म्हणाले ते?"

"म्हणाले की एका दिवशी तीन म्हणजे खूप ताण पडेल."

"मग?"

"मी म्हटलं की तिघेही बाहेरगावाहून ऑपरेशनसाठी आले आहेत. ऑपरेशन पुढे ढकललं तर कदाचित परत यायचे नाहीत."

"मग?"

"मग ते म्हणाले की ठीक आहे. प्रयत्न करूया."

दाबके तीन व्हेगॉटॉम्या स्वतःच करणार असं दिसत होतं.

"मनजित, तुझं काही खरं दिसत नाही. दाबके तीनही ऑपरेशनं स्वतःच करणार असं दिसतंय" मी म्हटलं.

"म्हणून तर मी तुझ्याकडे आलोय. तू काहीतरी आयडिया काढली होतीस ना?"

"वत्सा, घाबरू नकोस. उद्या तुला त्यातलं एक ऑपरेशन मिळणार हे नक्की. हे बघ, आज रात्री काहीही करून तू दाबक्यांना इमर्जन्सीत एखाद्या ऑपरेशनसाठी बोलावून घ्यायचंस. पुढचं काम माझ्याकडे लागलं. जमेल?"

"जमेल" तो म्हणाला.

एखादी गोष्ट मनावर घेतली की ती पार पाडल्याशिवाय मनजित रहात नसे. रात्री दहा वाजता मला त्याचा फोन आला. पोटात कोणीतरी चाकू मारल्यामुळे जखमी झालेल्या एका पेशंटच्या ऑपरेशनसाठी दाबके हॉस्पिटलात येत होते. मी ताबडतोब निघालो. मनजितला ऑपरेशन थिएटरमध्ये गाठलं.

"हे बघ मनजित, दाबक्यांना थोडा वेळ का होईना, ऑपरेशनसाठी बरोबर घे. ऑपरेशन संपलं की त्यांना म्हण, 'सर, मी पोटाला टाके मारतो. तुमच्यासाठी चहा मागवला आहे. सिस्टरच्या टेबलावर थर्मासमध्ये आहे. थोडा घेऊन जा."

"पण तिथे चहा कुठून येणार?" त्याने विचारलं.

"मी कँटीनमधून मागवून ठेवतो तुझ्या नावावर. त्यांना चहा प्यायला सांगायला विसरू नकोस."

"अरे पण..." मनजितचं वाक्य अर्धच राहिलं. दाबके आले आणि त्याला पकडून बरोबर घेऊन गेले. मी तिथे थांबलो

नाही. वेळ थोडा होता. ऑपरेशन थिएटरचा थर्मास घेऊन चहा आणायला थिएटरच्या सर्व्हंटला पाठवून दिलं. मग वॉर्डात जाऊन जुलाबाच्या दहा गोळ्या आणल्या. त्या कागदाच्या पुडीत घालून ठोकल्या आणि त्यांची पूड केली. चहा आला. मी ती सगळी पूड त्या चहात घातली आणि विरघळवली. थर्मास बंद करून ठेवला आणि माझ्या रूमवर गेलो. दिवसभर काम करून दमलो होतो. झोप पटकन लागली. सकाळी जाग आली तेव्हा मला एकदम मनजितची आठवण आली. प्लानप्रमाणे सगळं घडलं की नाही हे बघण्याची मला उत्सुकता साहजिकच होती. सगळं पटपट आटपून मी ऑपरेशन थिएटरमध्ये पोचलो. मनजित माझ्या आधीच तिथे पोचला होता.

"काय मनजित, कसं काय?"

"ठीक आहे" तो जराशा वाकड्या तोंडाने म्हणाला.

"दाबके आले?"

"नाही. आत्ताच मी त्यांना फोन केला होता. जमलं तर साडेअकरा-बारा वाजेपर्यंत येतो असं म्हणाले. त्यांची तब्येत जरा ठीक नाहीये."

"मग त्या तीन व्हेगॉटॉम्या?"

"जमलं तर करा नाहीतर पुढच्या आठवड्यात ठेवा असं ते म्हणाले."

"मनजित, आता तुझ्या वाट्याला एक सोडून तीन व्हेगॉटॉम्या आल्या आहेत. जरा हस. तू असा दुर्मुखलेला का?"

"अरे, काय सांगू? सकाळपासून मला जुलाब सुरू झालेयत. पार हैराण झालोय बघ."

जुलाब? नक्की काहीतरी गडबड झाली होती.

"मनजित, तू काल रात्री दाबक्यांना थर्मासमधला चहा दिलास?"

"हो. चांगला गरम राहिला होता" तो म्हणाला.

"म्हणजे तू सुद्धा तो चहा प्यायलास?" मी विचारलं.

"हो. ते चहा पिऊन गेले. ऑपरेशन संपल्यावर दमायला झालं म्हणून मी थर्मास उघडून पाहिला. त्यात थोडा चहा होता तो मी प्यायलो."

"अरे, तो दाबक्यांसाठी आणलेला चहा होता. तो तू कसा प्यायलास?"

"मग काय? माझ्याच पैशांनी आणला होता. तो काय फेकून द्यायचा?"

सर्जरीत एम्.एस्. न करता त्याने तर्कशास्त्रात एम्.ए. करायला हवं होतं असं माझ्या मनात आलं.

"अरे बाबा, तो खास बनवलेला चहा होता. त्यात जुलाबाच्या दहा गोळ्या घातलेल्या होत्या. आता दाबके त्यांच्या घरी आणि तू इथे शौचालयाच्या फेऱ्या मारा. आता त्या तीन व्हेगॉटॉम्यांचं काय करतोस?"

"त्या तर मी करणारच" तो निश्चयी सुरात म्हणाला. त्या दिवशी त्याने त्याच्या वॉर्डातलं जुलाब थांबवण्याचं बिस्मथ केओलिनचं सगळं मिश्रण संपवलं. ऑपरेशन चालू असताना तिथला वॉर्डबॉय मधून मधून त्याच्या तोंडावरचं मास्क खाली करून थोडं थोडं औषध त्याला पाजायचा. एक ऑपरेशन संपलं की तो चहासारखं एक कप औषध प्यायचा आणि शौचालयाला एक भेट देऊन यायचा. तीनही व्हेगॉटॉम्या पार

पडल्या. तिसऱ्या दिवशी वॉर्ड राऊंड घेताना दाबके त्याला म्हणाले,

"मनजित, एका दिवशी तीन व्हेगॉटॉम्या केल्यास तर मग तुझं तोंड असं बद्धकोष्ठ झाल्यासारखं का?"

बद्धकोष्ठ झाल्यामुळे चेहऱ्यावर आलेले भाव बदलून एकाच वेळी दाबक्यांच्या अचूक डायग्नोसिसबद्दल वाटणारा आदर, तीन ऑपरेशनं करायला मिळाल्याबद्दल वाटणारा आनंद, आणि बद्धकोष्ठ झाल्यामुळे चेहऱ्यावर येणारे भाव वरच्या दाढीमिशांच्या जंगलातून त्याने ज्या ताकदीने दाखवले, त्याला तोड नव्हती असं तेव्हा हजर असलेल्या मंडळींचं मत पडलं.

***

आमच्या पेशंट असणाऱ्या स्त्रिया कधी कधी काय सांगायच्या ते समजतच नसे. म्हणजे त्यांचं बोलण भाषेच्या दृष्टीने बरोबर असायचं. पण आम्ही विचारायचो काय आणि त्या उत्तर द्यायच्या काय या गोष्टींचा ताळमेळ लागणं अवघड होत असे. नगरपालिकेच्या हॉस्पिटलातली ओपीडी स्त्रियांनी चांगलीच भरलेली असायची. त्या गर्दीत पुरुष शिरले की स्त्रिया बोलताना बुजायच्या. बरं एखादा पुरुष विचित्र निघाला तर त्या स्त्रियांना त्रास नको म्हणून आम्ही पुरुषांना ओपीडीच्या बाहेरच ठेवायचो. आतमध्ये गेलेल्या स्त्रिया आमच्या प्रश्नांना सुचतील ती उत्तरं द्यायच्या, आणि बाहेर पडल्यावर काय आठवेल ते नवऱ्यांना सांगायच्या. अर्थात आम्ही गरज पडेल तेव्हा त्यांच्या नवऱ्यांना बोलावून त्यांच्याबरोबरसुद्धा बोलत

असू. पण एकाच वेळी नवरा-बायको डॉक्टरच्या खोलीत पोचले असं मात्र होत नसे.

"या ताई, बसा. काय त्रास होतोय तुम्हाला?" मी अशीच एका पेशंट ओपीडीत आली तेव्हा म्हटलं.

"पोटात दुखतंय" ताई म्हणाल्या.

"कधीपासून दुखतंय?"

"खूप दिवस झाले."

"खूप म्हणजे नक्की किती?" काही पेशंट नक्की उत्तरं द्यायचं टाळायच्या. ताई त्याच प्रकारच्या दिसत होत्या.

"माझ्या नणंदेचं लग्न झालं ना तेव्हापासून दुखतंय."

पेशंटने कितीही त्रास दिला तरीही तिच्याबरोबर हसतमुखाने आणि संयमाने संवाद साधावा आणि दयाबुद्धीने वागावं हे एका डॉक्टरचं कर्तव्य असतं खरं, पण तीन तासांच्या ओपीडीत दिडशे पेशंट तपासायचे म्हणजे प्रत्येक पेशंटच्या वाट्याला किती वेळ येईल पहा. या ताईंसारखे पेशंट आले की सगळं वेळापत्रक कोलमडायचं.

"तुमच्या नणंदेच्या लग्नाला मी आलो नव्हतो. ते नक्की कधी झालं सांगा नाहीतर किती दिवस पोटात दुखतंय ते नेमकं सांगा."

"पितृपक्ष संपला आणि दुखायला लागलं पहा." ताईंना इंग्रजी कॅलेंडरचा गंध दिसत नव्हता. 'भिंतीवरी अमुकतमुक कॅलेंडर असावं ही कधीतरी पाहिलेली टीव्हीवरची जाहिरात मला आठवली. 'त्या जाहिरातीसाठी ही कल्पना सुचवली तर?' असाही विचार मनात तरळून गेला. पितृपक्ष नक्की कधी होता

हे ताई मला नीट सांगू शकणार नाहीत हे एव्हाना मला उमगलं होतं.

"आणखी काय त्रास होतो?" मी विचारलं.

"फुगारा धरतो बघा" ताई म्हणाल्या.

"म्हणजे पोट फुगतं" असं स्वतःशी म्हणून मी विचारलं, "कधी फुगारा धरतो?"

"कधीपण धरतो" ताई उत्तरल्या.

"नाही, म्हणजे जेवायच्या आधी धरतो, नंतर धरतो, की इतर कशाशी संबंधित वेळी धरतो?"

"हं" ताई म्हणाल्या. त्यांच्या त्या उत्तरातून मला काही बोध झाला नाही. बाहेर पेशंटांची गर्दी वाढत चालली होती. ताईंच्या गतीने चाललो तर फक्त त्यांचीच तपासणी संपायला संध्याकाळ होईल हे माझ्या लक्षात आलं. अशा वेळी नातेवाईकाला बोलावणं हा रामबाण उपाय असतो.

"तुमच्या बरोबर कोणी आलं असेल त्याला बोलवा" मी म्हटलं. ताई बाहेर जाऊन नवऱ्याला आणि सासूला घेऊन आल्या. पोट दुखणं आणि फुगणं येवढ्याशा त्रासासाठी बरोबर इतकी मंडळी असणं म्हणजे जरा अतीच दिसत होतं.

"या," मी म्हटलं, "काय त्रास आहे यांना?"

ताईंचा नवरा जरा चाचरला. ही मुलगी सून करून घेतली ही मोठी घोडचूक केली असं तोंड करून सासूबाईंनी छताकडे नजर लावली.

"काय आहे डॉक्टर, लग्न होऊन वर्ष झालं पण घरात पाळणा हलला नाही म्हणून आलोय" नवरा म्हणाला.

"पाळणा?" मी आश्चर्याने म्हटलं. "पोट दुखतं आणि फुगारा होतो असं ताई म्हणत होत्या."

"काय आहे, ती गावाकडून आली आहे. इथलं तिला काही कळत नाही. त्यातून बाईमाणूस! सांगायला अवघड वाटतं म्हणून तसं म्हणाली असेल" नवरा जरासं ओशाळवाणं तोंड करून म्हणाला.

ताईंची उरलेली माहिती मी त्यांचा नवरा आणि सासू यांच्या मदतीने गोळा केली. ताईंच्या वैयक्तिक गोष्टी त्यांच्यापेक्षा त्यांच्या सासूबाईंनाच जास्त चांगल्या माहित होत्या असं दिसलं. वंशाच्या दिव्याला जन्म देणारं साधन म्हणून त्यांनी सुनेचं सूक्ष्म निरीक्षण केलं असावं. ताईंना तपासून झाल्यावर मी म्हटलं,

"तसा काही दोष दिसत नाहीये. त्यांची लघवी आणि रक्त तपासून घ्या. मिस्टरांची वीर्य तपासणी करून घ्या."

"ती कशाला?" सासूबाई उसळल्या. "त्याला काही त्रास नाही. तिच्यातच खोट आहे."

मी स्त्रीरोगतज्ज्ञ असून मला जे समजलं नव्हतं ते सासूबाईंना आपोआप समजलेलं दिसत होतं.

"तसं नसतं ते" मी म्हटलं. "वंध्यत्वाच्या सुमारे ४०% जोडप्यांमधील पुरुषांच्या वीर्यात दोष निघतो. वीर्यतपासणी करून घायला हवी."

"काही नको" सासूबाई म्हणाल्या. "तिची गर्भपिशवी धुवून द्या. मूल होणार."

माझ्याच विषय मलाच शिकविणाऱ्या त्या महिलेला मी हात जोडले, आणि म्हटलं, "तसं करणं मला योग्य वाटत नाही.

माझा सल्ला तुम्हाला पटत नसेल तर तुम्ही डॉक्टर बदला. तुमच्या मनासारखं करणारा डॉक्टर मिळेल असं वाटत नाही, पण प्रयत्न करायला हरकत नाही."

शेवटी मंडळींनी माझा सल्ला मानला. नवऱ्याला थोडसं औषधपाणी केल्यावर त्यांना मूलही झालं. बाळ बघायला सासूबाई आल्या तेव्हा 'सुनेची गर्भपिशवी न धुताच मूल झालं ना?' असं विचारायचं माझ्या मनात होतं. पण शिकवून त्यांना कितपत शहाणपणा येईल याची मोठी शंका असल्यामुळे मी ते मोठ्या संयमाने टाळलं.

***

चिंपोलीत अडचणी सगळ्याच बाजूंनी यायच्या.

"विजय, गंगाबाईंचं काय करायचं?"

"काय करायचं म्हणजे काय? सिझेरियन करायचं ठरलंय ना?"

"हो रे. पण आता एक वाजला म्हणून चांदनी ॲनास्थेशिया द्यायला तयार नाहीये."

ऑपरेशन थिएटरमध्ये सकाळी साडेआठ वाजता ऑपरेशनं सुरू होत. दुपारचा एक वाजला की नवं ऑपरेशन घ्यायचं नाही असा नियम होता. चांदनी, आमची ॲनास्थेटिस्ट या नियमाच्या बाबतीत अगदी काटेकोर होती.

"मग पुढे ढकल. पुढच्या आठवड्यात करू. मध्येच कधी तिला प्रसववेदना व्हायला लागल्या तर इमर्जन्सीत करू" मी म्हटलं.

"पण ती गंगाबाईं रडायला लागलीय. काही करून आपलं ऑपरेशन आजच करा असं ती म्हणतेय."

"चल, मी बोलतो तिच्याबरोबर" मी म्हटलं. मला बघून गंगाबाईला थोडी आशा वाटली.

"साहेब, माझं ऑपरेशन आता करून टाका."

"गंगाबाई, एक वाजून गेल्यावर आम्हाला ऑपरेशन थिएटर मिळत नाही. नर्स आणि अॅनास्थेटिस्ट नवी केस देत नाहीत. मग आम्ही तुमचं ऑपरेशन कसं करणार?"

"साहेब, माझा नवरा माझ्या ऑपरेशनसाठी आज खाडा करून हॉस्पिटलात आलाय. गावाकडून माझ्या आईला आणलंय. आता ऑपरेशन पुढं ढकललं तर खूप नुकसान होईल बघा."

तिचं म्हणणं खरं होतं. रोजीरोटीवाल्यांना एक दिवसाचा खाडा एकवेळ परवडला असता. पण पुनःपुन्हा खाडे करणं काही झेपलं नसतं. तिच्या आईला एक आठवडा इथे ठेवून घेतलं असतं तर गावाकडची कामं खोळंबली असती.

"साहेब, हिच्या बरोबरच्या इतक्या जणींची ऑपरेशनं होऊन गेली आणि हिचंच राहून गेलं बघा" तिचा नवरा म्हणाला.

"त्यांचंसुद्धा ऑपरेशन आम्ही करणार होतो. पण इतर डॉक्टरांची दोन इमर्जन्सी ऑपरेशनं आली. त्यामुळे वेळ पुरला नाही."

"मग आता हिचं इमर्जन्सी म्हणून करून टाका ना."

गडी हुशार दिसत होता. आमच्याकडे सिझेरियन, सर्जन लोकांकडे अपेंडिक्स काढणं आणि ऑर्थोपेडिक्सवाल्यांकडे तुटलेली हाडं बसवणं ही ऑपरेशनं इमर्जन्सी नसली तरी इमर्जन्सीत बिनदिक्कतपणे व्हायची. आम्ही जी युक्ती बिनदिक्कतपणे वापरायचो, ती त्याला आपोआप सुचली म्हणजे तो खरोखरच हुशार असावा.

"असं म्हणता?" मी जरा मागेपुढे केलं.

"साहेब, तुम्ही मनावर घ्याच. आज करून टाका ऑपरेशन."

"बरं, मग असं करूया. गंगाबाई, तुम्ही आता काही खाऊपिऊ नका."

"बरं."

"दुपारी तीन वाजता तुम्ही नर्सला सांगायचं, की तुमच्या पोटात दुखतंय आणि अंगावर जातंय. कळलं ना?"

"होय."

"तसं करताना पोटावर दोन्ही हात ठेवायचे आणि तोंड वाकडं करायचं. काय?"

"होय."

"डॉक्टरला बोलवा असं सांगायचं. डॉक्टर प्रिया येतील. तुम्हाला तपासतील. मग आम्ही तुमचं अर्जंट ऑपरेशन करून देऊ. लक्षात ठेवा, यात काही चूक झाली तर ऑपरेशन व्हायचं नाही."

"काही चूक होणार नाही डॉक्टर" गंगाबाईंचा नवरा म्हणाला.

आम्ही वॉर्डातून निघालो.

"विजय, हे जमेल?" प्रियाने घाबरत घाबरत विचारलं.

"न जमायला काय झालं?"

"पण चक्क खोटं बोलायचं?"

"कौरव-पांडवांच्या युद्धात तो सत्यवचनी युधिष्ठिर खोटं बोलला होता, आणि तेही स्वार्थासाठी. आपण काही स्वार्थासाठी खोटं बोलणार नाही आहोत."

यावर तिने थोडा वेळ विचार केला. तिला त्यात काही चूक आढळली नसावी. मग तिने नवाच मुद्दा काढला.

"रक्तस्त्राव होतो आहे असं ती सांगणार आहे. तो रक्तस्त्राव कसा दाखवायचा?"
"सोपं आहे. गंगाबाईंना सलाईन लावशील तेव्हा त्या सुईतून दहा सीसी रक्त काढून घे. ते एका पॅडला लाव आणि तिला ते दे. झाला ना रक्तस्त्राव?"
प्रियाने माझ्याकडे अशा नजरेने पाहिलं की ती आता 'शी, काहीतरीच काय?' असं म्हणणार असं माझ्या मनात आलं.
"शी, काहीतरीच काय?" प्रिया म्हणाली.
"याच्यापेक्षा चांगली कल्पना तुला सुचतेय का?" मी शांतपणे विचारलं. "हिंदी चित्रपटात वापरतात तसं टोमॅटो केचप वापरायचंय की मराठी चित्रपटात वापरतात तशी लाल शाई वापरायचीय? प्रेक्षकांना गंडवणं वेगळं आणि मुरलेल्या डॉक्टरांना आणि नर्सांना गंडवणं वेगळं. लाल रंगाचा प्रत्येक द्रव रक्त नसतो हे त्यांना बरोबर माहित असतं."
प्रियाने यावर परत विचार केला. मी खूप विचार करून काढलेल्या युक्तीवर तिने परत विचार करावा हाच एक मोठा विनोद होता, असं माझं स्वतःचं मत होतं. पण घाई करण्यात अर्थ नव्हता. "मला वाटतं आपण डबे खाऊन घेऊया. त्या वेळात तू विचार कर" मी म्हटलं. ते तिला पटलं. आमचे डबे खाऊन झाले. मग मी तिला विचारलं,
"काही सुचलं का?"
तिने नकारार्थी मान हलवली.
"ठीक आहे. मग मी म्हणतो तसंच करावं, काय?"
तिने होकारार्थी मान हलवली. मूक संमती आणि तोंडाने हो असं म्हणून दिलेली संमती यात काहीही फरक नसतो हे

तिला सांगण्याची ती वेळ नव्हती. तिला नेमून दिलेलं काम ती पार पाडणार यात काही शंका नव्हती. त्यामुळे मी तो विषय तिथेच आवरता घेतला.

तीन वाजता गंगाबाईंच्या पोटात दुखलं आणि थोडासा रक्तस्त्रावही झाला. सव्वातीन वाजता वॉर्डातल्या नर्सने कॉल पाठवून प्रियाला बोलावून घेतलं. साडेतीन वाजता गंगाबाई, प्रिया, निशा, आणि मी ऑपरेशन थिएटरमध्ये दाखल झालो. ॲनाथेटिस्ट आणि निओला बोलावणं गेलं. प्रिया बऱ्याच मानसिक दडपणाखाली दिसत होती.

"प्रिया, रिलॅक्स. मी आहे ना सगळं संभाळायला?" मी म्हटलं. त्याचा फारसा काही परिणाम झाला असं काही मला दिसलं नाही. "सगळं काही सुरळीतपणे पार पडावं म्हणून माझी तुझ्याकडून एक मोठी अपेक्षा आहे" मी म्हटलं. तिने भुवया प्रश्नार्थक उंचावल्या. "सिझेरियन पार पडून गंगाबाई वॉर्डात जाईपर्यंत तू काहीही बोलायचं नाहीस. जमेल?"

तिने होकारार्थी मान हलवली. नाहीतरी ती काहीच बोलत नव्हती. तेच पुढे चालू ठेवणं ही काही फारशी कठीण गोष्ट नव्हती.

तीन वाजून चाळीस मिनिटांनी चांदनी आली.

"अरे, ही तर आज सकाळी ऑपरेशनसाठी ठेवलेली बाई आहे." तिला संशय आला असं दिसत होतं.

"हूं" मी म्हटलं. "तिची डिलिव्हरीची तारीख काल होती. आता तीन वाजता तिला दुखायला लागलं."

गंगाबाई अनुभवी होत्या. प्रसववेदना कशा होतात ते त्यांना माहित होतं. मी दिलेल्या पूर्वसूचना त्यांना आठवत असाव्यात.

माझं वाक्य संपल्याबरोबर त्यांनी दोन्ही हातांनी पोट दाबून धरलं आणि 'अगं आई ग!' असं म्हटलं. वेदनांनी पिळवटलेला त्यांचा चेहरा पाहून चांदनीचा संशय दूर झाला असावा. मग तिने गंगाबाईंना स्पायनल ॲनास्थेशिया दिला. पोटाला जंतूनाशक लावण्यापूर्वी सर्व्हंटनं त्यांचं पॅड काढलं.

"अरे, तिच्या पॅडवर रक्त आहे" चांदनी उद्गारली.

मी प्रियाकडे पाहिलं. ती त्या पॅडकडे टक लावून पहात होती.

"इमर्जन्सी सिझेरियन होणाऱ्या लेबरमधल्या पेशंटच्या पॅडवर रक्तच असतं" मी शांतपणे म्हटलं.

"तसं नाही. पण तुमच्या डिपार्टमेंटचे आरेमो खूपदा बनवाबनवी करतात. आज सकाळी त्यागी सरांची पेशंट इमर्जन्सी म्हणून आणली, तिला रक्तस्त्राव होत नव्हता तरी त्यांनी तसं खोटंच सांगितलं."

"मग त्यांनी पॅडला काय टोमॅटो केचप लावून आणलं होतं का?" मी गंमतीने म्हटलं. त्यावर चांदनी खो खो हसली. प्रियाचे गाल लाल झाले हे तिच्या चेहऱ्यावर मास्क होतं तरी माझ्या लक्षात आलं. मग मी तो विषय वाढवला नाही. सिझेरियन पार पडल्यावर प्रिया, निशा आणि मी चहा प्यायला गेलो.

***

"तू म्हणालास तसंच सगळं पार पडलं." आता धोका टळल्यावर प्रियाला कंठ फुटला.

"प्रिया आणि निशा, नियोजन चांगलं असणं हे यश मिळवण्यासाठी अत्यावश्यक असतं हे लक्षात ठेवा. नियोजनात बारीक सारीक गोष्टींकडे लक्ष पुरवावं लागतं."

"पण आपण चांदनीला फसवलं ते बरं केलं नाही" प्रिया पुटपुटली. तिच्या मनातली अपराधीपणाची भावना काढायचं काम अजून बाकी होतं.

"प्रिया, आपण सत्यवचनी असणं केव्हाही चांगलं याबद्दल दुमत नाही. पण आजच्या जगात आपण तसे वागलो तर बघायला नको. ज्या गरीब पेशंटांसाठी आपण या हॉस्पीटलात काम करतोय त्यांच्या भल्याच्या आड जर कोणी येत असेल, तर त्या व्यक्तीला नामोहरम करण्यासाठी थोडेसे डावपेच खेळावे लागतात. तू या चांदनीला किती दिवस ओळखतेयस?"

"दोन महिने."

"मी तिला एम्.बी.बी.एस्.ला असल्यापासून ओळखतोय. एक नंबरची लबाड आणि कामचोर मुलगी आहे. ऑपरेशनं पुढे ढकलण्यासाठी ती कोणकोणत्या युक्त्या वापरते माहित आहे का?"

"नाही" प्रिया म्हणाली.

"ज्या दिवशी तिला लवकर सटकायचं असतं त्या दिवशी ती पेशंटाना नाही नाही ते आजार चिकटवते. त्या दिवशी आपल्या ऑपरेशन लिस्टवर नऊ पेशंट होत्या. त्यातल्या दोघींचीच ऑपरेशनं झाली, आठवतंय?"

"हो, पण त्याचा चांदनीशी काय संबंध?"

"किती भोळी आहेस ग तू?" मी म्हटलं. खरं तर तिला भोळी न म्हणता बावळटच म्हणायला हवं होतं. पण तसं म्हणणं सभ्यतेला धरून झालं नसतं.

"चांदनीने त्यातल्या पाच पेशंट ॲनास्थेशिया द्यायला अनफिट ठरवल्या. एकीला म्हणे हृदयात मर्मर निघाली. तिला हृदयरोगतज्ज्ञाकडून तपासून घ्या असं ती म्हणाली. म्हणजे किमान एक आठवडा तरी गेला. दुसरीला म्हणे दमा होता. तिच्या पल्मोनरी फंक्शन टेस्ट करून घ्या असं ती म्हणाली. म्हणजे दोन आठवडे तरी गेले?"

"हो. आजच तिच्या टेस्ट्स झाल्या. त्यात काहीच निघालं नाही" प्रिया म्हणाली.

"निघण्यासाठी काही असायला हवं ना? काही नाही हे सिद्ध करायला दोन आठवडे लागले. तिसरीचं ब्लड प्रेशर वाढलेलं होतं, जे आपण गोळ्या देऊन खाली आणलं ह्तं. पण आणखी एक आठवडा गोळ्या द्या असं ती म्हणाली. चौथीच्या रक्तातली साखर जराशी जास्त होती. तिच्यासाठी एंडोक्रिनॉलॉजिस्टचं मत घ्या असं ती म्हणाली. त्यांच्याकडे गेलेली पेशंट परत यायला किमान एक आठवडा तरी लागतो. पाचवीला म्हणे खोकला होता. तो बरा केल्याशिवाय ॲनास्थेशिया देता येणार नाही असं ती म्हणाली."

"पण ते बरोबर आहे ना?" प्रियाने विचारलं.

"जर पेशंटला खरोखर खोकला असेल तर ते बरोबर आहे. त्या पेशंटला खोकला नव्हताच. तिला तपासताना चांदनीने तिची श्वासनलिका थोडीशी दाबली. तसं केल्यावर कोणीही खोकेल. पाहिजे तर करून बघ."

प्रियाने आपली श्वासनलिका दाबून पाहिली आणि ती लगेच खोकली.
"स्वतःची श्वासनलिका दाबून बघ असं मी म्हटलं नव्हतं" मी म्हटलं. "असू दे. मी काय म्हणतो ते तुला पटलं का?"
"हो. पण तिने तसं केलं हे तुला कसं कळलं?"
"पिया, गायनॅकला हाउसपोस्ट सुरू करण्यापूर्वी मी ॲनास्थेशियात एक महिन्याची पोस्ट केली होती. मी पुढे गायनॅक घेणार हे त्या मंडळींना माहित नव्हतं. ऑपरेशनपूर्वी पेशंटांना तपासण्यासाठी ते मलाच पाठवायचे. धंद्याच्या या युक्त्या त्यांनी मला तेव्हा शिकवल्या होत्या. मी त्या पेशंटला विचारलं तेव्हा ती म्हणाली की डॉक्टरणीने नरडं दाबलं तेव्हा तिला खोकला आला. आता या युक्त्या मी तुम्हाला शिकवल्या आहेत. यापुढे चांदनीच्या लटपटी चालू न देण्याची जबाबदारी तुमची."
त्या दोघींची कळी खुलली. पुस्तकी ज्ञान काय, वाचूनही मिळतं. युक्तीच्या चार गोष्टी सांगाव्या तर त्या विजयनेच असा माझा लौकिक होता. मी तो सार्थ करून दाखवला असं त्यांच्या चेहऱ्यांवर स्पष्ट दिसत होतं.
"पण त्या शेवटच्या दोघींची ऑपरेशनं झाली नाहीत ती नर्समुळे. त्यात चांदनीचा काही दोष नव्हता" प्रिया म्हणाली.
"प्रिया, तू वेडी आहेस. सिस्टरने आपल्याला खायला केळी दिली असं त्या पेशंट म्हणाल्या खऱ्या, पण सिस्टर केळी आणणार कुठून? हॉस्पिटल पेशंटना केळी देत नाही, ज्यातली केळी ती त्या दोन पेशंटना देईल. आणि ऑपरेशनसाठी

रिकाम्या पोटी ठेवलेल्या पेशंटना केळी द्यायचं धाडस सिस्टरला होईल का?"

"मग?"

"ती केळी चांदनीने दिली. मी सकाळी हॉस्पिटलात आलो तेव्हा गेटवरच्या केळीवाल्याकडे चांदनी केळी खरेदी करताना मी पाहिलं. ती तिने स्वतः खाण्यासाठी घेतली असतीलही. पण पहिली दोन ऑपरेशनं सुरू होती तेव्हा ती मध्येच दिसेनाशी झाली होती, आठवतं. तेव्हा तिने वॉर्डात जाऊन पेशंटना प्रत्येकी तीन केळी खायला दिली. ऑपरेशनला वेळ लागेल, तोपर्यंत ताकद रहावी म्हणून केळी खा असं ती म्हणाली."

"पण पेशंट म्हणाल्या की सिस्टरने केळी दिली" प्रिया दातात धरलेलं कधी सोडत नसे. उद्या लग्न झालं की ही मुलगी नवऱ्याच्या मेंदूचा भुगा करणार असं माझ्या मनात आलं.

"अगं, त्या दोघींची भोजपुरी आपल्याला समजत नाही, आणि आपलं हिंदी त्यांना समजत नाही. मी त्यांच्या नवऱ्यांना दुभाषाचं काम देऊन त्यांच्याबरोबर बोललो तेव्हा पत्ता लागला की केळी देणारी 'सिस्टर' पांढऱ्या कपड्यातली, कमरेला निळा पट्टा लावलेली आणि डोक्यावर टोपी घातलेली नव्हती, तर लाल ड्रेस घातलेली आणि लाल लिपस्टिक लावलेली होती, आणि तिच्या गालावर पावलीयेवढा काळा डाग होता."

"चांदनी!" प्रिया आणि निशा एकदम म्हणाल्या.

मी फक्त जरासा हसलो.

"पण आपण तिच्याविरुद्ध तक्रार केली पाहिजे. तुला हे सगळं माहित होतं तर तू गप्प कसा राहिलास?"

"कारण मला चांदनीच्या ज्ञानाच्या आणि कामाच्या मर्यादा माहित आहेत. त्या दिवशी चांदनी एकटीच होती. दुसरी ॲनास्थेटिस्ट रजेवर होती. चांदनीने काही गोंधळ घालण्यापेक्षा त्यांची ऑपरेशनं पुढे ढकलणं जाणं त्यांच्या दृष्टीने जास्त बरं होतं."

"ए चल रे, तू कधी कधी फारच अतिशयोक्ती करतोस."

"अतिशयोक्ती नाही. खरंच सांगतोय. चांदनीची पर्स कधीही उघडून बघ. त्यात ॲट्राक्युरियम आणि ॲड्रिनॅलिनची एक एक अँप्यूल नेहमी असते."

"कशाला?"

"ॲट्राक्युरियम नवं आणि एकदम सुरक्षित औषध आहे. सिरियस पेशंटला ॲनास्थेशिया द्यायला ते बरं असं तिचं मत आहे. इमर्जन्सीत मिळालं नाही तर उगाच डोक्याला ताप नको म्हणून ती स्वतःकडे एक अँप्यूल नेहमी ठेवते."

"आणि पेशंट शॉकमध्ये गेला तर द्यायला म्हणून ॲड्रिनॅलिन ठेवते का?"

"अं हं. रात्री सिरियस पेशंटसाठी अर्जंट कॉल आला की ती टरकते. मग ती केस करायला धीर आणि ताकद यावी म्हणून ते ॲड्रिनॅलिन ती आधी स्वतःला टोचून घेते आणि मगच केस करायला जाते."

'हे तुला कसं कळलं' असं विचारायच्या बेतात ती होती हे तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतं. पण माझं तोंड बघून तिने तो मोह आवरला. मुलगी हळूहळू का होईना, पण शिकत होती हे नक्की.

***

काम करण्यात वेळ कसा जात होता ते लक्षातच येत नव्हतं. राजमातात परत जायचं आहे हे सुद्धा रोज आठवत नसे. एक एक अनुभव येत होते आणि राजमातात आली नव्हती ती परिपक्वता येत होती.

देव देतो त्याला छप्पर फाडून देतो आणि नाही त्याला काहीच देत नाही. मुलांच्या बाबतीत असंच असतं. आमच्या ओपीडीत एकेकदा एक स्त्री मूल होत नाही म्हणून यायची तिच्याच बाजूला बसलेली स्त्री लेकुरं उदंड झाली म्हणून आता आहे ते पाडून द्या म्हणुन आलेली असायची. त्या दुसऱ्या बाईची माहिती केसपेपरवर नोंदवताना पहिली स्त्री तिच्याकडे मोठ्या असूयेने पहात असायची. तिची नजर लागली असती तर असं नको असलेलं मूल आम्ही काहीही न करता आपोआप पडून गेलं असतं. दुर्दैवाने कोणालाही अशी नजर लागली नाही.

"विजय, या मूल नको असलेल्या बाईचा गर्भ या मूल नसलेल्या बाईच्या गर्भाशयात बसवता आला तर किती बरं होईल नाही?" एकदा मला प्रिया ओपीडीत म्हणाली.

"कल्पना छान आहे" मी म्हटलं. "पण कल्पनारम्यतेत रमणं आपल्याला परवडणारं नाही. बाहेर अजून पन्नास बायका रांगेत बसलेल्या आहेत. त्यांना एका तासात तपासून आपल्याला ओपीडी बंद करायचीय. तेव्हा आता चला."

"हे काय रे! मी येवढी छान कल्पना काढली त्याचं तुला काहीच नाही."

"कल्पना छान आहे गं. तू ती घई, नडियादवाला वगैरे कोणालातरी विकलीस तर बक्कळ कमावशील. पिक्चर तिकिटाच्या बारीवर धमाल चालेल. पण एम्.डी.च्या परीक्षेत

असं काही बोललीस तर तुला सहा महिन्यांनी परत बोलावतील, परिक्षेला बसायला."

अगदी अरसिक माणुस आहे असं तोंड करून ती आपल्या कामाला लागली. तर उरलेल्या पन्नास जणींना तपासण्यासाठी आता एका तासाऐवजी पंचावन्न मिनिटंच उरल्यामुळे मी पण जरा जास्त जोरात कामाला लागलो.

"डॉक्टर, मला गर्भपात करून हवाय."

ती अठरा एक वर्षांची मुलगी गर्भवती असेल असं तिचं तोंड बघून काही वाटत नव्हतं. अर्थात तोंड बघून कोणाचीच गर्भावस्था समजत नाही म्हणा. पण ती कॉलेजात वगैरे जाणारी मुलगी असावी असं दिसत होतं. लग्न, मूल वगैरेला अजून बराच अवकाश आहे असा तिचा अवतार होता.

"आधीची किती मुलं आहेत तुम्हाला?" मी सवईने विचारलं. ती जराशी लाजली.

"लग्न होऊन दोनच महिने झालेत डॉक्टर" ती म्हणाली.

"म्हणजे तुम्हाला पहिलंच मूल पाडायचंय?" मी आश्चर्याने विचारलं. मातृत्वाची इच्छा हा स्त्रीचा स्वभावधर्म असतो अशी माझी कल्पना होती. ही बाई हे मातृत्व इतक्या सहजपणे नाकारू पहाते याचं मला आश्चर्य वाटलं.

"माझे हे म्हणतात की येवढ्यात आपल्याला मूल नको. निदान एक वर्ष तरी एकमेकांसाठी मिळायला पाहिजे" ती म्हणाली.

"अहो ताई, मूल होऊ न देण्याचे अनेक उपाय असतात. त्यातले तुम्ही काही वापरले होते का?" मी विचारलं.

"नाही."

"का?"

"माझे हे तयार नाहीत" ती म्हणाली. "आता पिशवी धुवून द्या." आमच्या पेशंट गर्भाशयाला बऱ्याचदा पिशवी असं म्हणायच्या. तिचे उद्गार ऐकून माझं डोकं विलक्षण तापलं. पण पेशंटवर रागावून फारसा उपयोग होत नाही हे मला माहित होतं.

"ताई, पिशवी धुणं हे मळलेला रुमाल धुण्यायेवढं सोपं असतं असं तुम्हाला वाटतं का?" मी शांत आवाजात विचारलं.

"....."

"पिशवी धुताना पाच हजारातली एक बाई मरते. तुमचं तसं झालं तर तुम्हाला चालेल?"

"....."

"पिशवी धुतल्यामुळे पाच हजारातल्या दहा स्त्रियांना गंभीर प्रकारचे विकार होतात, आणि पन्नास स्त्रियांना बारीक सारीक त्रास होतात. चालेल?"

"....."

"पिशवी धुतल्यावर जंतूसंसर्गामुळे कधी कधी गर्भनलिका बंद पडतात. तसं तुमचं झालं तर नंतर मूल व्हायचं नाही. चालेल?"

"....."

बाई गप्प रहाण्यात वाकबगार होत्या.

"किंवा गर्भाशयाच्या तोंडाला इजा झाल्यामुळे नंतर गर्भ टिकत नाही. वारंवार गर्भपात होत रहातो. चालेल?"

"डॉक्टर, मी ह्यांना बोलावते" ती म्हणाली. म्हणजे शेवटचा निर्णय तिचा नवराच घेणार होता तर.

दोघं जोडीने आली. वेळ कमी असला तरीही मी त्या गर्भपाताच्या दुष्परिणामांचा पाढा परत एकदा वाचला. लग्न नवं होतं. आपल्या बायकोला कसलाही त्रास व्हायची कल्पना

त्याला सहन झाली नाही. लग्न जुनं झाल्यावर बायकोच्या तब्येतीची सुतराम काळजी न करता गर्भपात करण्यावर हट्टून बसलेले नवरे मी खूप पाहिले आहेत. त्या नवऱ्याने मात्र गर्भपात न करण्याचा निर्णय घेतला. वेळ गेला खरा, पण सत्कारणी लागला.

त्याच ओपीडीत सतरा वर्षांची रुकसाना आली. तिला मात्र गर्भपात करून घेण्यासाठी अॅडमिट करून घ्यावीच लागली. ती अविवाहित होती. पोटात चार महिन्यांचा गर्भ होता. तिच्या अम्माजानला ते माहित नव्हतं. माझ्याकडून ते कळलं तेव्हा 'या अल्ला' असं म्हणून ती खालीच बसली. तिला पाणी पाजून जरा ठीक केल्यावर मी म्हटलं,

"येवढं घाबरून जायचं कारण नाही. रुकसानाचा निकाह लावून टाका."

"डॉक्टर, आजपासून दहा दिवसांनी तिचा निकाह आहे" ती कापऱ्या आवाजात म्हणाली.

"मग प्रश्नच मिटला. कोणाला काही सांगू नका. प्रसूती झाली की अपुऱ्या दिवसांची झाली म्हणून सांगा."

"नाही बेटा, ते तेव्हढं सोपं नाही."

"का?" मी विचारलं.

"हे मूल" रुकसानाकडे एक जळजळीत कटक्ष टाकून ती म्हणाली "दुसऱ्याच कोणाचंतरी आहे. माझा दामाद दुबईला असतो. निकाह ठरवण्यापुरता तो आला आणि परत गेला."

रुकसाना रडत होती.

"तुम्ही रुकसानाबरोबर बोला. ज्याचं कोणाचं हे मूल आहे त्याच्याबरोबर तिचा निकाह लावून द्या" मी म्हटलं.

त्या दोघी बोलेपर्यंत मी इतर पेशंट बघायला गेलो. अर्ध्या तासाने दोघी परत आल्या. एव्हाना रुकसानाचे डोळे रडून रडून सुजले होते. अम्माजानचे डोळे सुजायच्या मार्गावर होते.

"काय ठरलं तुमचं?" मी विचारलं.

त्याला आधीच्या दोन बायका आहेत" अम्माजान खिन्न आवाजात म्हणाल्या. "त्याचं वयपण बरंच आहे. त्याचा मोठा मुलगा रुकसानाच्या वयाचा आहे. त्याच्याबरोबर तिचा निकाह लावणं शक्य नाही. बेटा, काहीही कर पण हे मूल पाडून दे. तिला मोकळी कर. दहा दिवसांनी तिचा निकाह लागला की मी सुटले."

"रुकसाना, तू या गोष्टीला तयार आहेस?" मी विचारलं. तिने जमिनीकडे बघत होकारार्थी मान हलवली. मी गर्भपाताचे परिणाम त्यांना सांगितले. आता मला त्याची प्रॅक्टीस व्हायला लागली होती.

"चालेल," अम्माजान म्हणाल्या "आता आम्हाला कुठेही तोंड दाखवायला जागा कुठे राहिली आहे? जगलो काय आणि मेलो काय, सारखंच."

दुसऱ्या दिवशी सकाळी निशाने सुई टाकून रुकसानाच्या गर्भाशयात वीस टक्के सलाईन टाकलं. एका दिवसात तिचा गर्भपात झाला. ती मोकळी झाली, पण सुटली मात्र नाही.

"विजय, जरा रुकसानाला बघ. जोराजोराने श्वास घेते आहे."

मी रुकसानाला तपासलं. गर्भाशयात जंतूसंसर्ग झाला होता. तो रक्तात पसरला होता.

"सेप्टिसेमिया आहे. तिला ब्रॉड स्पेक्ट्रम अँटिबायॉटिक्स चालू करूया" मी म्हटलं.

मी अँटिबायॉटिक्स बदलली. पण तिच्या गर्भाशयातले जंतू त्या अँटिबायॉटिक्सना दाद देईनात. तिच्या पोटात पस भरायला लागला. शेवटी आमच्या प्रोफेसरांनी तिचं गर्भाशय काढायचा निर्णय घेतला.

"सर, अजून तिचं लग्नपण झालेलं नाहीये" प्रिया म्हणाली.

"नाहीतर मरेल ना ग ती" प्रोफेसर म्हणाले.

रुकसाना आणि तिच्या अम्माजान दोघीही तिच्या ढासळत चाललेल्या तब्येतीमुळे घाबरलेल्या होत्या. गर्भाशय काढून ती बरी होईल म्हटल्यावर त्या तयार झाल्या. आम्ही ऑपरेशन करून तिचं गर्भाशय काढलं.

गर्भाशय काढलं म्हणून बिचारीच्या मागचं दुष्टचक्र संपलं नाही. आम्ही तिच्या त्वचेचे टाके आठव्या दिवशी काढले, तर तिचे सगळेच टाके तुटलेले निघाले. रुकसानाचं फुटलेलं पोट बघून अम्माजान चक्कर येऊन पडल्या. त्यांना शुद्धीवर आणल्यावर आम्ही रुकसानाला ऑपरेशन थिएटरमध्ये नेऊन तिचं पोट शिवलं. नवी अँटिबायॉटिक्स दिली. बारा दिवसांनी तिच्या त्वचेचे टाके काढले तेव्हा अल्लाने तिच्यावर मेहेरनजर केली. तिचे आतले टाके भरले होते, पण त्वचेचे टाके मात्र उघडले. त्यांचं ड्रेसिंग पंधरा दिवस केल्यावर ते स्वच्छ झाले. पण दोन इंच रुंद आणि सहा इंच लांब भागावर त्वचाच राहिली नाही. शेवटी प्लास्टिक सर्जननी त्वचारोपण करून ती जखम झाकली. रुग्णालयात अॅडमिट झाल्यापासून दोन महिन्यांनी रुकसाना घरी गेली.

"डॉक्टर, तुम्ही माझ्या बेटीची जान वाचवली. तुमचे उपकार फेडणं मला या जन्मात तरी शक्य नाही" अम्माजान घरी जाताना म्हणाल्या.
"तुमच्यावर अल्लाची कृपा होती म्हणून ती वाचली. मी म्हणण्यासारखं काहीच केलं नाही" मी म्हटलं.
रुकसाना काहीच बोलली नाही. तिचा तेव्हाचा तो हसरा चेहरा पाहून गेल्या दोन महिन्यात तिने कायकाय सोसलं होतं ते, आणि आपलं पुढचं आयुष्य उध्वस्त झालंय याची जाणीव तिला होती हेही कोणाला कळलं नसतं. आजही तिचं ते हसू आठवलं तर पोटात कालवाकालव होते.

***

चिंपोली हॉस्पिटल म्हणजे गर्भपाताचा अड्डा असं एखाद्याला वाटलं तर नवल नाही अशा घटना तिथे घडायच्या. रुकसाना घरी गेली आणि थोड्याच दिवसात एक नवी पेशंट नवी कहाणी घेऊन आली. खरं तर ती पेशंट मुळात डॉक्टर त्यागींची होती. तिला जे काही केलं होतं त्याला गर्भपात कसं म्हणायचं हा मोठा प्रश्न होता. कायद्याप्रमाणे वीस आठवड्यांपर्यंतच्या गर्भाचे ॲबॉर्शन करता येते. त्यानंतर तसं केलं तर त्याला क्रिमिनल ॲबॉर्शन असं म्हणतात आणि तो गुन्हा ठरतो. जर मुलगी अविवाहित माता असेल, तर या कायद्यामुळे तिला वीस आठवड्यांनंतर लक्षात आलेला गर्भ नऊ महिने पोटात वाढवावा लागतो. प्रसूतीनंतर तिला ते मूल नको असेल तर ते कोणाला दत्तक देता येतं. पण सगळ्यांना तिच्या कुमारी मातृत्वाबद्दल समजलं, तर ती आयुष्यातून

उठण्याचा संभव असतो. अशा मुलीबद्दल लोकं नाही नाही ते बोलतात. तिला अनेक प्रकारे त्रास देतात. तिचं लग्न होणं कठीण होतं. त्यामुळे अशा मुलींचं क्रिमिनल का होईना, ॲबॉर्शन करून घेण्याकडे काही पालकांचा कल असतो. ते करून देणारे डॉक्टर धोका पत्करतात आणि त्याबद्दल अवाच्या सवा पैसे घेतात.

प्रोफेसर त्यागी या प्रकारचे डॉक्टर होते हे मला आधी माहित नव्हतं. त्यांनी आपल्या खाजगी प्रॅक्टीसमधून एक पेशंट चिंपोलीत पाठवली. ती अविवाहित होती. पोटात आठ महिन्यांचा गर्भ होता. ते मूल पोटातच मरण पावलेलं होतं. तिची डिलिव्हरी करण्यासाठी त्यागींनी तिला चिंपोलीत पाठवलं होतं. पण तिला प्रसववेदना काही येईनात. त्या येण्यासाठी ऑक्सिटोसिनचं इंजेक्शन देऊन झालं. त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यागींची इमर्जन्सी संपली. आमची इमर्जन्सी सुरू झाली. नियमाप्रमाणे लेबर वॉर्डातले सगळे पेशंट आमच्या युनिटकडे ट्रान्स्फर झाले. सहा वाजता मी लेबर वॉर्डात ओव्हर घेण्यासाठी गेलो तेव्हा त्यागींची रजिस्ट्रार त्यांच्याबरोबर फोनवर बोलत होती.

"सर, तिला प्रसववेदना येत नाहीयेत..... दिलं सर, ऑक्सिटोसिनचं इंजेक्शन काल सकाळपासून चालू आहे....... मी स्वतः दिलं सर...... होय सर...... बरं सर....... पण सर, मूल मेलेलं आहे तरी सिझेरियन करायचं? ....... सॉरी सर....... नाही सर...... होय सर......"

तिने फोन ठेवला आणि कपाळावरचा घाम पुसला. त्यागींनी बत्ती मारली की त्यांच्या आरेमोंना घाम फुटत असे असं मी

ऐकून होतो, ते त्या दिवशी पाहिलं. इतर पेशंट आमच्या युनिटला ट्रान्स्फर झाले, पण ती पेशंट मात्र त्यागींकडेच राहिली.

"विजय, तू ऐकलंस का?" प्रियाने दुसऱ्या दिवशी मला विचारलं "त्यागींनी त्या अनमॅरिड पेशंटचं सिझेरियन केलं."

"हं" मी म्हटलं.

"प्रसववेदना येत नाहीत म्हणून सिझेरियन करतात का रे?"

"सामान्यपणे नाही" मी म्हटलं.

"मूल जर मृत असेल तर सिझेरियन शक्यतो टाळायचं असतं ना?"

"हो" मी म्हटलं.

"मग त्यागींनी भल्या पहाटे येऊन तिचं सिझेरियन का केलं?"

"काय सांगू?" मी म्हटलं.

"आपण तिला तपासू म्हणून तर त्यांनी असं केलं नसेल ना?"

वरिष्ठ डॉक्टरांबद्दल कनिष्ठ डॉक्टरांसमोर काहीबाही बोलू नये म्हणून मी नरो वा कुंजर वा असं उत्तर दिलं,

"ती शक्यता नाकारता येत नाही."

"त्यांनी तिच्या पोटाची एक सेंटीमीटर रुंदीची त्वचा कापून टाकली म्हणे" प्रिया म्हणाली.

"काय सांगतेस?" मी म्हणालो. सिझेरियन करताना त्वचा कापतात आणि शेवटी परत शिवून टाकतात. त्वचेचा तुकडा काही कापून टाकत नाहीत.

"त्यांनी त्यांच्या खाजगी हॉस्पिटलात तिच्या पोटात रुकसानासारखं हायपरटोनिक सलाईनचं इंजेक्शन दिलं होतं

म्हणे. त्यामुळे मूल मेलं. इंजेक्शनची खूण काढून टाकण्यासाठी त्यांनी भोवतालची त्वचा कापून टाकली म्हणे" ती म्हणाली.

लहानपणी मी रहस्यकथा वाचायचो. गुन्हा करून झाला की गुन्हेगार स्पर्श केलेल्या प्रत्येक गोष्टीवरचे आपले बोटांचे ठसे पुसून टाकायचा. त्यागींची गोष्ट ऐकून मला त्या ठसे पुसण्याची आठवण आली. प्रिया रहस्यकथा वाचायची की नाही हे माहित नसल्यामुळे मी त्या ठशांबद्दल काही बोललो नाही.

"याला पुरावा नष्ट करणं म्हणतात ना?"

"..." बोलण्यासारखं काही नव्हतं.

"विजय, उद्या या बाईचं लग्न झालं, की ती आपल्या पोटावरचा व्रण सिझेरियनचा आहे असं सांगेल का?"

"बहुतेक नाही" मी म्हटलं. आपलं लग्न टिकवायचं, मोडायचं नाही येवढी अक्कल प्रत्येकाला असते. "पोटात गाठ आली होती ती काढली असं बहुतेक वेळा सांगतात या बायका."

"पण डॉक्टरला ते सांगितलं नाही, तर तो तिच्या प्रसूतीच्या वेळी सिझेरियनचा व्रण फुटतो का ते पहात रहाणार नाही. मग तो व्रण फुटला तर कदाचित ती मरेल ना?"

"आपल्या घरच्यांना सांगू नका अशा अटीवर तिने आपलं सिझेरियन झालं होतं असं आपल्या डॉक्टरला सांगावं" मी म्हटलं.

"आणि डॉक्टरने ते तिच्या घरच्यांना सांगितलं तर?"

"तर तिचा बहुतेक घटस्फोट होईल" मी म्हटलं.

"मग?"

"मग डॉक्टरने गुप्ततेची शपथ मोडली म्हणून ती डॉक्टरवर कोर्टात केस घालू शकेल. डॉक्टरला बरीच नुकसानभरपाई द्यावी लागेल."

"हे सगळं कसंतरीच वाटतंय रे" ती म्हणाली.

"कशीतरीच असणारी गोष्ट कशीतरीच वाटणार" मी म्हटलं.

"हे सगळं त्यागींना माहित नसेल का?"

"त्यागी प्रोफेसर आहेत. ज्या गोष्टी मला माहित आहेत त्या त्यांना माहित नसतील असं म्हणणं हा मोठा विनोदच ठरेल."

"असे कसे रे ते?"

"पैसा कमावताना काही गोष्टींचा विसर पडतो काही जणांना. जाऊ दे. आपण जी गोष्ट सुधारू शकत नाही तिच्याबद्दल बोलून काही फायदा नाही. आपण कसे होऊ नये हे आपण त्यागींकडे बघून शिकलो तरी खूप झालं असं मी म्हणेन."

तिने मान डोलावली.

***

मी चिंपोलीत रुजू होऊन दहा महिने झाले होते. माझं मन तिथे रमलं होतं तेवढ्यात बर्वेला विद्यापीठाचं पत्र आलं. चिंपोलीला शैक्षणिक हॉस्पिटल म्हणून विद्यापीठाची मान्यता नव्हती. त्याने लगेच राजमातात जाऊन बदलीचा अर्ज केला. आठवड्याभराने मलाही तसंच पत्र आलं. आपण येथेच रहावं का असा विचार मनात आला. राजमातात फार सोनं होतं अशातली गोष्ट नव्हती. तिथे पेशंट यायचे तसेच चिंपोलीत यायचे. चिंपोलीत होती तशाच मनोवृत्तीची माणसं राजमातात होती. उलट कावळे आणि जोशीबाईंसारखी माणसं होती हे

राजमातात न जाण्याचं कारण म्हणता आलं असतं. पण माझी नाळ राजमाता हॉस्पिटलला जोडलेली होती. विद्यार्थीदशेपासूनच्या अनेक आठवणी होत्या. जर वैद्यकीय शिक्षक म्हणून करिअर करून एक दिवस प्रोफेसर व्हायचं माझं स्वप्न साकार व्हायचं होतं तर राजमातात परत जायलाच हवं होतं. शिवाय ते घराच्या जवळ होतं. पाउसपाण्यात वाहतूक बंद पडली तर वेळी चालत सुद्धा जाता येत असे. विद्यापीठाच्या पत्राची वाट पाहून दलाल तर कंटाळून नोकरी सोडून गेला होता. एक दिवस आपल्यालाही तिथला कंटाळा आला तर काय, हा विचारसुद्धा मनाला स्पर्श करून गेला. शेवटी मी माझी बदली राजमाताला करून घ्यायची असं ठरवलं. आमचे सावंत अजून त्याच ऑफिसात होते. मी त्यांना जाऊन भेटलो.

"काय म्हणता डॉक्टर, आज इथे कुठे?"

"राजमाताला बदली करून घ्यावी म्हणून आलो."

"वेळेवर आलात. आपल्याकडे एक जागा रिकामी झाली आहे."

"कोणाची?" मी म्हटलं.

"परवेझ सोडून गेला."

कितीही नको म्हटलं तरी तो शेवटी राजमाता सोडून गेलाच तर.

"कधी?"

"महिना झाला. त्याची रिकामी जागा भरा असं डॉक्टर कावळ्यांनी आम्हाला कळवलंय."

"ठीक आहे. मी डीनना भेटतो."

"बेस्ट ऑफ लक" सावंत म्हणाले.

मी डीनना भेटलो. माझं काम काय होतं ते सांगितलं.
"हो, हो. आपण तुमची इकडे बदली करून घेऊया. मी सावंतांना सांगून तुमची ऑफिस ऑर्डर काढतो."
जी गोष्ट दहा महिन्यांपूर्वीच व्हायला हवी होती ती आज होत होती. सावंतांनी पण पटापट हालचाली केल्या. एरवी ऑफिस ऑर्डर निघायला आठवडा तरी लागायचा. माझी ऑर्डर मला अर्ध्या तासात मिळाली. मी ती घेऊन चिंपोलीला जाऊन थडकलो.
"काय, तुम्ही आम्हाला कंटाळलात का?" आमचे बॉस मला म्हणाले.
"नाही. तसं नाही सर. हे हॉस्पिटल विद्यापीठाच्या दृष्टीने शैक्षणिक हॉस्पिटल नाहीये. मी इथे राहिलो तर माझी शैक्षणिक कारकीर्द सुरूच व्हायची नाही. मला कनिष्ठ असलेले पण राजमातासारख्या हॉस्पिटलात असलेले सर्वजण मला वरिष्ठ होऊन जातील."
"हं हं. तसं होता कामा नये. चांगली माणसं वैद्यकीय शिक्षक म्हणून टिकलीच पाहिजेत. नाहीतर विद्यार्थी चांगल्या प्रतीचे डॉक्टर कसे होणार? जा तुम्ही. बेस्ट ऑफ लक."
मी निघालो. सगळे जण मला बेस्ट ऑफ लक म्हणत होते. राजमातात, माझ्या दुसऱ्या घरात जाताना तसं म्हणत होते. ती नियतीची सूचना होती की शिष्टाचार म्हणुन ते तसं म्हणत होते? काही असो. मी चिंपोलीच्या ऑफिसात गेलो. मला त्या हॉस्पिटलातून मुक्त केल्याची रिलिव्हिंग ऑर्डर घेतली, आणि उलट्या पावली राजमाताला पोचलो.

मला वाटतं मला बेस्ट ऑफ लकची खरोखरच गरज होती. माझ्या बदलीबद्दल कावळ्यांना कळलं होतं. त्यांनी तडकाफडकी हा माणूस आपल्याला नको असं डीनना कळवलं होतं.

"डॉक्टर, तुम्ही डीनना लगेच जाऊन भेटा" सावंत म्हणाले. "कावळेंनी आम्हाला कळवलय की तुम्ही त्यांना नको आहात. त्यांना नव्याने निवडलेला उमेदवार हवा आहे."

आपली बाजू सत्याची असताना मी आकाश कोसळलं तरी घाबरत नसे. मी घाबरलो नाही. सरळ डीनना भेटायला गेलो.

"काय आहे डॉक्टर विजय, तुमचे डॉक्टर कावळे जरा नाराज आहेत. तुम्हाला ही जागा देऊ नये असं ते म्हणताहेत."

"का बरं सर?" मी विचारलं.

"त्यांना रेग्युलर निवडला गेलेला नवा उमेदवार हवा आहे" डीन म्हणाले.

"सर, रेग्युलर निवडला गेलेला सर्वात जेष्ठ उमेदवार मी आहे. या जागेवर माझ्याइतका इतर कोणाचाही हक्क नाही" मी नम्रपणे म्हटलं.

"पण एचोडीच नको म्हणतात तर काय करायचं?"

"सर, तुमच्या ऑफिस ऑर्डरप्रमाणे मला चिंपोलीतून रिलीव्ह केलंय. मला इथं घेतलं नाही तर मी काय करायचं?"

हा प्रश्न डीनना अवघड वाटला. असं पूर्वी कधी झालं नव्हतं. त्यांनी सावंतांना बोलावून घेतलं.

"सावंत, आपल्या ऑर्डरप्रमाणे यांना चिंपोलीतून मुक्त केलंय. आपण यांना घेतलं नाही तर यांनी काय करायचं?"

"सर, आपल्याला त्यांना घ्यावंच लागेल. दुसरा पर्याय नाही" सावंत म्हणाले.

"ठीक आहे. त्यांचं रुजू होण्याचं पत्र त्यांच्याकडून घ्या आणि त्यांना आपल्या हजेरीपटावर घ्या" डीन म्हणाले.

"थँक यू सर" मी म्हटलं. सावंत आणि मी बाहेर पडलो.

"प्रसंग कठीण होता. तुम्हाला चिंपोलीतून मुक्त केलं नसेल तर आधीची ऑर्डर रद्द करा असं डीन म्हणत होते" सावंत म्हणाले.

"मग?"

"मी म्हटलं, टायपिस्ट जेवायला गेलीय. ती आली की ऑर्डर काढतो. ती खूप लेट आली." सावंतांनी मला डोळा मारला.

"थँक यू" मी म्हटलं.

"डॉक्टर कावळेंचा तुमच्यावर येवढा राग का?" सावंतांनी विचारलं.

"बऱ्याच गोष्टी आहेत. त्यांनी केलेल्या बऱ्याच चुकीच्या गोष्टी मी पकडल्या होत्या. आपण आरेमो असताना एचोडींच्या अशा गोष्टी पाहिल्या तर तोंड बंद ठेवावं ही अक्कल मला नव्हती." मी म्हटलं.

"असं? केलं तरी काय त्यांनी?" त्या गोष्टी कोणत्या हे सावंताना ऐकायचं होतं.

"नंतर कधीतरी फुरसतीने सांगेन. आता आधी डिपार्टमेंटला जाऊन जॉइन होतो" मी म्हटलं.

मी डिपार्टमेंटमधे जॉइन झालो. डीनची ऑर्डर पाहिल्यावर कावळ्यांना मला नाकारता येईना.

"तुम्ही लेबर वॉर्डात ड्यूटी करा" कावळे म्हणाले.

"लेबर वॉर्डात? पण अशी पोस्ट नाहीये" मी म्हटलं. "मला कोणत्यातरी युनिटमधे जॉइन व्हायला पाहिजे."
"ते बघू आपण नंतर. सध्या तुम्ही सगळ्या युनिटांच्या डॉक्टरांना मदत करा."
हा सरळसरळ अन्याय होता. मी सर्वात जेष्ठ असून मी लेबर वॉर्डात लटकत रहायचं, आणि बाकी सगळे आपापल्या पेशंटांवर उपचार करणार ते बघत रहायचं म्हणजे फारच होत होतं. मी डीनना जाऊन भेटलो. काय झालं ते सांगितलं.
"तुम्ही आठवडाभर थांबा. मी बघतो काय करता येईल ते" डीन म्हणाले.
आठवडा काही न होताच गेला. मी अगदी कंटाळलो होतो. अन्यायामुळे संतापलो होतो. इतर युनिटचे लोकही माझ्याकडे जरा विचित्र नजरेने बघताहेत असं मला वाटायला लागलं होतं. शेवटी मी अकंना जाऊन भेटलो. आमच्या प्रभागाचे काम बघणारे अक वेगळे होते. मला चिंपोलीला टाकणारे अक नव्हते. हा सर्व प्रकार ऐकून त्यांनी कपाळाला सूक्ष्मशी आठी घातली.
"तुम्ही जा हॉस्पिटलात. तुमचं युनिट तुम्हाला मिळेल" ते म्हणाले.
"थँक यू, सर" असं म्हणून मी हॉस्पिटलात परतलो. तेवढ्या वेळात अकंनी फोन करून कावळ्यांचं बूच लावलं असावं. कावळे माझी वाट पहात होते.
"तुम्ही डॉक्टरांना जोशींच्या युनिटमधे जॉइन व्हा" मी काही बोलण्यापूर्वी कावळे म्हणाले.

"बरं" मी म्हटलं. त्यांना 'थँक यू' म्हणण्याचं काही कारण मला दिसत नव्हतं. कावळ्यांच्या नाकावर टिच्चून विजय राजमाताला आला आणि त्याने युनिटमधे प्लेसमेंटही मिळवलं हे सगळीकडे झालं. जुन्या मित्रमंडळींनी 'व्वा बॉस' असं म्हणून कौतूक केलं. मी समोर आलो की मनाली तिची जाडजूड मान जमेल तेवढी फिरवून तिसरीकडे बघायला लागली. मी राजमातातच तिच्यासारखा लेक्चरर झालो याचा तिला भयंकर राग आला असं दिसत होतं. आपलं पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर असताना मी आलो याचा जोशीबाईंना फार आनंद झाला.

"बरं झालं बाबा तू आलास. बारीक सारीक गोष्टी तुझ्याशिवाय अडकून रहायच्या" त्या म्हणाल्या. त्या गोष्टी त्यांनी करायला काही हरकत नव्हती. पुस्तक तर त्यांना काहीही मेहेनत न करता तयार मिळालं होतं. पण त्या आनंदाच्या काळाला हे विरजण लावावं असं मला वाटेना. म्हणून मी नुसतं बारीकसं हसून गप्प राहिलो.

***

"आता आपलं पुस्तक तयार झालंय" एके दिवशी सावंतांनी जाहीर केलं. "छपाई पूर्ण झालीय. बाइंडिंग सुरू आहे."

म्हणजे एक-दोन दिवसात ते हातात यायला हरकत नव्हती.

"कधी येईल ते?" जोशीबाईंनी उत्सुकतेनं विचारलं.

"आज नाही तर उद्या संध्याकाळी पहिल्या दोन प्रती मला मिळतील" सावंत म्हणाले.

"अरे वा!" बाई म्हणाल्या.

"तुम्हाला काही प्रकाशन समारंभ वगैरे करायचा असेल तर तयारी करा" सावंत म्हणाले. मला या गोष्टीचा काही अनुभव नसल्यामुळे मी गप्प होतो. प्रकाशन सोहोळ्याला येणारा खर्च टायपिंगच्या खर्चासारखा आपल्याच डोक्यावर पडेल या भितीमुळे असेल, बाई पटकन म्हणाल्या,
"काही नको समारंभ वगैरे, तुम्ही ते नुसतंच बाजारात ठेवा."
खरं तर समारंभ वगैरे केला असता तर बाईंना व्यासपीठावर बसून मिरवता आलं असतं. हातात माईक धरून भाषण ठोकता आलं असतं. ओळख काढून वर्तमानपत्रात फोटो छापून आणता आला असता आणि टीव्हीवरही झळकता आलं असतं. पण बाई या सर्व आनंदाला नको म्हणाल्या. कदाचित विजय आपल्या बरोबरीने मिरवेल अशी त्यांना भिती वाटली असावी.
"ठीक आहे" असं म्हणून सावंत निघाले. दोन दिवसांनी त्यांनी आम्हाला पुस्तकाची एक एक प्रत आणून दिली. खरं तर मला मुखपृष्ठावर एक छानसं चित्र टाकायचं होतं. पण बाईंनी तिथेही खो घातला होता. सरळ, सपाट, एका रंगाचं मुखपृष्ठ पाहून ते विकत घ्यावं असं लोकांना वाटलं नाही तर सगळी मेहेनत पाण्यात जाईल असं माझ्या मनात आलं. पण कसंही दिसलं तरी ते माझं पुस्तक होतं आणि म्हणून ते हातात पडल्यावर मी हरखून गेलो. आपली प्रत घेऊन बाई डिपार्टमेंटमध्ये फिरायला गेल्या. माझी प्रत घेऊन मी संध्याकाळी सिद्धिविनायकाच्या दर्शनाला गेलो. भटजींनी पुस्तक देवाच्या पायावर ठेवलं, त्याला गंध लावलं, आणि एका फुलासह ते मला परत दिलं. फूल आणि पुस्तक घेऊन मी घरी गेलो. मुलाने जग जिंकून आणलंय असा आनंद आई-दादांना झाला.

रात्री त्यांना झोप केव्हा लागली माहित नाही. पण मला मात्र त्या आनंदात बराच वेळ झोप लागली नाही. दुसऱ्या दिवशी पुस्तक घेऊन मी हॉस्पिटलात गेलो.

"काय यार, पुस्तकं लिहायला लागलास?" माझ्या पाठीवर थाप मारून निनाद म्हणाला. "बघू तरी दे आम्हाला."

जोशीबाईंच्या ग्रूपबाहेरच्या मंडळींपैकी निनादने ते पुस्तक प्रथम पाहिलं.

"छान लिहिलंयस रे" तो म्हणाला. "आतल्या आकृत्या कोणी काढल्या?"

"मीच काढल्या."

"तुझी चित्रकला चांगली आहे. काय चित्रकलेचा कोर्स केला होतास काय?"

"अं... नाही. शाळेत असताना इतर मुलांसारखा ड्रॉइंगच्या परीक्षांना बसलो होतो. इतरांसारखी मला पण सी ग्रेड मिळाली होती" मी म्हटलं. ए किंवा बी ग्रेड मिळण्यायेवढी माझी चित्रकला चांगली नव्हती हे मला माहित होतं.

"सी ग्रेडच्या मानाने छानच आकृत्या काढल्यायस. असेल, असेल, तुझ्या चित्रकलेत नंतर सुधारणा झाली असेल. छान! चालू ठेव."

एकाच्या हातून दुसऱ्याच्या हातात असं करत करत माझ्या सगळ्या मित्रमंडळींनी पुस्तक पाहिलं. ते माझ्या हातात परत येईपर्यंत दुपार झाली.

"काय सहलेखक?" मंगलाबाई जोशीबाईंच्या ग्रूपमध्ये होत्या. आमच्या कुटुंबनियोजनकेंद्रात दोशीमॅडमच्या हाताखाली कामाला होत्या. खरं तर दोशीमॅडमच्या कामाऐवजी

जोशीबाईंबरोबर टाईमपास करणं हे त्यांचं मुख्य काम होतं असं सगळ्यांचं मत होतं. राजमातात मी काढलेल्या साडेनऊ वर्षांत मंगलाबाईंबरोबर बोलण्याचं भाग्य मला त्या दिवसापर्यंत कधी लाभलं नव्हतं. त्या आपण होऊन बोलायला आल्या म्हणजे काहीतरी पाणी मुरत होतं. कदाचित जोशीबाईंनी माझी सहलेखक अशी ओळख करून दिली असावी. किंवा मला डिवचून मी जोशीबाईंच्या पुस्तक लिहिण्यातल्या योगदानाबद्दल काही माहिती देतो का हे त्यांना बघायचं असावं. या कामगिरीवर त्यांना दोशीमॅडमनी धाडलं असण्याचीही शक्यता दाट होती.

"काय मंगलाबाई" मी म्हटलं.

"ए, बाई काय म्हणतोस?" मंगलाबाई म्हणाल्या.

"का हो? बाई या शब्दात काय वाईट आहे?" मी म्हटलं.

"शी. आपल्या घरी काम करायला येते तिला बाई म्हणायचं असतं."

हे ज्ञान मला नवं होतं. हॉस्पिटलात येणाऱ्या सर्व स्त्रियांना मी बाई म्हणायचो, त्यांनी कधी आक्षेप घेतला नव्हता. जोशी आणि दोशीमॅडमना पण आम्ही बाईच म्हणायचो. कदाचित त्यांच्या समोर तसं म्हटलं असतं तर त्यांनी आक्षेप घेतलाही असता. बाई हे बुवा या शब्दाचं स्त्रीलिंगी रूप असतं. बाईला बाई म्हणायचं नाही तर काय म्हणायचं हा मोठा कठीण प्रश्न होता.

"सॉरी," मी म्हटलं, "मला कल्पना नव्हती. काय म्हणत होता तुम्ही?"

"काही नाही. पुस्तकाचा सहलेखक झालास म्हणून अभिनंदन.

"थँक यू. पण मराठीत सहलेखक असा शब्द नसतो." बाई या शब्दाचा खरा अर्थ भले मला माहित नसेल. पण सहलेखक हा नवाच शब्द माझ्या गळ्यात मारलेला मी बरा खपवून घेतला असता.

"अं..अं.. नाही म्हणजे मला असं म्हणायचं होतं की जोशीमॅडमनी पुस्तक लिहिलं, त्यात तू पण लेखक म्हणजे त्यांचा सहलेखक..."

याहून जास्त चांगल्या प्रकारे मला डिवचणं कोणालाही जमलं नसतं. मी स्मितहास्य केलं. निदान मला तसं करायचं होतं. त्यांना ते कदाचित छद्मी हास्यही वाटलं असेल.

"आता आलं लक्षात. अहो, सहलेखक होणं अगदी सोपं असतं. तुम्ही जोशीमॅडमकडे शब्द टाकून बघा, पुढच्या वेळी त्या तुम्हाला सहलेखक म्हणून घेतील."

मंगलाबाई काय समजायचं ते समजल्या की नाही कोण जाणे. पण तो विषय न वाढवता त्या सटकल्या खऱ्या.

"अरे विजय, तुला जोशीमॅडम बोलावताहेत" निनादने मला बाईंचा निरोप दिला. खरं तर आता मला बाईंना भेटावसं वाटत नव्हतं. मंगलाबाईंनी सहलेखक म्हटल्यावर बाण बरोबर लागला होता. पण बाईंना टाळता येत नव्हतं.

"काय मॅडम?"

"आपलं पुस्तक सगळ्यांना आवडलंय" बाई म्हणाल्या.

"हं" मी म्हटलं.

"अरे, सीटी स्कॅनवर लेख लिहिण्यासाठी मी तुला एक संदर्भग्रंथ दिला होता बघ. युनिव्हर्सिटीच्या लायब्ररीतून आणला होता तो" बाईंनी विषयाला हात घातला.

"तो लेख मी तुम्हाला वाचायला दिला तेव्हा त्याच्याबरोबर मी तो ग्रंथ तुम्हाला परत दिला होता. या टेबलावर या इथे तुम्ही तो ठेवलात" त्यांच्या जवळच्या टेबलाच्या कोपऱ्याकडे बोट दाखवून मी म्हटलं.

"नक्की दिला होतास? मला सापडत नाहीये" बाई म्हणाल्या.

"नक्की दिला होता. त्याच्यावर तुम्ही मी दिलेला लेख ठेवला होता. लेख वाचून तुम्ही मला परत दिलात ना?"

"अं...हो" बाई म्हणाल्या. बाई चाचरल्या म्हणजे त्यांनी लेख वाचलासुद्धा नव्हता की काय? तो एकच लेख वाचला नव्हता की सुरुवातीच्या दोन लेखांनंतरचे सगळेच लेख वाचले नव्हते?

"तुम्ही घरी तर नेला नाही तो?"

"नाही. मी पुस्तकं घरी नेत नाही." बाई म्हणाल्या. पुस्तकं घरी नेत नाहीत आणि हॉस्पिटलात वाचत नाहीत तर वाचतात तरी केव्हा, असं माझ्या मनात आलं. अर्थात हा प्रश्न विचारणं बरं दिसलं नसतं म्हणून मी तसं म्हटलं नाही.

"मग इथेच कपाटात ठेवला असेल" मी सुचवलं.

"कपाटात पण नाही. आता नवीन आणून द्यायला हवा" बाई म्हणाल्या.

मी काही त्याचा अर्धा खर्च देऊ केला नाही. बाई हरवतील त्या प्रत्येक वस्तूचा अर्धा खर्च मी द्यायचा म्हटलं असतं तर बघायला नको होतं.

"तुझ्या लॉकरमध्ये असेल तर बघ" बाई आशा सोडायला तयार नव्हत्या.

"छे हो. माझा लॉकर रिकामा आहे. त्यात मी फक्त माझा एप्रन ठेवतो."

त्यांना दुःखी कष्टी अवस्थेत सोडून मी जेवायला गेलो. बहुतेक त्यांची खोली साफ करताना पांडूने तो ग्रंथ लंपास केला असावा. तो विकून दोन-तीन दिवसांच्या दारूची व्यवस्था सहज झाली असावी. त्याने तसं केलं याचा काही पुरावा नव्हता. अर्थात माझ्याकडे पुरावा असता तरी मी त्याचं भांडं फोडलं नसतं. पुस्तकाच्या निर्मितीत बाईंचा वाटा टायपिंगच्या अडीच हजार रुपयांवर सीमीत न रहाता पुस्तकाच्या दीड हजार रुपयांनी वाढला हा परमेश्वराच्या दरबारातला न्याय होता. पांडूला पकडून दिलं असतं तर तो न्याय कसा झाला असता?

***

मी राजमातात परत आलो आणि आयुष्य जणू तिथे जाण्यापूर्वी होतं त्या क्षणापासून पुढे सुरू झालं. पेशंटांची रांग लागायची. सगळा दिवस कामात जायचा. काही नवं सापडलं तर वाचायचो. एम्.डी.ला बसणाऱ्या मुलांना हौस म्हणून शिकवायचो. एम्.बी.बी.एस्.च्या मुलांना कर्तव्य म्हणून हौसेने शिकवायचो. एखादी अवघड केस आली म्हणून कोणी मदतीला बोलावलं तर वेळ काढून जायचो.

जोशीबाईंच्या युनिटमध्ये काम करणं हे तेवढं आनंदाचं नव्हतं हे माझ्या लवकरच ध्यानात आलं. बाईंनी पुस्तक लिहिण्याचं माझं श्रेय लाटलं त्याचा या आनंद नसण्याशी काही संबंध नव्हता. आरेमो म्हणून मी त्यांच्या युनिटमध्ये होतो तेव्हाही मला असा अनुभव आला होता. पण तेव्हा मी आरेमो होतो, लेक्चरर नव्हतो. जबाबदारी कमी होती. बाईंच्या चुका

संभाळायला ऑनररी होते. आता बाईंचं राज्य होतं आणि त्यांच्या निर्णयावर अपील करायला वाव नव्हता. बरं बाई अभ्यास करून ज्ञानाच्या बाबतीत अप टू डेट राहिल्या असत्या तर प्रश्नच नव्हता. पण बाई पुस्तकं घरी नेत नसत, आणि हॉस्पिटलात वाचत नसत. नवी जर्नल्स वगैरे वाचणं त्यांना आवडत नसावं. आम्ही कोणी नवीन ज्ञान दाखवलं की त्यांचा तिळपापड होत असे. जोपर्यंत हे वादविवाद थेअरीतच रहायचे तोपर्यंत काही बिघडत नव्हतं. पण जेव्हा त्या रुग्णांच्या उपचारांमध्ये गोंधळ घालायच्या, तेव्हा जर तोंड उघडलं नाही तर रुग्णांचं नुकसान व्हायचं. तोंड उघडलं तर बाईंबरोबरचे संबंध बिघडायचे, आणि बऱ्याचदा बाई शेवटी स्वतःला हवं तेच करायच्या.

निशाबाई आमच्या लॅबोरेटरीत कामाला होत्या. मी विद्यार्थी असल्यापासून त्यांना ओळखत होतो. पुढे त्यांची बदली होऊन त्या दुसऱ्या विभागात गेल्या. पण त्या जुन्या मैत्रीणींना भेटायला मधून मधून येत राहिल्या. वयाची चाळीशी झाल्यावर त्यांना काहीतरी अडचण आली आणि त्या आमच्या ओपीडीत आल्या. मला पाहून त्यांनी मंदसं स्मित केलं आणि जोशीबाईंच्या केबिनमध्ये गेल्या. थोड्या वेळाने त्या परत गेल्या, तेव्हाही मला पाहून त्यांनी मंदसं स्मित केलं. त्या गेल्यावर जोशीबाई मला खाजगीत म्हणाल्या,

"अरे, ती निशा आहे ना, ती अगदी वेडीच आहे."

"का, काय झालं?" मी विचारलं.

"आता तिची चाळीशी होऊन गेली. दोन महिने पाळी आली नाही म्हणून तपासायला आली होती. या वयाला पाळी जायची

वेळ येते आणि म्हणून पाळी उशीराने येते येवढं पण तिला समजत नाही."

"काही नव्हतं तिला?" मी विचारलं.

"नसणारच. मी तिला सांगून टाकलं की आता तुझी पाळी जाणार. पाठवून दिलं."

"तपासलं नाही तिला?"

"पोटाला उभ्या उभ्या हात लावला मी. आणखी काय तपासायचं? काही गरज नसताना उगाच कशाला तपासायचं?"

मी गप्प राहिलो. वयाच्या चाळीस वर्षांनंतरही स्त्रिया प्रेग्नंट होतात, दोन महिन्यांचा गर्भ पोटाला हात लावून हाताला लागत नाही, तर आतून तपासूनच लागतो, आणि उभ्या उभ्या पेशंटला कधीही तपासायचं नसतं या गोष्टी एका प्रोफेसरला एका लेक्चररने शिकवण्याची गरज नसते. उलट प्रोफेसरला ते अपमानास्पद वाटण्याची दाट शक्यता असते.

दुर्दैवाने निशाबाईंची पाळी वयाप्रमाणे जात नव्हती. आणखी दोन महिने गेले तरी पाळी आली नाही तेव्हा त्यांनी आमच्या लॅबोरेटरीत येऊन लघवी तपासून घेतली. बाई प्रेग्नंट होत्या. त्या परत आमच्या ओपीडीत आल्या. जोशीबाईंच्या केबिनमध्ये गेल्या.

"अग निशा, तू प्रेग्नंट आहेस" जोशीबाईंचा आवाज माझ्या आणि त्यांच्या केबिनमध्ल्या पार्टिशनमधून आला. बहुधा निशाबाईंनी त्यांना आपल्या लघवीचा रिपोर्ट दाखवला असावा. एरवी मी तिथून येणाऱ्या आवाजांकडे लक्ष देत नसे. पण मला निशाबाईंची काळजी वाटत होती, म्हणून मी लक्ष देऊन ऐकू लागलो.

"तुम्ही तर म्हणाला होतात की माझी पाळी जाते आहे म्हणून. आता काय करायचं?"

"तुला हवंय का हे मूल?" जोशीबाईंनी विचारलं.

"छे हो मॅडम. माझा धाकटा मुलगा आता बारावीला आहे. आता कसलं मूल?"

"मग पाडून घे" जोशीबाई म्हणाल्या.

"पिशवी साफ करूया?"

"नाही ग. चार महिन्यांचा गर्भ आहे. तो पिशवी साफ करून पाडता येणार नाही. तुला वॉर्डात अॅडमिट करून गर्भाशयात औषध टाकून तो पाडावा लागेल. प्रसूती होताना कळा येतात तशा कळा येऊन तो पडेल. एक-दोन दिवस लागतील."

"पण मॅडम, मुलगा बारावीला आहे. महत्वाचं वर्ष आहे. अॅडमिट कशी होणार मी?"

"त्याला इलाज नाही. आपण शक्य तेवढ्या लवकर करून देऊ. तू अॅडमिट हो."

बिचारी अॅडमिट झाली. दुसऱ्या महिन्यात जोशीबाईंच्या ऐवजी दुसऱ्या कोणालातरी दाखवलं असतं तर गर्भाशय साफ करून घेऊन चार तासात घरी गेली असती. बिचारी जोशीबाईंच्या व्यक्तीमत्वाला पाहून फसली आणि मुलाच्या महत्वाच्या वर्षी हॉस्पिटलात चांगले चार दिवस घालवून घरी गेली. नशीब तिचं की तिचं रुकसानासारखं झालं नाही. जोशीबाई नशीबवान. ही गोष्ट अमेरिकेत झाली असती तर तिने जोशीबाईंवर खटला घातला असता आणि तो जिंकून त्यांच्याकडून रग्गड पैसा मिळवला असता.

***

अठ्ठावीस वर्षांची नंदिनी निशाबाईंयेवढी नशीबवान नव्हती. तिच्या गर्भनलिकेत प्रेग्नन्सी राहिली होती. त्याला एक्टॉपिक प्रेग्नन्सी असं म्हणत. अशी नळी प्रेग्नन्सीच्या पहिल्या एक-दोन महिन्यांत फुटून पोटभर रक्त व्हायचं आणि त्वरीत ऑपरेशन केलं नाही तर पेशंट दगावायची. नंदिनीची गर्भनळी फुटलेली नव्हती. त्यापूर्वीच कोणा प्रायव्हेट प्रॅक्टीस करणाऱ्या डॉक्टरने तिचं निदान करून तिला राजमातात पाठवलं होतं. जोशीबाईंनी तिला वॉर्डात ॲडमिट करून घेतलं.

"तिला कोणी तपासू नका हं" जोशीबाईंनी सर्वांना बजावलं. "तुम्ही तपासताना तिची गर्भनळी फुटली तर इमर्जन्सी ऑपरेशन करावं लागेल."

त्यावेळचा आमचा रजिस्ट्रार असराणीही नग होता. घोकंपट्टी करून त्याने परीक्षेत चांगले गुण मिळवले होते आणि स्त्रीरोगाच्या एम्.डी.ला ॲडमिशन मिळवली होती. पण स्वतःचं डोकं चालवणं हा प्रकार त्याला फारसा जमत नसे. कामाच्या बाबतीतही आनंद होता. नंदिताचं ऑपरेशन तो करणार होता.

नंदिता ऑपरेशन टेबलावर आली. तिला ॲनाथेटिस्टनी ॲनास्थेशिया दिला. असराणीने तिच्या लघवीच्या पिशवीत नळी घातली.

"नळीतून लघवी येत नाहीये" मी म्हटलं. लघवीची पिशवी ऑपरेशन सुरू करण्यापूर्वी रिकामी करणं महत्त्वाचं असतं, नाहीतर त्या पिशवीला ऑपरेशनच्या वेळी इजा होऊ शकते.

"गप रे. रात्रभर ती रिकाम्या पोटी आहे. कुठून लघवी येणार तिला?" जोशीबाईंना असराणी आवडायचा. त्यांनी त्याला सपोर्ट दिला.

मी वाकून बघितलं. नळी लघवीच्या पिशवीत नाही तर योनीमार्गात होती. नवं लग्न झालेल्या पुरुषाने असा गोंधळ करणं क्षम्य ठरेल, पण गायनॅकच्या रजिस्ट्रारने असं करणं केवळ अक्षम्य होतं.

"नळी योनीमार्गात आहे" मी म्हटलं.

'मग काय झालं?' असं तोंड करून त्याने माझ्याकडे पाहिलं.

"दुसरी नळी घे आणि लघवीच्या पिशवीत घाल" मी म्हटलं.

त्याने गुपचूप नवी नळी योग्य ठिकाणी घातली. जोशीबाई गप्प झाल्या. मी लावला तो शोध त्यांनी लावला असता तर भलं मोठं लेक्चर त्यांनी मारलं असतं, असं माझ्या मनात आलं.

"तिच्या पोटावर ती जुन्या ऑपरेशनची खूण कसली आहे?" मी विचारलं.

"पूर्वी तिचं कसलं तरी ऑपरेशन झालंय" तो म्हणाला. "पण त्याचे कागदपत्र तिच्याकडे आत्ता नाहीत."

"राहू दे जुने कागदपत्र. मी पाहिलीय तिला. एक्टॉपिक आहे. आता ऑपरेशन सुरू करा" जोशीबाई म्हणाल्या.

ऑपरेशन सुरू झालं. आम्ही आजूबाजूला उभे राहून बघत होतो. नंदिनीचं पोट उघडलं. डाव्या गर्भनलिकेत प्रेग्नन्सी होती.

"उजवी गर्भनलिका आणि स्त्रीबीजकोश दाखव" मी म्हटलं.

"सापडत नाही. तिथे आतडं चिकटलंय" तो म्हणाला.

"ठीक आहे. डावी नळी एक्टॉपिकसकट काढून टाक" मी म्हटलं.

"डावा स्त्रीबीजकोशपण काढू का?" त्याने विचारलं.

"छे छे! तरुण स्त्रियांचा स्त्रीबीजकोश कारण नसताना काढायचा नसतो."

"काढून टाक तो" जोशीबाई म्हणाल्या. "जरासा लांबट दिसतोय." माझ्यापेक्षा त्या ज्येष्ठ आहेत असं दाखवायसाठीच त्या तसं म्हणाल्या का असं माझ्या मनात आलं. तसं असायचं कारण काही माझ्या लक्षात आलं नाही. जरासा लांबट असला म्हणून काय काढून टाकायचा? उद्या सगळ्या उंच माणसांना गोळ्या घालून टाका म्हणायच्या.

"पण मॅडम..." मी सुरुवात केली.

"गप रे! उगाच पुस्तकी ज्ञान दाखवू नको. पुस्तकी ज्ञानापेक्षा आमचा अनुभव जास्त महत्त्वाचा आहे. एक्टॉपिक असली तर स्त्रीबीजकोशपण काढायचा असतो. तिचा दुसरा स्त्रीबीजकोश त्या चिकटलेल्या आतड्याच्या खाली असणार. तेवढा पुरे झाला तिला."

म्हणजे माझ्या पुस्तकी ज्ञानाबद्दल खदखदत होतं तर. वरिष्ठांची आज्ञा पाळणं नगरपालिकेच्या सेवानियमांप्रमाणे आवश्यक होतं, म्हणून मी गप्प राहिलो. पठ्ठयाने गर्भनलिका आणि स्त्रीबीजकोश दोन्ही काढले. तिचं पोट शिवून बंद केलं आणि तिला वॉर्डात नेलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही सगळे वॉर्डराउंड घ्यायला गेलो. नंदिनीच्या कॉटकडे पोचलो तेव्हा तिच्या आईने तिच्या जुन्या ऑपरेशनची फाईल आमच्या पुढे केली. मी ती घेतली आणि उघडली. तीन वर्षांपूर्वी उजव्या गर्भनलिकेत एक्टॉपिक प्रेग्नन्सी झाल्यामुळे जोशीबाईंसारख्याच कोणीतरी तिची उजवी गर्भनलिका आणि स्त्रीबीजकोश काढून टाकले होते. मी

ते सर्वांना ऐकू यावं म्हणून मोठ्याने वाचलं. जोशीबाई आणि असराणी या दोघांचीही तोंडं बघण्यासारखी झाली होती. तो किंवा ती गायनॅकॉलॉजिस्ट, जोशीबाई आणि त्यांचा रजिस्ट्रार असराणी सगळे तीच पन्नास वर्षांपूर्वीची पुस्तकं वाचत होते असं दिसत होतं.

"आपल्या उपचारांमुळे ही पेशंट ऐन तारुण्यात रजोनिवृत्त झालीय. आता तिला ओस्टिओपोरोसिस, इश्केमिक हार्ट डिसीज वगैरे आजार म्हातारपणाऐवजी आताच होतील" मी कोरड्या आवाजात म्हटलं. नंदिनी आणि तिची आई यांना कळू नये म्हणून इंग्रजीत म्हटलं. काय झालंय आणि पुढे त्याचे दुष्परिणाम टाळण्यासाठी काय करायला पाहिजे हे त्यांना समजावून सांगणं हे जोशीबाईंच काम होतं. माझ्यामुळे ते त्यांना कळलं म्हणून बाईने माझ्यावर खार खायला नको होता.

काही न बोलता बाई पुढच्या पेशंटकडे गेल्या. मागून आम्ही सगळे गेलो. बाईंना पश्चात्ताप झाला असं काही वाटलं नाही. माझ्यावर राग धरल्यासारखं त्यांचं तोंड मात्र दिसत होतं.

***

"अरे विजय, जोशीबाई तुझ्यावर खुन्नस ठेवून आहे असं ऐकतो. तू असं केलंस काय तिला?" राजेशने मला दोन दिवसांनी विचारलं.

मी ती एक्टॉपिक प्रेग्नन्सीची हकीकत सांगितली.

"पण बाई त्याच्या आधीपासूनच खुन्नस ठेवून आहे. दुसरं काहीतरी झालं असणार" तो म्हणाला.

"अरे, विजयच्या पुस्तकाचं सगळं लिखाण त्याने एकट्यानेच केलय हे सगळ्यांना समजलंय. ते त्यानेच सगळीकडे केलंय असं बाईला वाटतंय" निनादने गौप्यस्फोट केला.
"मी नाही कोणाला सांगितलं" मी म्हटलं.
"अरे, अशा गोष्टी लपत नाहीत. बाईचं ज्ञान सगळ्यांना माहित आहे. ती काय पुस्तक लिहिणार? त्यातून तुझ्या हस्ताक्षरातले पुस्तकाचे चाप्टर बाईच्या टेबलावर सुषमाने पाहिले होते" निनाद म्हणाला.
"तरीच बाई मला त्या दिवशी पुस्तकी ज्ञान दाखवू नको म्हणाली" मी म्हटलं. "ती अशी अंगावर का आली ते मला कळलं नव्हतं. आत्ता कळलं."
"मग आता काय करणारेस?"
"काय करणार? आलिया भोगासी असावे सादर" मी म्हटलं.
"अरे, सुषमा वगैरे वरिष्ठांना चाटतात तसं करायला शीक. आयुष्य सुखात जाईल" राजेश म्हणाला.
"मला ते जमायचं नाही. नाहीतर मी कावळ्यांनाच खिशात टाकलं नसतं का?" मी म्हटलं.
"काही चाटू बिटू नकोस. आहेस तसाच बरा आहेस" निनाद म्हणाला.
अर्थात मला जमलं असतं आणि मी चाटलं असतं तरी काही फायदा झाला नसता. दैवाने फासे टाकून झाले होते.

***

एक दिवस डीननी मला बोलावणं पाठवलं.
"या, बसा" ते म्हणाले.

मी अवघडून, खुर्चीच्या पाठीला पाठ न लावता बसलो.

"कसं काय चाललंय सगळं?"

"ठीक चाललंय, सर" मी म्हटलं.

"तुमचे एचोडी कावळे, त्यांच्याबरोबर सगळं ठीक आहे ना?"

"होय सर" मी म्हटलं.

"आता बघा, आपल्याकडे शशिकला निकाळजे नावाच्या डॉक्टर आहेत. सध्या ए.एम्.ओ. म्हणून काम करताहेत. त्या स्त्रीरोग आणि प्रसूतीशास्त्राच्या एम्.डी.च्या परीक्षेला बसायच्या आहेत. पण त्यांची तयारी फारशी चांगली झालेली नाही."

ए.एम्.ओ. म्हणजे असिस्टंट मेडिकल ऑफिसर. हॉस्पिटल चालवायचं काम करणाऱ्यांपैकी सगळ्यात कनिष्ठ डॉक्टर. ते रुग्णांवर उपचार करत नसत. ही डॉक्टरीण माझ्याच विषयात शिकत होती आणि मला त्याचा पत्ताच नव्हता, ही मोठी आश्चर्याची गोष्ट होती.

"त्या आपल्याकडच्या नाहीत. बाहेरून आल्याहेत" माझं प्रश्नार्थक तोंड बघून डीननी खुलासा केला. "आपले गृहमंत्री आहेत ना, त्यांची मुलगी."

आपल्याकडच्या साध्या ए.एम्.ओ.ची डीनना येवढी काळजी का ते माझ्या लगेच लक्षात आलं.

"आता आपल्या ए.एम्.ओ.ला आपण मदत करायला हवी. तुम्ही त्यांना काय गरज वाटते ते शिकवा."

ग्रुहमंत्रांच्या मुलीला शिकवणी हवी होती तर त्यांनी मलाच विचारायला हवं होतं. डीनकरवी माझ्यावर ते काम टाकणं योग्य नव्हतं. पण हातात सत्ता असली की माणसं अशी वागतात खरी. डीननी माझ्या बदलीच्या वेळी कावळ्यांना न

जुमानता मला मदत केली होती. त्यांना नाही म्हणण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता.

"तिला माझ्याकडे पाठवून द्या सर" मी म्हटलं.

शशिकलाची शिकवणी सुरू झाली. तिच्या गळ्यातलं मंगळसूत्र पाहून तिचं आडनाव ग्रुहमंत्रांच्या आडनावाहून वेगळं कसं हा मला पडलेला प्रश्न सुटला. तिला काहीही येत नव्हतं. स्त्रीरोगतज्ज्ञ होण्याची इच्छा तिला का झाली आणि तिला एम्.डी.ला ॲडमिशन कशी मिळाली हे प्रश्न तिला विचारले असते तरी त्यांची उत्तरं मिळाली नसती. शिकवणीचा वेळ तेवढा फुकट गेला असता.

"काय रे, शशिकला शिकतेय का?" निनादला आपलं ज्ञान अप टू डेट असावं असं नेहमी वाटायचं. त्यामुळे संबंधितांना असले प्रश्न विचारताना त्याला कधीही संकोच वाटत नसे.

"मी शिकवतोय. ती शिकते की नाही हे बघायला वेळ कुठे आहे? परिक्षा दोन महिन्यांवर आलीय" मी म्हटलं. त्यातून शशिकला मितभाषी होती. आपण होऊन ती काहीच बोलत नसे. प्रश्न विचारला तरी बहुधा उत्तर येत नसे. थोड्या दिवसांनी मी प्रश्न विचारायचं सोडून दिलं आणि सिलॅबस संपवण्यावर लक्ष केंद्रित केलं. दोन महिन्यांनी फुकट शिकवणी संपली. ती एकदा केव्हातरी मला 'थँक यू' म्हणाली असावी, पण मला तसं खात्रीलायकपणे सांगता येत नाही.

"फुकटची शिकवणी का रे?" निनादला संपूर्ण माहिती हवी असायची.

"होय" मी म्हटलं.

"काय रे, तिने काही पैसे देऊ केले का?" मी घरी गेल्यावर माझ्या आईने मला विचारलं. पोराचे श्रम कोणी फुकट घेऊ नये अशी त्या माउलीची रास्त अपेक्षा होती.

"नाही" मी म्हटलं.

"काही वस्तू तरी देऊ केली का?"

"नाही" मी म्हटलं.

"बघ कशी असतात ही मोठी माणसं" ती सात्विक संतापाने म्हणाली. "ग्रुहमंत्री आहेत. रग्गड कमवत असणार."

"अगं, असं म्हणू नकोस. त्यांच्या कानावर गेलं तर घरी पोलिस पाठवतील. पोलिसखातं ग्रुहमंत्रांच्या अखत्यारीत असतं."

"कोण येणार आहे आपल्या घरी मी काय म्हणते ते ऐकायला? आणि आलं तरी मी खरं बोलायला घाबरत नाही."

"जाऊ दे ग. आता ती विवाहित आहे. माहेरचा आधार किती दिवस घेणार ती?"

"तुमच्याकडे नोकरी करतेय ना? स्वतः कमावतेय ना? नवरापण कमवत असणार. कोणाचं काही फुकट घेऊ नये येवढं पण समजत नाही? आणि माहेरावर अवलंबून नाही तर ग्रुहमंत्रांनी तुमच्या डीनना सांगून शिकवणीची सोय कशाला लावली?"

"जाऊ दे ग. मी हे काम डीननी सांगितलं म्हणून केलं. माझ्यावर त्यांचे उपकार होते ते फिटले."

यावर ती माउली काही बोलली नाही. कोणाचे उपकार डोक्यावर ठेवू नयेत अशी तिची लहानपणापासूनची शिकवण होती. एका

उपकारातून मी मुक्त झालो याचं तिला समाधान वाटलं असावं.

एम.डी. ची परिक्षा कावळ्यांनी घेतली. बाहेरचे आणखी तीन परिक्षक होते. कावळ्यांच्या युनिटबरोबर माझा काही संबंध नव्हता. त्यामुळे परिक्षा कशी पार पडली ते मला समजलं नाही. परिक्षा संपल्यावर शशिकला आपल्या गुरुजींना येऊन भेटली नाही. त्यामुळे तिची परिक्षा कशी झाली तेही मला समजलं नाही. कालांतराने परिक्षेचा रिझल्ट लागला. कावळ्यांची आवडती सुझन चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झाली. ती तशी होणार याबद्दल कोणालाही काही शंका नव्हती.

"सुझन विद्यापीठात दुसरी आली म्हणे" निनादला सगळ्या गोष्टी माहित असत.

"तीन वर्षं कावळ्यांच्या केबिनमध्ये त्यांच्या शेजारी बसून काढली, मग दुसरी येणार नाही का ती?" राजेश म्हणाला.

"शेजारी? समोर नाही?" सुषमा म्हणाली.

"शेजारी" राजेश आपल्या विधानावर ठाम होता. "हाउसमन होती तेव्हा रजिस्ट्रारला नाही मिळाली तरी ती मात्र दर आठवड्याला एक केस ऑपरेट करायची."

"सोनोग्राफी बघताना कावळ्यांनी तिच्या जीन्सच्या खिशात हात घातला होता म्हणे" निनादला ते म्हणायची काही गरज नव्हती असं माझं मत होतं. मी तसं म्हणण्यापूर्वी सुषमाला परत कंठ फुटला.

"जीन्सचा खिसा? पुढचा की मागचा?"

"सुषमा?" असं मी जरा मोठ्या आवाजात म्हणालो, त्यांत राजेशने कोणता खिसा ते सांगितलेलं कोणाला ऐकू गेलं नाही. सुषमाचा चेहरा जरासा गोरामोरा झाला आणि तोंड बंद झालं.

"शशिकला उत्तीर्ण झाली का?" मी विचारलं.

"झाली" निनाद म्हणाला. "तू तिचा शिक्षक ना? तुला तिने पेढे आणून दिले नाहीत?"

"नाही" मी म्हटलं. शशिकलाचे पेढे कधीच आले नाहीत.

"ग्रुहमंत्रांची मुलगी ती. तिला नापास करायचे गट्स कोणाला असणार?" राजेश म्हणाला.

"अरे, निदान तू शिकवलंस म्हणून ती उत्तीर्ण झाली असं तरी चार लोकांनी म्हणायचं. तेवढच तुझं नाव तरी झालं असतं" मी घरी गेल्यावर माझ्या आईने म्हटलं. तिची न्यायबुद्धी तिला शांत राहू देत नसे.

"माझं नाव तसं आधीपासून चांगलं आहे ग" मी म्हटलं. "पण मी चमत्कार घडवू शकणार नाही हे सगळ्यांना माहित आहे. शशिकलाला फक्त तिचे बाबाच उत्तीर्ण करू शकतील असं सगळेजण आधीपासूनच म्हणायचे. मग त्यांनी मला तिच्या पास होण्याचं श्रेय कसं दिलं असतं? "

"अरे, पण येवढी मेहनत करून तुझ्या पदरात काहीच पडलं नाही" ती म्हणाली.

"आई, देव करतो ते भल्यासाठीच. तू विश्वास ठेव" मी म्हटलं. देवाचं नाव घेतल्यावर तिने तो विषय वाढवला नाही. जरी तो विषय आम्ही कोणी वाढवला नाही तरी तो वाढतच गेला.

***

"विजय, आजचा पेपर वाचलास का?"
"नाही रे, सकाळी इमर्जन्सी आली म्हणून मी लवकर निघालो. तोपर्यंत पेपर आला नव्हता."
"तळपदेने कोर्टात खटला घातलाय."
तळपदे शशिकलाबरोबर एम्.डी.ला बसला होता. कोणाच्या अध्यातमध्यात नसायचा. त्याची परीक्षेची तयारी किती होती माहित नाही. पण तो अनुत्तीर्ण झाला होता.
"गृहमंत्री, शशिकला आणि कावळे या तिघांवर. आपली परिक्षा शशिकलापेक्षा चांगली झाली होती. पण कावळ्यांनी तिला उत्तीर्ण केलं तर आपल्याला अनुत्तीर्ण केलं. गृहमंत्र्यांनी पदाचा गैरवापर केला आणि कावळ्यांकरवी आपल्या मुलीला पास करून घेतलं म्हणून खटला गुदरलाय त्याने."
ही एकदम सनसनाटी बातमी होती. राजमाताच्या इतिहासात असं कधी घडलं नव्हतं. एक साधारण डॉक्टर गृहमंत्री आणि एचोडीवर खटला घालतो म्हणजे काय?
"तळपदेचं धाडस कसं काय झालं? पोलीस नाही आले त्याच्या घरी?" मी म्हटलं.
"पोलीस कसे येतील त्याच्या घरी? फिर्याद त्याने घातलीय. तो आरोपी नाहीये" निनाद म्हणाला.
"अरे, पोलीसखातं गृहमंत्र्यांच्या अखत्यारीत असतं ना? त्यांच्यावर खटला घातला तर ते पोलीस नाही पाठवणार?" मी विचारलं. निनादचं तोंड बघून माझा प्रश्न कदाचित बावळटपणाचा असेल असं मला वाटलं.

"अरे, ही लोकशाही आहे. गृहमंत्री हे जनतेने निवडून दिलेले लोकांचे प्रतिनिधी आहेत, हुकूमशहा नाहीत. पोलीस कसे पाठवतील?"

"मी आपला पेपर वाचून आणि हिंदी चित्रपट पाहून जगात काय चालतं ते ठरवणारा माणूस. मला वाटलं तसं होत असणार" मी म्हटलं.

"चल, चल" निनाद म्हणाला खरा, पण त्याच्या बोलण्यात पूर्वीचा जोर नव्हता. मला वाटतं तोही पेपर वाचून आणि हिंदी चित्रपट पाहून जगात काय चालतं ते ठरवणारा माणूस असावा. घडलेल्या घटनेच्या सनसनाटीपणामुळे तो तात्पुरता आपली जुनी मतं विसरला असावा. तळपदेच्या धाडसीपणाच्या पाठी कोणती ताकद आहे ते ठरवायला तो रवाना झाला.

तळपदेने वकील मात्र सॉलिड केला होता. माणूस मोठ्या तयारीचा दिसत होता. खटला पुढे सरकत गेला तसतशी त्याची मेहनत आणि विचारशक्ती उघड होत गेली. वर्तमानपत्रं तर अगदी चेकाळल्यासारखीच झाली होती. रोज काहीतरी नवं छापत होती. राजमातात तर रोज चर्चासत्रं झडायला लागली. म्हणजे मुख्य लेक्चर हॉल किंवा ऑडिटोरियममध्ये नव्हे, तर स्टाफरूम, कँटीन, कट्टा, व्हरांडा अशा प्रत्येक ठिकाणी छोट्याछोट्या गटांत चर्चा व्हायला लागल्या. सगळेच जण बोलत होते. जोशीबाई मात्र तोंड बंद करून होत्या.

"अरे, आजच्या पेपरात कावळ्यांचा फोटो आलाय" निनादने दुमडलेलं वर्तमानपत्र खिशातून काढलं आणि आम्हाला दाखवलं. फोटो पोलीस काढतात तशा मग शॉटसारखा दिसत होता.

"अरे, तुरुंगात टाकताना पोलीस समोरून आणि बाजूने फोटो काढतात तसा दिसतोय हा फोटो" राजेश म्हणाला.

"खटल्याचा निकाल लागायच्या आधीच त्यांनी असा काढला? कमाल आहे. निदान निकाल जाहीर होईपर्यंत तरी थांबायचं ना त्यांनी" सुषमा म्हणाली. तिलाही कावळे आवडत नसावे असं दिसलं. बहुधा सवईने त्यांनी तिलाही न्याहाळलं असावं. त्यांच्याविषयी बोलताना तिने अभावितपणे आपला दुपट्टा सावरला आणि नीट लपेटून घेतला हे माझ्या लक्षात आलं, पण मी ते दर्शवलं नाही. तळपदे खटला जिंकणार याची मात्र तिला खात्री दिसत होती.

"तळपदे काय म्हणतोय याबद्दल?"

"मला भेटला होता" राजेश म्हणाला. "पण तो काहीच म्हणत नाहीये. त्याच्या वकीलाने त्याला सल्ला दिलाय की काही बोलू नकोस नाहीतर केस वीक होईल."

"पण त्याचा कोणी पाठीराखा आहे का?" मी विचारलं. बिनपाठिंब्याचा तो आमच्यासारखा सामान्य माणूस गुंडांकडून मारला जाईल अशी मला भिती वाटत होती.

"विरुद्ध पक्षाचा त्याला पाठिंबा आहे म्हणे. ही राजकीय खेळी आहे. त्यांना सरकार पाडायचंय. ते झालं नाही तर पुढच्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाला धूळ चारायचीय."

"म्हणजे त्याला प्यादं म्हणून वापरतायत का?"

"तसच वाटतंय. इतके दिवस तो कोणाच्या अध्यातमध्यात नव्हता, तो एकदम थेट गृहमंत्र्यांवर खटला भरतो म्हणजे काय?"

"आणि खर्च पण खूप होत असेल नाही? तसा तो घरचा फार श्रीमंत आहे असं काही ऐकलेलं नाही."
"केस जिंकला आणि एम्.डी.त पास झाला तर आयुष्यातले सहा महिने वाचतील. त्या काळात केलेल्या खर्चापेक्षा बरंच जास्त कमवेल तो."
बोलणाऱ्या मंडळींना ठोस असं काहीही माहित नव्हतं. पण स्वतःची मतं प्रत्येकाला होती, आणि ती मांडण्याचा उत्साह तर उदंड होता. प्रत्येकाच्या म्हणण्यात थोडंफार तथ्य असण्याची शक्यताही होती.
"रिट पिटिशन आहे. निकाल लवकर लागेल." निनाद म्हणाला.
ही सगळी एक्साइटमेंट फार दिवस टिकणार नाही म्हणून मंडळी खट्टू झाली. खटल्याचा निकाल लागण्यापूर्वी हाती असलेल्या वेळेचा होईल तेवढा सदुपयोग करून घ्यावा म्हणून चर्चा आणखी जोरात सुरू झाली. मला दुपारची ओपीडी होती. मी तिथून हळूच सटकलो. जोशीबाई दुपारच्या ओपीडीत कधीही जात नसत. मी उशीरा पोचलो असतो तर ओपीडी संध्याकाळपर्यंत संपली नसती.

***

तळपदेच्या वकीलाने आरोपींची लक्तरं काढली. त्या ताणाने कावळे आजारी पडले. त्यांचा मधुमेह बळावला. फुप्फुसांचा टीबी झाला. फुप्फुसांच्या आवरणांमध्ये पू भरला. कावळे देसाई जनरलमध्ये ॲडमिट झाले. तिथे त्यांनी कावळ्यांचं इंटरकॉस्टल ड्रेनेज केलं. इन्सुलीनची इंजेक्शनं आणि भारी अँटिबायॉटिक्स चालू केली.

"कावळे राजमातात नोकरीला असून देसाई जनरलमध्ये ॲडमिट का झाले?" राजेश म्हणाला.

"त्यांना इथे यायची लाज वाटली असेल" सुषमा म्हणाली.

"लाज कसली वाटतेय? पोचलेला माणूस आहे. मी मुख्य परिक्षक म्हणून स्वतःच्या जबाबदारीवर, इतर परिक्षकांना न सांगता शशिकलाचे गुण वाढवले. तसं करण्याचा मला अधिकार आहे असं त्याने कोर्टाला सागितलंय. खरं वाटेल कोणाला? म्हणे आपल्याला तो अधिकार होता. हं!" निनाद म्हणाला. ही घटना घडल्यापासून तो बाजारात मिळतील ती सगळी वर्तमानपत्रं विकत घ्यायला लागला होता.

"मग घराजवळ आहे म्हणून असेल. बिचारी बायको एकटी कुठेकुठे म्हणून धावेल?" सुषमा म्हणाली. असा नवरा मिळाला म्हणून कावळ्यांच्या बायकोबद्दल तिला अनुकंपा वाटत होती.

"कावळ्यांना आपण मुख्य परिक्षक म्हणजे परमेश्वर असं वाटलं की काय?"

"तसंच दिसतंय."

"इतर परीक्षकांना साक्ष देण्यासाठी बोलावलं होतं म्हणे. त्यांनी साफ सांगितलं की शशीकला अनुत्तीर्ण होती. कावळ्यांनी नंतर काय फेरफार केले त्यांच्याशी त्यांचा काही संबंध नाही."

"शशीकलाला साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभं नाही केलं?"

"अरे, ती आरोपी आहे. ती कशी साक्ष देणार?"

"अरे, आपल्या विजयला नाही त्यांनी साक्षीदार केलं ते? त्याने शशीकलाची शिकवणी घेतली होती" राजेशने नवा मुद्दा काढला. तो मला फारसा आवडला नाही.

"अरे, मी काय सांगणार? सर्व परीक्षकांनी तिला अनुत्तीर्ण केलं म्हणजे ती अनुत्तीर्ण व्हायला लायक होती. मी भले म्हटलं की ती खूप ज्ञानी होती, म्हणून काय फरक पडणार आहे?" मी म्हटलं.

"होय रे, ते बरोबर आहे. उद्या बचावपक्ष तिचे शिशूवर्गापासूनचे सर्व शिक्षक साक्ष द्यायला आणेल. त्याचा काही उपयोग नाही."

खरं तर खटला उभा राहिल्यापासून मी तणावाखाली होतो. देवाची दया म्हणून मंडळींनी मला शिकवणीचे पैसे दिले नाहीत. नाहीतर तळपदेनं कदाचित मला पण आरोपी बनवलं असतं. ते जमलं नसतं तर किमान साक्षीदार म्हणून तरी बोलावलं असतं. इच्छा नसताना मी नको त्या प्रकरणात गोवला गेलो असतो. ईश्वर करतो ते भल्यासाठीच, हा माझा विश्वास सार्थ ठरला. घरी गेल्यावर ही गोष्ट आईला आठवणीने सांगितली पाहिजे असं मी मनाशी ठरवलं. तेवढाच तिचा ईश्वरेच्छेवरचा विश्वास अधिक दृढ झाला असता.

***

खटला लांबत गेला तशी कावळेबुवांची तब्येत खालावत गेली.

"खटला आणखी लांबला तर म्हातारा कदाचित गचकेल" निनादने म्हटलं.

"चूप रे. काहीतरी काय बोलतोस?" सीमाने त्याला दटावलं. पण या वेळी तिने छातीवरून साफ खाली पडलेला दुपट्टा अजिबात सावरला नाही. म्हणजे कावळे गचकतील असं तिलाही मनोमन वाटलं असावं. मग कशाला दुपट्टा सावरायचा असा विचार तिच्या अंतर्मनात आला असावा.

"खरंच. परवा डायबेटिक कोमात गेले होते ते" निनाद म्हणाला. केवळ तिने दटावलं म्हणुन त्याने 'म्हातारा' ऐवजी 'ते' असं म्हटलं हे माझ्या लक्षात आलं. ती गेल्यावर तो परत म्हातारा असं म्हणणार याची मला खात्री होती.

"त्यांची सुट्टी संपलीय. अर्धपगारी सुट्टी पण संपलीय. आता बिनपगारी रजेवर आहेत."

"दोन मुली आहेत ना त्यांना?" सीमाने विचारलं

"दोन नाही तीन आहेत" राजेश म्हणाला.

"बायको काही काम करते?"

"छे! गृहिणी आहे. आता नवऱ्याचा आजार आणि तीन मुली कशी काय संभाळणार ती देव जाणे."

"कर्ज काढायचं तर तारण ठेवायला स्वतःचं घर सुद्धा नाहीये त्यांचं. नगरपालिकेच्या वसाहतीत रहातात ते."

ही बातमी मला नवी होती. इतका वेळ मी नुसता ऐकत होतो. कावळ्यांनी आपला सगळा संसार वाऱ्यावर सोडलासं दिसत होतं.

"आपण काही मदत करायची का त्यांना?" मी विचारलं. मी तसं का म्हटलं कोण जाणे. बहुधा मला त्या तीन मुलींची दया आली असावी.

"चल रे. आपला पगार तो किती आणि त्यातनं आपण देणार किती. गृहमंत्री करतील त्यांना मदत" सीमा म्हणाली.

"त्यांची सुझन आणि मनाली करतील त्यांना मदत" राजेश म्हणाला.

मी काहीतरी निमित्त सांगून तिथून सटकलो. मला कावळे अजिबात आवडत नसत हे जरी खरं होतं तरी खाली पडलेल्या

प्रतिस्पर्ध्यावर वार करणं मला पटत नव्हतं. त्यातून या प्रतिस्पर्ध्याला मी खाली पाडलेलं नव्हतं. तो आपला आपणच खाली पडला होता. असं असताना चार-पाच जणांनी मिळून त्याच्यावर वार करणं अगदीच वाईट होतं.

महिन्याभराचा अवधी गेला. खटल्याचा निकाल लागला. वर्तमानपत्रांत रकानेच्या रकाने भरून आले. निनाद परत एकदा सगळी वर्तमानपत्रं घेऊन आला. त्यांतल्या हेडलाइन्स मला अजून आठवताहेत.

"वैद्यकीय विद्यार्थ्याला न्याय."

"डॉक्टर तुम्हीसुद्धा?"

"गृहमंत्र्यांसाठी कमरेचं डोक्याला."

कोर्टाने कावळ्यांना दोषी ठरवलं होतं. गृहमंत्र्यांनी त्यांना हे करण्यास भाग पाडल्याचा प्रत्यक्ष पुरावा नसला तरी त्यांच्यासाठीच कावळ्यांनी हा सारा प्रपंच मांडला असावा असं मानायला परिस्थितीजन्य पुरावा असल्याचं कोर्टाने नमूद केलं होतं. शशिकला अनुत्तीर्ण असताना तिला कावळ्यांनी उत्तीर्ण केलं हे बेकायदेशीर असून तिला अनुत्तीर्ण ठरवावं असं म्हटलं होतं. तळपदेच्या दुर्दैवाने तोही अनुत्तीर्णच ठरला होता.

"कावळ्यांना शिक्षा काय झाली?" हा प्रश्न जो तो विचारत होता. आपले एचोडी गेले तर त्यांच्या नंतरच्या क्रमांकावर असणाऱ्या प्रोफेसरांची समीकरणं बदलण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती. आपला राज्याभिषेक होईल या आशेनं जोशीबाई धावपळ करायला लागल्या होत्या.

"उद्याच्या पेपरात संपूर्ण निकाल येईल. मग चित्र स्पष्ट होईल" मेहतासरांनी जाहीर केलं.

दुसऱ्या दिवशी चित्र एकदमच स्पष्ट झालं.

गृहमंत्रांनी राजीनामा दिला आणि मुख्यमंत्र्यांनी व पक्षश्रेष्ठींनी तो स्वीकारला. कावळ्यांना काय शिक्षा द्यायची याचा निर्णय कोर्टाने विद्यापीठावर सोपवला. शशिकलाला कोणतीच शिक्षा झाली नाही. बहुधा झाली तेवढी बदनामीच खूप झाली असेल असं कोर्टाला वाटलं असेल. एम्.डी.च्या परीक्षेला तिला परत बसावं लागणार यावर मात्र शिक्कामोर्तब झालं. सरकारने राजीनामा द्यावा अशी जोरदार मागणी विरोधी पक्षाने केली. ती मुख्यमंत्र्यांनी फेटाळून लावली.

तळपदे आणि त्याचा वकील यांचं तोंडभर हसू आणि हवेत उंच धरलेले हात असा फोटो छापून आला. तळपदेला परत परीक्षेला बसावं लागणार असं जरी छापून आलं नाही तरी आम्हाला सर्वांना ते माहित होतं. आम जनतेला ते सांगून सनसनाटी गोष्टीचा विचका करावा असं वर्तमानपत्रांना वाटलं नसावं.

"बिचारे कावळे" मेहतासरांनी खाजगी आवाजात स्टाफरूममध्ये पिल्लू सोडलं. "गृहमंत्र्यांनी त्यांना रहायला फ्लॅट आणि होंडा गाडी द्यायचं कबूल केलं होतं. आता घरही नाही आणि गाडीही नाही."

"त्यांनी घर आणि गाडी सगळं स्वतःच घ्यायचं ठरवलं ते चुकलं" दोशीमॅडम म्हणाल्या. "चार परिक्षकांनी मिळून सगळं वाटून घेतलं असतं आणि मिळून शशिकलाला उत्तीर्ण केलं असतं तर हे सगळं रामायण झालं नसतं."

"पण नीना, सगळे परिक्षक तसे असते तरच ते जमलं असतं ना?" मेहता म्हणाले. "मी त्या उरलेल्या तिघांना चांगलं ओळखतो. सचोटीची माणसं आहेत."

"आणि एक फ्लॅट आणि एक गाडी चौघांमध्ये कशी वाटणार? गृहमंत्र्यांनी प्रत्येकाला एक फ्लॅट आणि एक गाडी दिली असती तर गोष्ट वेगळी होती" जोशीबाई म्हणाल्या. ही कल्पना त्यांना बरीच आवडली होती असं त्यांच्या हसऱ्या चेहऱ्यावरून वाटलं. त्या स्वतः अजून सहकुटुंब नगरपालिकेच्या वसाहतीतच रहात होत्या. कदाचित सहा महिन्यांनी त्यांचा एम्.डी.चा परिक्षक म्हणून नंबर आला असता.

"तू परिक्षक झालीस तर शशिकलाला उत्तीर्ण करू नकोस हो" दोशीमॅडमनी न मागताच सल्ला दिला. "नाहीतर तो तळपदे उद्या तुझ्यावरपण खटला भरायचा." ही कल्पना दोशीमॅडमना बरीच आवडली होती असं त्यांच्या हसऱ्या चेहऱ्यावरून वाटलं. जोशीबाईंनी तोंड वाकडं केलं आणि काहीतरी खडूस बोलायला तोंड उघडलं. पण दोशीमॅडमनी त्यांना बोलू न देता पुढचं वाक्य फेकलं, "कावळेंनंतर तुझाच नंबर ना ग एचोडी म्हणून?"

जोशीबाईंच तोंड लगेच खुललं. आपण आताच काहीतरी खडूस बोलणार होतो ते त्या विसरल्या, आणि तोंडभर हसून म्हणाल्या, "हो, आता बघूया काय होतं ते."

ग्रुहमंत्र्यांनी कावळ्यांना अगदीच वाऱ्यावर सोडलं नाही. भले त्यांना फ्लॅट आणि गाडी दिली नाही, पण शिक्षा मात्र सौम्य होईल याची काळजी घेतली. विद्यापीठाने कावळ्यांवर परिक्षक व्हायला दोन वर्षं बंदी घातली. बस्स. आणखी काही नाही.

नाहीतरी दोन वेळा परिक्षक झाल्यावर इतरांचा नंबर लागत असे, आणि काही काळ परिक्षक न होता घालवावा लागत असे. तसंच हे झालं. नगरपालिकेने त्यांना काहीही शिक्षा केली नाही. या सगळ्या गोष्टी खटल्याचा निर्णय लागून दोन आठवडे झाल्यावर घडल्या. तोवर जनता हे सगळं विसरून गेली होती. जराही प्रसिद्धी न मिळता हे सगळं पार पडलं.

"तुझा चान्स गेला ना ग एचोडी व्हायचा" दोशीमॅडम जोशीबाईंना मोठ्या अनुकंपेने म्हणाल्या. त्यांच्या चेहऱ्यावर मात्र अनुकंपेऐवजी आनंदच दिसत होता. हातातोंडाशी आलेला घास गेला म्हणून जोशीबाई बऱ्याच चरफडल्या. पण त्यामुळे काही होत्याचं नव्हतं झालं नाही.

"तू धीर सोडू नकोस. तू नक्की एचोडी होशील बघ" दोशीमॅडमनी त्यांना आशीर्वाद दिला. आपला पुण्यसंचय फारसा नाही आणि त्यामुळे आपला आशीर्वाद खरा होणार नाही याची त्यांना खात्री असावी. नाहीतर एरवी त्या दोघींमधून विस्तव जात नसे, अशा परिस्थितीत त्यांनी जोशीबाईंना असा आशीर्वाद आपला प्राण गेला तरीही दिला नसता. जोशीबाईंना याची कल्पना असावी. "हूं!" असा आवाज काढून त्या उठून निघून गेल्या.

***

दोशीमॅडमनी आपलं संचित पुण्य पणाला न लावता दिलेला आशीर्वाद खरा होणार नाही हे त्यांना माहीत असलं तरी तो खरा होऊ घातला. ती एक सुरस आणि चमत्कारीक कथाच झाली.

त्याचं काय झालं, इतक्या सगळ्या नाट्यमय घटना घडत असताना सगळी मंडळी कालक्रमण विसरून गेली होती. पण म्हणून कालक्रमण काही थांबलं नव्हतं. तिकडे देसाई जनरलमध्ये एचोडी मोटवानीबाईंचं वय वाढत होतं. त्यांची इच्छा नव्हती तरी ते अठ्ठावन्न झालं. इथे आम्हाला त्या गोष्टीची जाणीव नव्हती पण तिकडे मोटवानीबाई सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या खुर्चीचा उत्तराधिकारी कोण यावर मुख्यालयात खल झाला. खलबतंपण झाली, पण त्यांचा पत्ता आम्हाला बऱ्याच काळाने लागला. घटना मात्र आमच्या समोर एखाद्या पटकथेसारख्या घडल्या.

एका सुप्रभाती जोशीबाईंना मुख्यालयातून एक पत्र आलं. म्हणजे पत्र डीनना आलं, आणि त्याची प्रत जोशीबाईंना आली. त्या पत्रात संबंधित अकंनी डीनना सूचना केली होती की सेवाज्येष्ठतेनुसार जोशीबाई देसाई जनरलमध्ये स्त्रीरोग आणि प्रसूतीशास्त्राच्या एचोडी म्हणून नियुक्त केल्या गेल्या होत्या. तरी डीननी त्यांना तो पदभार स्वीकारण्यासाठी त्वरित मुक्त करावं.

सनसनाटी गोष्टींचा मोसमच राजमातात आलाय असं आम्हाला वाटायला लागलं.

"आता मॅडमचा निरोपसमारंभ केला पाहिजे." नंदिता आणि सीमा अगदी उत्सवप्रिय दिसत होत्या. जोशीबाईंबरोबर त्यांच्या खूप पार्ट्या चालायच्या. आता त्यांना आणखी एका पार्टीसाठी निमित्त मिळालं म्हणून त्या आनंदात होत्या.

"आपण या वेळी चायनीज आणूया हं" सीमा म्हणाली.

"आणि काला जामुन" नंदिता म्हणाली.

"परत दीडशे रुपये काढायचे?" निनाद म्हणाला.
"दीडशेनं काय होणार? मॅडमना साजेसं गिफ्ट नको द्यायला? तीनशे तरी काढावे लागतील" नंदिता म्हणाली.
"त्यापेक्षा आपण त्यांना देसाई जनरलमध्ये जाऊ नका असं सुचवूया" निनाद म्हणाला.
"चल रे, असं कसं सुचवायचं? त्यांच्या करियरचा प्रश्न आहे" नंदिता म्हणाली.
तिथे जोशीबाई समीकरणं बदलण्यात गुंतल्या होत्या.
"अशी मध्येच कशी जाणार मी?" त्यांचा प्रश्न असा होता की त्याचं उत्तर फक्त त्यांनाच बरोबर माहित होतं.
"का? येवढी छान संधी आलीय तर ती हुकवू नकोस" दोशीमॅडमनी पूर्वीच्याच कनवाळूपणे सल्ला दिला. बया इथून गेली तर बरं असं त्यांना मनापासून वाटत असावं.
"सगळं आयुष्य इथे काढलंय. सोडून कसं जायचं?" जोशीबाई म्हणाल्या.
"काय सांगते ग?" दोशीमॅडम म्हणाल्या. "डिग्री मिळेपर्यंत तू भोपाळला होतीस. नंतर इथे नोकरी पकडलीस तेव्हापासून फक्त तू इथे आहेस. नोकरीच करायची तर इथे काय आणि देसाईत काय, एकच."
त्यांचं व्याकरण आणि वाक्याचा अर्थ ह्या गोष्टी बरोबर होत्या, पण 'नोकरी' हा शब्द त्यांनी दोनदा आणि तो सुद्धा अशा आवाजात म्हटला, की आपण पोटाची खळगी भरण्यासाठी चार घरी धुणीभांडी करतो असं जोशीबाईंना वाटावं. वास्तविक धुणीभांडी करणं हे काही कमी दर्जाचं काम नसतं. पण त्याची

दोशी आणि जोशी या दोन्ही बायांना कल्पना नव्हती. त्यामुळे त्यांचे शब्द जोशीबाईंना बोचले.

"असं कसं? राजमाता हे पहिल्या क्रमांकाचं हॉस्पिटल आहे. त्याची सर देसाईला कशी येणार?" त्या उसळून म्हणाल्या. जणू काय राजमाता हॉस्पिटल त्यांनीच सध्याच्या नावारूपाला आणलं होतं.

"पण पदोन्नती मिळतेय ना? पगार पण वाढेल तुझा." पगार या शब्दाला मगासच्यासारखा धुण्याभांड्यांचा वास येत होता.

"काही नाही. प्रोफेसर आणि एचोडीला पगार सारखाच मिळतो" जोशीबाईंचं या विषयावरचं संशोधन व्यवस्थित दिसत होतं.

"बरं निदान अधिकार तरी वाढतील" दोशीमॅडम म्हणाल्या.

"उं! त्यात काय येवढं?" जोशीबाईं म्हणाल्या. वास्तविक अधिकार गाजवण्याची त्यांची हौस प्रचंड होती. पण तसं कबूल करणं त्यांना अवघड वाटत असावं. "त्यातून मुलांच्या शाळा वगैरेची घडी नीट बसलीय ती बिघडायची."

"बदली झाली तर इथलं तुझं घर जाईल अशी भिती वाटतेय का तुला?" दोशीमॅडमनी विचारलं. जोशीबाईंचं एकही छिद्र उघडं न करता त्यांना सोडायचं नाही असा त्यांनी चंग बांधला असावा.

"अं..." वार बरोबर लागला होता.

"बघ. तुझी जागेची अडचण झाली तर मी तुला थोड्या दिवसांकरता दोन खोल्या देईन." दोशीमॅडमच्या वडिलांनी त्यांच्यासाठी अख्खी इमारत ठेवली होती. तिथल्या नोकरांच्या दोन खोल्या त्यांनी बहुधा जोशीबाईंना देऊ केल्या असाव्यात.

"काही नको" असं म्हणून जोशीबाईं फणकाऱ्याने उठून गेल्या.

"अशी काय ती? तिला मदत देऊ केली तर उलट माझ्यावरच उपकार केल्यासारखी वागते" दोशीमॅडमनी मेहतासरांकडे दिलासा शोधण्याचा प्रयत्न केला.
"जाऊ दे ग. तिला जायचं तर ती जाईल" मेहतासरांनी त्यांना सल्ला दिला. जोशीबाईंना खिजवताना दोशीमॅडमना गंमत वाटायची ते मेहतासरांना माहित असावं. आपला सल्ला त्या पाळणार नाहीत हेही त्यांना माहित असावं. केवळ संभाषण करायचं म्हणून त्यांनी तो सल्ला दिला असावा.
"असं कसं करणार? कोणाला मदतीची गरज आहे असं मला दिसलं तर माझ्याच्याने रहावत नाही, तुला माहित आहे."
उत्तरादाखल मेहतासर नुसते हसले.
जोशीबाईंनी हे समीकरण सोडवायला कोणाकोणाची मदत घेतली कोण जाणे. बायको देसाई जनरलला गेली तर वेळेवर घरी यायची नाही, मुलं शाळेत आणि क्लासला जातात की नाही, आणि गेलीच तर वेळेवर परत येतात की नाही हे बघू शकणार नाही हे त्यांच्या नवऱ्याला माहित असायला काही हरकत नव्हती, कारण ते आम्हालाही समजत होतं. स्वतः जोशीबाईं जेवायच्या वेळी घरी जायच्या, कामवाल्या बाईने गरम केलेलं जेवण जेवायच्या, आणि एखादी डुलकी काढून परत यायच्या. त्यांना बदली झाल्यावर रोज डब्यात नेलेलं थंडगार जेवण जेवावं लागलं असतं. एकदा सुखाची चटक लागली की ते सहजासहजी सोडवत नाही. जमलं तर राजमातातच एचोडी व्हायची त्यांची इच्छा असणं साहजिक होतं. या गोष्टी आम्हाला सीमाकडून कळल्या. अशा गोष्टी त्या सीमाकडे उघड करत असत.

***

समीकरणाचा मुख्य भाग होता कावळे. त्यांचा आजार कधीही बळावेल आणि ते राम म्हणतील अशी जोशीबाईंना आशा वाटत होती.

'कावळ्यांना व्यवस्थित उपचार मिळताहेत की नाही कोण जाणे. उद्या त्यांच्या जिवाचं काही बरंवाईट झालं तर त्यांची बायको-पोरं उघड्यावर पडतील' असं त्यांनी अनेक जणांना वेगवेगळ्या वेळी म्हणून झालं होतं. वाक्य तसं दयाबुद्धीचं होतं, पण त्यांच्या चेहऱ्यावर तेव्हा झळकणारं स्मितहास्य काही वेगळच सूचित करत असे. कावळ्यांनी राम म्हटलं असतं तर जोशीबाईं एचोडी झाल्या असत्या. त्यांच्या दुर्दैवाने कावळ्यांना व्यवस्थित उपचार मिळत होते. ते जोशीबाईंना कळलं असतं तर त्यांनी एकतर घरातले देव पाण्यात बुडवून ठेवले असते, नाहीतर समीकरण तरी बदललं असतं. अब्रू गेली म्हणून कावळे राजमाता सोडून जाण्याची शक्यता होती. पण ते काय करणार ते फक्त त्यांनाच माहित होतं. शेवटी बाई त्यांनाच भेटायला गेल्या. बरोबर सोबतीला म्हणून सीमाला घेऊन गेल्या. परत आल्यावर संभाषणाचा आठवेल तेवढा भाग सीमाने आमच्यापर्यंत पोचवला.

"काय सर, तब्येत कशी आहे आता?"

"जरा बरी आहे" क्षीण आवाजात उत्तर आलं.

"कामावर परत कधी येणार?"

"बघू. येवढ्यात जमेल असं वाटत नाही. कदाचित सहा महिनेसुद्धा जातील. खूप गुंतागुंत आहे."

"लवकर बरे व्हा" असं म्हणून बाई निघाल्या. परत येताना त्यांची सीमाबरोबर अधिक विस्तृत चर्चा झाली.

"कावळ्यांना माजी गृहमंत्र्यांच्या मतदारसंघात असलेल्या मेडिकल कॉलेजात नोकरी देणार आहेत असं ऐकलं" बाई म्हणाल्या.

"हो? कोण म्हणालं?"

"अं... डॉक्टरांच्या ओळखीच्या एकाने सांगितलं" बाई नवऱ्याला डॉक्टर म्हणायच्या.

"नक्की का?"

"नक्की. आता कावळे ती जागा स्वीकारतील की नाही ते माहित नाही. पण बरोबर घर सुद्धा मिळालं तर स्वीकारतील."

"मग मॅडम तुम्हीच एचोडी व्हाल."

"पण ही गोष्ट त्यांना लगेच करता येणार नाही म्हणे. सगळ्यांच्या लक्षात येईल."

"हरकत नाही. थोडं थांबायचं" बाईंच्या मनातलं ओळखून ते आपलं मत म्हणून मांडायची हातोटी असल्यामुळे सीमाचं बाईंबरोबर छान पटायचं.

"हूं" बाई विचारमग्न झाल्या.

आणि सखोल विचारांती त्यांनी प्रशासनाला कळवलं की देसाई जनरलमधली पदोन्नती आपल्याला नको.

'आपण ही जागा नाकारलीत तर पुढील दोन वर्षं आपण पदोन्नतीपासून वंचित रहाल' असं प्रशासनाने बाईंना त्वरित कळवलं.

दोन वर्षांनी कावळे माजी गृहमंत्रांची ऑफर स्वीकारून त्यांच्या कॉलेजात जातील आणि आपण एचोडी होऊ. उलट

आज आपण जर देसाई जनरलला गेलो तर कदाचित कधीच परत येऊ शकणार नाही असा विचार करून बाईंनी प्रशासनाला कळवलं की आपल्याला ती अट मंजूर आहे.
बाईंचा लेखी नकार आणि दोन वर्षांच्या बंदीला मंजूरी या दोन गोष्टी मिळताच प्रशासनाने सूत्रं तडकाफडकी हलवली. बाईंचं पत्र गेल्यापासून बरोबर तिसऱ्या दिवशी कावळ्यांची देसाई जनरलच्या एचोडीच्या रिक्त पदावर बदली झाली. कावळे मूळचे देसाई जनरलचे असल्यामुळे आणि आता पाठी शुक्लकाष्ठ लागलेलं असल्यामुळे त्यांनी ती स्वीकारली. राजमातात एचोडीचं पद रिक्त झालं. जोशीबाईंवर दोन वर्षांची बंदी असल्यामुळे ते पद त्यांच्यानंतर सर्वात ज्येष्ठ असलेल्या अहुजामॅडमना मिळालं. त्या कधी कोणाच्या अध्यातमध्यात नसायच्या. त्या एचोडी होतील असं कोणालाच अपेक्षित नव्हतं. कोणीतरी अतिशय बुद्धिमान व्यक्तीने मोठ्या कौशल्याने खेळी खेळून जोशीबाईंवर चेकमेट केली होती.
डोक्यावर आकाश कोसळलेल्या जोशीबाईंना सावरायला दोन दिवस लागले. तेवढ्यात अहुजामॅडमनी एचोडीची सूत्रं हातात घेऊन राज्याचा गाडा हाकायला सुरुवात केली होती.
"अगं, आता तू काय करणार?" दोशीमॅडमनी चाचपणी केली. "तू कोर्टात का नाही जात?"
"हो. मी कोर्टात जाणार आहे" जोशीबाई म्हणाल्या.
"चांगला वकील बघ. केस जिंकायची तर वकील चांगला निवडावा लागतो. थोडा खर्च जास्त होतो. पण केस जिंकण्यापुढे खर्चाचं काय? तुला पाहिजे तर कावळ्यांच्या वकीलाचा नंबर मी देते तुला."

"काही नको" जोशीबाई फणकाऱ्याने म्हणाल्या. नुकतीच एक मोठी केस हरलेल्या वकीलाकडे आपण ही केस हरावं म्हणूनच ही बया आपल्याला पाठवत असणार हे त्यांना त्या अवस्थेतही समजलं. "माझा दीर वकील आहे."

बाईंचा दीर शहाणा होता. त्यांच्या केसमध्ये काही दम नाही हे त्याने स्पष्ट सांगितलं.

"पण हा अन्याय आहे. हे कुरघोडीचं राजकारण आहे. त्यांनी आधीच कावळ्यांची बदली करून मला राजमातात एचोडी करायला हवं होतं."

कुरघोडीच्या राजकारणावर कायद्याने बंदी नसते हे बाईंना जेव्हा समजलं तेव्हा चरफडण्यापलिकडे त्यांच्या हातात काही राहिलं नाही. हे कुरघोडीचं राजकारण कोणी केलं यावर आमच्या डिपार्टमेंटमध्ये बऱ्याच चर्चा झाल्या. पुरावा नसल्यामुळे अमूकच व्यक्तीने हे घडवलं असं कोणी सांगू शकत नव्हतं.

"अहुजा मॅडमनी कमिशनरच्या बायकोचं ऑपरेशन केलं म्हणून त्यांना एचोडी केलं असणार" नंदिता म्हणाली.

"तेवढ्यासाठी कोणी कोणाला एचोडी करत नाही. मला वाटतं इथे नाचक्की झाली म्हणून कावळ्यांनीच बदली मागून घेतली असणार" सीमा म्हणाली. पण त्यांची इच्छा पूर्ण करण्याची इच्छा प्रशासनाला व्हायचं काही कारण नव्हतं.

"मला वाटतं आपल्या डीननीच हे सगळं घडवून आणलंय" निनाद म्हणाला. "जोशीबाईंचा नवरा त्यांना आवडत नाही म्हणे. नगरपालिकेने त्यांना अमेरिकेला शिकायसाठी जायची परवानगी दिली होती. परत आल्यावर दोन वर्षं राजमातात

काम करण्याचं बंधन घातलं होतं. परत आल्यावर त्याने बरोब्बर दोन वर्षं काम केलं आणि नंतर एका दिवसाची नोटीस देऊन राजीनामा दिला. डीन तेव्हा भयंकर संतापले होते. त्यांच्या फंडाचे पैसे त्यांनी अडकवून ठेवले. जोशीबाईंनी नगरपालिकेच्या वसाहतीतलं घर सोडून जावं म्हणून त्यांनी बरेच प्रयत्न केले, कारण राजीनामा देऊनही बाईंचा नवरा डीनच्या नाकावर टिच्चून त्याच घरात रहात होता. आता बाईंची बदली केली की त्यांना घर सोडावं लागेल हे त्यांनी हेरलं असावं. जर त्यांनी बदली नाकारलीच तर त्यांच्या डोक्यावर कनिष्ठ अड्डुजामॅडम आणून ठेवल्या की त्यांना बराच मानसिक त्रास होईल ही त्यांची अटकळ एकदम बरोबर ठरली. जर बायकोला सतत मानसिक त्रास असला तर ती नवऱ्याला सतत दुःखी ठेवेल हे त्यांना सांगायला काही मानसोपचारतज्ज्ञाची गरज नसावी."

"काय सॉलिड थेअरी आहे" राजेश कौतुकाने म्हणाला. "तू एकट्याने हे सर्व शोधून काढलंस?"

"लेको, ह्या सर्व गोष्टी इतिहासात नमूद आहेत. जरा सिनियर माणसांबरोबर बोललं की कोणालाही ही माहिती मिळू शकते. रहाता राहिलं संकलन आणि कार्यकारणभाव शोधणं. तेवढं केलं की थिअरी तयार" निनाद म्हणाला. "डीन एकदम ग्रेट आहेत. एका दगडात किती पक्षी मारले बघा त्यांनी. राजमाता हॉस्पिटलचं नाव खराब केलेल्या कावळ्यांना इथून काढून लावलं. फारशा कार्यक्षम नसलेल्या जोशीबाईंना एचोडी होण्यापासून थांबवलं. जोशीबाईंच्या नवऱ्याला चांगला धडा

शिकवला. अहुजाबाईंना उपकृत करून आपल्या बाजूच्या एचोडींमध्ये भर घातली."

आम्ही सगळ्यांनी कौतुकाने माना डोलावल्या.

"पण नवऱ्याच्या वाईट वागण्याची सजा बायकोला देणं बरं नाही" नंदिता म्हणाली.

"बाई ग, मोठ्या माणसांचं जग हे असंच असतं" निनाद म्हणाला.

***

माझं पहिलं पुस्तक प्रकाशित झालं त्याच्या आनंदाचा भर ओसरल्यावर मला वाटायला लागलं की आपण आणखी लिहावं. एम्.डी.साठी अभ्यास खूप केला होता. टिपणं खूप काढली होती. माझ्या नोट्समधलं थोडसं मटिरियल वापरून माझ्या पहिल्या पुस्तकाने आकार घेतला होता. अजून बरंच काही शिल्लक होतं. त्याबद्दल विचार करताना मला एकदम सुचलं की विद्यार्थ्यांच्या प्रॅक्टिकल परीक्षेसाठी सर्वंकष असं पुस्तक अजून कोणी लिहिलेलं नाही. तसं पुस्तक आपण लिहायचं असं मी मनाशी ठरवलं, आणि त्या कल्पनेने झपाटला गेलो. जोशीबाईंच्या युनिटमध्ये काम करताना रोजची कामं संपली की उरलेला वेळ मी पुस्तकामागे खर्च करत असे. घरी तर मिळणारा सगळाच वेळ त्या कामात जात असे. तीन महिन्यात चांगलं तीन किलो वजनाचं बाड तयार झालं.

"अरे, असं तासाचे तास बसून काय लिहितोयस?" माझ्या आईने मला एकदा विचारलं.

"नवं पुस्तक लिहितोय" मी म्हटलं.

"कशाला? त्या बयेला रेडीमेड द्यायला? काम करायचं तू आणि श्रेय उपटणार ती. काही नको."

"नाही. जोशीबाईंचा या पुस्तकाशी काही संबंध नाहीये. मी एकटाच लेखक आहे" मी म्हटलं.

"मग हरकत नाही. पण असा वाघ पाठी लागल्यासारखा का लिहितोयस? अमुक तारखेपर्यंत काम पूर्ण झालं पाहिजे असं काही आहे का?"

"नाही. तसं काही नाही."

"मग जरा शांतपणे काम कर."

मी तिला हो असं म्हटलं खरं, पण पूर्वीच्याच गतीने काम चालू ठेवलं. उगाच इतर कोणाला ही आयडिया सुचली आणि त्याने आपल्याआधी असं पुस्तक लिहून प्रकाशित केलं तर अशी मला भिती वाटत होती. कोणी तसं काही केलं नाही. पुस्तकाचं हस्तलिखित तयार झालं. आता फक्त प्रकाशक शोधायचा होता. ते कसं करायचं ते मला माहित नव्हतं. मला एकच प्रकाशक माहित होते, ते म्हणजे सावंत. मी त्यांना फोन केला.

"कुठे भेटू, हॉस्पिटलात?" त्यांनी विचारलं.

"नको. माझ्या घरी भेटूया" मी म्हटलं. जोशीबाईंना पत्ता लागू देऊ नकोस असं माझं अंतर्मन मला सांगत होतं. मी अंतर्मन म्हणतो त्याला इतर माणसं कॉमन सेन्स म्हणत असावीत.

ठरल्या वेळी ते मला माझ्या घरी येऊन भेटले.

"नमस्कार डॉक्टरसाहेब."

"या, बसा" मी म्हटलं. त्यांना पाणी दिलं. "धापा टाकताय. तब्येत बरी आहे ना?"

"तब्येत बरी आहे हो. आता वय झालंय. जिने चढवत नाहीत."
"वय? असं कितीसं वय झालंय तुमचं?"
"पंचाहत्तर पूर्ण झाली" ते म्हणाले.
"वाटत नाही हो."
"काय म्हाताऱ्याच्या फिरक्या घेता काय?" ते हसून म्हणाले.
"नाही हो. मी खरंच म्हणतोय. तुमचा काम करण्याचा उरक आणि उत्साह बघून तर तुमचं वय पन्नासच्यावर असेल असं कोणालाही वाटणार नाही." प्रकाशक पटवण्यासाठी मी खरंच तसं म्हणालो नव्हतो.
"ते खरं आहे. मी आतापर्यंत शंभरच्या वर पुस्तकं प्रकाशित केली आहेत. आता वयाप्रमाणे गाडी जरा स्लो झालीय. तुम्ही काय लिहिलंय सांगा बघू."
ते चहा घेत असताना मी त्यांना मी लिहिलेल्या पुस्तकाचं बाड दाखवलं.
"हे सगळं तुम्ही एकट्याने लिहिलंत?" त्यांनी विचारलं.
"हो."
"या हस्तलिखितातलं हस्ताक्षर आणि तुमच्या जोशीमॅडमबरोबरच्या पुस्तकातलं हस्ताक्षर एकच आहे. ते पुस्तक पण तुम्ही एकट्यानेच लिहिलं होतं का?" ग्रुहस्थ वाटायचे तसे खरोखर हुशार दिसत होते.
"हो" मी म्हटलं.
"मग लेखक म्हणून पहिलं नाव असणाऱ्या बाईंनी त्या पुस्तकात काय योगदान दिलं?"
"त्यांनी पुस्तकाचं नाव ठरवलं, त्यांत लिहिण्यासाठी विषय निवडले, टंकलेखनाचे पैसे दिले आणि सगळ्यात महत्त्वाचं

म्हणजे प्रकाशक मिळवला" मी म्हटलं. "पण तुम्ही हस्तलिखित कसं बघितलं? आम्ही तर टंकलिखित पानं दिली होती."

"अहो, बाईना हस्तलिखित स्वतःकडे ठेवून घ्यायचं डोकंसुद्धा नव्हतं. टंकलिखित केलेली पानं आणि हस्तलिखित टायपिस्टकडून ज्या पाकिटात यायची, ते अख्ख पाकिट बाई मला द्यायच्या."

मी मनातल्या मनात जोशीबाईंना हात जोडले. त्यांच्या बावळटपणाचा मला असा फायदा झाला की मी एकट्यानेच सगळं लेखन केलं हे त्या प्रकाशकाला समजलं. नाहीतर त्यांनी माझं पुस्तक घेतलं असतं की नाही कोण जाणे. देव करतो ते भल्यासाठीच, हे नकळत जोशीबाई वारंवार सिद्ध करत होत्या.

"बाई मोठी लबाड दिसते. आव तर असा आणायची की अख्ख पुस्तक तिनेच लिहिलं आणि तुम्हाला फक्त मदतीला घेतलं."

मी गप्प राहिलो. झालं गेलं गंगेला मिळालं. ते उकरून काढण्याचा काही फायदा नव्हता.

"तिला रॉयल्टीचा छदामपण देणार नाही मी" त्यांनी जाहीर केलं.

सावंतांनी जोशीमॅडमचं जोशीबाई केलं त्याचा मला आनंद झाला होता. आता ते बाईंना रॉयल्टीचा छदामपण देणार नाहीत हे कळल्यावर माझा आनंद वृद्धिंगत झाला.

"बरं मला तुमच्या नव्या पुस्तकाबद्दल सांगा" ते म्हणाले.

मी त्यांना लेखी परिक्षा आणि तिच्यासाठी उपलब्ध असणारी पुस्तकं, तोंडी परिक्षा आणि तिच्यासाठी उपलब्ध नसलेली

पुस्तकं, वगैरे समजावून सांगितलं. माझ्या नव्या पुस्तकात असलेल्या सगळ्या गोष्टी उत्साहाने दाखवल्या. दहा मिनिटं झाल्यावर ते कदाचित बोर झाले असतील म्हणुन त्यांना विचारलं,

"तुम्ही बोर तर नाही ना झालात?"

"छे, छे! तुमचा उत्साह बघून मला पण उत्साह आलाय. पण पुस्तक मोठं आहे. मला एकट्याला झेपेल असं वाटत नाही. मी तुम्हाला दोन-चार दिवसात फोन करतो."

दोन दिवसांनी त्यांनी खरोखरच फोन केला. मला थोडं आश्चर्य वाटलं, कारण आजच्या जगात असं म्हणणारी माणसं नंतर फोन करतच नाहीत. आपल्यालाच फोन करावा लागतो. मनात नसलं तर ती फोन घ्यायचं टाळतात. सावंत वचनाचे पक्के दिसत होते.

"आज संध्याकाळी पाच वाजता मी येऊ का? बरोबर आणखी एकाला घेऊन येणार आहे."

"अवश्य या" मी म्हटलं.

पाच वाजता सावंत बरोबर एका मध्यमवयीन ग्रुहस्थाला घेऊन आले. मी त्यांना पाणी वगैरे दिल्यावर ते मुद्द्याकडे वळले.

"हे गाला. मेडिकलची पुस्तकं विकतात. त्यांना आता प्रकाशक व्हायचं आहे." म्हणजे सिनेनट-नट्या निर्माते किंवा दिग्दर्शक होतात त्यातलाच हा प्रकार दिसत होता. "आणि हे डॉक्टर पाटील. यांचं पुस्तक आपल्याला प्रकाशित करायचंय." सावंत एकमेकांची गरज असणाऱ्या दोन व्यक्तींना एकत्र आणत होते असं दिसत होतं.

गालांनी मला पाहून तोंडभर हास्य केलं आणि हात जोडले. मी पण हात जोडले. मला वाटतं हास्य करणं मला जमलं नसावं कारण ज्याने अजूनपर्यंत एकही पुस्तक प्रकाशित केलेलं नाही त्याच्या हातात आपलं पुस्तक सोपवायचं हे अवघड काम वाटत होतं. आयुष्यात पहिलंच ऑपरेशन करणाऱ्या डॉक्टरकडून आपलं ऑपरेशन करून घेणाऱ्या पेशंटला वाटावं तसं मला वाटत होतं.

"त्यांना आपलं पुस्तक दाखवा" सावंत म्हणाले.

मी तीन किलोचं बाड गालांच्या हातात दिलं. त्यांनी ते सहज पेललं. मेडिकलची जडजड पुस्तकं हाताळण्याची सवय असलेल्या गालांना ते तीन किलो म्हणजे किस झाडकी पत्ती वाटली असावी. व्यवस्थित बांधलेलं ते बाड त्यांनी बाहेरूनच पाहिलं आणि समोरच्या टेबलावर ठेवलं.

"तुम्हाला दिली ती पुस्तकाची माहिती त्यांनापण देऊ का?" मी विचारलं.

"नको, नको" सावंत म्हणाले. "मी दिलीय तेवढी माहिती त्यांना पुरेशी आहे. मी त्यांना मार्गदर्शन करीन आणि ते तुमचं पुस्तक प्रकाशित करतील."

जे पुस्तक आपण हातात घेतोय ते हिरा आहे की काचेचा तुकडा आहे हे ज्याला माहित नाहीये तो माणूस आपलं पुस्तक केवळ सावंतांच्या शब्दावर विसंबून प्रकाशित करणार आहे, ही मोठी आश्चर्याची गोष्ट होती. ते गेल्यावर मी आईला तसं म्हटलं.

"अरे, तो माणुस पुस्तकं विकतो ना, मग त्याने तुझं पहिलं पुस्तक विकलं असणार" ती म्हणाली.

"हो. ते सावंतांचं पुस्तक. तो त्यांचाच पुस्तकविक्रेता. त्याने ते नक्कीच विकलं असणार. ते चांगलं खपतंय असं ऐकतो."
"आणि सावंतांनी त्याला सांगितलं असणार की ते तू एकट्यानेच लिहिलं आहे" ती म्हणाली.
"हं. आता माझ्या लक्षात आलं" मी म्हटलं.
तर माझं स्वतंत्र पुस्तक मार्गी लागलं. त्याची पृफं तपासायला येऊ लागली. प्रकाशनाच्या युक्त्या मी शिकू लागलो. वेळ आनंदात चालला होता. निर्मितीचा आनंद काही औरच असतो. तर अशा आनंदात मी असताना असोशिएट प्रोफेसरच्या दोन जागा भरण्यासाठी नगरपालिकेची जाहिरात आली. राजमातात दोन रिक्त जागा होत्या. त्यातली एक आपल्याला मिळावी अशी माझी खूप दिवसांपासूनची इच्छा होती. आता ती पूर्ण होण्याची आशा दिसू लागली.

***

"काय विजय, अप्रोच्या जागेसाठी अर्ज करतोयस का?" राजेश म्हणाला.
"हो" मी म्हटलं. "तू पण करत असशील ना?"
"हो, करतोय. फारशी आशा नाहीये, कारण आपल्याहून सिनियर बरीच जणं रांगेत आहेत. पण अर्ज करायला काय हरकत आहे?"
"सगळेच जण करत असतील" मी म्हटलं, "निनाद, नंदिता, सीमा, सुचेता..."
"बहुतेक."

बढती कोणाला नको असते? आपण त्या जागेला योग्य आहोत का नाही याचा विचार करायचं काही कारण नसतं. प्रयत्न करायचा. नशीबाने हात दिला तर आनंद आहे. नाही दिला तर हातातली नोकरी कुठे जात नाही. निवडणूकीला उभं रहाताना सरकारी नोकरी सोडावी लागते. निवडणूकीत हरलं तर नोकरीही नाही आणि जे काय नगरसेवकपद, आमदारकी किंवा खासदारकी मिळवायची असते तीही मिळत नाही. इथं तसं काही नसल्यामुळे किमान आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि अनुभव या दोन गोष्टी असणारी सगळी मंडळी अर्ज करायची. बाहेरगावातून शहरात येऊन स्थायिक होण्याची इच्छा असणारी मंडळीही अर्ज करायची. जोशीबाई आणि त्यांचा नवरा याच पद्धतीने राजमातात येऊन चिकटले होते. अर्थात आरेमोंचा संप तोडून त्यांनी नोकरी मिळवली होती. मला माझ्या मेरिटवरच निवडून यायचं होतं. पण बाहेरगावचे राजकीय वरदहस्त असणारे कोणी न येवोत अशी मात्र मी देवाची प्रार्थना करत होतो. वास्तविक माझी लेक्चरर म्हणून दोनच वर्षं झाली होती. पाच पाच वर्षं रखडलेले लेक्चररही अर्ज भरत होते. पण आपली गुणवत्ता आपल्याला हात देईल अशा आशेवर मी होतो. इंटरव्ह्यूत माझे पाय खेचायला कावळे नव्हते. चित्र आशादाई दिसत होतं.

"विजय, सुचेता अकंची भाची आहे" निनाद म्हणाला.

"माहित आहे. तिला राजमातात येता यावं म्हणून तर मला चिंपोलीला जावं लागलं होतं. तिला कसा विसरेन मी?"

"तिला आता अप्रो व्हायचं आहे म्हणे."

"तिला ढीग व्हायचं असेल. तिची निवड व्हायला हवी ना" मी म्हटलं.

"तिचे मामा आता सचिवालयात सेक्रेटरी आहेत. सरकारी यंत्रणाच आपले इंटरव्ह्यू घेणार आहे. तिथे त्यांचा वशिला चालेल ना?"

ही चिंता करण्यासारखी गोष्ट होती. राजकीय वजनानंतर सरकारदरबारचं वजन हा नोकरी मिळवण्याचा हुकुमाचा एक्का होता. जर सुचेता तो परत वापरणार होती तर आमचं काही खरं नव्हतं.

"मामांच्या ओळखीने तिची कुठल्याशा मासिकात मुलाखत छापून येणार आहे म्हणे."

"काय सांगतोस काय?"

"आत्ता आपल्या स्टाफरूममध्ये मुलाखत घेताहेत."

"चल, गंमत बघायला जाऊया" मी म्हटलं.

"हो, चल."

आम्ही लगबगीने स्टाफरूममध्ये गेलो. येवढी फुकटची गंमत बघायला मिळतेय आणि आपण तिथे नाही असं कसं चालेल, असं आमचं रास्त म्हणणं होतं. आम्ही पोचलो तेव्हा मुलाखत सुरू झालेली होती. एक चटपटीत दिसणारी मुलगी मुलाखत घेत होती. ध्वनी मुद्रण एका छोट्या टेपरेकॉर्डरवर सुरू होतं.

"डॉक्टर सुचेता, तुम्ही डॉक्टर का झालात?"

"अं... बाबा म्हणाले म्हणून झाले."

हे उत्तर मुलाखतीत फारसं चांगलं वाटत नव्हतं. पण सुचेताला सफाईने खोटं बोलणं जमत नसे. चांगला नवरा मिळवण्यासाठी तिच्या बाबांनी तिला डॉक्टरकीला पाठवलं होतं हे ती एका

भावनिक क्षणी जोशीबाईंना सांगताना मी ऐकलं होत. चोरून नव्हे हो. सुचेता बोलायला लागली की तिच्या आवाजाच्या जादूमुळे म्हणा किंवा इतरांचा आवाज लुप्त करून टाकण्याच्या तिच्या हातोटीमुळे म्हणा, आसपासच्या सगळ्यांना तिचं बोलणं अगदी व्यवस्थित ऐकू येत असे.

"पण आपण स्त्रीरोतज्ज्ञच का झालात?"

"संजूची आवड म्हणून" सुचेताने खरंखुरं उत्तर दिलं. तिची इंटर्नशिप सुरू असताना संजू इंग्लंडमधून लग्न करण्यासाठी भारतात आला. त्याचं एफ्.आर्.सी.एस्.चं शिक्षण चालू होतं. ते संपलं की तो भारतात येऊन त्याच्या बाबांचं नर्सिंगहोम चालवणार होता. स्वतः सर्जन आणि बायको स्त्रीरोतज्ज्ञ असणं प्रॅक्टीसच्या दृष्टीने चांगलं असं त्याचं मत होतं. त्याने ही अट घातली आणि सुचेताने हो म्हटलं.

"तुम्ही लंडनला होता ना?"

"हो. लग्नानंतर एक वर्ष मी तिथे अनुभव घेतला" सुचेता म्हणाली. खरं तर तिला एम्.आर्.सी.ओ.जी. करायचं होतं. पण जंग जंग पछाडलं तरी तिला एम्.आर्.सी.ओ.जी.ला प्रवेशच मिळाला नाही. त्यामुळे एक वर्षभर तिने ग्रुहिणीचं काम केल्यावर संजूने तिला परत पाठवून दिलं. तिने वर्षभर आरेमोचं काम कुठच्यातरी लहानशा हॉस्पिटलात केलं. लंडनला वर्षभर आराम केलेला असल्यामुळे तिला आरेमोचं काम झेपेना. त्या काळी एम्.डी.च्या परीक्षेला बसण्यासाठी एक वर्षाचा अनुभव पुरत असे. फक्त त्यानंतर दोन वर्षांनीच परीक्षेला बसता येत असे. सुचेता लंडनला परत गेली.

"इथं शिकण्यासारखं होतं ते मी एक वर्ष आरेमो होते तेव्हा शिकले. मग पुढील अनुभवासाठी मी लंडनला परत गेले" ती म्हणाली.

ते खरं होतं. त्या दोन वर्षांत तिने प्रसूतीशास्त्राचा जातीने अनुभव घेतला. परत येताना उभयता एक मुलगा आणि एक मुलगी, अशी दोन गुतगुटीत बाळं घेऊनच आले.

"त्या दोन वर्षांच्या अनुभवाचा मला खूपच फायदा झाला" ती म्हणाली.

परीक्षेत मेंदूच्या पांढऱ्या पेशींपेक्षा त्वचेच्या गोऱ्या पेशींमुळे ती उत्तीर्ण झाली असं जाणकार म्हणत. आता बोलणाऱ्यांची तोंडं कोण धरणार हो? सुचेताने त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं. पण तिने केलं म्हणून संजूला तसं करता येईना. तिने लंडनमध्ये घेतलेला अनुभव आपलं नर्सिंगहोम चालवायला कामाचा नाही हे त्याच्या लवकरच लक्षात आलं. 'सुचेता, तू नगरपालिकेच्या हॉस्पिटलात लेक्चरर हो, ऑपरेशनं करण्याचा अनुभव घे आणि मगच आपल्या नर्सिंगहोममधल्या पेशंटांना हात लाव' असं त्याने तिला निक्षून सांगितलं. सुचेता रडली, भेकली, पण काही उपयोग झाला नाही. शेवटी तिच्या मामांनी शब्द टाकला आणि ती राजमातात लेक्चरर झाली. मेहनत करून नाकासमोर चालणाऱ्या माझ्याआधी अशा विचित्र चालीने चालणारी सुचेता राजमातात पोचली. आणि आता तर तिला माझ्यापुढे जायचं होतं. नवऱ्याचं नर्सिंगहोमपण चालवायचं आणि इथला पगारपण चालू ठेवायचा असा प्लान होता.

माझ्या डोक्यात अशा विचारांचा कल्लोळ सुरू असताना तिचा इंटरव्ह्यू कधी संपला ते मला कळलंच नाही. सिनेमाचा शो

संपल्यावर सगळे बाहेर पडतात तसे इंटरव्ह्यूनंतर सगळे बाहेर पडले तेव्हा मी भानावर आलो आणि बाहेर पडलो.

***

मी गायनॅक ऑपरेशन थिएटरसमोरून जात होतो.

"विजय, जरा ओटीत ये रे" आमच्या गायनॅक ऑपरेशन थिएटरच्या अॅनास्थेटिस्ट मला रस्त्यात थांबवून म्हणाल्या. त्यांचा काळजीचा सूर ऐकून मी पटकन त्यांच्या मागून ओटीत गेलो. "सुचेता अॅब्डॉमिनल हिस्टरेक्टोमी करतेय. तिने पोट उघडलंय, आणि पुढे तिला काही करताच येत नाहीये. तू जरा बघ" त्या हलक्या आवाजात म्हणाल्या.

मी कॅप-मास्क लावलं आणि ओटी नंबर दोनमध्ये शिरलो. सुचेता एका बाईच्या उघडलेल्या पोटासमोर खरोखरच नुसती उभी होती. सुचेताचे दोन असिस्टंट्स आणि ज्युनियर अॅनास्थेटिस्ट गोंधळून गेलेले दिसत होते. नर्स समोरच्या भिंतीकडे बघत उभी होती.

"काय सुचेता, काय चाललंय?" मी म्हटलं.

मी तिथे गेलेलो तिला आवडलं नाही असं दिसलं.

"फायब्रॉइड युटेरस आहे. मी अॅब्डॉमिनल हिस्टरेक्टोमी करतेय" ती अनिच्छेने म्हणाली.

केस एकदम सरळ आणि सोपी दिसत होती. माझ्या रजिस्ट्रारनेसुद्धा एकट्याने ती केली असती. सुचेता का थांबली होती देव जाणे.

"नाही म्हणजे तू काही करताना दिसत नाहीस म्हणून विचारलं" मी म्हटलं.

"सिस्टर मॉप द्या" सुचेताने नर्सकडून मॉप मागून घेतला. तिने अजून काही कापलंच नव्हतं, त्यामुळे पुसायला कुठे रक्तच नव्हतं. तरीपण तिने मॉपने रक्त पुसल्यासारखं केलं. तोपर्यंत मी जाईन असं तिला वाटलं असावं. पण तसं झालं नाही. मी बघतच राहिलोय असं पाहिल्यावर तिने मॉप परत दिला आणि म्हणाली, "सिस्टर आर्टरी द्या."

सिस्टरने तिला आर्टरी फोर्सेप्स दिला. उघडलेल्या एखाद्या रक्तवाहिनीला तो लावण्यासाठी तिने उघडलेल्या पोटात कुठे रक्तस्त्राव होतोय का हे पाहिलं. तिच्या दुर्दैवाने पण पेशंटच्या सुदैवाने कुठेही रक्तस्त्राव होत नव्हता. तिने त्या फायब्रॉइडवर आर्टरी फोर्सेप्स लावायचा पवित्रा घेतला. मी चुकून 'अं?' असं म्हटलं. तिने तो फोर्सेप्स परत खाली ठेवून दिला. मी तरीही निघून जात नाही असं बघून तिने शेवटी म्हटलं, "मला तुझी मदत नकोय. मी अहुजामॅडमना बोलावणं पाठवलं आहे. आपण येतो असं त्या म्हणाल्यायत."

तिने मदत मागितली असती तर मी खरोखरच मदत करणार होतो, कारण ती बिचारी पेशंट ऑपरेशन होऊन सुरक्षितपणे परत जाणं महत्त्वाचं होतं. पण तिने असं म्हटल्यावर माझी सटकली.

"पण मी तुला मदत करायला आलोच नाहीये मुळी. मी गंमत बघायला आलोय" मी म्हटलं.

तिला ते खरं वाटलं असावं, कारण तिने राजमातातली माझी जागा पटकावल्यापासून माझा तिच्यावर खुन्नस आहे असं तिला वाटत असे.

"अगं असं उभं राहून तुझे पाय दुखतील ना. मॅडम येईपर्यंत बसून घे. सर्व्हंटला सांगू का तुला स्टूल द्यायला?" मी कनवाळू आवाजात म्हटलं.
"काही नको" ती फणकारली. आपण नुसतेच उभे आहोत असं मला वाटू नये म्हणून तिने म्हटलं, "सिस्टर, क्लँप द्या."
सिस्टरने तिला क्लँप दिला. पोट उघडल्यावर एकामागून एक क्लँप लावून युटेरस काढायचं असतं. बहुधा अहुजामॅडम आल्यावर त्यांच्या मार्गदर्शनाखाली तिला क्लँप लावायला सुरुवात करावयाची होती असणार. सुचेताने जिवाचा धडा करून पहिला क्लँप लावायला घेतला. पण ज्या पद्धतीने तो धरायचा असतो त्याच्या बरोबर उलट्या दिशेला धरून तिने तो लावायला घेतला होता. गर्भपिशवीच्या आजूबाजूच्या एखाद्या महत्त्वाच्या भागावर ती क्लँप लावून टाकेल अशी मला भिती वाटायला लागली. मला रहावेना. मी म्हटलं,
"तुमच्या युनिटमध्ये तुम्ही असा धरून क्लँप लावता का? आम्ही सामान्य माणसं तो उलटा धरतो."
विजेचा झटका बसल्यासारखा तिने तो क्लँप खाली टाकला.
"विजय, तू आता जा. तू आणखी काही बोललास तर तिच्या मेंदूतली एखादी शीर फुटेल" ॲनास्थेटिस्ट मॅडम मला हळू आवाजात म्हणाल्या. मी निघालो. उगाच संजूला बायको आणि त्या दोन निष्पाप पोरांना आई नाही असं व्हायचं आणि त्याचं पाप मला लागायचं.

***

स्त्रियांच्या मासिकातल्या तिच्या मुलाखतीमुळे तिच्याकडे उपचारांसाठी येणाऱ्या स्त्रियांची संख्या एकदम वाढली. ओपीडीचा सर्व्हंट धनकू खरं तर आपले नातेवाईक उपचारांसाठी नेहमी माझ्याकडे आणायचा. त्या दिवशी मात्र तो आपल्या बहिणीला घेऊन सुचेताकडे गेला. तिला दोन महिन्यांचा गर्भ पाडून हवा होता. सुचेताने तिला दोन दिवसांनी बोलावलं. ऑपरेशन झालं तेव्हा मी हजर नव्हतो, पण संध्याकाळी ती बाई घरी गेली त्या अर्थी सर्व काही सुरळीतपणे पार पडलं असावं असं मी धरून चाललो. दोन तीन महिने गेले आणि एक दिवस धनकू माझ्याकडे आला.

"साहेब, जरा माझ्या बहिणीला बघा. सुचेतामॅडम म्हणतात की तिच्या पोटात ट्यूमर झालाय आणि तिचं पोट उघडून ऑपरेशन करायला हवं."

'मग घे करून' असं म्हणायचं माझ्या मनात होतं, पण एका पेशंटच्या बाबतीत असा निर्दयपणा करणं मला जमलं नाही. मी तिला तपासलं.

"धनकू, तिच्या पोटात साडेचार महिन्यांचा गर्भ आहे" मी म्हटलं.

"साहेब, असं कसं होईल? आताच तर सुचेता मॅडमनी तिचा गर्भपात करून दिला ना? त्या गोष्टीला आता दोन-अडीच महिनेच झालेत."

"धनकू, तुझ्या भाच्याची आयुष्यरेषा मोठी बळकट दिसतेय. मॅडमनी गर्भपात केला खरा, पण तो झालाच नाहीये."

"साहेब, काही करा पण तिला मोकळी करा हो. तिचं पहिलं पोर अवघ्या नऊ महिन्यांचं आहे" तो म्हणाला.

मला तिची दया आली. मी तिला वॉर्डात ॲडमिट केलं. तिचा गर्भपात पार पाडला. तिला घरी पाठवण्यापूर्वी एकदा तपासावं म्हणून वॉर्डात गेलो, तेव्हा स्वतःच्या एका पेशंटला तपासण्यासाठी सुचेता तिथे आलेली मला दिसली.

"सुचेता, आपल्या ओपीडीच्या धनकूच्या बहिणीला पोटात ट्यूमर झाला म्हणून तू तिचं ऑपरेशन करणार होतीस ना?" मी विचारलं.

"अरे, हो. पण ती ऑपरेशनसाठी आलीच नाही" सुचेता म्हणाली.

"तेच तुला सांगायचं होतं. तिने तो ट्यूमर प्रसूतीमार्गातून बाहेर टाकला. तुला दाखवायसाठी ठेवलाय."

"प्रसूतीमार्गातून? असं कसं शक्य आहे?" असं म्हणत ती पुढे आली.

"हा बघ" असं म्हणून मी तिला तो किडनी ट्रेमध्ये ठेवलेला साडेचार महिन्यांचा गर्भ दाखवला. हात, पाय, डोकं वगैरे सर्व काही स्पष्ट दिसणाऱ्या त्या गर्भाकडे ती डोळे फाडून बघतच राहिली.

"तू काढून टाकल्यावरही दोन महिन्यांत तो येवढा वाढला म्हणजे तो साधासुधा ट्यूमर नसून कॅन्सर असावा, नाही? मला वाटतं एखाद्या जर्नलमध्ये नाहीतर मासिकात त्यावर लेख छापून आणायला हरकत नाही" मी म्हटलं.

काहीही न बोलता सुचेता वळली आणि वॉर्डातून निघून गेली. दुसऱ्या दिवसापासून ती रजेवर गेली आणि त्याच महिनाअखेरीस तिने राजीनामा दिला. राजमाता सोडून ती

संजूचं नर्सिंगहोम चालवायला लागली. बहुधा मिळाला तेवढा अनुभव तिला खूप झाला असावा.

***

"काय रे विजय, तू सुचेताला काय बोललास म्हणून ती नोकरी सोडून गेली?" जोशीबाईंनी मला विचारलं.

"मी बोलल्यामुळे तिने नोकरी सोडायला मी काय एचोडी आहे का मॅडम?" मी विचारलं. “कोण म्हणालं असं?"

"असंच ऐकलं" बाई आपला माहितीचा स्रोत उघड करायला तयार नव्हत्या.

"लोक काहीही बोलतात हो" मी म्हटलं. "आपण ऐकायचं आणि सोडून द्यायचं."

"असं कसं? डिपार्टमेंटमधल्या लोकांनी एकमेकांना काही बोलायचं नाही."

"ते बरोबर म्हणा. पण मी तिला लागेल असं काही बोलल्याचं आठवत नाही. तिची लेखी तक्रार आली आहे का?"

"अं...नाही. काहीतरी अॅबॉर्शन केसबद्दल बोलत होती."

"अच्छा अच्छा. ते होय? तिने एका पेशंटचं दोन महिन्यांचं अॅबॉर्शन केलं होतं, पण ते झालंच नव्हतं. शेवटी तो गर्भ चार महिन्यांचा झाल्यावर ती पेशंट माझ्याकडे आली. मी तिचा गर्भपात करून दिला. तो गर्भ मी सुचेताला दाखवला."

"असं कसं केलंस तू?"

"तिला तो गर्भ नको होता. एकदा तिने प्रयत्न केला पण गर्भपात झाला नाही. मग परत गर्भपात नको का करायला?"

"नाही. म्हणजे सुचेताला का दाखवलास?"

"तो गर्भ नसून ट्यूमर आहे आणि तो ऑपरेशन करून काढायला पाहिजे असं ती पेशंटला म्हणाली. म्हटलं दाखवूया. काही चुकलं का? पुढच्या वेळी नाही दाखवणार" मी म्हटलं.

"हूं" बाई म्हणाल्या.

"अहो, असं होतं कधी कधी याची मला कल्पना आहे. एवढंच काय, कधी कधी गर्भ असतानाच पेशंटला न तपासताच काही नाही असं काही डॉक्टर सांगतात आणि गर्भ आपला वाढतच रहातो. मग चांगला चार एक महिन्यांचा झाला की तो हाताला लागायला लागतो आणि दुसऱ्या तिमाहीच्या पद्धतीने पाडावा लागतो. हल्लीच अशी एक केस झाली होती."

बाई चपापल्या, पण काही बोलल्या नाहीत.

"मी त्या केसबद्दलही बोललो असेन. नक्की आठवत नाही. पण म्हणून काही कोणी नोकरी सोडून गेलं नाही."

मी लॅबोरेटरीच्या निशाबाईंचा जोशीबाईंनी गोंधळ घातला होता त्याबद्दल बोलत होतो हे त्यांना समजलं. त्यांनी माझ्याकडे रोखून पाहिलं. माझा चेहरा निर्विकार राहिला की नाही माहित नाही.

"मी बोलून असलं काही होणं शक्यच नाही. नाहीतर पहिल्या क्रमांकाच्या मला चिंपोलीला टाकून शेवटच्या क्रमांकाच्या सुचेताला इथे आणलं तेव्हा माझ्या बोलण्यामुळे ती सोडून गेली नसती का?"

बाई गप्प झाल्या. टोचणारं सत्य बाहेर कढलं की त्या गप्प व्हायच्या. बाई एचोडी नसताना अशा वागताहेत. जर एचोडी असत्या तर काय काय केलं असतं असं माझ्या मनात आलं. मी अप्रो झालो तर ही कटकट कमी होईल असंही मनात

आलं. आपला उत्कर्ष होण्यासाठी  अप्रो व्हायचं हे माझं उद्दिष्ट होतं. पण बाईंच्या त्रासातून सुटका करून घेणं हे त्यासाठी आणखी एक कारण मिळालं. इंटरव्ह्यू कसे द्यावे असं एखादं पुस्तक वाचायला पुरेसा वेळ नव्हता, नाहीतर मी ते पण केलं असतं. आपण जसे आहोत तसंच जायचं आणि मनाला योग्य वाटतील ती उत्तरं द्यायची अशी माझी जुनी व्यूहरचना आतापर्यंत मला उपयोगी पडली होती. आता पण तीच वापरायची असं मी ठरवलं.

***

अप्रोचे इंटरव्ह्यू सरकारी हॉस्पिटलात झाले. तिथे ओळखीचं असं कोणीच नव्हतं. सुदैवाने खूप ओळखी असणारा कोणी उमेदवारही नव्हता. डॉक्टर फडके नावाचे ऑनररी डॉक्टर विषयाचे तज्ज्ञ म्हणून आले होते. स्वभावाने उमदे वाटले. त्यांनी मला दोन निवडक प्रश्न विचारले. माझी उत्तरं त्यांना बहुतेक आवडली असं मला वाटलं. माझं प्रकाशित झालेलं पुस्तक त्यांनी नीट पाहिलं. माझ्या नव्या पुस्तकाची पृफं बघितली. विद्यार्थ्यांना परिक्षेत ओळखायला सोपी पडावी म्हणून मी काढलेले इंस्ट्रुमेंट्स, स्पेसिमेन्स, एक्स.रे., अल्ट्रासोनोग्राफी वगैरेचे डायग्राम बघून ते खूश होऊन हसले.
"विद्यार्थ्यांना अभ्यास करणं अगदी सोपं करून टाकायचं ठरवलेलं दिसतंय आपण" ते म्हणाले.
"सर, मला अभ्यास करताना दहा ठिकाणी जाऊन माहिती गोळा करावी लागली होती. त्यांना ती एका ठिकाणी मिळाली तर त्यांचा वेळ आणि श्रम वाचतील, जे इतर काही

शिकण्यासाठी त्यांच्या कामाला येतील असं मला वाटतं. म्हणून मी हे पुस्तक लिहितोय."

"छान. पण तुम्ही फक्त संकलित केलेली माहिती त्यात घातलीय की तुमची स्वतःची निरक्षणं पण घातलीयत?"

"सर, नव्वद टक्के संकलन आणि दहा टक्के माझं स्वतःचं ज्ञान असं त्या पुस्तकात आहे" मी प्रांजळपणे सांगितलं.

ते हसले आणि म्हणाले, "ठीक आहे. तुम्हाला तुमच्या पुस्तकासाठी बेस्ट ऑफ लक. या तुम्ही."

महिन्याभराने इंटरव्ह्यूचा निकाल जाहीर झाला. माझी निवड झालीय असं पत्र मला लोकसेवा आयोगाकडून घरच्या पत्त्यावर आलं. मनावरचं मोठंच दडपण गेलं.

मला माहित होतं ते पद तुला मिळणार ते" माझी आई गहिवरल्या आवाजात म्हणाली. मुलगा खूप श्रम करतो आणि म्हणून त्याला यश मिळालं पाहिजे असं तिला वाटत असे. "सिद्धीविनायकाच्या दर्शनाला जाऊन मगच हॉस्पिटलात जा रे बाबा."

"हो तर" मी म्हटलं.

सिद्धीविनायकाचं दर्शन घेऊन मी हॉस्पिटलात पोचलो. ऑफिसात गेलो.

"अभिनंदन" सावंतानी माझा हात पकडून हलवला. "रिझल्ट आलाय. तुम्ही पाहिला का?"

"हो. माझ्या घरी पत्र आलं" मी त्यांना माझं पत्र दाखवलं.

"ते नव्हे हो. ते फक्त तुमच्या निवडीचं पत्र आहे. आमच्याकडे संपूर्ण निकाल आलाय. बघा."

मी निकाल बघितला आणि चाट पडलो. पाच जणांची निवड झाली होती. त्यात माझं नाव पहिलं होतं. मोटवानींची माझ्या परिक्षेच्या वेळची लेक्चरर निशा हलाल दुसरी होती. आमच्याकडे असणारे वीरकर तिसरे होते. निशा आणि वीरकर दोघेही नगरपालिकेत टेंपररी अप्रोच्या पोस्टवर होते. मी त्यांच्या पुढे गेलो म्हणून ते माझ्यावर खसकतील असं माझ्या मनात आलं.

"तुमचा नंबर पहिला आहे. राजमातातली जागा तुम्हाला मिळणार" सावंत म्हणाले. "मी ऑफिस ऑर्डर काढून डीनच्या सहीला टाकतो. दुपारी येऊन घेऊन जा. आजपासून तुम्ही अप्रो."

"कॉन्ग्रॅट्स, मॅन" माझ्या पाठीवर थाप मारून निनाद म्हणाला. मला वाटतं थाप जरा नेहमीपेक्षा जोरातच पडली.

"तुला पण कॉन्ग्रॅट्स" मी म्हटलं. मला पण त्याच्या पाठीवर तशीच जोरदार थाप मारायची होती. पण त्याचा उभं रहाण्याचा अँगल थाप मारण्यासाठी योग्य नव्हता. "तुलासुद्धा पोस्ट मिळाली ना?"

"होय" तो म्हणाला. "थँक्स."

"काय यार, पार्टी केव्हा देतोयस बोल" राजेश म्हणाला. "कँटीनमध्ये नाही चालणार हां. बाहेर पाहिजे."

"होय, होय, देणार ना" मी म्हटलं.

एकामागून एक मित्रमंडळींनी माझं अभिनंदन केलं. जोशीबाईंनी तोंड वाकडं करून कसंनुसं हसल्यासारखं केलं. सुषमा आणि सीमा साधारण जोशीबाईंच्या धाकट्या बहिणींसारख्या वागल्या. साधारणपणे आपले मित्र कोण, असूया

वाटणारे कोण आणि शत्रू कोण याचा मला अंदाज होताच. आता पुरावा मिळाला येवढंच.

"बॉस, आता तुला तुझं स्वतःचं युनिट मिळेल ना?" निनादने विचारलं.

माझं स्वतःचं युनिट? वर्षानुवर्षं झगडा केल्यावर जोशीबाईंना मिळालं होतं तसं युनिट मला येवढ्यात?

"माझं स्वतःचं युनिट?" मी म्हटलं.

"अर्थात. कावळ्यांची बदली झाली त्यानंतर ती जागा रिक्तच आहे. त्यांचं युनिट स्वतःच्या युनिटबरोबर अहुजा मॅडमच संभाळताहेत. युनिटचा मुख्य होण्यासाठी कमीत कमी अप्रो असणं आवश्यक असतं. आता ते युनिट तुला मिळेल."

"अहुजामॅडम ते युनिट सहजासहजी सोडायच्या नाहीत. आता त्यांना ऑपरेशनं करायला दुप्पट पेशंट मिळताहेत." निनादने भाकीत केलं.

"विजय मिळवणार ते" राजेश म्हणाला. "तो कावळ्यांना पुरून उरला. अहुजामॅडम कावळ्यांपुढे काहीच नाहीत."

मला स्वतःचं युनिट मिळण्याची कल्पना फारच आवडली. मी अहुजामॅडमना जाऊन भेटलो.

"मॅडम, मला अप्रोची जागा मिळाली. आता आपल्याकडे एका युनिटला कोणी मुख्य नाही. ते तुम्हालाच संभाळावं लागतंय. ते युनिट मला मिळालं म्हणजे तुमचा भार पण हलका होईल."

अहुजामॅडम अवाक झाल्या. आठवड्याला दोनाऐवजी चार वेळा त्यांना ओटी मिळत होती आणि इतरांच्या दुप्पट पेशंट

मिळत होते, ते मी थांबवू पहातोय हे मला वाटतं त्यांना अजिबात रुचलं नाही.

"ते जमणार नाही" त्यांनी जाहीर केलं.

"पण मॅडम..."

"तुम्ही अजून खूप लहान आहात. येवढ्यात तुम्हाला युनिट देता येणार नाही."

खरं तर अहुजामॅडमबरोबर माझे संबंध चांगले होते. त्यांनी असं म्हटलं हे मला काही बरं वाटलं नाही. कदाचित हातात दोन युनिटं असताना केवळ कालच्या पोराबरोबरचे संबंध चांगले ठेवण्यासाठी म्हणून त्यांतलं एक युनिट देऊन टाकणं त्यांना परवडलं नसेल. एरवी अहुजामॅडम इतर युनिटांच्या मुख्यांबरोबर गप्पाटप्पा करत नसत. पण माझी युनिटची मागणी त्यांनी सर्वांच्या कानांवर घातली.

"छे,छे. तो खूप अपरिपक्व आहे" मेहतासर म्हणाले.

"येवढ्या लहान वयात त्याला युनिट देऊन कसं चालेल?" जोशीबाई म्हणाल्या.

"त्याला अजून अनुभव घ्यायची गरज आहे. युनिटचं नंतर बघता येईल" दोशीमॅडमचं मत पडलं.

वीरकरांनी निकालपत्र सावंतांच्या ऑफिसात जाऊन पाहिलं होतं. मी त्यांच्या पुढे गेलो होतो हे त्यांना समजलं होतं. जर मला युनिट दिलं नाही तर कदाचित आपलं युनिटपण जाईल हे त्यांच्या ध्यानात आलं असावं. "नियमाप्रमाणे जे काही असेल ते व्हावं असं ते सावधपणे म्हणाले."

माझ्या वतीने बोलायला तिथे कोणी नव्हतं. माझ्या खबऱ्यांना बोलायची परवानगी नव्हती. ते फक्त ऐकत राहिले. मला

इत्थंबूत माहिती मिळाल्यावर मला त्या मंडळींसमोर माझी बाजू मांडायची इच्छाच राहिली नाही. हल्लीहल्लीपर्यंत आपला विद्यार्थी असणारा विजय आता आपल्या पंक्तीत येऊन बसतो हे त्यांच्या पचनी पडत नव्हतं, म्हणून त्यांनी माझं नुकसान करणं काही त्यांना शोभत नव्हतं. आपण अशोभनीय वर्तन करतोय याची त्यांना लाजही वाटत नव्हती. विद्यार्थी असताना ज्यांना आपण मोठी माणसं समजत होतो ती अशी निघावी हे तर अतिशय अस्वस्थ करणारं होतं.

शेवटी मी सरळ डीनना जाऊन भेटलो.

"गुड मॉर्निंग सर" मी म्हटलं.

"गुड मॉर्निंग."

"सर, असोशिएट प्रोफेसर म्हणून माझी नेमणूक झालीय."

"हो. मी कालच सही केली तुमच्या ऑफिस ऑर्डरवर."

"सर, आमच्या डिपार्टमेंटमध्ये डॉक्टर कावळे बदली होऊन गेल्यापासून एका युनिटला मुख्य नाहीये. मेडिकल कौन्सिलच्या म्हणण्याप्रमाणे युनिटचा मुख्य असोशिएट प्रोफेसर किंवा प्रोफेसर असावा. सध्या डॉक्टर अहुजा दोन युनिटचा भार संभाळताहेत. तर मी आपल्याला अशी विनंती करतो की त्या दुसऱ्या युनिटचा मुख्य म्हणून मला नेमावं."

"बरोबर आहे तुमचं म्हणणं. आम्ही असोशिएट प्रोफेसरचे पद भरण्याची वाट बघत होतो. त्या नव्या असोशिएट प्रोफेसरला ते युनिट द्यायचं असा आमचा धोरणात्मक निर्णय कावळे गेले तेव्हाच झाला होता. मी ऑफिस ऑर्डर काढून पाठवतो. सावंतांना मला भेटायला सांगा."

"थँक यू सर."

अवघ्या दोन दिवसात माझं काम झालं. अहुजांनी डीनना पत्र पाठवून ते करून घेतलं असतं तर त्यांना माझं काम केल्याचं श्रेय घेता आलं असतं. पुढेमागे गरज लागेल तेव्हा माझ्याकडून आपलं एखादं काम हक्काने करून घेता आलं असतं. इतर बुजुर्गांनी मला उघड विरोध करून स्वतःचा कोतेपणा उघड केला. त्यांनी विरोध केला नसता तर संबंध बरे राहिले असते. निदान नियमाप्रमाणे ते युनिट मला मिळेल हे समजून तरी त्यांनी योग्य प्रकारे वागायला हवं होतं. हम करे सो कायदा चे जुने दिवस गेले याचंही त्यांना भान राहिलं नाही हे मला त्यांच्या स्वभावांबद्दल बरंच काही शिकवून गेलं. तीन दिवसांत माझ्या नावाचे शिक्के बनले. पुढच्या आठवड्यापासून माझी स्वतःची ओपीडी सुरू झाली.

***

"हॅलो विजय, अभिनंदन."

"अरे परवेझ, आज इथे कसा अकस्मात?"

"माझ्या फंडाचे पैसे यायचेत ना, त्याच्यासाठी आलो होतो. तुला अप्रोची जागा आणि स्वतंत्र युनिट मिळालं. अभिनंदन."

"थँक्स" मी म्हटलं. "खरं तर ही जागा तुला मिळाली असती. तू थोडा थांबला असतास तर ..."

"चल रे. तू वीरकरच्या पण पुढे गेलास तो काय उगाच?" हॉस्पिटल सोडून दोनापेक्षा जास्त वर्षं झाली तरीही परवेझचं स्थानिक घटनांचं ज्ञान एकदम अद्यावत दिसत होतं. "तुझी दोन पुस्तकं प्रकाशित झाली. छान. एकाचं क्रेडिट बाईने मारलं.

दुसरं तू एकट्याने प्रकाशित केलंस, तिला लेखक म्हणून घेतलं नाहीस म्हणून बाई फुटाण्यासारखी उडतेय म्हणे. "
"जाऊ दे. बाईच्या स्वभावाला औषध नाहीये. चल, चहा मारूया" मी म्हटलं.
शेट्टीच्या कँटीनमध्ये बसून आम्ही छान गप्पा मारल्या.
"काय रे, तुला युनिट मिळालं त्याच्यावर इतर युनिट प्रमुखांच्या प्रतिक्रिया काय आहेत?"
"कोणीच आनंदी नाहीये. अहुजामॅडम मी समोरून आलो की तोंड फिरवून जातात. जोशीबाई नाक मुरडतात. मेहता-दोशी जोडगोळी पूर्वी एखादं वाक्य तरी बोलायची, आता तेही नाही."
"हूं."
"मला युनिट मिळालं त्यामुळे त्यांच्यापैकी कोणाच्याही पदरचं काही गेलं नाही. त्यांना मिळणारी कोणतीही गोष्ट कमी झाली नाही. येवढा खडूसपणा का करतात कोण जाणे."
"त्याचं काय आहे विजय, जगात दोन प्रकारच्या विचारधारणा असतात. बहुतेक जणांची कमतरतेची विचारधारणा असते. त्यांना असं वाटतं की जगात चांगल्या गोष्टी अगदी कमी प्रमाणात आहेत. एखाद्याचं काही चांगलं झालं की तेवढं आपल्या वाट्याला कमी चांगलं येईल. मग त्यांचं पोट दुखतं. फार कमी लोकांना इतरांचं चांगलं झालेलं बघून आनंद वाटतो. त्यांची विचारधारणा मुबलकतेची असते. त्यांना असं वाटतं की जगात चांगल्या गोष्टी मुबलक प्रमाणात असतात आणि एखाद्याचं चांगलं झालं म्हणून इतरांच्या वाट्याला येणारं चांगलं कमी होत नाही. आपल्या डिपार्टमेंटमधली

माणसं ही त्या पहिल्या प्रकारची आहेत. त्यांची ही मानसिकता कधीही बदलायची नाही. हे सगळं असंच रहाणार." परवेझने काय जबरदस्त फिलॉसॉफी सांगितली. मानलं त्याला. "मी एचोडी असतो ना, तर तुला मानसशास्त्राचा मानद प्रोफेसर म्हणून नेमावं असं मी प्रशासनाला सुचवलं असतं" मी म्हटलं. "होशील. होशील. तू एक दिवस एचोडी पण होशील. तेव्हा मानद प्राध्यापक होण्याची माझी इच्छा नसेल. पण इतर बरीच चांगली कामं तुला करून घेता येतील."

परवेझ द्रष्टा होता की मला बरं वाटावं म्हणून तसं म्हणाला देव जाणे. मला बरं वाटलं हे खरं.

"थॅंक्स. तू आजवर सल्ला दिलास. आता यापुढे तुझ्या शुभेच्छा बरोबर घेऊन पुढे जायचंय. बघूया कसं काय जमतंय ते" मी म्हटलं. "मधून मधून येत जा. तुझ्याबरोबर बोललं की सगळं कसं स्पष्ट आणि स्वच्छ दिसायला लागतं."

"जमेल तेव्हा येईन. पण कठीण आहे" तो म्हणाला.

"का रे?"

"अमेरिकेला जातोय. आवडलं तर तिथेच राहीन."

हातात असलेला हिरा राजमाताच्या प्रशासनाला संभाळता आला नव्हता. आपला हिरा हातातून निसटून कदाचित कायमचा परदेशी चाललाय याची राज्यकर्त्यांना कल्पना दिसत नव्हती, किंवा असली तर पर्वा दिसत नव्हती. केवळ देशासाठी म्हणून त्याने कायमचं लेक्चरर म्हणून कावळे आणि जोशीबाई यांच्यासारख्यांच्या हाताखाली रहावं अशी अपेक्षा ठेवणं मूर्खपणाचं होतं. मी हिरा होतो की नाही देव जाणे, पण नशीबवान मात्र नक्कीच होतो. नाहीतर

आमच्याकडच्या नतद्रष्टांच्या कारवाया विरोधात असताना राजमातात पाय रोवून उभा राहूच शकलो नसतो.
परवेझ परत येणार नाही हे मला पक्कं माहित होतं.
"बेस्ट ऑफ लक" मी म्हटलं.

***

अहुजा २ युनिटच्या आरेमोंना अहुजामॅडमची बऱ्यापैकी सवय झाली होती. मॅडमना ज्या गोष्टींत रस असायचा त्या करण्यासाठी त्या बरोबर हजर असायच्या. बाकीच्या गोष्टी तुम्ही संभाळा असं त्या आरेमोंना सांगून गुल असायच्या. त्यामुळे आरेमोंना स्वातंत्र्याची सवय झाली होती. नऊच्या ड्यूटीला नऊनंतर केव्हातरी येण्याऐवजी साडेआठ वाजताच हजर होणारा बॉस म्हणजे त्यांना कटकट वाटणं सहाजिक होतं. त्यातून जर तो कमीत कमी चार वाजेपर्यंत डिपार्टमेंटमध्ये राहून काम करत बसला आणि आपल्या हाताखालच्यांकडून काम नीट होतंय की नाही इकडे लक्ष ठेवून राहिला तर कटकट कितीतरी पटींनी वाढली असं त्यांना वाटणं तर अगदी सहाजिक होतं. युनिटचे प्रमुख बदलले की आरेमोंना असं बरेचदा होतं. त्याला इलाज नसतो. हळूहळू सवय होते. माझ्या आरेमोंना पण तशी सवय झाली.
आमच्याकडची काही बॉस मंडळी एकदम राजेशाही होती. 'का रे' असं विचारणारं कोणी नसल्यामुळे मंडळी नऊच्या ठोक्याला कधीही यायची नाहीत. बरं रोज साडेनऊ तर साडेनऊलाच आली असती तर आरेमो मंडळी आपली कामं उरकून आणि नाश्ता करून साडेनऊ वाजता हजर झाली असती. पण ही

राजेशाही मंडळी आज सव्वानऊ वाजता आली तर उद्या पावणेदहा वाजता यायची. आरेमो वाट पहात रहायचे. त्यांचा वेळ फुकट गेला तर काय झालं मोठसं, असा या बॉस लोकांचा दृष्टीकोन होता. मी स्वतः आरेमो असताना या त्रासातून गेलेलो होतो.

"मुलांनो," मी पहिल्या दिवशी जाहीर केलं, "मी नऊ वाजता येणार. तेव्हा तुमचं काम आणि नाश्ता झालेला असेल काय?"

"होय, सर" माझे तीन आरेमो म्हणाले. एक रजिस्ट्रार आणि दोन हाउसमन अशी प्रचंड फौज माझ्याबरोबर युनिटचा गाडा हाकायला होती.

"मला उशीर होणार असेल तर मी तसं कळवीन. उगाच माझ्यासाठी थांबून रहाण्याची गरज नाही."

"होय, सर."

"दिवसाभरात काहीही अडलं, चुकलं तर मी असणार. मला पटकन सांगायचं. मदत शोधत इकडे तिकडे धावायचं नाही."

"होय, सर" तिघं एका सुरात म्हणाली. मी असणार म्हटल्यावर त्यांची तोंडं जरा वाकडी झाली होती. खरं तर माझं असणं ही मोठी दिलाशाची गोष्ट होती. अडचणीच्या वेळी बॉस सापडला नाही तर आई हरवलेल्या कोंबडीच्या पिल्लांसारखं आरेमोंना धावताना मी पाहिलेलं होतं. मी रजिस्ट्रार असताना एकदा दुपारी बारा वाजता अहुजाबाई गुल झाल्या होत्या. तेव्हाच एका बाईला सिझेरियनची तात्काळ गरज भासली होती. आम्ही कोंबडीच्या पिल्लासारखे धावत होतो. शेवटी एका अप्रोने आम्हाला सिझेरियन करण्याची परवानगी दिली. दुर्दैवाने पेशंटला काही काळाने काही गुंतागुंत झाली. तोपर्यंत सगळं

काही ठीक होतं. गुंतागुंत झाली म्हटल्यावर अहुजाबाईंनी हात वर केले. सिझेरियन केलं तेव्हा आपण तिथे नव्हतोच, त्यामुळे जबाबदारी आपली नाही असं त्यांनी सांगून टाकलं. मग आम्ही आरेमो डोकं कापून टाकलेल्या कोंबडीच्या पिल्लांसारखे इकडे तिकडे धावायला लागलो. सुदैवाने आमच्या बॉसला अहुजाबाई कशा आहेत ते बरोबर माहित होतं. दुपारी बारा वाजता सिझेरियन करायचं असताना तुम्ही तिथे नव्हता तर होता कुठे असा रोखठोक सवाल त्यांनी केला. आपण तिथे नव्हतो असं म्हटलं तर मेमो मिळेल आणि कामचुकारपणाचा शिक्का बसून कारवाई होईल हे त्यांच्या लक्षात आलं. लगेच त्यांनी जबानी बदलली आणि आपण ऑपरेशन थिएटरमध्येच होतो आणि आपल्याच देखरेखीखाली सिझेरियन झालं असं जाहीर केलं. आम्ही मंडळी जबाबदारीतून मुक्त झालो. पदव्युत्तर डिग्री मिळेपर्यंत आम्हा आरेमोंना स्वतंत्रपणे ऑपरेशनं करण्याची परवानगी नसे, आणि फुलटायमर किंवा ऑनररींना ती जबाबदारी घ्यावी लागत असे. अहुजाबाईंना गुल व्हायचं स्वातंत्र्यही हवं असायचं आणि आरेमोंवर ढकललेल्या कामाची जबाबदारीपण नको असायची. आपण असं काही करायचं नाही असं मी पक्कं ठरवलं होतं. माझ्या आरेमोंना मी तसं सांगून टाकलं.

"मी सांगतो तसं तुम्ही जोपर्यंत कराल तोपर्यंत जे काय होईल त्याची जबाबदारी माझी. गुपचूप, स्वतंत्रपणे काही कराल तर मात्र मी जबाबदारी घेणार नाही. काय?"

"होय सर" माझी रजिस्ट्रार सीमा म्हणाली. इतर दोघं गप्प राहिली कारण साधारणपणे रजिस्ट्रार सांगेल ते काम करायचं

असं त्यांच्या कामाचं स्वरूप असायचं. जबाबदारी रजिस्ट्रारची असायची.

"आपण आपल्या युनिटमध्ये काय करतो ते इतर युनिटच्या लोकांना जाऊन सांगितलेलं मला आवडत नाही. त्यामुळे बॉस मंडळींची भांडणं होतात. त्यांना पाहिजे ते त्यांना करू दे. आपल्याला जे योग्य वाटतं ते आपण करायचं. गॉसिप करायचं नाही. काय?"

"नाही सर" तिघं जरा बारीक आवाजात म्हणाली. गॉसिप नाही तर आयुष्यात आनंद कसला उरणार असं त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतें. अर्थात मी नको म्हटलं म्हणून ती गॉसिप करणं पूर्णपणे सोडणार होती अशातली गोष्ट नव्हती हे मला समजत होतं.

"आपण रुग्णांवर उपचार करू ते शास्त्रशुद्ध, पुस्तकांत लिहिल्याप्रमाणेच करायचेत. केवळ मी म्हणतो म्हणून तसं, आणि मी नसेन तेव्हा दुसऱ्याच पद्धतीनं, असं नाही. एका रुग्णाला असं आणि दुसऱ्या रुग्णाला तसं, असं आपल्याला करायचं नाही. काय?"

"होय सर, म्हणजे नाही सर" सीमा म्हणाली. एका वेळी एकच वाक्य म्हटलं तरच ती योग्य होकारार्थी किंवा नकारार्थी उत्तर देऊ शकेल हे माझ्या लक्षात आलं. एक होकारार्थी आणि आणि दुसरं नकारार्थी उत्तर अपेक्षित असलेले दोन प्रश्न एका वाक्यात तिला विचारले आणि मग तिला 'काय?' असं विचारलं तर गोंधळ होणार अशी मी खूणगाठ बांधली.

"कोणत्या प्रकारच्या रुग्णावर इमर्जन्सीत काय उपचार करायचे ते मी लेखी देतो. तसंच करायचं. प्रत्येक प्रकारच्या

रुग्णाला बरं करून घरी पाठवताना कागदपत्रं कशी भरून द्यायची ते पण लेखी देतो. त्याची एक एक प्रत प्रत्येकाने स्वतःजवळ ठेवायची. त्यांत दिल्याप्रमाणे करायचं. म्हणजे कुठली एखादी गोष्ट राहून जायची नाही. काय?"

"होय सर" तिघं मरगळलेल्या आवाजांत म्हणाली.

"आज तुम्हाला ही गोष्ट कटकटीची वाटेल, पण एकदा सवय झाली की काही वाटणार नाही. पुढे त्याचा फायदाच होईल. उद्या स्वतंत्र प्रॅक्टीस कराल तेव्हा राजमाताचं संरक्षक कवच आणि डोक्यावर बॉसची संरक्षक छत्री नसेल. तेव्हा एखादी गोष्ट राहून जाणं परवडायचं नाही. अशी प्रकरणं कोर्टात जातात आणि फार महाग पडतात."

तिघं गप्प राहिली. त्यांनी असलं काही पूर्वी ऐकलेलं दिसत नव्हतं. रोज फुलपाखरासारखं गंमत करत जगायचं हा त्यांचा खाक्या होता. जर तो वेळीच सुधारला नाही तर एक दिवस चटका बसेपर्यंत तो तसाच राहील आणि तेव्हा सुधारणा झाली तरी नुकसान झालेलं नाहीसं करता येणार नाही हे त्यांना शिकवणं माझं काम होतं.

"मी सांगतो ते बरोबर असतं हे मला माहित आहे. पण जर तुमचा त्यावर विश्वास बसला नाही तर तुम्ही पुस्तकं, जर्नल्स वगैरे वाचून सत्याचा शोध घ्यायला मोकळे आहात. जर तुमचं म्हणणं माझ्या म्हणण्यापेक्षा जास्त बरोबर निघालं, तर ती गोष्ट आपण तुमच्या म्हणण्याप्रमाणे करू. काय?"

यावर तिघांपैकी एकही जणाने होय म्हटलं नाही. माझं म्हणणं चुकू शकेल असं त्यांना वाटत नव्हतं, वाचन करायची त्यांना

इच्छा नव्हती, की माझी चूक मला सांगायचं त्यांना धाडस नव्हतं हे काही माझ्या लक्षात आलं नाही.

"अभ्यासू मुलं मला आवडतात. मला घाबरायचं काही कारण नाही. शास्त्रीय चर्चा करायला घाबरायचं कशाला?" मी म्हटलं. तिघांनी माना थोड्याशा हलवल्या.

"मला वाटतं आजच्यासाठी येवढं पुरे झालं. चला. कामाला लागूया."

मला वाटतं माझा डोस पुरेपेक्षा बराच जास्त झाला असावा. तिघं पटकन उठली.

***

आपला बॉस कितीही हुशार असला तरी आपण त्याच्यापेक्षा अभ्यासात नाही तरी इतर गोष्टींत जास्त हुशार आहोत असं बऱ्याच आरेमोंना वाटायचं. तसं ते आजही वाटतं म्हणा. काळ बदलला म्हणून माणसाचा स्वभाव थोडाच बदलतो? माझ्या आरेमोंना माझी हुशारी ठाऊक असली, तरी मी थोड्याच वर्षांपूर्वी आरेमो म्हणून काम करून निघालोय आणि त्यांच्या सगळ्या लांड्यालबाड्या मला ठाऊक असणार याचं त्यांना स्मरण रहात नसे. प्रत्येक अडचणीच्या वेळी मला गंडवून बघायचं असं त्यांच्यातले काहीजण करायचे. माझी हाउसमन निला त्याच पंथातली होती.

युसॉल नावाचा द्राव आम्ही पस झालेल्या जखमांचं ड्रेसिंग करायला वापरायचो. युसॉलमध्ये क्लोरीन विरघळलेला असायचा, आणि त्याला विचित्र वास यायचा. नाकाजवळ नेऊन त्याचा वास घेतला तर मेंदूला झिणझिण्या यायच्या. पण

क्लोरीनमुळे जंतू मरायचे. त्यामुळे आम्हाला युसॉल वापरणं आवडायचं. युसॉल उघडं राहिलं तर त्यातला क्लोरीन उडून जायचा आणि साधं पाणी मागे उरायचं. तसं होऊ नये म्हणुन त्याची बाटली गच्च बंद ठेवावी लागायची.

"सर, या सुमित्राबाईंचे सिझेरियनचे टाके काढून पाच दिवस झालेयत. त्यातले दोन टाके उघडलेयत. आम्ही दिवसातून दोनदा ड्रेसिंग करतोय, पण त्यांची जखम काही स्वच्छ होत नाहीये."

सीमाला काळजी वाटणं सहाजिक होतं. जखम स्वच्छ झाल्याशिवाय तिला टाके मारता येत नव्हते. टाके मारले नसते तर ती जखम भरायला किमान महिना तरी लागला असता.

"कशाने ड्रेसिंग करता तिचं?" मी विचारलं.

"जखमेवर आधी हायड्रोजन पेरॉक्साईड टाकतो. मग ती सलाइनने धुतो. नंतर अर्धा तास त्याच्यावर युसॉलने भिजवलेला गॉझ ठेवतो. शेवटी अँटिसेप्टिक लावून गॉझचं ड्रेसिंग करतो."

"युसॉल वापरता का? छान. मला बाटली बघू युसॉलची." त्याला क्लोरीनचा वास येतोय का ते मला पहायचं होतं. त्यातला क्लोरीन उडून गेलेला असला तर त्याचा काहीच उपयोग नव्हता. मग त्या बाईंचे टाके स्वच्छ होत नव्हते त्याचं कारण स्पष्ट झालं असतं.

"सर, युसॉलची बाटली खालच्या मजल्यावर आपल्या युनिटच्या कपाटात ठेवलीय. इथे ठेवली तर इतर युनिटची लोकं आपलं युसॉल खुशाल वापरतात" निला म्हणाली.

"ठीक आहे. तू हो पुढे. इथे दोन पेशंट उरल्यायत त्यांना बघून आम्ही खाली येतो."

निला गेली. आम्ही राउंड पुढे चालू केली. मी शेवटच्या पेशंटला तपासत असताना ती युसॉलची बाटली घेऊन परत आली.

"सर, हे बघा युसॉल" ती म्हणाली.

"अगं, तेवढ्यासाठी तू परत वर कशाला आलीस?" मी म्हटलं. "आम्ही आता खाली येणारच होतो."

ती काहीच बोलली नाही. मी तिच्या हातातली बाटली घेतली, तिच बाहेरचं फिरकीचं बूच काढलं आणि बाटली उलट्या बुचावर उपडी धरली. थोडसं युसॉल बुचात ओतून त्याचा वास घ्यायचा माझा बेत होता. पण बाटलीतून थेंबभरही युसॉल बाहेर आलं नाही.

"तुम्ही आतल्या बुचाला भोक पाडत नाही का?" मी विचारलं. "दर वेळी आतलं बूच काढणं आणि लावणं त्रासाचं असतं. पण कल्पना चांगली आहे. तेवढंच क्लोरीन उडून जाण्याचं प्रमाण कमी होईल."

निला गप्पच राहिली. मी डाव्या हाताने बाटली घट्ट धरली आणि उजव्या हाताची नखं त्या बुचाखाली घालून ते उचकटून काढायचा प्रयत्न केला. बूच तसूभरही हललं नाही. मला शंका आली म्हणून मी बाटली आणि बूच नीट न्याहाळलं. माझी शंका खरी होती. बाटली पूर्णपणे भरलेली आणि सीलबंद होती. निलाने नवी कोरी, अजिबात न वापरलेली बाटली आणून मला ती रोजच्या वापरातली बाटली म्हणून दाखवली होती.

"निला, मी कालच नखं कापलीयत. त्यामुळे मला ते बूच काढता येत नाहीये. तू रोज ते काढतेस, तेव्हा तुला ते सहज जमेल. जरा काढून देतेस का?"

निलाने माझ्याकडून बाटली घेतली. आपली प्रमाणात वाढवलेली आणि सुरेख नेलपॉलिश लावलेली नखं बुचाच्या कडेखाली घातली आणि बूच उचकटून काढायचा प्रयत्न केला. अर्थातच बूच तसूभरही हललं नाही. तिने बाटली थोडीशी फिरवली आणि परत प्रयत्न केला. बूच होतं तसंच राहिलं. वॉर्डातल्या कामाची यादी मागायला आलेला आमचा इंटर्न रमेश बाजूला उभा होता. स्त्रीदाक्षिण्य म्हणून त्याने बूच काढून द्यायची तयारी दाखवली. निला त्याच्याकडे बाटली देणारच होती, तेवढ्यात मी गुरगुरलो,

"ए SSSS."

रमेशने दचकून पुढे केलेला हात मागे घेतला. निलाने पटकन पुढे केलेली बाटली मागे घेतली.

"या रमेशचा वेळ जात नाहीसं दिसतं" मी म्हटलं. "सीमा, त्याला काहीतरी काम दे."

रमेश दोन पावलं मागे सरकला.

"निला, तू थांबू नकोस. तू उघड बाटली."

तिने वेगवेगळ्या अंशांच्या कोनांतून बुचाखाली नखं घालून ते काढायचा प्रयत्न केला. पण कंपनीवाल्यांनी बऱ्या दर्जाचं प्लास्टिक आणि सिलिंग वापरलेलं दिसत होतं. बूच निघेना आणि फाटेहीना.

"निला, थांब. तुझी नखं उचकटली गेली तर तुझे डॅडी माझ्याबरोबर भांडायला येतील" मी म्हटलं. "दुसऱ्या महायुद्धात

छळछावण्यांत जर्मन लोक कैद्यांची नखं उचकटायचे म्हणे. तसा आपल्या पोरीचा छळ तिचा बॉस करतो असं ते म्हणाले तर?"

ती थांबली. तिची नजर काही माझ्या नजरेला भिडेना.

"ही न वापरलेली, नवी कोरी बाटली आहे, खरं ना?" मी विचारलं.

तिने होकारार्थी मान हलवली.

"अर्धवट वापरलेली बाटली खाली कपाटातच आहे. हो ना?"

तिची मान परत होकारार्थी हलली.

"त्यातल्या युसॉलला क्लोरीनचा वास येत नाहीये. ती बाटली मी बघू नये म्हणून तू ही बाटली आणलीस. खरं ना?"

तिने परत मान हलवली. गेल्या जन्मी ही मुलगी नंदीबैल असावी किंवा नुकतीच फॅन्सी ड्रेस स्पर्धेत नंदीबैल झाली असावी असा मला संशय आला. पण तसं बोललो असतो तर महत्प्रयासाने तिने थोपवलेल्या गंगायमुना वहायला लागल्या असत्या म्हणून मी तो मोह टाळला.

"म्हणजे त्या बाटलीत निव्वळ पाणी शिल्लक आहे. तुम्ही दिवसातून दोनदा त्या बाईचं ड्रेसिंग पाण्याने करताय. मग ती जखम कशी बरं स्वच्छ होईल?"

तेवीस चोवीस वर्षांच्या मुलीचे गुढगे लटलट कापू शकतात हे मला तेव्हा कळलं. असं काही करायचा माझा हेतू नव्हता. पण ड्रेसिंगसाठी होणारा पाण्यचा वापर थांबवणं महत्वाचं होतं.

"पुन्हा अशी चूक होईल का?"

तिने नकारार्थी मान हलवली.

"निला, तू मला बनवण्याचा प्रयत्न केलास त्याचं मला दुःख नाही. पण एक गोष्ट लक्षात घे. मी आरेमो होतो त्याला फक्त तीन वर्षं झालीयेत. आरेमोंच्या लबाड्या या विषयावर मी एक शोधनिबंध लिहू शकेन येवढी माझी तयारी आहे. अशा मला गंडवायचं तर तुला अजून खूप तयारी करावी लागेल. तेव्हा भविष्यकाळात सावधान. काय?"
तिची मान होकारार्थी हलली.

***

हळूहळू आरेमोंना माझ्या कार्यपद्धतीची सवय झाली. नंतर नंतर तर त्यांना आपण इतरांपेक्षा जास्त सुखी आहोत असं वाटायला लागलं. इतर युनिटमधले आरेमो आपापल्या प्रमुखांची वाट बघत उभे असायचे तेव्हा आमची पोरं मोकळी होऊन आपल्या मार्गाला लागलेली असायची. नक्की काय करायचं ते ठरलेलं असल्यामुळे प्रत्येक पेशंटच्या वेळी युनिटप्रमुखाला शोधत फिरायला लागायचं नाही. एखाद्या वेळी अमुकच का केलं असं मी विचारायचो नाही, किंवा तसं केलं म्हणून बत्ती मारायचो नाही. पुढे परिक्षांमध्ये प्रश्नांची उत्तरं देताना त्यांना विचार करावा लागत नसे, कारण निदान करायचे ठोकताळे आणि उपचारपद्धती त्यांच्या अंगवळणी पडल्यामुळे आपोआप तोंडातून उत्तर यायचं. ऑनररींसारखं मला घरी जाताना माझी बॅग हातात धरून गाडीपर्यंत सोडायला जावं लागत नसे. एकतर तेव्हा माझी गाडी नव्हती. पुढे आईने आणि बायकोने आग्रह केला म्हणून मी गाडी घेतली. आता साहेबांना गाडीपर्यंत सोडून यायचं म्हणून

आरेमोंनी माझी बॅग हातात घ्यायचा प्रयत्न केला. तेव्हा मी त्यांना सांगून टाकलं की माझं काही अजून वय झालं नव्हतं, आणि हातपाय शाबूत असेपर्यंत माझी बॅग मीच धरणं मला आवडलं असतं.

"नाही, सर. गाडीचं दार उघडताना बॅगची अडचण होईल ना" एक जण म्हणाला.

"दाराची चावी फिरवायला एक हात पुरतो" मी म्हटलं. "दुसऱ्या हाताने मी बॅग धरेन. नाहीतर ती मी गाडीच्या बॉनेटवर ठेवीन. माझ्या ऑफिसचं आणि घराचं दार उघडतो तेव्हा पण येणार का रे तुम्ही बॅग धरायला?"

"अं ... नाही सर."

"की मी खरोखर घरी गेलो याची खात्री करायचीय?"

"नाही सर. तसं नाही."

"त्याचं काय आहे, गेटबाहेर पडल्यावर मी गाडी उलटी वळवून परत येऊ शकतो. काय?"

"होय, सर" ते गांगरून म्हणाले. ही शक्यता त्यांनी कधी जमेला धरली नव्हती असं दिसलं.

"पण मी तसं करणार नाही. तुम्ही मंडळी मी नसतांनाही तेच कराल जे मी असताना करता, याचा मला विश्वास आहे."

"होय सर" ते म्हणाले. जरी ते होय म्हणाले तरी ते तसं शंभर टक्के वागत नसत याची मला कल्पना होती.

'चलो बहनजी, जरा पेशाब करके आना' असं माझ्यासमोर पेशंटला म्हणणारे आरेमो संध्याकाळी चारनंतर बॉसमंडळी घरी गेली की 'चलो बाई बाथरूम करके आओ फटाफट' असं म्हणताना मी ऐकलं होतं. दिवसा ऑपरेशन थिएटरमध्ये

नाकातोंडावर चपखल बसलेलं मास्क संध्याकाळी हनुवटीच्या खाली लटकतानाही मी पाहिलं होतं. पण जर रोज संध्याकाळी त्यांच्यावर लक्ष ठेवायला मी तिथे हजर राहू शकत नसेन, तर त्या काळातल्या त्यांच्या वागण्याला मी नावं कशाच्या जोरावर ठेवणार? आणि जर संध्याकाळी उपचार केलेले पेशंटही बरे होऊन घरी जात होते तर आरेमो संध्याकाळी आणि रात्री गोंधळ घालतात असं कसं म्हणता आलं असतं? तुमची सदसद्विवेकबुद्धी वापरून वागा येवढं सांगितलेलं येवढ्या शिकलेल्या मुलामुलींना समजलं पाहिजे अशी अपेक्षा ठेवण्यापलिकडे मी आणखी काही करू शकत नव्हतो.

एकदा तर आमच्या मुलींनी कमालच केली. संध्याकाळचे सव्वाचार वाजले होते. एका पेशंटला इमर्जन्सी ऑपरेशनची गरज भासल्यामुळे ऑपरेशन थिएटरमध्ये हलवलं होतं. आरेमो आले की त्यांना काय करायचं ते सांगून घरी जावं म्हणून मी तिथेच थांबलो होतो. मी तिथे असेन अशी अपेक्षा नसलेल्या सीमा आणि निला आइसफ्रूटच्या कांड्या जिभेने चाटत चाटत तिथे आगमनकर्त्या झाल्या.

"ऑरेंज कँडी? व्वा! मला पण आवडते" मी म्हटलं. दोघी चपापल्या.

"कँडी चाटण्यासारखा आनंद नसतो" मी म्हटलं. दोघींनी म्हटलं तर होय, म्हटलं तर नाही अशा अर्थाने माना हलवल्या.

"पण काय आहे, हे अत्यवस्थ पेशंट तुमची वाट बघत थांबलेले असताना तुम्ही अशा आनंदात कँडी चाटत चाटत त्यांच्यासमोर येणं बरं दिसत नाही. "तुम्ही कँडी खाऊ नका असं मी अजिबात सुचवत नाही. फक्त मला येवढंच म्हणायचंय

की तुम्ही खाणंपिणं उरकून मगच पेशंटांसमोर यावं असं मला वाटतं"

निलाने आइसफ्रूट अख्खच्या अख्खं गिळलं. सीमाने आपलं आइसफ्रूट एप्रनच्या खिशांत कोंबलं.

"अरे, तुम्ही दोघींनी हे काय केलं?" मी म्हटलं. "तुम्ही दोघी असं काही कराल असं मला खरोखर वाटलं नव्हतं. नाहीतर तुमचं खाऊन होईपर्यंत मी बोलायचा थांबलो असतो."

पोस्ट संपेपर्यंत दोघी परत कधीही खातखात वॉर्डात आल्या नाहीत.

***

त्याचं काय आहे, प्रसूती ही एक नैसर्गिक क्रिया आहे. तिचा उगाच फार बाऊ करू नये" जोशीबाई आमच्या डिपार्टमेंटला भेट द्यायला आलेल्या कुठल्याशा कंपनीच्या मंडळींना सांगत होत्या. संधी मिळाली की त्या लोकांचं असं बौद्धिक घेत असत. हे लोकशिक्षण आहे असं त्या म्हणत असत. त्यांचं हे वक्तव्य डॉक्टर नसणाऱ्या त्या मंडळींनी भक्तीभावाने ऐकून घेतलं. कदाचित ते आपली औषधं खपवायला आलेले असल्यामुळे डॉक्टरांना बरं वाटेल असं विक्रेत्याच्या दृष्टीकोनातून वागले असावेत. पण मंडळी गेली तरी जोशीबाई काही बौद्धिकाच्या तारेतून बाहेर आल्या नाहीत.

"विजय," हातातले श्रोते निसटल्यामुळे त्यांनी समोर दिसलेल्या मला पकडलं, "आपण राजमातात नैसर्गिक प्रसूती करायला सुरुवात केली पाहिजे."

मी स्वतंत्र पुस्तक लिहिल्यापासून त्या मला खुन्नस द्यायला लागल्या होत्या. पण स्वतःचं काम निघालं की मात्र खुन्नस निघून जायचा.

"पण मॅडम, आपल्या नव्वद टक्के पेशंट नैसर्गिक रित्याच प्रसूत होतात. फक्त दहा टक्क्यांनाच फोर्सेप्स, व्हॅक्यूम, किंवा सिझेरियन लागतं. आपण नव्याने नैसर्गिक प्रसूती करायला कशी सुरुवात करणार?"

काही प्रगत देशांत नैसर्गिक प्रसूतीचं फॅड आलं होतं हे मला माहित होतं. पण आपल्या देशात एका वर्षात जेवढ्या प्रसूती व्हायच्या तेवढ्या त्या सगळ्या देशांत मिळून पाच वर्षांत होत नसत. प्रसूतीबद्दल त्यांनी आम्हाला शिकवावं आणि आम्ही ते शिकावं यासारखा दिसरा मोठा विनोद नसावा. सूर्य पूर्वेला उगवून पश्चिमेला मावळत असला तरी ज्ञानाचा सूर्य पश्चिमेला उगवून पूर्वेला मावळतो असा जोशीबाईंचा ठाम समज असल्यामुळे ही गोष्टही त्या विद्यार्थ्यांच्याच दृष्टीकोनातून हाताळत होत्यासं दिसलं. बाईंनी नुकतंच त्याच्याबद्दल काहीतरी वाचलं असावं, किंवा परदेशातून आलेल्या कोणीतरी त्यांना त्याबद्दल सांगितलं असावं. ते करायला सोपं वाटल्यामुळे आपणही तसं करून पहावं असं त्यांच्या मनानं घेतलं असावं."

"अरे, आपण करतो तशी प्रसूती करायची नाही काही. प्रेग्नन्सीत स्त्रीच्या शरीराची आणि मनाची योग्य प्रकारे तयारी करून घेतली तर प्रसूती होताना तिला अजिबात दुखत नाही. आपल्याला त्या प्रकारची नैसर्गिक प्रसूती करायची आहे."

मी अजून जोशीबाईंच्या युनिटमध्ये अडकून पडलो नव्हतो ते माझं नशीब म्हणायचं. त्यांच्या असल्या अव्यवहार्य कल्पना प्रत्यक्षात आणण्याचं काम त्या हटकून हाताखालच्यांवर टाकायच्या. मला काही त्या फंदात पडायचं नव्हतं.
"माझ्याकडे या विषयावरची एक कॅसेट आहे" बाई म्हणाल्या. "आपण सगळे ती लायबरीच्या व्हिडिओ रूममध्ये जाऊन बघूया. मग आपल्याला त्याप्रमाणे काम करता येईल."
"कॅसेट बघितली म्हणून काही मी त्या भानगडीत अडकायला बांधलेलो नव्हतो. इतरांबरोबर मी पण ती कॅसेट बघायला गेलो. ती अमेरिकेच्या पूर्व किंवा पश्चिम किनाऱ्यावरच्या कुठल्याशा हॉस्पिटलात बनवलेली होती. सुरुवातीला एक लांबलचक आणि गुळगुळीत गाडी छानसं वळण घेऊन हॉस्पिटलच्या दारात येऊन उभी राहिली. तिच्यातून तेव्हढ्याच मस्त सुटातला, पांढऱ्या केसांचा एक डॉक्टर उतरला. "मी डॉक्टर अमुक तमुक" असं त्याने जाहीर केलं.
"काय म्हणाला तो?" जोशीबाईंनी विचारलं. त्याचे अमेरिकन उच्चार त्यांना पटकन कळले नाहीत. परदेशातले चित्रपट केबलवर दाखवतात त्यांच्यात संवाद मराठीत किंवा हिंदीत खाली लिहिलेले असतात, तशी सोय त्या कॅसेटमध्ये नव्हती.
"देव जाणे" मी म्हटलं. तो काय म्हणतो ते मला कळतं हे जर बाईंना कळलं असतं तर त्यांनी मला ती कॅसेत हिंदीत डब करायला लावली असती, तिला सबटायटल लावायला लावली असती, किंवा किमानपक्षी कॅसेट बघून होईपर्यंत दुभाषाचं काम करायला लावलं असतं. मग जोशीबाईंनी माझा नाद सोडला

आणि त्यांच्या दुसऱ्या बाजूला त्यांची लेक्चरर सुषमा बसली होती तिची मदत घ्यायला सुरुवात केली.

कॅसेटमधला डॉक्टर मग कॅमेऱ्याच्या गतीला जुळणाऱ्या गतीने चालत एका वॉर्डात पोचला. तिथे चार पाच प्रेग्नंट स्त्रिया खुर्च्यांवर बसल्या होत्या. समोर एक छान कपड्यांतली, सोनेरी केसांची नर्स व्यायामाच्या प्रकारांची प्रात्यक्षिकं दाखवत होती.

"बघ कसं सूत्रबद्ध चाललंय सगळं ते" जोशीबाई म्हणाल्या.

त्या एकदम तंदुरुस्त आणि उत्साही चेहऱ्याच्या स्त्रिया कुठे आणि घरचं सगळं आटपून दमलेल्या, घरी बघायला कोणी नाही म्हणून आधीच्या मुलांना बरोबर घेऊन हॉस्पिटलात आलेल्या, आणि प्रत्येक ठिकाणी रांगेत उभ्या राहून कंटाळलेल्या आमच्या पेशंट कुठे असं माझ्या मनात आलं.

"असे व्यायामाचे वर्ग आपल्याला सुद्धा चालवता येतील" जोशीबाई उत्साहाने म्हणाल्या.

आमच्या एका ओपीडीला दोनशे बायका तरी यायच्या, त्या कॅसेटमधल्या हॉस्पिटलसारख्या पाच-दहा नाही, हे बाईंच्या डोक्यात आलेलं दिसलं नाही. आम्हाला व्यायामाच्या वर्गासाठी एक खोली पुरली नसती.

"होय मॅडम, आपल्या कॉलेजच्या मैदानात आपण हे वर्ग चालवू शकू" मी गंभीर चेहऱ्याने म्हटलं. "शेवटच्या रांगांमधल्या स्त्रियांना तुमचा आवाज ऐकू यावा म्हणून ध्वनीक्षेपक बसवावा लागेल. त्यांचे कपडे मळू नयेत म्हणून एक मोठसं जाजम अंथरावं लागेल. झालंच तर गंमत बघायला लोकांनी गर्दी करू नये म्हणून चारही बाजूला पडदे लावावे लागतील. उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून वरती मंडपही करावा

लागेल. हे येवढं केलं की व्यायामाचे वर्ग चालवायला काही अडचण येऊ नये."

तिथे कॅसेट चालू होती. पण जोशीबाई मी मांडलेल्या मुद्द्यांवर विचार करायला लागल्या, आणि कॅसेट बघायचं विसरल्या. बराच वेळ विचार केल्यावर त्यांना या सगळ्या अडचणींवर एक नामी उपाय सापडला.

"अरे, येवढं सगळं करायलाच नको. आपण निवडक पाच-सहा स्त्रियांसाठीच व्यायामाचा वर्ग चालवूया. जर चांगला प्रतिसाद मिळाला तर पुढे वाढवता येईल. तोपर्यंत वर्ग एका खोलीत चालवता येईल."

"पण त्याचा उपयोग काय मॅडम? दोनशेपैकी पाच स्त्रियांवर येवढी छान पद्धत वापरून काय मिळणार आपल्याला?" मी म्हटलं.

"का? असं का म्हणतोस? आपल्याला एक नवीन अनुभव मिळेल. त्यावर आपण एक शोधप्रबंध लिहून कॉन्फरन्समध्ये वाचू शकू."

'आपण वाचू शकू' याचा अर्थ तू लिही आणि मी वाचेन असा होतो हे मला पूर्वानुभवावरून माहित होतं. त्यातून शोधप्रबंध पाचशे रुग्णांवर उपचाराची पद्धत वापरून लिहायचा असतो, पाच जणींवर नाही, याचीही मला कल्पना होती. जोशीबाईंची कल्पना कितीही छान असली तरी ती त्यांनीच राबवावी, तिच्यासाठी मला राबवू नये अशी माझी प्रामाणिक इच्छा होती.

"हो. तुम्ही म्हणता ते बरोबर आहे" मी म्हटलं. "तुम्ही ते कराच."

"तुला नाही भाग घ्यायचा?" बाईंनी विचारलं.
"मॅडम, एकतर तुमच्या ओपीडीच्या दिवशी माझा ऑपरेशनचा दिवस असतो. त्यातून सुटून मी या व्यायामासाठी कसा येऊ शकेन? माझ्या ओपीडीत मी हे करू शकेन. पण स्त्रियांना व्यायाम शिकवण्यासाठी एक स्त्रीच असणं बरं, नाही का? माझ्या युनिटमध्ये कोणी स्त्री नाही" असं म्हणून मी सुषमाकडे सहेतुक बघितलं. माझ्या नजरेच्या रोखाने बघितल्यावर जोशीबाईंनाही सुषमा दिसली.
"अरे हो. माझी सुषमा आहे ना. ती आणि मी मिळून हे काम करू शकू" त्या उत्साहाने म्हणाल्या. तिकडे बिचाऱ्या सुषमाला तिच्यासाठी आम्ही इकडे काय वाढून ठेवत होतो याची कल्पना नव्हती. ती मन लावून कॅसेट बघत होती. कॅसेट एव्हाना व्यायामातून बाहेर पडून प्रेग्नन्सीत आराम कसा करावा ते शिकवण्याच्या पायरीवर पोचली होती. जमिनीवरच्या गालिच्यावर त्या हॉस्पिटलची एक प्रशिक्षक प्रेग्नन्सीत विश्रांती कशी घ्यायची याचं प्रात्यक्षिक करून दाखवत होती. त्यात शिकवण्यासारखं काय आहे ते माझ्या काही लक्षात येईना.
"बघ कसं शास्त्रशुद्ध शिक्षण देतात त्यांच्या देशात" जोशीबाई म्हणाल्या. "आपण आपल्या बायकांना अशीच विश्रांती घ्यायला शिकवूया."
मला त्या कामं करून दमलेल्या, आणि नवरा, मुलं, सासू-सासरे आणि असली तर इतर मंडळी यांचं उरकता उरकता मरगळून गेलेल्या आमच्या ओपीडीतल्या बायका आठवल्या. झोपायला बिछाना दिला तर पाच मिनिटांत त्यांतली प्रत्येक बाई

डाराडूर झाली असती. अशा स्त्रियांना विश्रांती घ्या असा सल्ला देणं आणि ती कशी घ्यायची ते शिकवणं ही त्यांची क्रूर थट्टा झाली असती. पण जोशीबाईंना हे जाणवलेलं दिसलं नाही.

"मॅडम, मला वाटतं आपल्या बायकांना हे शिकवण्याची फारशी गरज नाही. त्यांना आपोआप जमेल ते" मी म्हटलं.

"चल रे, अशा महत्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालेल का? विश्रांतीचं महत्व पटवून दिलं तरच त्या विश्रांती घेतील."

"पण मॅडम ...."

"शू! ती कॅसेट लक्ष देऊन बघ. मधे मधे बोलू नकोस. आधीच त्यांचे संवाद नीटसे समजत नाहीयेत."

मी गप्प बसलो. विजय मधे मधे बोलत होता म्हणून कॅसेटमधले संवाद नीट समजले नाहीत असं त्या नक्कीच म्हणाल्या असत्या. त्यांचा कार्यकारणभाव सामान्य माणसांपेक्षा वेगळा होता.

एव्हाना कॅसेट प्रसूतीकक्षात पोचली होती. प्रसूतीपूर्व काळात तयारी केलेल्या स्त्रिया प्रसववेदना सुरू झाल्यावर कशा वागतात ते दाखवलं होतं. त्या प्रशस्त वॉर्डात टीव्ही चालू होता. दोघीजणी त्या टीव्हीवर चालू असणारा मनोरंजनाचा कार्यक्रम बघत होत्या. कार्यक्रम गमतीदार असावा, कारण त्या मधेच जोरात हसल्या. एका बाजूला एक बाई पुस्तक वाचत होती. दुसऱ्या बाजूला एक बाई कानात इयरफोन बसवून गाणं किंवा संगीत ऐकत होती. सगळ्या जणी एकदम मजेत दिसत होत्या. कोणालाही प्रसववेदना होत होत्या असं दिसत नव्हतं. आम्ही आश्चर्यचकित झालो. आमच्या प्रसूतीकक्षात

प्रसववेदनांनी कळवळणाऱ्या स्त्रिया नेहमी दिसत असत. काहीजणी तर किंचाळून सगळा वॉर्ड डोक्यावर घ्यायच्या. एखादी समजूतदार बाई शांत असायची, नाही असं नाही. एकदा एका अशा बाईला मी विचारलं होतं,

"ताई, तुम्हाला दुखत नाही का?"

"दुखतं ना."

"मग तुम्ही अशा शांत कशा?"

"ओरडाआरडा करून का दुखायचं थांबणार आहे? सहन करायचं" ताई समजूतदारपणे म्हणाल्या. त्या कॅसेटमधल्या स्त्रिया त्या ताईंसारख्या असाव्या. किंवा पोटाला चादरी बांधलेल्या सुरेखशा मुलींना त्यांनी कॅसेट बनवण्यासाठी त्या वॉर्डात बसवलं असावं.

"बघितलंत किती प्रगत देश आहे ते? जे त्यांना जमतं ते आपल्याला जमायला काय हरकत आहे?" जोशीबाई म्हणाल्या.

"हो सहज जमेल" मी म्हटलं. "मागे एकदा मी एका बाईची नैसर्गिक प्रसूती केली होती. तेव्हा मी कॅसेट पाहिली नव्हती. त्यामुळे मी जराशी वेगळी पद्धत वापरली होती."

"हो? काय केलंस ते सांग तरी" जोशीबाई उत्सुकतेनं म्हणाल्या.

***

"मॅडम, ती पहिलटकरीण होती. रात्रीची वेळ होती. पोटात कळ आली की ती बाई अशी काय किंचाळायची, की चौथ्या मजल्यावरच्या डॉग लॅबमधली कुत्रीसुद्धा जागी झाली. मग दर वेळी ती किंचाळली की ती कुत्री तिकडे रडायला लागायची.

आमचं सगळ्यांचं डोकं उठलं. तिला ड्यूटीवरच्या नर्सांनी आणि आयाबाईंनी खूप समजावलं, पण काही उपयोग झाला नाही. शेवटी मी उठलो, तिच्याजवळ गेलो आणि म्हटलं, 'ए बाई, इतना आवाज क्यों करती हो? तकलीफ तो सबको होती है. अब मुंहसे जरासाभी आवाज आया तो देख.' तिने भेदरून मान हलवली. मी खुर्चीवर परत येऊन बसलो. पाच मिनिटं गेली, दहा मिनिटं गेली, तिचा आवाज नाही. मला काळजी वाटायला लागली. पटकन मेली बिली की काय असं माझ्या मनात आलं. मी उठलो, तिच्या दिशेने चार पावलं गेलो, तर 'घुर्र घुर्र' असा आवाज यायला लागला. जवळ जाऊन पहातो तर काय, ती चक्क घोरत होती. म्हटलं झालं तरी काय? मी तिला उठवलं आणि विचारलं, 'क्यों दर्द आना बंद हुवा क्या?' ती म्हणाली 'नही. दर्द तो होताही है. मी म्हटलं, 'फिर चिल्लाती कैसे नही?' ती म्हणाली, 'आप डाँटते हैं ना, इसलिये.' एवढं बोलून तिने परत डोळे मिटले आणि घोरायला लागली. प्रसूती होईपर्यंत ती परत एकदाही किंचाळली नाही. म्हणजे या कॅसेटमध्ये दाखवल्यासारखी नैसर्गिक प्रसूती झाली की नाही?"

मी सांगितलेल्या सत्यघटनेचा जोशीबाईंवर अपेक्षित परिणाम झाला असं दिसलं नाही. त्यांनी नाक मुरडण्यापलिकडे काही प्रतिक्रिया दर्शवली नाही. एखाद्या बाईची इच्छा असेल तर तिला न दुखण्याचं इंजेक्शन देता येत असे. लागलंच तर एपिड्युरल ॲनास्थेशियाही देता येत असे. ॲनास्थेटिस्ट सदैव गळ्यापर्यंत कामात बुडालेले असायचे ही गोष्ट वेगळी. नैसर्गिक प्रसूती हवी असेल तर तिची कॅसेटमध्ये दाखवल्यासारखी तयारी करायला हरकत नव्हती. पण तेवढा वेळ आणि पैसा

आपल्यासारख्या विकसनशील देशातल्या गरिबांसाठी असणाऱ्या हॉस्पिटलात कसा खर्च करणार? त्यापेक्षा तिला समजुतीच्या चार गोष्टी सांगणं सोपं होतं. त्यातून ती ओरडायला लागलीच तर सज्जड दम भरून नैसर्गिक प्रसूती करणं शक्य होतं. रुग्णाला दम देणं योग्य नसलं तरी हिस्टेरिकल झालेल्या रुग्णावर ही मात्रा बऱ्याचदा लागू पडत असे. पण जोशीबाईंनी एकदा एखादी गोष्ट चांगली आहे असं ठरवलं, की त्यांना इतर पर्यायांचा विचारही करवत नसे.

बाईंचं हे फॅड चार दिवस टिकेल आणि मग त्या ते विसरून जातील असं मला वाटलं होतं. पण या वेळी त्यांनी खरंच मनावर घेतलं होतं. वाचता येणाऱ्या सात स्त्रिया त्यांनी निवडून घेतल्या. प्रसूतीच्या काळात वाचण्यासाठी स्वतःच्या घरून चार-पाच पुस्तकं आणली. ऑपरेशन थिएटरमध्ये एंडोस्कोपीसाठी वापरायचे तो टीव्ही त्यांनी लेबर वॉर्डात हलवला. वेदना जाणवू नयेत म्हणून पेशंटांना संगीत ऐकवण्यासाठी त्या घरून वॉकमन आणणार होत्या, पण त्यांच्या मुलाने तो बेत हाणून पाडला. शेवटी त्यांनी घरातला एक जुना, वापरात नसलेला ट्रांझिस्टर आणला. सगळ्या साहित्याची जमवाजमव झाल्यावर त्यांनी त्या पेशंटांना विश्रांती कशी घ्यायची ते शिकवलं. पोटात कळ आल्यावर श्वासोच्छ्वास कसा करायचा त्याचे धडे दिले. पोटात कळा येत असताना लक्ष इतर गोष्टींवर केंद्रित करण्याचा सराव करण्यासाठी त्यांना ट्रांझिस्टरवर गाणी ऐकवली आणि टीव्हीवर दूरदर्शनचे कार्यक्रम दाखवले. त्यांच्याकडून पुस्तकं

वाचून घेतली आणि लोकरीचे स्वेटर कसे विणायचे त्याचे धडेही दिले.

सगळी तयारी झाली होती. आता आपल्या श्रमांचं चीज कसं होतं ते बघायचं तेवढं शिल्लक राहिलं होतं. पण सातापैकी एकाही बाईला प्रसववेदना सुरू होईनात. वाट बघून जोशीबाई कंटाळल्या. शेवटी त्यांनी ठरवलं की तारीख उलटून गेलेल्या तिघींना कळा सुरू व्हायचं इंजेक्शन सलाइनमध्ये घालून द्यायचं.

"एकाच दिवशी आपल्या तीन बायका या नव्या पद्धतीप्रमाणे प्रसूत होतील" त्या उत्साहाने म्हणाल्या.

"मग उद्याच्या वर्तमानपत्रात तुम्ही, त्या तिघी, आणि त्यांची बाळं असा एकत्र फोटो द्यायला हरकत नाही" मी म्हटलं. "आपल्या देशात ही सुरक्षित आणि कमी खर्चाची पद्धत यशस्वीपणे वापरणाऱ्या तुम्ही पहिल्या ठरणार हं."

बाईंच्या गालांवर या कल्पनेने गुलाब फुलले. लगेच त्यांच्या देखरेखीखाली सुषमाने त्या तिघींना कळा यायचं इंजेक्शन सलाइनमध्ये घालून लावलं. थोड्या वेळाने कळा सुरू झाल्या. बाया हाय हुय करायला लागल्या. जोशीबाईंना तसा निरोप गेला. बाई त्वरेने लेबर वॉर्डात हजर झाल्या. त्या तीन बायकांच्या आवडीप्रमाणे त्यांनी एकीला टीव्ही लावून दिला, दुसरीला ट्रांझिस्टर लावून दिला, आणि तिसरीला वाचायला पुस्तक दिलं.

"तुम्हाला शिकवल्याप्रमाणे श्वासोच्छवास करत रहा" त्या म्हणाल्या. बायकांनी श्वासोच्छवास करायला सुरुवात केली.

"बरं वाटतंय ना?" त्यांनी गोड आवाजात विचारलं.

"हो SS" त्या तिघी म्हणाल्या.

जोशीबाई आपल्या ऑफिसात पोचून दहा मिनिटं झाली असतील नसतील, सुषमाने त्यांना लेबर वॉर्डातून फोन केला. मी तिच्या शेजारी बसून सगळी गंमत बघत होतो.

"मॅडम, त्या भागीरथीबाईंना रेडिओवर चालू असणारा कृषीविषयक सल्ला ऐकायचा नाहीये. त्या म्हणतात की गाणी लावा. पण साडेदहा वाजता गाण्यांचा कार्यक्रम लागत नाही ...... आणि त्या लक्ष्मीबाई टीव्ही बघत नाहीयेत. शालेय चित्रवाणीचा कार्यक्रम चालू आहे. त्यांना चित्रपट किंवा कमीत कमी छायागीत बघायचंय. आता येवढ्या सकाळी चित्रपट किंवा छायागीत कसं लागेल? ...... हो, पार्वतीबाई मात्र पुस्तक वाचताहेत ...... बरं मॅडम" सुषमाने फोन ठेवला.

"काय म्हणाल्या मॅडम?" मी उत्सुकतेनं विचारलं.

"काय म्हणणार?" सुषमा या सगळ्या प्रकाराला अगदी कंटाळून गेलेली दिसत होती. "आहे तसं सगळं चालू ठेवा म्हणाल्या."

अर्धा तास असाच गेला. एव्हाना तिघींनाही जोरदार कळा यायला लागल्या होत्या. कसं काय चाललंय ते बघायला जोशीबाई लेबर वॉर्डात जातीने हजर झाल्या. वॉर्डाच्या दारात त्यांचं स्वागत आतून येणाऱ्या किंचाळ्यांनी झालं.

"सुषमा, ती कोण बाई किंचाळतेय तिला काहीतरी इंजेक्शन देऊन टाक ना. तिच्या किंचाळ्या ऐकून आपल्या बाया घाबरतील आणि किंचाळायला लागतील."

"मॅडम, आपल्याच बाया किंचाळताहेत" सुषमा म्हणाली. "तुम्हीच बोला ना त्यांच्याबरोबर. त्या माझं काहीच ऐकत नाहीयेत."
जोशीबाई लेबर वॉर्डात गेल्या. भागीरथीबाई पहिल्याच कॉटवर होत्या. जोशीबाईंचा हात घट्ट धरून त्या म्हणाल्या,
"माझं सिझेरियन करून टाका. मला आता सहन होत नाहीये."
"अहो असं काय करता? आपण केवढी तयारी केली होती. तसं करून बघा ना" जोशीबाई म्हणाल्या.
"अग आई ग" भागीरथीबाईंना तेवढ्यात एक जोरदार कळ आली. कळ सहन होत नाही म्हणून त्यांनी हातात असलेला जोशीबाईंचा हात येवढ्या जोराने दाबला की त्या सुद्धा ‘आई ग’ असं म्हणायच्या बेतात होत्या. पण समोर सुषमा आणि मी असल्यामुळे त्यांनी तसं केलं नाही. आपला हात सोडवून घेत त्या म्हणाल्या,
"ट्रांझिस्टर का ऐकत नाही तुम्ही?"
"मॅडम, एक जोराची कळ आली तेव्हा त्यांच्या हातातून ट्रांझिस्टर खाली पडला. तो आता चालत नाहीये" सुषमा म्हणाली.
जोशीबाईंचा चेहरा एकदम बघण्यासारखा झाला. बहुतेक आपला नवरा आपल्याला आता कच्चा खाईल असं त्यांचा मनात आलं असावं. थोड्या वेळाने त्यांचा तोंडावर थोडासा तजेला आला. किमान पक्षी आपण आपल्या मुलाचा वॉकमन इथे आणला नाही, त्यामुळे तो तरी आपल्याला कच्चा खाणार नाही असं त्यांच्या मनात आलं असावं. पण त्यांच्या नशीबात

फार काळ सुख लिहिलेलं नव्हतं. पलीकडून लक्ष्मीबाई आणि पार्वतीबाई यांनी एकदमच किंचाळायला सुरुवात केली.

"आता काय करायचं मॅडम?" सुषमाने विचारलं. "वॉर्डाच्या सिस्टर म्हणताहेत की काहीही करून या तिघींना गप्प करा, नाहीतर अशी खास तयारी न केलेल्या बायकासुद्धा किंचाळायला लागतील."

प्रसूत्योत्तर वॉर्डात एक नवजात अर्भक रडायला लागलं की संसर्गजन्य रोगाप्रमाणे सगळीच पोरं रडायला लागतात. पण होऊ घातलेल्या आयासुद्धा तशाच वागू शकतात हे मी पहिल्यांदाच पहात होतो.

"काय तुम्हाला वाटेल ते करा. आधी तो टीव्ही बंद करा" जोशीबाई म्हणाल्या. त्यांनी आपला ट्रांझिस्टर आणि पार्वतीबाईंनी जमिनीवर टाकलेलं आपलं पुस्तक उचललं.

"मॅडम, त्यांची नैसर्गिक प्रसूती..." सुषमा म्हणाली.

"काही नको. जे काय नेहमी करता तेच करा" असं म्हणून त्या निघून गेल्या.

"आता काय करायचं रे?" सुषमाने मला विचारलं. "मॅडमनी या तिघींना गोड गोड बोलून असं काही लाडावून ठेवलंय, की आता त्या कोणाचं काही ऐकतच नाहीयेत. मानसिक तयारी आणि व्यायाम न केलेल्या स्त्रियांच्या दुप्पट आरडाओरडा त्या करताहेत."

"नैसर्गिक प्रसूतीची दुसरी पद्धत आपण वापरूया. बघूया ही पद्धत मॅडमच्या पद्धतीपेक्षा जास्त परिणामकारक आहे का ते" असं म्हणून मी त्या तिघींसमोर उभा राहिलो आणि म्हटलं,

"बायांनो, येवढा आवाज कशाला करताय? जास्त नाटकं नकोयत, काय? खबरदार एकीच्याही तोंडून बारीकसाही आवाज आला तर. समजलं?"

तिघीही भेदरल्या. तिघींचीही तोंड बंद झाली. प्रसूती होईपर्यंत एकीनेही तोंडातून ब्र सुद्धा काढला नाही. तिघी प्रसूत झाल्यावर सुषमा आणि मी जोशीबाईंना जाऊन भेटलो.

"मॅडम, त्या तिघी झाल्या" सुषमा म्हणाली.

"बरं" जोशीबाई तुटकपणे म्हणाल्या. त्या विषयावर जास्त काही बोलायची त्यांची इच्छा दिसली नाही.

"मॅडम, नंतर त्या तिघींनी अजिबात त्रास दिला नाही" सुषमा म्हणाली.

बाईंचा चेहरा खुलला.

"म्हणजे आपली पद्धत यशस्वी ठरली तर" त्या म्हणाल्या.

"अं ... नाही, मॅडम. विजयने त्यांना सॉलिड दम भरला, तशी त्या गप्प झाल्या. मग त्यांनी प्रसूती होईपर्यंत तोंड उघडलं नाही" सुषमा म्हणाली.

बाईंचं तोंड पडलं.

"मॅडम, माझ्या नैसर्गिक प्रसूतीच्या पद्धतीवर तुम्हाला शोधप्रबंध लिहून कॉन्फरन्समध्ये वाचायचा असेल तर माझी हरकत नाही" मी म्हटलं. "तुम्हाला हव्या तेवढ्या केसेस मी करून देतो."

"काही नको" माझ्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकून त्या म्हणाल्या. भगवान शंकरासारखा तिसरा डोळा त्यांना असता, तर माझं काही खरं नव्हतं.

***

हातची एचोडीची जागा कायमची गेली हे काही जोशीबाईंच्या पचनी पडलं नव्हतं. जेव्हा हे घडलं तेव्हा कोर्टात जाण्याचा विचार त्यांनी केला होता. दोशीमॅडमनी त्यांना तसं करायसाठी चढवलंही होतं. त्यांना जोशी आणि अहुजा या दोघीही आवडत नसत. या दोघींचं भांडण लावून दिलं तर रोज चघळायला रंगतदार विषय मिळेल असा त्यांचा होरा होता.

"कोर्टाची प्रकरणं बर्षानुवर्षं चालतात. खर्चही खूप होतो" जोशीबाई म्हणाल्या होत्या.

ज्या नगरपालिकेच्या हॉस्पिटलात काम करायचं त्याच नगरपालिकेच्या विरुद्ध कोर्टात गेलं तर आपल्यावर डूख धरतील अशी भिती पण त्यांना वाटत होती. पण त्यांनी दोशीमॅडमसमोर तसं म्हटलं नव्हतं. पण त्यांच्यावरच्या बंदीचा दोन वर्षांचा काल संपत आला आणि त्यांच्या जुन्या इच्छेने उचल खाल्ली. दोन वर्षांत त्यांच्या नवऱ्याची प्रॅक्टीस बरीच वाढली होती. पैशाला तोटा नव्हता. त्यातच त्याने दोन-चार मंत्री, पाच-सहा संत्री यांचे गुढगे बदलून कृत्रिम गुढगे बसवून दिले होते. त्यामुळे सरकारदरबारी त्याचं वजन वाढलं होतं. आता कोर्टात गेलं तर कुठच्याच बाजूने त्रास होण्याची शक्यता दिसत नव्हती. बंदीची दोन वर्षं संपताच बाईंनी चांगलासा मुहूर्त पाहिला आणि कोर्टात नगरपालिका आणि अहुजाबाई यांच्यावर केस घातली.

"अरे मेहुल, हीनाने केस घातलीय म्हणे" दोशीमॅडमनी स्टाफरूममध्ये मेहतासरांबरोबर चर्चा सुरू केली.

"होय. तिचा वकील तोच आहे ज्याने कुख्यात गुंड शेरूला जैन बिल्डरच्या खुनाच्या आरोपातून सोडवलं होतं."

"तुला बरीच माहिती दिसतेय. हा वकील कुठे भेटला तिला?"
"तिला कसला भेटतो तो? तिचा नवरा हल्ली मोठा माणूस झालाय ना? त्याला अशी मंडळी भेटतात, गुडघे बदलून घेण्यासाठी."
"हं. पण ती जिंकेल का?"
"कोर्टात काय होईल सांगणं कठीण असतं. भरपूर पैसा खर्च केला तर जिंकेलही."
"पण हे असं बरं दिसतं का? आपल्याच हॉस्पिटलातल्या डॉक्टरवर केस घालणं म्हणजे फारच झालं नै?"
दोन वर्षांपूर्वी आपण जोशीबाईंना आता केलं तेच करायला सांगत होतो याचं दोशीमॅडमना विस्मरण झालंसं दिसत होतं. किंवा त्यांच्या विचारसरणीत आमूलाग्र बदल झालेला दिसत होता. तेवढ्यात जोशीबाई स्टाफरूममध्ये प्रवेश करत्या झाल्या. डोळ्यांची पापणीपण न हलवता दोशीमॅडम म्हणाल्या,
"ये हीना. तुला शंभर वर्षं आयुष्य आहे. आत्ताच मी मेहुलला म्हणत होते की तुझ्यावर खूप अन्याय झालाय. बरं केलंस तू कोर्टात गेलीस ते. मी तर तुला दोन वर्षांपूर्वीच कोर्टात जा असं म्हणाले होते."
मेहतासरांनी चेहऱ्यावरच्या स्मितहास्यात किंचितसाही बदल होऊ दिला नाही. मेहता-दोशी अद्वैत होतं असं सगळे म्हणायचे ते खरं दिसत होतं. एकाच आत्म्याचे ते दोन भाग होते. एकमेकांना ते पूर्णपणे ओळखत होते आणि ती ओळख त्यांना एकदम पसंत दिसत होती.
वकिलाने बाईंना बहुधा तोंड बंद ठेवायचा सल्ला दिला असावा. जोशीबाईंनी 'हुं' असा आवाज काढला, पण नेहमीप्रमाणे

त्यांचं तोंड उघडून त्यातून वाक्यं बाहेर घरंगळायला सुरुवात झाली नाही.

"मला खात्री आहे तू जिंकणारच" दोशीमॅडमनी जोशीबाईंना बोलतं करायचे प्रयत्न सोडले नाहीत. चिकाटी हा त्यांचा वाखाणण्यासारखा गुण होता.

"बघूया" जोशीबाई थोडक्यात बोलल्या. तोंड बंद ठेवताना त्यांना होणारा मानसिक त्रास त्यांच्या तोंडावर इतका स्पष्ट दिसत होता की त्यांनी मला इतकी वाईट वागणूक दिलेली नसती तर मला त्यांची दया आली असती. कर्ता करविता परमेश्वर मनात कोणतीही भावना न आणता या सर्व घटना तिथून वरून बघत असेल असं माझ्या मनात आलं. मला त्रास दिल्याची शिक्षा तो जोशीबाईंना देतोय असं समजून मी त्यांना होणारा मानसिक त्रास मोठ्या आनंदाने अवलोकन करत होतो.

"तुझा वकील खूप हुशार आहे म्हणे. त्याने शेरूभाईला जैन खून खटल्यातून सोडवलं होतं ना?"

आतून विलक्षण त्रास होत असल्यासारखं तोंड करून जोशीबाई उठल्या आणि तिरमिरल्यासारख्या स्टाफरूममधून बाहेर पडल्या.

"अशी काय ती हीना? येवढं चांगलं मी बोलले तर उठून गेली. अगदी काहीच मॅनर्स नाहीत तिला."

"नीना, तसं नसेल ते. कदाचित निसर्गाची हाक ऐकून ती गेली असेल" मेहतासर हसून म्हणाले.

"निसर्गाची हाक?" दोशीमॅडमना काही कळलं नाही. 'नेचर्स कॉल'चं ते मराठी भाषांतर तसं पाहिलं तर समजायला

कठीणच होतं. पण मेहतासर वर्षानुवर्षं विद्यार्थ्यांच्या प्रत्येक तुकडीला तेच विनोद सांगत आले होते. एकेकाळी मी सुद्धा त्यांचा विद्यार्थी होतो. मला तो विनोद पटकन कळला. शाळेतली मुलं शिक्षकांची परवानगी मागताना हाताची मूठ वळून करंगळी वर करून दाखवतात तसं त्यांनी करून दाखवल्यावर दोशीमॅडम जोरजोरात हसायला लागल्या. त्या दोघांचं अद्वैत असूनही त्यांनी मेहतासरांचा हा विनोद ऐकलेला नव्हता ही खरोखर आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट होती.

हॉस्पिटलच्या आवारात जोशीबाई आणि अहुजाबाई समोरासमोर आल्या तर एकमेकींकडे न बघता आपापल्या रस्त्याने आधीपासूनच जात असत. आता तर जोशीबाई मागे बघत पुढे जायला लागल्या, आणि अहुजाबाई क्षितिजरेषा असेल तेवढ्या अंतरावर शून्यातल्या एका बिंदूवर नजर रोखून जायला लागल्या. आसपासच्या मंडळींना हा प्रकार पाहून अवघडल्यासारखं व्हायला लागलं. पण कोर्टकेसचा निकाल लागेपर्यंत, आणि बहुधा नंतरही हे असंच चालणार हे आम्ही समजून चाललो होतो.

"अरे विजय, अशी मधेच कशी काय सणकी आली बाईंना?" निनादने मला विचारलं. तो बहुधा सगळ्यांचच मत विचारत फिरत होता.

"त्या म्हणतात, त्यांचा दोन वर्षांचा बंदीचा काळ संपला आहे. आता त्यांना त्यांच्या हक्काची एचोडीची जागा मिळाली पाहिजे."

"अरे, पण अहुजाबाईंना जी जागा मिळाली आहे ती कायमस्वरूपी मिळाली आहे. आता जर कुठे एचोडीची जागा

रिकामी झाली तरच ती जोशीबाईंना मिळू शकेल" निनाद म्हणाला.

"खरय तू म्हणतोस ते. पण कायद्यात इतक्या काही गोष्टी असतात, की त्या वापरून वाल्या कोळी वाल्मिकी आहे असं सिद्ध करता येईल. त्या काळी वकील नव्हते म्हणून बिचाऱ्याला तपश्चर्या करावी लागली" मी म्हटलं.

"तसं नव्हतं ते. त्याला उपरती झाली म्हणून तो तपश्चर्या करून वाल्मिकी महाराज झाला" सुषमा म्हणाली.

मी हात जोडून काहीतरी पुटपुटलो.

"काय म्हणालास तू?" तिने संशयाने विचारलं.

"अरसिकेषु कवित्वनिवेदनम् शिरसि मा लिख, मा लिख, मा लिख असं मी देवाला उद्देशून म्हणालो."

ती तडकाफडकी उठून चालायला लागली.

"काही वर्षांत सुषमाची दुसरी जोशीबाई होणार, लागली पैज?" राजेश म्हणाला.

"एक पुरे नाही झाली का? शुभ शुभ बोलो" निनाद म्हणाला.

शुभ बोललं किंवा अशुभ बोललं तरी सुषमा दुसरी जोशीबाई होत होती हे सत्य काही बदलणार नव्हतं. राजमाता हॉस्पिटलचे आणि आमचे भोग म्हणून या बायका आपापल्या खुर्च्या पकडून आहेत असं समजून मी मनाची समजूत घातली.

तिथे कोर्टकेस लांबत होती. अकस्मात एक दिवस अहुजाबाईंनी कोर्टाला पत्र देऊन टाकलं, की एचोडीची जागा आपल्याला नको, ती जोशीबाईंना देऊन टाकावी. आम्ही सगळे चाट पडलो. "काय मॅडम, तुम्ही एचोडीची पोस्ट सोडून दिली?" मी विचारलं.

"जाऊ दे रे. इथे कोणाला वेळ आहे कोर्टात चकरा मारायला? घेऊ दे तिला ती पोस्ट" अहुजाबाई म्हणाल्या.

"पण हा अन्याय आहे" मी म्हटलं. जरी मला युनिट मिळण्याच्या वेळी अहुजाबाईंनी मला त्रास दिला होता तरी एरवी त्या तशा बऱ्या होत्या, आणि न्याय-अन्यायाच्या बाबतीत मी माझ्या आवडीप्रमाणे माझी मतं बदलत नसे.

"असंच असतं आयुष्यात. स्वीकारायचं आणि पुढे जायचं" असं म्हणून त्या निघून गेल्या.

"काही तरी मुरतंय" निनाद म्हणाला.

काय मुरत होतं त्यावर स्टाफरूममध्ये चर्चा झाली.

"मेहुल, त्या दोघींनी कोर्टाबाहेर तडजोड केली की काय?" दोशीमॅडमनी विचारलं.

"नाही. मी काहीतरी दुसरंच ऐकलंय" सर्वांना ऐकू जाईल अशा खाजगी आवाजात मेहतासर म्हणाले. "कोणा भाईच्या माणसाने अहुजाला सांगितलं की माघार घे नाहीतर पुढे माघार घ्यायच्या परिस्थितीत रहायची नाहीस."

"बाप रे! ही तर गुंडगिरी झाली" दोशीमॅडम म्हणाल्या.

"मी फक्त असं ऐकलं. खरंखोटं अहुजा जाणे" मेहतासर मिश्किल चेहरा करून म्हणाले.

आपली झाशीच्या राणीसारखा लढाऊ बाणा असणारी, पण फालतू स्वार्थासाठी लढणारी बायको रोज पिडते म्हणून बहुधा जोशीबाईंच्या नवऱ्याने हा झटपट मार्ग शोधून काढला असावा असं माझं मत होतं, जे मी माझ्याजवळच ठेवलं.

***

दोशीमॅडम सेवानिवृत्त व्हायला आल्या आणि आता कोणाला युनिट मिळणार याची समीकरणं मांडली जाऊ लागली. कोणीही आलं तरी असं व्यक्तीमत्व राजमाताला परत लाभणार नाही हे मला पक्कं ठाउक होतं. दोशीमॅडमना खरं तर सेवानिवृत्त व्हायचं नव्हतं. पण वयाची अठ्ठावन्न वर्षं झाली की सेवानिवृत्त व्हावंच लागायचं. जर अशा व्यक्तीने असामान्य कार्य केलेलं असलं तर पूर्वी तिची प्रोफेसर एमेरिटस या सन्मान्य जागेवर नेमणूक होत असे. खरं तर ही नेमणूक फक्त एका वर्षासाठी होत असे असं मी ऐकून होतो. पण बैठकीला मिळालेली खुर्ची आणि लावायला मिळालेली पदवी सोडणं माणसाच्या फार जिवावर येतं. त्यामुळे ही सगळी मंडळी आपली प्रोफेसर एमेरिटसगिरी कायमचीच मिरवायला लागली. जरी हॉस्पिटल त्यांना या कामासाठी फुटकी कवडीदेखिल देत नसे, तरी आपल्या व्हिजिटिंग कार्डांवर आणि लेटरहेडवर राजमाताचे एमेरिटस प्रोफेसर असं छापून ती आपला दबदबा वाढवायची. भारतात स्पेशल एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेटांचं जसं पीक आलं आणि पानवालेसुद्धा स्पेशल एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेटचे स्टॅंप घेऊन बसायला लागले, तसं या एमेरिटस प्रोफेसरांचं सुद्धा भरघोस पीक आलं. यावर लान्सेट की ब्रिटिश जर्नलमध्ये थोडसं विनोदी स्फुटसुद्धा छापून आलं म्हणे. ते विद्यापीठाच्या कुलपतींना कोणीतरी दाखवलं. दाखवणाऱ्याची झाली गंमत, पण या सेवानिवृत्त होऊ घातलेल्या प्रोफेसरांचा जीव गेला ना. कुलपतींनी एक फतवा काढला आणि ही प्रथा बंद केली. दोशीमॅडम एमेरिटस प्रोफेसर काही होऊ शकल्या नाहीत.

सेवानिवृत्त होणाऱ्या प्रोफेसरला निरोप द्यायचा समारंभ करण्याची आमच्याकडे रूढी होती. खरं तर सगळ्या वरिष्ठ मंडळींमध्ये येवढे हेवेदावे होते, की होता होईतो ती एकमेकांची तोंड बघत नसत, आणि बघितलीच तर पाण्यात बघत. पण निरोप समारंभाच्या वेळी सगळ्यांना खूप उत्साह यायचा. ब्याद गेली एकदाची हाच विचार मंडळींच्या मनात असायचा. ब्यादीला जाताना स्वतःच्या डोळ्यांनी बघून खात्री करावी म्हणून प्रत्येक जण या समारंभाला हजर रहात असे. हजर रहाण्याचं दुसरंही एक महत्त्वाचं कारण होतं. निरोप देताना द्यायच्या भेटवस्तूसाठी आणि उपस्थितांच्या चहापाण्यासाठी निवृत्त होणारी व्यक्ती सोडून इतर सगळ्यांकडून सक्तीने वर्गणी घेतली जात असे. वर्गणी तर दिलीच आहे, मग खाणंपिणं फुकट का सोडायचं या विचाराने या समारंभात उपस्थिती शंभर टक्के असायची.

दोशीमॅडमच्या निरोप समारंभाची वर्गणी मी सुद्धा दिली होती. माझं कर्तव्य मी पार पाडलं होतं. आता त्या दिवशी जेवणाचा डबा आठवणीने न नेण्यापलिकडे मला करण्यासारखं काही उरलं नव्हतं. पण अनपेक्षितपणे एक काम माझ्या डोक्यावर आलं. आलं म्हणण्यापेक्षा जोशीबाईंनी ते टाकलं असंच म्हटलं पाहिजे.

"विजय" जोशीबाईंचा असा गोड आवाज आला की आता आपल्या पाठी काहीतरी बला लागणार येवढं ओळखायला मी एव्हाना शिकलो होतो. "डॉक्टर नीना दोशींचा निरोप समारंभ परवा आहे."

"हो" मी म्हटलं. पदरचे तीनशे रुपये त्यासाठी गेले असल्यामुळे मी ती गोष्ट सहज विसरणं शक्य नव्हतं.

"त्या प्रसंगी तुला भाषण करायचंय" बाई म्हणाल्या.

"मॅडम, मी? मी तर साधा अप्रो आहे. भाषण एचोडी नाहीतर एखाद्या प्रोफेसरने केलं पाहिजे." जोशीबाई एचोडी होत्या. त्यांनी ते काम माझ्यावर ढकलावं हे काही मला योग्य वाटलं नाही. "तुम्ही का नाही भाषण करत? तुम्ही तर नेहमी छान बोलता."

"मी .... अं .... अं .... मला" त्यांना पटकन काय खोटं बोलायचं ते सुचेना. जोशीबाई खोटं बोलायच्या, पण त्यांना ते सफाईदारपणे करता येत नसे. मागे एकदा दोशीमॅडमच्या एका पेशंटला इमर्जन्सीत ऑपरेशनची गरज भासली होती. त्यांनी आपल्याला राजमातात पोचायला वेळ लागेल, तोपर्यंत जोशीबाईंना बोलावून ऑपरेशन सुरू करून घ्या असं सांगितलं होतं. जोशीबाईंना यायचं नव्हतं. तेव्हा त्यांनी असंच अं अं करून आपला दात दुखतोय असं म्हणून यायचं टाळलं होतं. दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा मी त्यांची दातदुखी कशी आहे असं त्यांना विचारलं, तेव्हा त्यांनी कुठची दातदुखी असा मलाच प्रतिप्रश्न केला होता. तेव्हा त्यांचं भांड फुटलं हे मला चांगलं आठवत होतं, पण त्यांना आज ते आठवत होतं की नाही देव जाणे.

"तुमचा दात वगैरे दुखतोय का?" मी सहज आवाजात विचारलं. त्यांनी माझ्याकडे रोखून पाहिलं. माझ्या बोलण्याचा रोख त्यांच्या लक्षात आला नाही. माणसं स्वतःच्या चुका फार लवकर विसरतात. "की घसा धरलाय?" मी त्यांच्या युनिटमध्ये

नसल्यामुळे आणि स्वतः अप्रो असल्यामुळे पूर्वीपेक्षा जास्त धीटपणे बोलू शकत होतो.

"अं .... अं .... मला ना, तिच्याबद्दल काही बोलावसं वाटत नाही. तू तिच्या हाताखाली वर्षभर होतास. तुला बोलायला हरकत नाही."

मलापण त्यांच्याबद्दल बोलावसं वाटत नाही असं मला म्हणावसं वाटलं. पण ते बरं दिसलं नसतं. "दोन दिवसांत मी तयारी कशी करणार?" मी म्हटलं.

"त्याची कसली तयारी करायचीय? अशा वेळी काय बोलतात ते तुला माहित नाही का?"

सेवानिवृत्तीच्या वेळी, शोकसभेमध्ये वगैरे भाषणं करणारी मंडळी व्यक्तीचं नाव आणि एक-दोन-संदर्भ बदलून तीच तीच भाषणं करतात याची मला कल्पना होती. पण मी सुद्धा तेच करावं अशी माझी इच्छा अजिबात नव्हती.

"ठीक आहे. प्रयत्न करतो. मला त्यांची माहिती कुठे मिळेल का?"

"आपल्या टायपिस्टकडे त्यांची फाईल आहे. त्या फायलीत सगळी माहिती मिळेल तुला."

मी टायपिस्टकडे गेलो. फायली बनवण्यात आणि त्या शोधून काढण्यात त्या वाकबगार होत्या. त्यांनी दोशीमॅडमची फाईल अर्ध्या मिनिटात काढून माझ्या हातात ठेवली.

"येवढ्या पटकन मिळाली फाईल" मी विचारलं.

"हो. आता त्या रिटायर होणार ना? मग ती फाईल क्लोज करून रेकॉर्ड ऑफिसमध्ये पाठवायला हवी. म्हणून ती कपाटात वरच काढून ठेवली होती."

टायपिस्टबाईंनी सगळ्यांच्या फायली आद्याक्षरांप्रमाणे न लावता जन्मतारखेप्रमाणे लावलेल्या दिसत होत्या.

"नंतरची फाईल कोणाची आहे?" मी विचारलं.

"मेहतासरांची" त्यांनी क्षणभरही विचार न करता सांगितलं. "अजून सहा महिने आहेत त्यांचे."

'चला, सहा महिन्यांनी परत खिशातले तीनशे रुपये जाणार म्हणायचे' मी मनातल्या मनात म्हणालो. 'भाषणासाठी ती फाईलसुद्धा माझ्याच गळ्यात नाही पडली म्हणजे मिळवलं.'

दोशीमॅडमबद्दल भाषण करताना काय बोलायचं म्हणण्यापेक्षा काय बोलायचं नाही हे ठरवणं अधिक कठीण होतं. आठवणी अनेक होत्या. आम्ही विद्यार्थी असताना त्यांच्या लेक्चर्सना असणारी ती गर्दी. कट्ट्यावर न बसता त्यांच्या लेक्चर्सना येऊन बसणारी आणि लेक्चर चालू असताना त्यांचा पदर किती वेळा ढळायचा ते मोजणारी नवीन आणि त्याची मित्रमंडळी. ऑपरेशन आधी कोणी करायचं यावर त्यांची चाळीतल्या पाण्याच्या नळावर होत तशी जोशीबाईंबरोबर होणारी भांडणं. चांगली केस त्यांनी करायची की जोशीबाईंनी यावर पारकर सरांना त्या लावायच्या तो मस्का. गर्भाशयाच्या कॅन्सरचं ऑपरेशन करताना दोन्ही मूत्रनलिका चुकून बांधल्यामुळे किडनी फेल होऊन मेलेली त्यांची पेशंट. ऑपरेशन लिस्टवरचं प्रत्येक ऑपरेशन स्वतःच करण्याची त्यांची इच्छा. मदत करण्याच्या मिशाने मधेच घुसून हाउसमन आणि रजिस्ट्रारच्या केसेसवर स्वतःच ऑपरेशन करण्याची त्यांची हातोटी. माझी एम्.डी. ची परिक्षा झाल्यावर मला न मागता देऊ केलेली मोलकरणीच्या पगाराहून कमी

पगाराची, पडेल ते काम करायची नोकरी. तसं करताना आपलं काही चुकतंय असं न जाणवण्यातून दिसणारा त्यांचा निष्पापपणा. घरी विसरलेल्या सोन्याच्या बांगड्या ओटीच्या सर्व्हंटांनी चोरल्या असा संशय व्यक्त करून त्यांना पोलिस स्टेशनमध्ये पोचवणं. स्वतः केलेल्या ऑपरेशननंतर पेशंटला रक्तस्त्राव झाला तर त्याचं दोष रजिस्ट्रार आणि हाउसमनवर फोडणं. एंडोस्कोपीची कातर मेहतासरांनी मोडली असताना ती विजयने मोडली असं जाहीर करणं. मी अप्रो झाल्यावर मला युनिट मिळण्याच्या वेळी पदरचं काहीही जात नसताना त्याला विरोध करणं.

आठवणी अनंत होत्या, पण भाषणात सांगण्यासारख्या नव्हत्या. शेवटी मी ऐन वेळी जे सुचेल ते बोलायचं असं ठरवलं.

***

भाषण करायचा मोका मला मिळालाच नाही. दोशीमॅडमनी जाहीर केलं की त्यांना असली भाषणं वगैरे प्रकार बिलकूल आवडत नसत. आपण स्वतःच चार वाक्य बोलू असं त्या म्हणाल्या. मी परमेश्वराचे आभार मानून श्रोतृवर्गात बसलो. म्हैसूर सिल्कची साडी नेसून त्या आल्या तेव्हा सर्वांनी टाळ्या वाजवल्या. सर्वांनी वाजवल्या म्हणून मी पण वाजवल्या, पण त्या वाजवण्याचं कारण काही मला कळलं नाही. खरं तर त्यांची साडी म्हैसूर सिल्कची होती हे सुद्धा मला कळलं नव्हतं. कोणा माहितगार लेक्चररने तसं म्हटलं तेव्हा मला ते कळलं होतं.

"दोशीमॅडमचा पदर आज कमीतकमी दहा वेळा तरी पडणार. लागली पैज?" राजेश म्हणाला.
नेहमीप्रमाणे कोणीही त्याच्याबरोबर पैज लावली नाही.
जोशीबाईंनी तद्दन खोटा सूर लावून दोशीमॅडमच्या सेवानिवृत्तीमुळे सर्वांना फार दुःख होतंय असं जाहीर केलं आणि त्यांनी फूल ना फुलाची पाकळी स्वीकारावी अशी विनंती केली. त्याबरोबर म्हैसूर सिल्कची साडी नेसलेली दोशीमॅडमची रजिस्ट्रार शेफाली पुढे झाली. आयुष्यात कधीही साडी नेसलेली नसूनही ती इतकी झकपक साडी नेसली होती की तिने तयार साडी नाडीने कमरेभोवती बांधली असावी असा बऱ्याच जणांना संशय आला. नंतर कळलं की दोशीमॅडम आणि ती अशा दोघीही एकाच जाणत्या बाईकडे जाऊन समारंभासाठी खास साड्या नेसवून घेऊन आल्या होत्या. प्रत्येकी सात-आठ पिना वापरलेल्या असल्यामुळे दोघी अशा नीटनेटक्या दिसत होत्या. राजेशबरोबर पैज लावली असती तर मी आज जिंकलो असतो असं माझ्या मनांत आलं.
शेफालीने त्यांना एक खूप पाकळ्यांचा फुलांचा गुच्छ आणि एक चांदीचं ताट दिलं. त्या ताटाचं त्या काय करू शकल्या असत्या देव जाणे. त्यांना स्वतःला जेवायला पुरेल येवढं मोठं ताट आमच्या अंदाजपत्रकात बसत नव्हतं. त्यांची दोन्ही मुलं अमेरिकेत स्थायिक झाली होती. त्यामुळे त्यांची नातवंडं त्या ताटात जेवली असती अशीही शक्यता नव्हती. ते ताट कोणाला देऊन टाकणंही त्यांना शक्य नव्हतं, कारण त्याच्यावर ठसठशीत अक्षरात आमच्या डिपार्टमेंटकडून सप्रेम भेट असं लिहिलेलं होतं. माणूस जन्मभर अनेक वस्तू गोळा

करतो त्यांच्यात सेवानिवृत्तीच्या वेळी जराशी भर या पलिकडे त्या ताटाचा काही उपयोग नव्हता. घसघशीत दिसलं पाहिजे म्हणून जोशीबाईंच्या सूचनेनुसार ताटाची खरेदी झाली होती. ॲल्युमिनिअमचं मोठं भांडं घेतलं तर ते जास्त घसघशीत दिसेल आणि दोशीमॅडमना ते त्यांचा नर्सिंगहोममध्ये ऑपरेशनची उपकरणं उकळून निर्जंतूक करायला उपयोगी पडेल असं मी सुचवलं होतं. जोशीबाईंनी ती सुंदर कल्पना तडकाफडकी फेटाळून लावली होती. कदाचित उपकरणं उकळायला नवं भांडं मिळालं तर दोशीमॅडमची प्रॅक्टीस वाढेल अशी त्यांना भिती वाटली असेल.

पांडूने प्रत्येकाच्या पुढ्यात खाण्याची प्लेट नेऊन ठेवली. पंजाबी समोसा, ढोकळा, वेफर्स, केकचा तुकडा, आणि पिण्यासाठी शीतपेयाची बाटली असा बेत होता. आम्ही खायला सुरुवात केली. भाषण करायला उभ्या राहिलेल्या दोशीमॅडमच्या समोरही त्याने एक प्लेट नेऊन ठेवली. त्या बोलत असताना खाऊ शकणार नाहीत, उगाच त्या पदार्थांवर माशा बसतील, तेव्हां त्यांना भाषणानंतर प्लेट दे असं मी पांडूला म्हटलं. पण जोशीबाईंनी ती कल्पनाही फेटाळून लावली. दूरदर्शनच्या निवेदिका पूर्वी बातम्या वाचताना हाताच्या नाजूक हालचाली करून माशा हाकलायच्या, तसं दोशीमॅडमनी करावं अशी त्यांची इच्छा होती की माशा बसलेले पदार्थ खाऊन त्यांना उलट्या, जुलाब, आंव, कॉलरा, टायफॉइड, कावीळ वगैरे खूपसे आजार एकदम व्हावे असा त्यांचा दुष्ट हेतू होता ते त्यांच्या चेहऱ्यावर वाचता येत नव्हतं. दोशीमॅडमनी दोनदा माशा हाकलल्यावर शेफाली तत्परतेनं पुढे झाली आणि उरलेल्या

भाषणाच्या वेळात माशा हाकलण्याचं काम तिने आपल्या अंगावर घेतलं. जमलं तर तिला कुठेतरी पिटाळायचा जोशीबाईंचा बेत असावा. पण स्त्रियांना अशा गोष्टी न सांगता जाणवतात म्हणे. शेफालीने तिच्याकडे रोखून बघणाऱ्या जोशीबाईंच्या नजरेला एकदाही नजर भिडवली नाही.

"मी याच कॉलेजात शिकले" दोशीमॅडम बोलत होत्या. " माझी विद्यार्थीदशा मला अजूनही नीट आठवतेय. असे मंतरलेले दिवस होते ते. आम्ही खूप अभ्यास करायचो, खूप खेळायचो ...."

"खेळायचीस की मुलांना खेळवायचीस?" जोशीबाई पुटपुटल्या. मी त्यांच्या शेजारीच बसलो होतो. मी त्यांच्याकडे चमकून बघितलं. ती कौतुकाची नजर समजून जोशीबाई सुखावल्या.

"आम्ही कॉलेजच्या वार्षिकोत्सवात सक्रिय भाग घ्यायचो. नाटकं, नाच ...."

"भरतनाट्यम करताना साडी स्टेजवर सुटली ते तुला कळलंसुद्धा नव्हतं. तशीच नाचत राहिली होतीस. शेवटी पडदा पाडावा लागला होता. विसरलीस?" जोशीबाई पुटपुटल्या. मी ऐकतोय याची त्यांनी तिरक्या नजरेनं बघून खात्री करून घेतली. मी जर काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही किंवा मनात आल्याप्रमाणे कपाळाला आठ्या घातल्या तर त्यांना वाईट वाटेल म्हणून मी भुवया वर केल्या. त्याने त्यांचं समाधान झालंसं दिसलं.

"मी हाउसपोस्ट आणि रजिस्ट्रारची पोस्ट इथंच केली. मी डॉक्टर भडभड्यांची आवडती स्टुडंट होते."

"त्याचं कारण तुझी हुशारी हे नव्हतं." जोशीबाईंनी दोशीमॅडमना उद्देशून मला सांगितलं. मी चेहरा जेवढा गोंधळलेला दाखवता येईल तेवढा दाखवला.

"त्यांनी मला इतकं शिकवलं की मी त्यांची आजन्म ऋणी आहे."

"त्यांच्याबरोबर लोणावळ्याला जाऊन रहायचीस म्हणून तर तुला एम्.डी.चं गोल्ड मेडल आणि नंतर ऑनररीची पोस्ट मिळाली. सगळ्यांना माहित आहे" जोशीबाईंनी हलक्या आवाजात गौप्यस्फोट केला.

"त्यांच्या व्याख्यांनांची आणि कॉन्फरन्समध्ये वाचायच्या शोधनिबंधांची तयारी आम्ही लोणावळ्याला त्यांच्या बंगल्यात जायचो तेव्हा मी स्वतः करून द्यायचे."

"शी! त्यांच्याबरोबर लोणावळ्याला जाऊन रहायचीस ते सगळ्यांसमोर कबूल करायला लाज नाही वाटत?" आवाज चढू न देता जोशीबाईंनी विचारलं. त्या इतका वेळ बोलत होत्या ते खरं होतं याचा पुरावा दोशीमॅडमनी स्वतःच दिला याचा त्यांना कोण आनंद झाला होता. त्यांनी माझ्याकडे विजयी मुद्रेनं पाहिलं. मी उत्तरादाखल ओठ मुडपले. त्याचा त्यांनी काय अर्थ लावला कोण जाणे.

"डॉक्टर भडभड्यांनी मला संशोधन करायला प्रोत्साहन दिलं. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी आय.सी.एम्.आर.चं संशोधन केलं. या संशोधनकार्यात आजच्या घडीला वीस माणसं कार्यरत आहेत."

आय.सी.एम्.आर.साठी त्यांनी खूप काम केलं आणि हॉस्पिटलचं नाव मोठं केलं हे अगदी खरं होतं.

"दहा माणसांच्या पगारातून पैसे कापून त्यातून आणखी दहा माणसांना नोकरीला ठेवलंस त्याचं काय?" जोशीबाईंनी विचारलं. हे मलाही माहित होतं. मला महिना दोनशे रुपये पगारावर एकवीसावा कर्मचारी बनण्याची संधी दोशीमॅडमनी देऊ केली होती. मी ती नाकारली होती ती गोष्ट वेगळी.

"मला माझ्या पतीचे आभार मानले पाहिजेत" दोशीमॅडम म्हणाल्या. मी रात्री इमर्जन्सीसाठी यायचे तेव्हा लक्ष्मण सोबतीला यायचा. ऑपरेशन संपेपर्यंत गाडीत बसून रहायचा, आणि मग मला घेऊन घरी जायचा."

"का? तुला येत होतं ना ड्रायव्हिंग?" जोशीबाई पुटपुटल्या. रात्री बायकोला कोणीतरी काहीतरी करेल या भितीपोटी तो येत असावा, पण ते समजण्यायेवढी प्रगल्भता जोशीबाईंना नसावी.

"लक्ष्मणसारखा समजूतदार आणि आधार देणारा नवरा मिळायला भाग्य लागतं" दोशीमॅडम म्हणाल्या.

"तुझी लग्नाआधीची लफडी सगळ्या दुनियेला समजली होती. तुला नवरा मिळाला हेच मोठं भाग्य समज. भडभड्यांनी जमवलं ना तुझं लग्न?" जोशीबाईंचं दोशीमॅडमबद्दलचं ज्ञान मोठं सर्वंकष दिसत होतं. ही गोष्ट दोशीमॅडमना माहित होती की नाही देव जाणे.

"आपण सर्वांनी मला जे प्रेम दिलं त्याबद्दल मी आपली ऋणी आहे."

"कोणी प्रेम दिलं तुला?" जोशीबाईंचा आवाज जरासा चढला. मी चपापून इकडे तिकडे पाहिलं. सुदैवाने मी सोडून इतर कोणी ते ऐकलंसं दिसलं नाही. "भडभड्यांनी दिलं म्हणून इतरांनी दिलं असं होत नाही."

"आपला निरोप घेताना आज मला खूप दुःख होतय" असं म्हणून दोशीमॅडमनी चष्मा काढून रुमालाने डोळे पुसले. मग त्याच रुमालाने चष्मा पुसला. जोशीबाईंनी "हूं" असा गुदमरल्यासारखा आवाज काढला. तो बऱ्याच जणांनी ऐकला, आणि त्यांच्याकडे वळून पाहिलं. त्यावर त्यांनी मोठ्याने घसा खाकरून घशात काहीतरी अडकलं होतं असं नाटक केलं. त्याला कोणी फसलं असेल असं मला वाटत नाही.

"जर आपण मला कधीही बोलावलंत, तर हातातली सगळी कामं सोडून मी येईन" दोशीमॅडम म्हणाल्या.

आता जोशीबाई वाट बघ असं म्हणतील असं माझ्या मनात आलं. त्यांच तोंड तसंच दिसत होतं. पण तेवढ्यात दोशीमॅडम खाली बसल्या आणि त्याबरोबर सर्वांनी टाळ्या वाजवल्या. त्या आवाजात जोशीबाईंचे शब्द कुठच्या कुठे विरून गेले. खाणंपिणं आटोपल्यावर दोशीमॅडम आपलं चांदीचं ताट आणि फुलं घेऊन उठल्या. शेफाली त्यांना गाडीपर्यंत सोडायला गेली. मंडळी पांगली.

"तुम्ही दोशीमॅडमच्या भाषणावर केलेल्या कॉमेंट्स मनोरंजक होत्या" मी म्हटलं. "पण येवढ्या सगळ्या गोष्टी तुम्हाला कळल्या कशा? त्यांच्या विद्यार्थीदशेत तर तुम्ही येथे नव्हता."

"ऊं! त्यात काय येवढं? या गोष्टी त्या वेळच्या सगळ्यांना माहित आहेत" जोशीबाई म्हणाल्या.

म्हणजे या गोष्टी शंभर टक्के खऱ्या आहेत असं त्यांना ध्वनित करायचं असावं. त्यांच्या खरेपणाबद्दल मला वाटणारा संशय मी व्यक्त केला नाही.

"येवढं सगळं बोलण्यासारखं असून तुम्ही भाषण करायला नकार का बरं दिलात?" मी विचारलं. "आता ज्या गोष्टी मला एकट्यालाच समजल्यायत, त्या सगळ्यांना कळल्या असत्या ना."

"चल रे! काही तरी काय? अशा गोष्टी कोणी भाषणात सांगतं काय?" त्या जरासं लाजून म्हणाल्या. त्यांना काय म्हणायचं होतं ते मला बरोबर कळलं. ज्या गोष्टी त्या जाहीरपणे सांगायला घाबरत होत्या, त्या मला सांगायला त्यांना काहीच वाटत नव्हतं. त्या मी त्यांच्याकडून ऐकल्या असं म्हणून चार जणांना आणि त्या चार जणांनी आणखी चार चार जणांना सांगितल्या असत्या तर त्यांना ते हवंच होतं.

"काय रे, एकदम हंसलास. काय झालं?"

"काही नाही" मी म्हटलं. जोशीबाईंच्या सेवानिवृत्तीच्या वेळी त्या भाषण करतील तेव्हा मी अशाच प्रकारे कोणकोणत्या तळटीपा प्रत्येक वाक्याला जोडू शकेन ते मनात येऊन मला हसू आलं होतं.

***

"सर, कसे आहात?"

"अरे, प्रिया? आज इथे कुठे?" मी चिंपोलीत लेक्चरर असताना प्रिया तिथे रजिस्ट्रार होती. मी राजमातात परत आल्यापासून मला चिंपोलीतलं कोणीच भेटलेलं नव्हतं. "आणि हे सर वगैरे काय प्रकरण आहे? चिंपोलीत मला विजय अशी हाक मारायचीस."

"आता तुम्ही अप्रो झालात. राजमातात तुमचं युनिट आहे. तुमची दोन पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. आता तुम्हाला नावाने कशी हाक मारणार?"

"चल ग. काहीतरीच काय?" मी अवघडून म्हटलं.

"तुम्ही इकडे आलात आणि आम्हाला विसरलात."

"छे, छे, तसं काही नाही ग. फक्त तेवढ्या लांब यायला होत नाही. पण तू इथे कशी या प्रश्नाचं ते उत्तर नाही."

"मी कॉन्फरन्सला आले होते. म्हटलं तुम्हाला भेटून जावं."

"अरे वा. मोठी झालीस. कॉन्फरन्सेसना जायला लागलीस हं?"

"कसली मोठी? बॉसने सांगितलं की सगळ्यांनी कॉन्फरन्सला जायलाच पाहिजे. मग आम्ही आलो."

"कसली कॉन्फरन्स चाललीय ही?" मी विचारलं. मी स्वतः कोणत्याच कॉन्फरन्सला जात नसे.

"आपल्या ऑब्स-गायनॅक सोसायटीची वार्षिक कॉन्फरन्स."

"छान. पण सगळ्यांना आग्रहाने पाठवायचं कारण काय?"

"ऑर्गनायझिंग कमिटीचे सर चेअरमन आहेत."

"अच्छा, म्हणजे पुरेसे प्रेक्षक हवे म्हणून तुम्हा लोकांना पकडलं हं? पण फुकट की पैसे घेतले?"

"फुकट नाही. मोजून दोन हजार रुपये घेतलेत" ती म्हणाली. आरेमोला दोन हजार रुपये म्हणजे खिशाला चांगलाच फटका होता.

"मग काय शोधनिबंध वगैरे वाचलास का?"

तिने माझ्याकडे रोखून पाहिलं. मी तिच्या फिरक्या घेतोय का असा तिला संशय आला असावा.

"नाही. चिंपोलीत आम्ही कसलं संशोधन करणार? आम्ही इतरांचे पेपर प्रेझेंटेशन बघतो. पण मला वाटलं होतं की तुम्ही तिथे भेटाल. तुम्ही का नाही आलात?"

"प्रिया, या कॉन्फरन्सेस पंचतारांकित हॉटेलांत असतात. तिथलं जेवण मला मानवत नाही."

"पण ते जेवायचं नाही. फक्त सॅलड आणि डाळ-भात खायचा."

"दोन हजार रुपये भरून जायचं आणि जेवायचं नाही? पैसे फुकट जातील ना?" माझं मध्यम वर्गीय मन पैसे मोजलेले असताना जेवायचं नाही हे मानायला तयार नव्हतं.

"स्रर, तिथे ज्ञान मिळतं त्याच्यासाठी पैसे खर्च झाले असं समजायचं."

मी गप्पच राहिलो.

"तुम्ही काही बोलत नाही. माझं काही चुकलं का?"

"तिथे ज्ञान मिळतं असं तू म्हणतेस, ते मला पटत नाही. मला सांग, तिथे सगळे डॉक्टर मिळून शंभर एक शोध निबंध वाचतात. राजमाता नंबर एकचं हॉस्पीटल असतानाही आमच्याकडे नवं आणि महत्त्वाचं असं काहीही संशोधन होत नाहीये. मग हे इतर डॉक्टर वाचताहेत ते शोधनिबंध कुठच्या संशोधनावर बेतलेले आहेत?"

ती निरुत्तर झाली.

"फॉरेनची जर्नल्स वाचून सगळं नवं ज्ञान मिळतं. मग येवढा पैसा खर्च करून कॉन्फरन्सेसना कशाला जायचं?"

"येवढे सगळे डॉक्टर कशाला जातात?" वादविवाद करायची प्रियाची खोड गेलेली दिसत नव्हती.

"छान कपडे घालून मिरवायचं, मित्रमंडळींना भेटायचं, बाहेरगावातून आले असले तर इथली प्रेक्षणीय स्थळं बघायची, मोठी माणसं असली तर स्टेजवर उभं राहून भाषणं ठोकायची, कमीतकमी खर्च केलेला पैसा इन्कम टॅक्स भरताना डिडक्शनमध्ये दाखवायचा, आणि फार्मास्युटिकल कंपनीने आपली फी भरली असली तर फुकट मौज मजा करायची. येवढी कारणं पुरेत की आणखी काही सांगू?"

"मी यातल्या कोणत्याच कारणासाठी आलेले नाही" ती बाणेदारपणे म्हणाली.

"असतात. तुझ्यासारखी थोडी माणसं असतात. पण बॉसने धमकावलं नसतं तर तू आली असतीस का?"

"माझं जाऊ दे. पण तुम्ही आलात तर तुमच्या ज्ञानाचा फायदा इतरांना होईल ना. तुम्ही चेअरमन झालात तर ...."

"प्रिया, एखादं सेशन चेअर करण्यासाठी ज्ञान आवश्यक नसतं. पस्तीस हजार रुपये मिळवून दिले की चेअरमन होता येतं. म्हणजे अठरा जणांना कॉन्फरन्सची फी भरायला लावली की झालं. तुझे बॉस एखाद्या सेशनचे चेअरमन आहेत का?"

"हो, आहेत" ती म्हणाली. आपल्याला कॉन्फरन्सला जायला बॉसने का भाग पाडलं ते कोडं तिला उलगडलंसं दिसलं.

"तुमच्या एचोडी आल्या आहेत कॉन्फरन्सला" तिने विषय बदलला.

"जोशीबाई? शोधनिबंध वाचताहेत की चेअरमन आहेत?"

"चेअरमन आहेत" ती हसून म्हणाली. "पण जेवणाच्या वेळी त्या म्हणत होत्या ....." ती एकदम अडखळली.

"माझ्याबद्दल बरं बोलल्या की काय?"

"......"

"अगं सांग. उगाच ते आतमध्ये कोंडून ठेवलंस तर तुला गुदमरल्यासारखं होत राहील" मी म्हटलं. मी तिला ओळखत होतो. ती खरच गुदमरली असती.

"त्या म्हणाल्या, डॉक्टर पाटील कसली पुस्तकं लिहिताहेत? त्यांना काय अनुभव आहे? अनुभव आम्हा ज्येष्ठ मंडळींना आहे. पुस्तकं आम्ही लिहायची."

"बरं" मी म्हटलं. "आता कोणतं पुस्तक लिहिताहेत त्या?"

"सध्या कोणतंच नाही. त्यांचा आक्षेप तुम्ही पुस्तकं लिहिण्यावर होता."

"जाऊ दे ग. त्यांनी आक्षेप घेतला तरी विद्यार्थी माझी पुस्तकं घेऊन वाचताहेत ना? झालं तर मग."

"सर, त्यांच्याबरोबर असलेलं तुमचं पुस्तक तुम्ही एकट्यानेच लिहून काढलंय ना?"

मी चमकलो. "का ग?"

"सगळे जण म्हणतात तसं. तुमचं नवं पुस्तक आणि ते पुस्तक, दोन्हीची लिखाणाची शैली अगदी सारखी आहे."

"हं" मी म्हटलं.

"त्यांनी तुमचा येवढा फायदा घेतला आणि वर तुम्हालाच नावं ठेवतात. तुम्ही ते सहन कसं करता?"

"जाऊ दे ग. तू ते मनाला लावून घेऊ नकोस. माझ्यावर अन्याय व्हायची ही काही पहिलीच वेळ नाही. देसाई जनरलमध्ये माझी एम्.डी.ची परिक्षा झाली तेव्हा तू मोटवानी मॅडमची हाऊसमन होतीस. परिक्षेत ज्युनियर सुपरवायझर होतीस. आठवतंय?"

"...."

"मोटवानींनी तुमच्या दोन रेसिडेंटना पहिला आणि दुसरा क्रमांक देण्यासाठी मला खाली खेचलं होतं."

"त्यात माझी काही चूक नव्हती रे विजय" ती म्हणाली. तिच्या डोळ्यांत पाणी तरळलं. ती येवढी अपसेट झाली होती की मला सर न म्हणता चिंपोलीत म्हणायची तशी विजय म्हणाली होती.

"ए, रडू नकोस" मी म्हटलं. "चूक तुझी नव्हती, मोटवानींची होती हे मला माहित आहे. इतके दिवस मी तुला काही बोललो का? आज जोशीबाईंनी माझ्यावर अन्याय केला म्हणून तू चिडलीस, ते बघून मला ती जुनी गोष्ट आठवली. मला येवढंच म्हणायचय, की अशा गोष्टी मनात ठेवायच्या नसतात. त्याने आयुष्यातला आनंद जातो. देव बघत असतो. तो अन्याय करणाऱ्यांना काय करायची ती शिक्षा करतो. आपण मागे बघत रहायचं नाही, फक्त पुढे जायचं. आणि अन्याय माझ्यावर झालाय. तू उगाच कशाला अपसेट होतेस? जाऊ दे."

तिने उत्तरादाखल मान हलवली. डोळे पुसले. येते असं पुटपुटली आणि निघून गेली.

जोशीबाईंना काय बोलायचं होतं ते त्यांनी मला बोलायचं होतं. परक्या, स्वतःच्या मुलांच्या वयाच्या विद्यार्थ्यांना आपल्या मनातल्या विषारी भावनांचा स्पर्श होऊ द्यायला नको होता.

***

दरम्यानच्या काळात आमच्याकडे गजलवार लेक्चररच्या पदावर रुजू झाले. ते देशावरच्या सरकारी रुग्णालयांमध्ये काम करून आले होते. तिथेच राहिले असते तर पदोन्नती होऊन

बरेच वर चढले असते. पण शहरात स्थायिक व्हायचं म्हणून सगळं काही सोडून राजमातात आले होते. ते आमच्या वातावरणात फिट बसत नव्हते हा काही त्यांचा दोष नव्हता. त्यांचं शिक्षण झालं होतं तिथल्या भाषेत ते बोलयचे. तिथल्यासारखाच विचार करायचे. इंग्रजी भाषेवर त्यांच्या शिक्षकांचं प्रभुत्व नसावं, असं गजलवारांचं इंग्रजी ऐकून वाटायचं. जोशीबाई आणि सुषमा वगैरे मंडळी त्यांना गावंढळ समजायची. आता एखाद्याचं इंग्रजी व्याकरण इतरांपेक्षा जरासं जास्त सदोष असलं, त्याचे उच्चार चुकीचे असले, तरी त्याने डॉक्टरकीची परिक्षा उत्तीर्ण केली आहे म्हटल्यावर त्याला नावं ठेवू नयेत येवढा पोच त्यांना नव्हता. पण गजलवारांना मात्र कसलाही न्यूनगंड नव्हता. जसे होते तसे ते रुबाबात वावरायचे. जर ते आपली बाजू जरा लंगडी आहे असं समजून नरमाईने वागले असते तर मंडळींनी त्यांना एक वेळ माफ केलं असतं. पण ते आपल्या बरोबरीचे असल्यासारखं वागतात म्हणून मंडळींचा तिळपापड होत असे. जेव्हा ते लेक्चरर होते तेव्हा येवढं काही बिघडलं नव्हतं. अनेक लेक्चररांपैकी एक. असले गावंढळ तर असले. पण जेव्हा गजलवारांना कोट्यामध्ये अप्रोचं प्रमोशन मिळालं आणि दोशीमॅडम सेवानिवृत्त झाल्यावर  युनिट मिळालं तेव्हा मात्र प्रकरण एकदम चिघळलं.

"शी! कसा बोलतो ना तो?" एकदा मला गाठून जोशीबाई म्हणाल्या.

"कोण कसा बोलतो?" मी म्हटलं.

"तो गजलवार रे. कुठून कुठून माणसं गोळा करून आणतात आणि राजमातात भरतात बघ."
बाई भोपाळच्या होत्या. गजलवार निदान महाराष्ट्रातले होते.
"तुम्हाला काही बोलले का?" मी विचारलं.
"मला थेट काही बोलला नाही. पण माझ्याविषयी बोलताना त्याने माझा उल्लेख 'द जोशी' असा केला."
विशेषनामाच्यापाठी इंग्रजीत 'द' लावायचं नसतं हे गजलवारांना माहित नव्हतं. पण म्हणून जोशीबाईंनी इतकं पकायला नको होतं. गजलवारांनी माझाही उल्लेख 'द पाटील' असा अनेकदा केला होता. पण मी काही असा पकलो नव्हतो.
त्याला आपल्या आवारात रहायला जागा दिलीय. त्यामुळे आता सगळ्या परिचारिका आणि सर्व्हंट्स त्याच्या युनिटमध्ये नाव घालताहेत."
म्हणजे ही जोशीबाईंची खरी मळमळ होती तर. पूर्वी सगळ्या परिचारिका आणि सर्व्हंट्स जोशीबाईंच्या युनिटमध्ये नाव टाकायच्या, कारण त्या हॉस्पिटलच्या आवारात रहायच्या, आणि रात्री बेरात्री अडीअडचणीला हॉस्पिटलात यायच्या. हा सुरुवातीचा उत्साह काही वर्षांनी आटला. बाई रात्री हॉस्पिटलात यायच्या बंद झाल्या. त्यामुळे आता त्यांची जागा गजलवारांनी घेतली होती. पण ही मळमळ बाई माझ्याकडे का उघड करत होत्या ते काही माझ्या लक्षात येईना.
"जाऊ देत हो" मी म्हटलं. "त्यांना आवडतं तिथे ते जाणारच."
"अरे, पण त्यामुळे त्या बायकांचं नुकसान होतं ना."
बाई इतर बायकांच्या नुकसानाबद्दल बोलायला लागल्या हे काही चांगलं लक्षण नव्हतं.

"हं" मी म्हटलं.

"अरे, प्रत्येक ऑक्सिपुट पोस्टेरियरचं तो सिझेरियन करतो." हे नवंच काही मी ऐकत होतो. ते खरं असलं तर गजलवारांच्या ज्ञानात काहीतरी कमतरता होती असं दिसत होतं.

"प्रत्येक?" मी म्हटलं.

"म्हणजे बहुतेक. ज्या बाया त्याच्या नजरेतून सुटतात त्यांची नॉर्मल डिलिव्हरी होते."

"हं" मी म्हटलं. प्रत्येकवरून बाई बहुतेकवर आल्या, त्याअर्थी ते 'काही' असण्याची दाट शक्यता होती.

"त्या दिवशी तर त्याने प्रसूत्योत्तर जंतूसंसर्ग झालेल्या एका बाईंच्या गर्भाशयाला आतून जंतूनाशक चोपडलं."

"हं?"

"आता तू सांग, आजच्या काळात असं कोणी करतं का?" जोशीबाई माझं मत विचारत होत्या ते माझ्या मताला खूप किंमत होती म्हणून नव्हे हे मला माहित होतं. पण विचारलं म्हणून मी उत्तर दिलं,

"नाही. आजच का, पूर्वी कधीही असं करत नव्हते. त्यांनी नवीन उपचारपद्धती तयार केली असेल."

"हं!" जोशीबाई म्हणाल्या. त्या एका 'हं!' मध्ये जोशीबाईंना गजलवारांबद्दल काय वाटायचं ते बरोबर ध्वनित होत होतं.

"हल्ली तर तो त्याच्याकडे नाव घातलेल्या प्रत्येक परिचारिकेचं सिझेरियन करतो. कोणाची नैसर्गिक प्रसूती होऊच देत नाही."

"का बरं?"

"कोण जाणे. सिझेरियन करण्याचं कारण विचारलं तर त्याचा लेक्चरर सांगतो 'परिचारिका आहे म्हणून'. आता बोल."

"नॉर्मल डिलिव्हरी करताना बाळ गुदमरलं तर परिचारिका खवळतील याचं त्यांना टेन्शन येत असेल. त्यापेक्षा सिझेरियन केलं की एकदम सुरक्षित असं त्यांना वाटत असेल" मी म्हटलं.

"दडपण आमच्यावरसुद्धा यायचं. पण म्हणून आम्ही असं कधी केलं नाही" जोशीबाई म्हणाल्या.

"किंवा रात्री सिझेरियन करायसाठी जायला नको म्हणून ते दिवसाच सिझेरियन करून टाकत असतील."

"असं कसं? रात्री जायचं नाही तर तसं स्पष्ट सांगून टाकायचं" बाई म्हणाल्या.

"तसं सांगणं वाईट नाही का दिसणार?" मी म्हटलं.

"आपण घरी नाही असं सांगायला सांगायचं" जोशीबाईंना या गोष्टीचा बराच अनुभव दिसत होता.

"आता मध्यरात्री ते घरी नाही तर कुठे आहेत म्हणून सांगतील ते?"

"ते कोणी विचारत नाहीत. कोणी विचारलंच तर माहित नाही असं त्यांची बायको नाहीतर मुलं सांगू शकतील."

लहान मुलांवर असे खोटं बोलण्याचे संस्कार करणं बरं नाही असं मी म्हणणार होतो. पण गजलवारांच्या मुलांवर होणाऱ्या संस्कारांचं जोशीबाईंना सोयरसुतक नसावं हे माझ्या लक्षात आलं म्हणून मी गप्प राहिलो. त्यातून जोशीबाईंनी आपल्या मुलांवर तसलेच संस्कार केले असावे असं मानायला जागा

होती. मग मी त्यांना उद्देशूनच तसं म्हणालो असं समजून बाईंनी मला त्रास द्यायला सुरुवात केली असती.

"परवा तर त्याने कमालच केली. एका पेशंटच्या नातेवाईकाला त्याने दूध आणायला सांगितलं."

"दूध? चहा करायला नगरपालिकेने रोजच्यासारखं दिलं नाही का?" मी विचारलं. किचनमधून सर्व वॉर्डांना आणि ऑपरेशन थिएटरांना दूध पुरवण्यात येत असे.

"चहासाठी नाही रे. ट्युबोप्लास्टीसाठी मागवलं. गर्भनळ्या उघड्या आहेत की बंद हे बघायला त्याने ऑपरेशनच्या वेळी पेशंटच्या गर्भाशयात सरकारी दुधाचं इंजेक्शन दिलं."

"पण ते निर्जंतुक कसं केलं?" ते उकळ उकळ उकळून, आटवून या कामासाठी वापरायचं असतं. गजलवारांनी ते कसं केलं याचं मला कुतूहल वाटलं.

"आणलं तसंच वापरलं. पाश्चराइज्ड आहे म्हणाला तो."

पाश्चराइज्ड दुधात टीबीचे जंतू मरतात, इतर नाही, हे गजलवारना माहित नव्हतंसं दिसत होतं. गजलवार धोकादायक या कॅटेगरीत टाकाण्यासारखे होते असं आता मला वाटायला लागलं.

"हे आपण काहीही करून थांबवलं पाहिजे" बाई म्हणाल्या.

मला पकडून माझं येवढं बौद्धिक घेण्याचा हा हेतू होता तर. जे काम स्वतः करायची भिती वाटते ते विजयला चढवून त्याच्याकडून करून घ्यायचं अशी ही साधी आणि सरळ व्यूहरचना होती. मी जर राजमातातल्या राजकारणाला आणि जोशीबाईंना नीट ओळखत नसतो, तर मी नक्की बळी पडलो असतो.

"ते कसं करायचं?" मी विचारलं. मला तसं करायचं नव्हतं. पण बाई काय म्हणतात ते ऐकणं उद्बोधक ठरलं असतं.

"आपण डीनना पत्र लिहूया की सहा युनिटच्या ऐवजी पाचच युनिटं करा. मग गजलवारचं युनिट तो सर्वात कनिष्ठ असल्यामुळे आपोआप जाईल."

बाईंचा इलाज आजारापेक्षा जास्त जालिम होता. सर्दी झाली म्हणून कोणी नाक कापून टाकत नाही.

"पण मग त्यांच्या दिवशी ओपीडी कोण चालवणार?" मी विचारलं. हा विचार बाईंनी केला नसणार, नाहीतर त्या असं म्हणाल्याच नसत्या.

"पूर्वी भडभडे नाही का दोन दिवस ओपीडी चालवायचे? कावळे गेल्यावर अहुजासुद्धा दोन युनिटं चालवत होती. तसंच करायचं."

म्हणजे अहुजा १ आणि अहुजा २ प्रमाणे जोशी १ आणि जोशी २ अशा दोन युनिटांचा कार्यभार संभाळण्याची जोशीबाईंची इच्छा दिसत होती. ऑपरेशनं करण्यासाठी दुप्पट पेशंट आणि दोनाच्या ऐवजी चार दिवस मिळावे यासारखा दुसरा आनंद त्यांच्या आयुष्यात नसावा असं दिसत होतं.

"पण एकदा पाच युनिटं केली की परत सहा करणं खूप कठीण जाईल" मी म्हटलं. भडभड्यांनंतर चाराची सहा युनिटं करून घेताना कोण त्रास झाला होता.

"परत सहा कशाला करायची?" बाईंनी विचारलं. दूरदृष्टी हा गुण बाईंच्यात खासच नव्हता.

"उद्या दुसऱ्या कोणाला युनिट द्यायची वेळ आली तर एक युनिट कमी पडेल" मी म्हटलं.

"दुसरं कोण?"

स्वतः सेवानिवृत्त होईपर्यंत तशी गरज भासणार नाही असं त्यांचं मत दिसत होतं. नंतर काय व्हायचं ते होवो, त्यांना काही फरक पडणार नव्हता. फरक पडला असता तो आम्हा राजमाताच्या चेल्यांना.

"उदाहरणार्थ सुषमा" मी म्हटलं.

"सुषमा" बाईंनी नाक मुरडलं. ती रोज गप्पा मारायला आणि पाट्र्या करायला ठीक असली तरी युनिटची प्रमुख व्हायला त्यांना योग्य दिसत नव्हती.

"बरं समजा गजलवारांचं युनिट काढून घ्या असं पत्र लिहिलं, तर त्याचं कारण काय द्याल?" मी विचारलं.

"तो रुग्णसेवेत घोडचुका करतो असं लिहायचं" बाई म्हणाल्या. चुका न करणारा माणूस जन्माला यायचाय, असं म्हणता म्हणता मी थांबलो. बाईंना ते आवडलं नसतं. बाईंनी काय कमी घोडचुका केल्या होत्या? एकदा एका पेशंटची ट्यूबोप्लास्टी करताना त्या पेशंटच्या पोटात दोन मॉप विसरल्या होत्या. त्यांतला एक पेशंटच्या आतड्यात जाऊन नंतर गुदद्वारातून बाहेर आला होता. दुसऱ्या मॉपचं बाईंनी नंतर काय केलं हे आम्हाला कळू दिलं नव्हतं. एकदा एका एक्टॉपिक प्रेग्नन्सी असणाऱ्या पेशंटची गर्भनळी काढताना त्यांनी त्यांच्या रजिस्ट्रारला स्त्रीबीजकोशही काढायला लावला होता. पेशंटचा दुसरा स्त्रीबीजकोश कोणीतरी पूर्वीच काढून झाला होता. ऐन तारुण्यातली ती बाई अकाली रजोनिवृत्त झाली होती. बिचारीला पुढे ना मासिक पाळी, ना मूल अशी परिस्थिती आली होती. एक ना दोन, बाईंच्या घोडचुकांची

अनेक उदाहरणं होती. गजलवारांच्या घोडचुकांबद्दल जोशीबाईंनी बोलणं हा मोठाच विनोद होता.

"त्यांची निवड लोकसेवा आयोगाने केली आहे. आयोगाने चूक केली आहे हे कसं सिद्ध कराल?" मी विचारलं.

"अं ...." बाई म्हणाल्या.

"समजा तुम्ही त्यांचं युनिट काढून घेतली म्हणून त्यांनी तुमच्यावर अॅट्रॉसिटी अॅक्टखाली केस घातली तर?"

"......" बाई टरकल्या. या दृष्टीकोनातून त्यांनी विचार केलाच नव्हता. त्या दिवसानंतर बाईंनी गजलवारांच्या घोडचुका आणि त्यांचं युनिट काढून घेणं याबद्दल चकार शब्द काढला नाही.

***

जोशीबाईंना एचोडीचं पद मिळालं तेव्हा आम्ही समजलो की आता त्या डिपार्टमेंटमध्ये पाट्यांमागून पाट्या करणार, मनात येईल तेव्हा कामावर येणार आणि मनात आलं की पळणार, किंवा थोडक्यात सांगायचं तर धमाल करणार. पण त्यांच्या दुर्दैवाने तसं झालं नाही. सगळ्यांना पकवून आणि कोर्टकचेऱ्या करून जोशीबाईंनी एचोडीचं पद मिळवलं खरं, पण त्या जागेचं सुख काही त्यांना उपभोगता येईना. जुने डीन बाईंच्या नवऱ्यावर खसकलेले होते आणि म्हणून त्यांनी बाईंना त्रास दिला होता खरा, पण ते तसे मृदू स्वभावाचे होते. बाईंच्या कमनशीबाने याच सुमारास ते सेवानिवृत्त झाले आणि त्यांच्या जागी देसाई जनरलमधल्या डीन ट्रान्स्फर घेऊन आल्या. या डीन चांगल्याच कडक होत्या असा त्यांचा लौकिक होता. इतका की तेव्हा देसाई जनरलमधून सगळ्यांनी एकत्र

टाकलेला सुटकेचा निश्वास अख्ख्या शहराला ऐकू गेला होता म्हणे. आमच्या लेबर वॉर्डात चालू असलेल्या कोलाहलात बाहेरचा कुठलाही आवाज ऐकू येत नसे. त्यामुळे आम्हाला तो निश्वास ऐकू आला नाही. जोशीबाईंना तो ऐकू आला की नाही देव जाणे. पण अशा गोष्टींतलं वॉर्निंग समजण्यायेवढी प्रगल्भता त्यांच्याकडे निश्चितच नव्हती. त्यामुळे बाईंचा पाय खोलात गेला आणि जास्त जास्तच जात राहिला.

"काय ती डीन!" जोशीबाईंनी आमच्या साप्ताहिक मिटिंगच्या वेळी तक्रार केली. "सक्काळी घड्याळाकडे बघत गेटवर उभी रहाते शाळेच्या हेडमास्तरसारखी. कोण किती वाजता येतं ते बघत रहाते. म्हणे नऊच्या ठोक्याला हजर रहा. काय इतर कामधंदे नाहीत काय आम्हाला?"

आम्ही एकमेकांच्या तोंडांकडे पाहिलं. रोजचं काम करायसाठी तर कामावर यायचं. इतर कामधंदे त्या वेळेत असण्याचा प्रश्नच येण्याचं कारण नव्हतं.

"डॉक्टर हॉस्पिटलात जातात साडेनऊला, तेव्हा मला रस्त्यात सोडून जातात. आता इथं नऊ वाजता हजर रहायचं म्हणजे मला त्यांच्याआधी निघायला हवं. त्यांचा नाश्ता कामवाली मुलगी बनवते, पण तिच्याकडे लक्ष ठेवायला नको का?" बाई म्हणाल्या. आम्ही गप्पच राहिलो. "संध्याकाळी चार वाजता मस्टरवर सही करून जा म्हणते. मस्टर ऑफिसात तपासायसाठी मागवून घेते. तिला इतर काही कामं नाहीत काय?"

जोशीबाईंना वक्तशीरपणामध्ये डीननी सुधारून टाकलं. वक्तशीरपणा असला की झालं असा जोशीबाईंनी समज करून

घेतला असला, तरी डीनचा तसा समज नाही हे त्यांना लवकरच समजलं.

त्या दिवशी डीनच्या ऑफिसचा मामा मला बोलवायला आला.

"साहेब, तुम्हाला डीननी बोलावलंय."

"येतोच" मी म्हटलं. डीन माझी वाटच बघत होत्या.

"या, बसा" डीन म्हणाल्या. त्या तशा शांत दिसत होत्या. आग्यावेताळासारख्या दिसत असतील असं मला वाटलं होतं ते खोटं निघालं.

"मला तुम्हाला एक काम द्यायचंय. तुमच्या एचोडींना मी ते करायला सांगितलं होतं, पण आठवडा उलटून गेला तरी त्यांच्याच्याने कामाची सुरुवातही झाली नाही. 'हाच तुमचा सर्वोत्तम प्रयत्न का' असं मी विचारलं तर म्हणाल्या, 'होय, हाच माझा सर्वोत्तम प्रयत्न.'"

"काय काम आहे मॅडम?" मी विचारलं. डीनना असं उलट उत्तर द्यायला जोशीबाई धजावल्या कशा असं माझ्या मनात आलं.

"तुमच्याकडे गेल्या दोन वर्षांत किती अॅबॉर्शनं झाली, ती किती महिन्यांची होती, आणि त्यांना काय गुंतागुंती झाल्या ती माहिती मला हवी आहे."

"ठीक आहे मॅडम, मी ती माहिती काढून तुम्हाला देतो" मी म्हटलं.

दोन दिवसांत मी ती माहिती जमा केली आणि डीनना देऊन टाकली.

"छान!" त्यांनी प्रशस्तीपत्रक दिलं.

"काय ती डीन!" जोशीबाईंनी आमच्या पुढच्या साप्ताहिक मिटिंगच्या वेळी तक्रार केली. "कितीही केलं तरी तिला समाधान म्हणून नाही."
"काय झालं मॅडम?" सुषमाने गोड आवाजात विचारलं. तिचं युनिट बदललं तरी ती जोशीबाईंबरोबर छान संपर्क साधून होती.
"अग काय सांगू? तिला ॲबॉर्शनांबद्दल माहिती हवी होती. मला म्हणाली दोन वर्षांचा डेटा द्या. आता दोन वर्षांची माहिती काढायला वेळ लागणार की नाही? चार दिवसात मला विचारते की काम झालं का? मी साफ सांगून टाकलं की माझ्याच्याने ते काम होणार नाही." आपले स्टाफ मेंबर्स आपल्याकडे आदराने बघतील या अपेक्षेने त्यांनी आम्हा सर्वांकडे पाहिलं. त्यांच्या या बाणेदारपणामुळे कोणी त्यांच्याकडे सादर पाहिलं की नाही ते मला समजलं नाही. डीन आपल्या गोपनीय अहवालात आपल्याबद्दल काही वाईट लिहितील अशी भिती त्यांना कशी वाटली नाही देव जाणे.
दोन आठवडे गेले. आमच्या साप्ताहिक मिटिंगच्या वेळी जोशीबाईंनी परत तक्रार केली.
"काय ती डीन! आपण राउंड घ्यायला येते म्हणाली म्हणून मी प्रवेशद्वाराजवळ जाऊन उभी राहिले. ती आली तेव्हा मी 'गुड मॉर्निंग' असं म्हटलं. तिला काही मॅनर्सच नाहीयेत. तिने मला 'गुड मॉर्निंग' तर म्हटलंच नाही, तर उलट काहीबाही बोलली."

"काय म्हणाल्या डीन?" सुषमाने गोड आवाजात विचारलं. कुतूहल आम्हा सर्वांनाच होतं. पण बातम्या काढायचं काम सुषमा करत असे.
"म्हणाली, 'महागडी साडी नेसून आणि पर्फ्यूम लावून हॉस्पिटलची कामं होत नाहीत. इथं उभं राहून वेळ फुकट घालवण्याऐवजी थोडं काम करा. मी मोठ्या प्रयत्नाने चेहरा गंभीर ठेवला. जोशीबाई खाली उभ्या राहिल्या नाहीत तरी त्या वेळात काही काम करणार नाहीत, ऑफिसात बसून कॉफी पितील हे मला माहित होतं, आणि मला वाटतं डीननासुद्धा माहित होतं. आपल्याला जोशीबाई आवडत नाहीत असं जोशीबाईंना सांगणं डीनना आवडत असावं.
"आता परत कधी मी तिच्या स्वागतासाठी खाली जाऊन उभी रहाते का बघ" जोशीबाईंनी जाहीर केलं.

***

हातात सत्ता आली की काय काय करायचं हे जोशीबाईंनी एकतर इतर लोकांनी आजपर्यंत काय काय केलं ते बघून तरी ठरवलं असावं किंवा त्यांना दुष्ट प्रवृत्तीच्या कोणीतरी शिकवलं असावं.
कावळ्यांनी सुझनला चांगल्या प्रकारे उत्तीर्ण करून दिलं आणि ते स्वतः दुर्दशेच्या फेऱ्यात सापडले. ते सावरले तेव्हा त्यांची देसाई जनरलला बदली झाली. इथे सुझनने लेक्चररची पोस्ट मिळवली.
"ती देसाई जनरलला कावळ्यांच्या पाठोपाठ जाणार, लागली पैज?" राजेश म्हणाला.

"कावळ्यांना टीबी झालाय. तिथे गेली आणि तिला पण टीबीची लागण झाली तर? नाही जाणार ती" निनाद म्हणाला.
"ती जाणार असं मी ऐकलंय" हीना म्हणाली. हीना म्हसवानी खरं तर माझ्याबरोबर एम्.बी.बी.एस्. झाली आणि माझ्याच बरोबर एम्.डी. सुद्धा झाली. पण कमी मार्क असल्यामुळे तिला लेक्चररची पोस्ट मिळायला बरीच वर्षं लागली. मी अप्रो, युनिटचा मुख्य आणि  डिपार्टमेंटमध्ये नंबर दोनच्या जागेवर असताना ती आमच्याकडे लेक्चरर म्हणून रुजू झाली. नावातील साधर्म्यामुळे म्हणा किंवा आणखी काही कारणामुळे म्हणा, जोशीबाई आणि हीना यांचं भलतंच जमायला लागलं होतं. इतकं की हीनाने सुषमाला बाजूला सारून तिची जागा पटकावली होती. हल्ली ती प्रत्येक विषयात आपलं मत मांडायला लागली होती.
"कुठे ऐकलंस तू?" सुषमाने विचारलं. आपल्याला न सांगता जोशीबाईंनी हीनाला आतल्या गोटातली बातमी दिली की काय असं तिला वाटलं.
"असंच ऐकलंय" हीना म्हणाली.
"ती जाणार नाही" मी म्हटलं. "काय राजेश, लागली पैज?"
राजेश हबकला. आयुष्यात त्याला कोणी पैज लावायचं आव्हान दिलं नव्हतं. तेवढ्यात तिथे सुझन अवतरली आणि पैजेचा विषय तिथेच थांबला.
"काय सुझन, तू देसाई जनरलला जाणार म्हणे" हीना म्हणाली. तिच्या बोलण्याला कुत्सित वास आला तिकडे सुझनने दुर्लक्ष केलं आणि म्हणाली,

"छे ग. ते मला खूप लांब पडेल. माझा नवरा इथे आणि मी तिथे लेक्चरर होऊन फायदा काय?"

सुझनने मधल्या काळात तिच्या बॉयफ्रेंडबरोबर लग्न करून टाकलं होतं. तरीही ती कावळ्यांच्या मागून जाईल असं म्हणताना आमच्या डिपार्टमेंटच्या लोकांना जराही लाज वाटली नव्हती.

मंडळी पांगल्यावर मला निनादने विचारलं,

"काय रे, तुला कसं कळलं की सुझन देसाई जनरलला जाणार नाही?"

"साधी गोष्ट आहे. तिचं काही कावळ्यांवर प्रेम नव्हतं. ती करिअर घडवण्यासाठी केलेली तडजोड होती. आता हवं ते साध्य झालं आहे. त्यातून कावळ्यांचं जहाज बुडतं आहे. त्यांच्या पाठी जायला ती काय मूर्ख आहे का?"

"बरोबर आहे तू म्हणतोस ते" निनाद म्हणाला.

कावळे देसाई जनरलला गेले. त्यांची लेक्चरर मनाली राजमाता सोडून प्रायव्हेट प्रॅक्टीस करायला लागली. पण सचोटी हा काही तिचा स्वभाव नव्हता. तिने सुझनबरोबर संधान बांधलं, आणि राजमाताचा जमेल तेवढा उपयोग करून घेणं चालू ठेवलं. जोशीबाईंनी अजूनपर्यंत हातातली सत्ता वापरून कोणाच्या मागे चौकशीचा ससेमिरा लावला नव्हता. त्यांनी यासाठी सुझनला का निवडलं याबद्दल अनेक मतं होती. सुझन तरुण, गोरी, दिसायला जोशीबाईंपेक्षा उजवी, जोशीबाईंपेक्षा बांधेसूद, तंग टी-शर्ट आणि जीन्स घालणारी होती म्हणून जोशीबाईंना तिचा मत्सर वाटायचा असा एक मतप्रवाह होता. सुझन आणि तिचा नवरा एम्.बी.बी.एस्.चे

परिक्षक असायचे आणि म्हणून त्यांच्याकडे मुलं ट्यूशनसाठी गर्दी करायचे याचा जोशीबाईंना मत्सर वाटायचा असा दुसरा एक मतप्रवाह होता. कावळ्यांमुळे आपल्याला हातातोंडाशी आलेली एचोडीची पोस्ट मिळाली नाही आणि सुझनला त्रास दिला तर कावळ्यांवर सूड उगवला जाईल अशी जोशीबाईंची विचित्र मानसिकता असावी असं माझं मत होतं. आणखीही मतप्रवाह असण्याची शक्यता होती, पण ते जाणून घेऊन काही फायदा होण्यासारखा नव्हता. तर जोशीबाईंनी सुझनला पकडलं. त्याचं काय झालं, वीर्यात शुक्रजंतू नसणाऱ्या पुरुषांना अपत्यप्राप्ती व्हावी म्हणून एखाद्या दात्याचे शुक्रजंतू वापरण्याची उपचारपद्धत तेव्हा वापरात होती. अशा दात्याला पैसे देण्यापेक्षा ते राजमाताच्या लॅबोरेटरीत तपासण्यासाठी आलेल्या वीर्याच्या सॅंपलमधलं चांगलं सॅंपल वापरून फुकट होत असे, म्हणून मनाली सुझनकरवी अशी सॅंपल्स मिळवत असे. पैसे दोघी वाटून घेत असाव्या.

"मी आज सुझनला पकडलं" जोशीबाईंनी जाहीर केलं. "मनालीची एक प्रायव्हेट पेशंट आपला केसपेपर घेऊन आली होती. तिच्या पेपरवर सुझनने वीर्याचं सॅंपल द्या असं लिहून तिला लॅबोरेटरीत पाठवलं होतं. मला ती पेशंट भेटली आणि तिचं भांडं फुटलं."

"मग आता तुम्ही काय करणार आहात?" सुषमाने विचारलं.

"मी तिची चौकशी करायला डीनना सांगणार आहे."

लक्षणं काही बरी दिसत नव्हती. चार दिवस गेले. सुझन तिच्या नवऱ्याला घेऊन मला भेटायला आली.

"काय झालं ते तू मॅडमकडून ऐकलंच असशील. आम्ही तुझा सल्ला घ्यायला आलोय" सुझन म्हणाली.

"तुझ्याविरुद्ध पुरावा काय आहे?" मी विचारलं.

"त्या पेशंटच्या केस पेपरवर तिला सँपल द्या असं मी लिहिलेलं आहे" सुझन म्हणाली.

"ते सँपल घेऊन मनालीकडे जा असं तू लिहिलं होतस का?"

"छे!" ती म्हणाली.

"तुझ्याकडून सँपल आण असं मनालीने लिहिलं होतं का?"

"छे! पण पेशंटने जोशीबाईंकडे तसं कबूल केलंय म्हणे. मला काय माहित की पेशंट सँपल घेऊन मनालीकडे जाईल ते? मी आपलं इतर पेशंटांना देते तसं लिहून दिलं. मला वाटलं आपल्याच ओपीडीत तिला ट्रीटमेंट देणार आहेत."

"साक्ष द्यायला पेशंट येईल का?"

"ती त्या दिवशी पळून गेली. ती नाही यायची. नाहीतरी तिला बोलावण्यासाठी तिचा पत्ता कुठे आहे मॅडमकडे? ओपीडी पेपरवर फक्त उपनगराचं नाव लिहिलेलं असतं." पूर्ण पत्ता असता तरी मनालीने पेशंटला साक्ष देण्यासाठी येऊ दिलं नसतं.

"मग जोशीबाई तुझ्यावरचा आरोप कसा सिद्ध करणार आहेत?"

"देव जाणे. उगाचच त्यांनी माझ्यामागे नसतं झेंगट लावून दिलं आहे."

"हे बघ, तक्रारदार जोशीबाई आहेत. त्यामुळे त्या तुझी चौकशी करू शकत नाहीत. कोणा त्रयस्थ डिपार्टमेंटच्या मुख्याला चौकशी अधिकारी म्हणून नेमतील. उपलब्ध कागदपत्रं आणि

साक्षी यावर तो निर्णय घेईल. साक्षीदार फक्त जोशीबाई आहेत. त्या किती सुसूत्र बोलू शकतात ते तुला माहित आहेच. त्यामुळे चौकशी झाली तरी तुला काही होणार नाही. बिनधास्त रहा." मी म्हटलं. कावळ्यांच्या कनेक्शनमुळे मला सुझन आवडत नसे. पण जोशीबाई तिला सूडासाठी म्हणून त्रास देतायत हे पाहून मला सुझनला योग्य सल्ला दिल्याशिवाय रहावेना.

"थँक यू" असं म्हणून दोघं गेली. जोशीबाईंनी जंग जंग पछाडलं, पण चौकशीत सुझन बालंबाल सुटली. वैयक्तीक हेव्यापायी जोशीबाईंनी आपल्याला खोट्या आरोपांत अडकवलं असं तिने लिहून दिलं, जे जोशीबाईंच्या गोपनीय अहवालांत नमूद केलेलं असावं.

एचोडी झाल्यावर बाई माझ्यापाठी एखादी खोटी चौकशी लावून मला त्रास देतील असं मला वाटत होतं. तसं त्यांनी मला एक दोनदा धमकावलंसुद्धा होतं. जरी मी प्रत्येक गोष्ट नियमाप्रमाणे करत असे, तरी खोटी चौकशी करायची तर त्यांना करता आली असती. पण विजयने सल्ला दिल्यामुळे सुझन सुटली हे त्यांच्या कानावर गेलं, आणि बहुधा त्यातून धडा घेऊन बाईंनी मला तसा त्रास द्यायचा कधी प्रयत्न केला नाही.

***

ज्या देवाने हीना जोशीना घडवलं, त्यानेच उरलेलं सामान वापरून चौदा वर्षांनंतर हीना म्हसवानीला घडवलं. अर्थात उरलेलं सामान कमी असावं. कमी पडलं तिथे त्याने इतरही

बरंच सामान वापरलं होतं. जोशीबाई गोऱ्यापान तरी म्हसवानी काळीशार होती. जोशीबाई वयानुसार जाड झाल्या असल्या तरी मध्यमवयापर्यंत नाच, बॅडमिंटन आणि टेबलटेनिस खेळणं वगैरे करायच्या. म्हसवानी प्रत्येक पाऊल संभाळून, दमदारपणे टाकायची. नाच आणि खेळ यांचं आणि तिचं विळ्याभोपळ्याएवढं सख्य होतं. जोशीबाईंनी शिक्षण घेतलं तेव्हा हुशार असाव्या. म्हसवानी ढ होती असं म्हणता आलं नसतं तरी हुशार नक्कीच नव्हती. बैद्यकीय परिक्षा ती पहिल्या फटक्यात उत्तीर्ण झाली असली तरी आयुष्यातली दोन वर्षं तिने कुठेतरी फुकट घालवली होती. काही सांगितलं तर जोशीबाईंना बहुतेक वेळा ते कळायचं. पण म्हसवानीला ते कळेल याची शाश्वती नसायची. कळलं तर अभिप्रेत असेल त्याच्यापेक्षा वेगळंच काहीतरी तिला कळायचं. तर अशा साफ वेगळ्या भासणाऱ्या दोन समाजाच्या दृष्टीने यशस्वी असणाऱ्या स्त्रियांमध्ये देवाने कोणता भाग एकाच सामुग्रीपासून बनवला होता ते देवच जाणे, पण दोघींचं विलक्षण पटायचं.

हीना आमच्याकडे येण्यापूर्वी देसाई जनरलमध्ये नोकरीला लागली होती. एक दिवस सनसनाटी बातमी आली.

"हीनाने तिच्या ऑनररी प्रोफेसरांना हिसका दाखवला" निनाद म्हणाला.

"काय केलं तिने?" राजेश म्हणाला.

"ते तिला तिच्या बुद्धीमत्तेवरून काहीतरी म्हणाले. त्यावरून दोघांचं चांगलंच वाजलं."

"मग?"

"मग तिने त्यांना आपली माफी मागायला लावली."

"आणि त्यांनी मागितली? ती कशी काय?"

"काही विचारू नका."

"का? काय केलं तरी काय तिने?"

"आपल्यावर त्यांनी अत्याचार करायचा प्रयत्न केला असा आरोप तिने कमिशनरना पत्र लिहून केला."

"काय सांगतोस काय? अरे, तिचा आडवा हात बसला तर माणूस पाणीही मागू शकायचा नाही. तिच्यावर अत्याचार करायचं धाडस कोण करेल?"

"आणि त्यातून ती दिसायला ..."

"राजेश. असले सेक्सिस्ट रिमार्क करू नकोस" सुषमा म्हणाली. राजेश पटकन गप्प झाला.

"काही असो. कायदा स्त्रियांच्या बाजूचा असतो. त्यातून तिचे एक काका नगरपालिकेत उच्चपदावर आहेत म्हणे. त्यांनी दट्ट्या लावला. लेखी माफी मागा नाहीतर पोलिस केस करू असं म्हटल्यावर बिचाऱ्यांनी माफी मागितली."

हीना म्हसवानी अशी धोकादायक असेल असं मला एम्.बी.बी.एस्.च्या साडेपाच वर्षांत कधीच वाटलं नव्हतं. चित्रपटात एक्स्ट्रा मंडळी असतात ती तिथे असतात पण नसतात, तसंच तिचं होतं. तिचं अस्तित्व कधी जाणवलंच नव्हतं. आता तिचं अस्तित्व जाणवलं आणि दोन आठवड्यांत खुद्द हीनाच राजमातात ट्रान्स्फर घेऊन हजर झाली. आमच्याकडे एक जागा रिक्त होती ती तिने पटकावली. वास्तविक अशी ट्रान्स्फर मिळणं खूप कठीण असायचं. पण जिथे आपल्या स्त्रीत्वावर घाला पडला तिथे आपल्याला काम करणं अवघड वाटतं असं सांगून तिने ट्रान्स्फर करून घेतली

म्हणे. तिला विचारून खरंखोटं करण्याची कोणाची इच्छा दिसली नाही.

"चल रे. तिच्याबरोबर काम करताना आपण तिच्या स्त्रीत्वावर घाला घालत नाही याची साक्षीदार दर वेळी ठेवणं शक्य नाही म्हणून तिथल्या पुरुष मंडळींनी तिची बदली करवली असेल" निनाद म्हणाला.

पुरुष बॉस तिच्यावर अत्याचार करेल म्हणून तिला जोशीबाईंच्या युनिटमध्ये जागा दिली गेली. दोन हीना एकत्र आल्या आणि दोशी-मेहता यांच्यापेक्षा सरस अद्वैत झालं. ते फक्त दोघींचं नाव एकच होतं म्हणून झालं असं नाही. त्या वेळी जोशीबाई अतिशय विमनस्क अवस्थेत होत्या. त्यांच्या आयुष्यात एक पोकळी निर्माण झाली होती. जोशीबाईंच्या आयुष्यातली ती पोकळी हीना म्हसवानीने भरून काढली, म्हणून ते अद्वैत एकदम घट्ट झालं. त्याचं असं झालं ....

जोशीबाईंना आय.सी.एम्.आर्.चा सोनोग्राफीचा एक संशोधनाचा प्रोजेक्ट मिळाला. बाईंना सोनोग्राफीचा गंध नव्हता. त्यांनी त्या प्रोजेक्ट्साठी भावसार नावाचा एक सोनोग्राफर नियुक्त केला. भावसार नुकताच एम्.डी. झाला होता. स्वतःचं क्लिनिक उघडेपर्यंत काय करायचं अशा विचारात असताना त्याला हा प्रोजेक्ट मिळाला. तेव्हा जोशीबाईंचं वय चाळीसच्या पुढे पाच-सहा वर्षं झालं होतं. या वयाला काही स्त्रिया हातातून निसटणाऱ्या तारुण्याबद्दल कधीकधी उदास होतात. तसे पुरुषही होतात म्हणा, पण सध्या आपण जोशीबाईंच्या मानसिकतेचा विचार करतो आहोत. त्यांच्या या अवस्थेत जर त्यांना त्यांच्या नवऱ्याची साथ मिळाली असती तर फार बरं झालं

असतं. पण नवरा त्याच्या व्यवसायात व्यस्त होता. त्याच्या हॉस्पिटलातल्या रिसेप्शनिस्टबरोबर त्याचा वेळही बरा जायचा अशी कुजबूजही होती. काही असो, बाई एकट्या आणि उदास होत्या. भावसार आयुष्यात आल्यावर बाईंचं विश्व एकदम सजीव झालं. एकदा सकाळची वॉर्डांची राउंड झाली की बाई भावसारबरोबर सोनोग्राफीला जायच्या. भावसार सोनोग्राफी करायचा आणि बाई बघत बसायच्या. जरा दमल्यासारखं वाटलं की दोघं कॉफी प्यायला जायचे. मग परत सोनोग्राफी करणं आणि बघणं. दुपारी भावसार बाईंबरोबर त्यांच्या ऑफिसात जेवायचा. जेवण गप्पागोष्टी करत, खेळीमेळीच्या वातावरणात व्हायचं. मग परत सोनोग्राफी करणं आणि बघणं. तीन वाजता दोघं परत कॉफी प्यायला जायचे. चार वाजेपर्यंत जखडून पडावं लागतं म्हणून पूर्वी धुमसणाऱ्या जोशीबाई आता मोठ्या कष्टाने चार वाजता घरी जायला निघायच्या.

बाई पंचेचाळीसच्या असल्या तरी घरी सुबत्ता आणि आराम असल्यामुळे सुळसुळीत होत्या. त्यांचे केस विदेशी रंग लावल्यामुळे नैसर्गिक काळ्या रंगाचे दिसायचे. अर्थात मला ते तेव्हा माहित नव्हतं. पुढे एकदा बाईंनीच तसं म्हटलं तेव्हा मला कळलं. असो. तर येवढी सुरेख दिसणारी स्त्री आपल्या सान्निध्यात खूश आहे आणि संपूर्ण दिवस आपल्याबरोबर मजेत घालवतेय म्हटल्यावर भावसार खूश होता. दोघं कॉरिडॉरमध्ये एकत्र येताना किंवा जाताना दिसले की लोकांच्या भुवया उंचावायला लागल्या. जोशीबाईंना त्याची फिकिर होती असं दिसत नव्हतं. भावसार अशा गोष्टींची

फिकिर नसणाऱ्या प्रकारचा पुरुष होता. त्यामुळे आयुष्य मजेत चाललं होतं.

दुर्दैवाने आय.सी.एम्.आर्.चा प्रोजेक्ट त्याची मुदत संपल्यावर थांबला. तो वाढवून मिळावा म्हणून जोशीबाईंनी जंगजंग पछाडलं. पण आय.सी.एम्.आर्.ला काही त्यांची दया आली नाही. भावसार बाईंच्या आयुष्यातून दूर गेला. जोशीबाई एकट्या आणि उदास झाल्या. नेमक्या त्याच वेळी हीना म्हसवानी त्यांच्या युनिटमध्ये अवतरली. हीनाचा रंग भावसारसारखाच होता. तिचा आकार भावसारच्या दुप्पट होता, पण दोघांच्या शरीराच्या मधल्या भागाची ठेवण सारखीच होती. हीना जोशीबाईंना रुचेल असंच बोलायची, जसं भावसार बोलायचा. ती एक स्त्री होती ही एक गोष्ट सोडली तर ती भावसारच्या जाण्यामुळे निर्माण झालेल्या पोकळीत अगदी चपखल बसत होती. त्या वयाला जोशीबाईंची गरज भावनिक जास्त अणि शारिरीक कमी असावी. त्यांचं विश्व पुन्हा एकदा सतेज झालं. बाईंची नाडी ओळखण्यात हीना भावसारपेक्षा सरस निघाली. प्रसंगी ती बाईंबरोबर लहान मुलासारखं थोडं बोबडं लाडेलाडेसुद्धा बोलायची. घरी जोशीबाईंची पोरं आईला हिडिस फिडिस करायची. ही एरंडासारखी वाढलेली बाई लाडेलाडे बोलली की बहुधा जोशीबाईंच्या अंतःचक्षूंपुढे त्यांची लहान पोरंच अवतरायची. हीना जोशीबाईंच्या आयुष्याचा अविभाज्य नसला तरी अतिशय महत्त्वाचा भाग बनली.

***

"सर, जोशीमॅडम आपल्यावर खुन्नस ठेवून आहेत का?" निशांत या गोष्टीमुळे चिंतातूर दिसत नव्हता. त्याला फक्त या गोष्टीचं कुतूहल वाटत होतंसं दिसलं. माझ्या लेक्चररलासुद्धा ही गोष्ट जाणवली म्हणजे जोशीबाई अगदी उघड उघडपणे खुन्नस दाखवत होत्या तर.

"एकदम बरोबर" मी म्हटलं. "पण तुला कसं कळलं?"

"आपल्या युनिटला त्रास द्यायची एकपण संधी त्या सोडत नाहीत. किंबहुना त्या अशा संध्या शोधतच असतात."

"हं...." मी म्हटलं. त्याच्या लक्षात काय काय आलंय ते बघणं मनोरंजक ठरलं असतं. काय सांगावं, मला न जाणवलेली एखादी गोष्ट त्याला समजली होती असेलही.

"सर, तुमच्या ऑफिसजवळच्या खोलीत आपण कोल्पोस्कोप्या करायचो. इतरांच्या मानाने आपले पेशंट खूप असायचे. जोशीमॅडमनी तिथला कोल्पोस्कोपच काढून घेतला. आपल्या कोल्पोस्कोप्या बंद झाल्या."

"अरे, पण त्यामुळे त्यांच्या पेशंटांच्या कोल्पोस्कोप्यापण बंद झाल्या ना."

"त्यांच्या असायच्याच अशा कितीशा केसेस?"

"त्यांच्या लक्षात येत नाही की त्यांनी आपलं नुकसान केलं नाही तर राजमातातल्या पेशंटांचं नुकसान केलं" मी म्हटलं. "तुझा माझा पगार आहे तेवढाच राहिलाय ना?"

"पण त्या आपल्याला उगाचच त्रास देतात ही जाणीव मनाला अस्वस्थ करत रहाते ना सर?" तो म्हणाला.

"उगाच नाही रे. मी त्यांना मस्का लावत रहात नाही म्हणून त्यांना खुन्नस आहे. मिटिंगमध्ये त्या चुकीचं बोलल्या की मी

त्यांची चूक दाखवून देतो म्हणून त्यांचा राग आहे. मी पुस्तकं लिहिली त्यांत त्यांचं नाव लेखक म्हणून टाकलं नाही याची चीड आहे. एक ना दोन, अनेक गोष्टी आहेत."

"असं उगाचच लेखक म्हणून नाव घालायचं?"

"मोठ्या माणसांच्या इतरांकडून खूप अपेक्षा असतात" मी म्हटलं.

"मिटिंगमध्ये आरेमोंच्यासमोर पण कशा बोलतात? 'खूप पुस्तकं वाचली म्हणून कोणी हुशार होत नाही. आम्हाला वर्षानुवर्षांचा अनुभव आहे म्हणून आम्हीच खरे हुशार आहोत.' मला वाटतं त्या खास तुम्हाला उद्देशून म्हणतात."

त्याने जोशीबाईंचं वाक्य अगदी त्यांच्यासारखं म्हणून दाखवलं होतं. मी हसून त्याला दाद दिली आणि म्हटलं, "ते माझ्याही लक्षात आलं होतं."

"सर मध्यंतरी आपलं ऑपरेशन थिएटर दुरुस्तीसाठी पंधरा दिवस बंद होतं. काम संपल्यावर धुलाई आणि फ्युमिगेशन करून झालं ते आपल्या ऑपरेशनच्या दिवशी. आपल्या पेशंट तयार होत्या. सिस्टर आपल्याला थिएटर द्यायला तयार होती. जोशीमॅडमनी आपल्याला ऑपरेशनं करू दिली नाहीत. म्हणाल्या, सर्वच युनिटांचं नुकसान झालंय. सर्वांचे सारखेच दिवस फुकट गेले पाहिजेत. तोपर्यंत तुम्हाला थांबायला पाहिजे."

"आठवतंय. मी तेव्हा डीनकडे तक्रार केली होती. डीननी जोशीबाईंना फायरिंगपण दिलं होतं. पण तोपर्यंत तो दिवस निघून गेला होता. आपल्या पेशंटांना ऑपरेशनशिवाय घरी जायला लागलं होतं."

"मला असा खुन्नस आला होता सर."

"जाऊ दे रे. त्रास गरीब पेशंटांना झाला. तुझं-माझं वैयक्तिक नुकसान काही झालं नाही."

"मॅडमना येवढी साधी गोष्ट कळू नये?"

"आपल्याहून सोळा वर्षांनी लहान असलेल्या माझ्याबरोबर असे पोरकट हेवेदावे करताना त्यांना पाहिलं की मला पूर्वी राग यायचा, आता कींव येते. हे बघ, सत्य आपल्या बाजूला आहे. शेवटी विजय आपलाच होणार."

"सर, सत्याचा विजय व्हायला हा काय हिंदी चित्रपट आहे? ही असली माणसंच शिरजोर होऊन सत्यवाल्यांना पिडतात. या जगात न्याय नाहीये सर."

"आपण काल म्हटलेली वाक्य आता हा कालचा पोरगा म्हणतोय हे बघून गंमत वाटायची ती वेळ नव्हती तरी मला गंमत वाटली."

"अरे, आपण मूर्ख आणि त्या शहाण्या म्हणून त्यांनी कितीही डंका पिटला तरी ते लोकांना खरं वाटायला लोक काय मूर्ख आहेत का? त्यांच्याबद्दल लोक काय काय बोलतात ते ऐक."

योगायोग असा की मी असं म्हणतोय तेवढ्यात माझी जुनी रजिस्ट्रार चित्रा आली.

"गुड मॉर्निंग, सर" ती म्हणाली.

"गुड मॉर्निंग" मी म्हटलं. "तुझा लंडनचा ॲक्सेंट छान वाटतोय. कशी आहेस?"

ती हसली.

"काय, एम्.आर्.सी.ओ.जी. झालं का?"

"होय सर. दुसरी आले. तुमच्यासाठी चॉकलेट आणलंय." तिने पर्समधून चॉकलेटं काढली आणि मला आणि निशांतला एक एक दिलं.
"अभिनंदन" मी म्हटलं. "चल, जोशीबाईंना भेटूया."
"कशाला सर? नको" ती म्हणाली.
"अग, एचोडी आहेत. त्यांना तुझा रिझल्ट सांगून पेढा दे. चॉकलेट नको देऊस. येवढं छान चॉकलेट त्यांच्या पोटात जाऊ नये."
"तिने डोळे मोठ्ठे करून माझ्याकडे पाहिलं. मग म्हणाली, "मी पेढे नाही आणलेत."
"मी देतो ना" मी म्हटलं, आणि टेबलाच्या खणातून दोन पेढ्यांची प्लास्टिकची पिशवी काढली. "ही घे. एका पेशंटने देवाचा प्रसाद दिलाय. मी पेढे खात नाही. बाईंना देऊन टाक."
"पण त्यांना कशाला? मला नाही त्यांना काही द्यावसं वाटत" ती म्हणाली.
"चित्रा, माझी रजिस्ट्रार म्हणून काम केलंस, पण जगात माणसांबरोबर कसं वागायचं ते काही शिकली नाहीस. माझं ऐक. त्यांना तुझा रिझल्ट सांग आणि पेढे दे. मग त्यांचं तोंड बघ. लंडनपासूनचा प्रवासखर्च वसूल होईल बघ."
तशी ती हुशार होती. येवढं समजावून सांगितल्यावर तिची ट्यूब पेटली.
"आपण एकत्र गेलो तर त्यांना संशय येईल. आम्ही स्टाफरूममध्ये त्या आहेत तिथे आधी जातो. तू पाच मिनिटांनी ये" मी म्हटलं.

मी दिलेल्या सूचना तंतोतंत पाळण्याची तिला जुनी सवय होती. बरोबर पाच मिनिटांनी ती स्टाफरूममध्ये पोचली. जोशीबाई ऑपरेशन थिएटरमधून चहा मागवून पीत होत्या. मी निशांतला हलक्या आवाजात काही तरी सांगत होतो.

"अरे, मॅडम?" चित्रा चित्कारली.

"चित्रा, काय कसं काय?" बाईंच्या मॅनर्स तशा बऱ्या होत्या.

"कालच लंडनहून आले."

"हं."

"एम्.आर्.सी.ओ.जी. पहिल्या फटक्यात पास झाले."

"अभिनंदन."

"दुसरी रँक मिळवली. स्वीट्स आणल्यात" असं म्हणून तिने पर्समधून चॉकलेट काढलं, ते जोशीबाईंनी पाहिल्यावर परत आत ठेवून दिलं, आणि पेढ्यांची पिशवी काढून बाईंच्या हातावर ठेवली. बाई कसंनुसं हसल्या.

"ते परिक्षक परिक्षेच्या वेळी माझ्यावर खूश होते. इंडियात कोणत्या हॉस्पिटलात होतीस असं विचारत होते. मी म्हटलं राजमाता."

"अरे वा!"

"हो. ते पण 'अरे वा' असं म्हणाले. मग कोणाबरोबर काम केलंस असं विचारलं. मी म्हटलं डॉक्टर विजय पाटील."

"......"

"हो. ते पण 'अरे वा' असं म्हणाले. आय मीन ते 'अरे वा' असं म्हणाले. तुम्हाला ओळखत होते ते सर" ती माझ्याकडे तोंड करून म्हणाली.

"काय नाव म्हणालीस?" मी विचारलं.

"पीटरसन."

"हो, हो. त्यांचा फोन आला होता त्या दिवशी. मी ते ‘ल फोर्ट’ ऑपरेशन मॉडिफाय केलंय त्याबद्दल विचारत होते ते" मी गंभीरपणे म्हटलं.
जोशीबाईंचं तोंड बघण्यासारखं झालं होतं.
"माझं लॉग बूक बघितलं त्यांनी. 'राजमातात ही सगळी ऑपरेशनं तुम्ही करता का?' असं त्यांनी विचारलं."
"मग? आम्ही..." जोशीबाईंनी संभाषणाची सूत्रं हातात घ्यायचा प्रयत्न केला.
"मी म्हटलं त्यांना 'आमचे सर छान करतात ही ऑपरेशनं" बाईंचं वाक्य सुरू होताहोताच तोडून चित्रा म्हणाली. "आता जाते मी. घाईत आहे, सर. परत येईन हां जास्त वेळ बोलायला" असं म्हणून ती भुर्रकन उडून गेली.
"निशांत, चल बाबा, त्या पेशंटला टेबलवर घ्या असं सांगून आलोय आपण. जाऊन बघूया तिला" असं म्हणून मीही उठलो. त्याने माझ्याकडे चमकून बघितलं, पण काही न बोलता तो पण माझ्या मागून बाहेर आला.
"कुठची पेशंट सर?" त्याने विचारलं.
"कुठचीच नाही. मनाने येवढ्या खचलेल्या जोशीबाईंचं तोंड बघून मला हसू आवरेना म्हणून मी बाहेर पडलो" मी म्हटलं.
चित्रा फक्त स्टाफरूममधून भुर्रकन उडाली होती. बाहेर जाऊन ती थांबली होती. आम्हाला पाहून ती हसली.
"डॉक्टर श्रीराम लागू डॉक्टरकी सोडून नाट्यभूमीवर शिरले आणि अतिशय यशस्वी झाले. तूसुद्धा मनांत आणलंस तर नाट्यक्षेत्रात नाव कमावशील," मी म्हटलं, "चला, चहा पिऊया." आम्ही तिघं कॅंटीनला गेलो.

"सर, पीटरसननी फोन केला होता तुम्हाला?" तिने विचारलं.
"छे ग! पीटरसन काळा की गोरा तेसुद्धा मला माहित नाही."
"गोरा आहे" ती म्हणाली.
"असू दे, असू दे. तू पीटरसन 'अरे वा' म्हणाला असं म्हणालीस, म्हणून बाईंना जळवायला मी फोनबद्दल कल्पनेनेच सांगितलं. बाईंचा चेहरा बघून आनंद झाला की नाही?"
"जुनं सगळं येणं वसूल झालं सर" ती म्हणाली. "आता मात्र मी पळते. पुन्हा येईन." या वेळी मात्र ती खरोखरच पळाली, बाहेर जाऊन थांबली नाही.
"हे सगळं गौडबंगाल मला कळलं नाही" निशांत म्हणाला. तो बऱ्यापैकी गोंधळलेला दिसत होता.
"जोशीबाईंना चित्रा आवडत नसे, जसा त्यांना मी आवडत नाही. तिच्याबद्दलही त्या लोकांकडे काहीबाही बोलायच्या. चित्रा एम्.डी. व्यवस्थित उत्तीर्ण झाली. ती जेव्हा एफ्.सी.पी.एस्.ला बसली तेव्हा जोशीबाई परिक्षक होत्या. प्रॅक्टिकल परिक्षेत चित्राला फायब्रॉइडची केस मिळाली. बाईंनी पेशंटला स्वतः तपासलंच नाही. सुपरवायझर रजिस्ट्रारने चिठ्ठीवर लिहून दिलं ते वाचून बाईंनी डायग्नोसिस ठरवलं आणि परिक्षार्थींना प्रश्न विचारले. चित्राच्या पेशंटचं गर्भाशय चांगलं बेंबीपर्यंत मोठं होतं, तर चिठ्ठीत ते जरासंच मोठं आहे असं लिहिलं होतं. चित्राने खरा आकार काय होता ते सांगितलं. बाईंनी पेशंटच्या पोटाला हात लावला असता तरी त्यांना त्या गर्भाशयाचा आकार कळला असता. त्याऐवजी चिठ्ठीवर विसंबून त्यांनी चित्राने चांगली उत्तरं द्यायला मिळावी म्हणून गर्भाशयाचा आकार खोटाखोटाच मोठा सांगितला असं ठरवलं आणि

चित्राला नापास केलं. त्यांनी मला तसं सांगितलं, कारण ती माझी रजिस्ट्रार होती. मी ते चित्राला सांगितलं. अशी भडकली होती ती. त्या पेशंटचं तोपर्यंत ऑपरेशन झालं होतं. तिचं ते भलं मोठं गर्भाशय पॅथॉलॉजी लॅबमधून आणून जोशीबाईंच्या डोक्यावर आपटते असं ती म्हणत होती. पॅथॉलॉजीवाल्यांनी तिला ते दिलं नाही म्हणून जोशीबाई वाचल्या. ज्या मुलीला आपण नापास केलं ती एम्.आर्.सी.ओ.जी. पहिल्या फटक्यात पास होते आणि तेही दुसऱ्या क्रमांकाने, हे ऐकून त्यांचं तोंड कसं होतं ते बघण्यासाठी मी हा सगळा प्रपंच रचला. त्यांचं तोंड येवढं पडलेलं तू पूर्वी कधी पाहिलं होतस का?"

"नाही सर," तो म्हणाला "पैसा वसूल. पण ही चित्रा तुम्ही काय बोलायचं, कसं बोलायचं हे न पढवता येवढं छान कशी काय बोलली?"

"अरे बाबा, आंतरकॉलेज स्पर्धांमध्ये तिने नाटकं, नाट्यछटा, इंप्रॉम्प्टू एकपात्री प्रयोग वगैरे प्रकारात इतकी बक्षिसं मिळवलीयेत म्हणून सांगू. एकदा संकल्पना स्पष्ट झाली तिला थांबवणं कठीण असतं. म्हणून तर मी तिला जोशीबाईंवर येवढ्या कॉन्फिडन्सने सोडलं. तिने ते चॉकलेट पर्समधून काढलं आणि जोशीबाईंनी त्याच्याकडे आशेने बघितल्यावर परत ठेवून दिलं तो प्रसंग तर नाट्यगृहात खात्रीने वन्स मोअर घेऊन गेला असता."

***

कोणाच्या पोटात कशामुळे दुखेल ते सांगता येत नाही. मी कॉम्प्यूटर घेतला म्हणजे काय मर्सिडीझ गाडी घेतली नव्हती

की कोणाच्या पोटात दुखावं. आता हे खरंय की त्या काळी आमच्यापैकी कोणाकडे कॉम्प्यूटर नव्हता. डिपार्टमेंटमध्येही नव्हता. कोणाला तो वापरताही येत नव्हता. आय्.सी.एम्.आर्.जवळ एक डॉसवर आणि मोठ्ठ्या फ्लॉप्प्यांवर चालणारा एक डबा होता, जो जोशीबाईंनी ए.सी. मध्ये ठेवला होता, आणि फार गरम वाटायला लागलं किंवा झोप आली की बाई त्या खोलीत जाऊन बसत असत. इतर कोणाला तिथे प्रवेश नव्हता. त्यामुळे तो वापरण्याचा तर प्रश्नच नव्हता. मला कोणीतरी सुचवलं की तू तुझी पुस्तकं कॉम्प्यूटरवर लिही. सोपं जाईल. वाटेल तेव्हा वाटेल तिथे बदल करता येतील. टेक्स्ट हवं त्या आकारात आणि फॉन्टमध्ये टाकता येईल. छपाईचं भविष्य खिळे जुळवण्यात नाही तर कॉम्प्यूटर आणि लेसर प्रिंटरमध्ये आहे. माझ्या पुस्तकांच्या प्रिंटरला ते कबूल नव्हतं. पण माझ्या डोक्यात काय आलं, मी एक कॉम्प्यूटर विकत घेऊन टाकला. अख्खा दिवस हॉस्पिटलात जायचा. त्यामुळे घरी कॉम्प्यूटरवर काम करायला वेळ मिळण्याची शक्यता नव्हती. मग मी डीनची परवानगी काढून तो हॉस्पिटलात माझ्या ऑफिसात ठेवला. कामातून वेळ मिळाला की मी त्याच्यावर काम करायला लागलो. कसा वापरायचा ते पुस्तकं वाचून शिकलो आणि आठवड्याभरात बऱ्यापैकी प्रगती केली.

मी कॉम्प्यूटर घेतला म्हणून जोशीबाई, सुषमा, गजलवार अशा बऱ्याच जणांच्या पोटात दुखलं. मी गाडी घेतली होती तेव्हाही बऱ्याच जणांच्या पोटात दुखलं होतं. तेव्हा सुषमाने गाडी कितीला घेतलीस, कर्ज काढलंस का, कर्ज काढलं नाहीस तर

पैसे कुठून आणलेस अशा बऱ्याच चौकशा केल्या होत्या. घरी जाण्यासाठी बऱ्याचदा ती माझ्याच गाडीत घुसायची. बरं ज्याचं खावं त्याचं इमान तरी पाळावं. पण छे, ती माझ्याच गाडीत बसून मलाच चाव्या मारायची,

"जोशीमॅडमनी अमुक अमुक गोष्ट केली. त्याबद्दल तुझं काय मत आहे?"

ती माझं उत्तर दुसऱ्या दिवशी जोशीबाईंना सांगणार हे मला माहित असल्यामुळे मी तिला उत्तर देण्याच्या फंदात पडत नसे. शेवटी मी तिला कंटाळलो आणि काहीतरी निमित्त सांगून तिला बरोबर नेणं बंद केलं. एकदा तर जोशीबाई माझ्या गाडीत घुसल्या. मला रस्त्यात सोड म्हणाल्या. नवऱ्याच्या पैशांनी त्यांनी स्वतःसाठी आलिशान गाडी घेतली होती. ती नाही तर टॅक्सीने जाणारी बाई माझ्याकडे लिफ्ट मागते हे मला जरा विचित्र वाटलं. मी गाडी कशी चालवतो, गाडीत एसी नाही, डेक नाही वगैरे माहिती मिळाल्यावर त्यांचं समाधान झालं. मग त्यांनी माझ्याकडे परत कधी लिफ्ट मागितली नाही.

मी कॉम्प्यूटरवर काम करत असताना सगळीजणं एक एक करून माझा कॉम्प्यूटर बघून गेली. शेवटी डिपार्टमेंटसाठीही एक कॉम्प्यूटर घ्यावा असं सगळ्यांनी ठरवलं. मी माहितगार असल्यामुळे खरेदी झाल्यावर तो वापरायचा कसा हे सगळ्यांना शिकवायचं काम माझ्यावर आलं. मीही त्यांना हौसेने शिकवलं. मित्र आणि शत्रू असा भेदभाव केला नाही. माझ्याकडून शिकून घेतल्यावर शत्रू मंडळींना माझा काही

उपयोग राहिला नाही. मग त्यांनी आपला शहाणपणा दाखवायला सुरुवात केली.

त्याचं काय झालं, निशांतला कॉम्प्यूटर वापरण्यात खूपच रस वाटायला लागला. त्याला मी एक दिवस आपल्या फायली उघडून कोणी वाचू नयेत म्हणून त्यांना पासवर्ड कसा द्यायचा ते शिकवलं. त्याला ते फार आवडलं. त्याने उत्साहाने दोन फायली बनवल्या, त्यांना पासवर्ड दिला आणि आनंदात घरी गेला. आपल्या शिष्याने छान काम केलं म्हणून कृतकृत्य होऊन मीही घरी गेलो. दुर्दैवाने आमचा आनंद फार काळ टिकला नाही.

"विजय, या कॉम्प्यूटरवर पासवर्ड दिलेल्या दोन फायली आहेत. त्या तुझ्या आहेत का?" मला जोशीबाईंनी विचारलं.

"नाही. निशांतच्या आहेत. त्याला मी शिकवलं आणि त्याने त्या बनवल्या."

"हा कॉम्प्यूटर डिपार्टमेंटचा आहे. त्याच्यावर कोणीही आपल्या खाजगी फायली ठेवायच्या नाहीत. सगळ्या फायली सगळ्यांना उघडून वाचता आल्या पाहिजेत."

सगळ्यांना लायब्ररीत जाऊन वाचायची कधीही इच्छा होत नसे. त्या फायली वाचायची इच्छा का होत होती देव जाणे.

"ठीक आहे. पासवर्ड काढून टाकतो" मी म्हटलं. "पण तुम्हाला कसं कळलं तिथे त्या दोन फायली आहेत?"

"अं... मला सुषमा आणि अनिताने सांगितलं."

अनिता ही सुषमाची लेक्चरर होती. आपण कोणीतरी महान आहोत असं तिला मनापासून वाटायचं आणि तसं ती

सगळ्यांना दाखवायची. मला आठवतं, मी पुस्तक लिहिलं तेव्हा ती आरेमो होती. मला पाहून ती म्हणाली,

"ओ, शिट! तू पुस्तक लिहिलंस की काय?"

वरिष्ठांच्या ज्या गोष्टी 'शिट' वाटायच्या त्यांनाही मी कधी शिट म्हटलं नव्हतं. पुस्तक लिहिण्यात शिट म्हणण्यासारखं काय होतं देव जाणे. त्यातून तिने ते म्हटलं होतं तेव्हा तिला स्वतःला ऑपरेशनच्या नोट्ससुद्धा लिहिता येत नसत. मी सभ्य असल्यामुळे तेव्हा काही बोललो नव्हतो. मी तिला बराच ज्येष्ठ असताना आणि आमची काही ओळख नसताना ती असं म्हणाली होती. जोशीबाईंना इतरांच्या काड्या लावायचं काम ती आणि सुषमा मिळून करायच्या. जोशीबाई अतिशय हलक्या कानाच्या असल्यामुळे आग सहज लागायची. निशांतच्या फायलींची आग कारण नसताना लावल्याचं पाहून माझ्या डोक्यात संताप झाला. पण तसं न दाखवता मी पासवर्ड काढायला बसलो.

"सर, आपला पासवर्ड काढला की सगळी जणं आपल्या फायली वाचणार" निशांत म्हणाला.

"पण मला सांग, तुला असं काय लिहायचंय की ते इतरांनी वाचू नये?" मी विचारलं.

"काहीही..." तो म्हणाला.

"ठीक आहे. तुला काहीही लिहायचं असेल, चिंता करू नकोस. मी तुझ्या पाठीशी आहे तोपर्यंत तुझ्या फायलींमधलं एक अक्षरही कोणी वाचू शकणार नाही."

मी जुन्या फायलींचे पासवर्ड काढले. एक नवी फाईल बनवून तिच्यात जुन्या फायलींमध्ये लिहिलेल्या गोष्टी टाकल्या आणि

तिला पासवर्ड दिला.. जुन्या फायलींमध्ये ए, बी, सी, डी अशी अक्षरं टाईप केली.

"सर, पण आता नवी फाईल त्यांना सापडेलच, जिला पासवर्ड आहे. परत जुनंच नाटक होईल."

"घाबरू नकोस. हे काय आहे बघ." मी त्याला एक फ्लॉपी डिस्क दाखवली.

"काय आहे ते?"

"त्याला फ्लॉपी डिस्क असं म्हणतात. तिच्यात आपली फाईल अशी घालायची." मी त्याला आमची नवी फाईल फ्लॉपीत कशी घालायची ते दाखवलं. "मग ती फाईल कॉम्प्यूटरमधून अशी काढून टाकायची." मी त्याला तेही करून दाखवलं. "आता फ्लॉपी अशी बाहेर काढायची, आपल्या खिशात ठेवायची आणि शांत चित्ताने घरी जायचं. फाईल तुझ्या खिशात, तर बाया ती उघडतील कशा?"

"आणि आपल्याला ती लागेल तेव्हा?"

"तेव्हा फ्लॉपी परत कॉम्प्यूटरमध्ये घालायची आणि फाईल उघडायची. या कानाचा त्या कानाला पत्ता लागायचा नाही."

निशांत खूश झाल. पण लगेच त्याचं तोंड पडलं.

"काय झालं?" मी विचारलं.

"पण हा पळपुटेपणा झाला. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आपण वागलो यात आपला पराभव आहे" तो म्हणाला.

"ठीक आहे. तुझी इच्छा आहे तर आपण ती फाईल कॉम्प्यूटरमध्ये लपवून ठेवूया. हे असं करायचं" असं म्हणून मी ती फाईल एक्स्प्लोररमध्ये जाऊन हिडन करून टाकली.

"अरे, फाईल गेली. आता आपल्याला ती लागेल तेव्हा काय करायचं?"
"तेव्हा 'व्ह्यू हिडन फाईल्स' कमांड वापरली की ती दिसेल." स्वारी खूश झाली. त्याने मग फायलींमागनं फायली बनवण्याचा सपाटाच लावला. तो उठून जायचा तेव्हा त्याची एकही फाईल मागे शिल्लक नसायची. फायलींमध्ये महत्त्वाचं असं काही नसायचं हे खरं, पण प्रश्न तत्वाचा होता.
"विजय, तू आणि निशांत येवढा वेळ कॉम्प्यूटरवर बसून काय करता? तुम्ही बनवलेली एकही फाईल नंतर तिथे नसते." जोशीबाईंची व्यथा मी समजू शकत होतो, कारण तिचा निर्माता मीच होतो.
"का बरं? अनिताला सापडल्या नाहीत का फायली?" मी खवचटपणे विचारलं.
"अं ... हो, नाही" जोशीबाई म्हणाल्या.
"ती स्वतः काम करायचं सोडून इतरांच्या फायली शोधत का बसते?" मी रोखठोकपणे विचारलं.
"मीच सांगितलं तिला. पूर्वी तुम्ही फायलींना पासवर्ड द्यायचा तसं आता कोणी करतं का ते बघायला हवं म्हणून" जोशीबाई म्हणाल्या.
कोणाचाही खाजगी मजकूर वाचण्याची केवळ इच्छा असणंच नव्हे तर तो आपला अधिकार आहे असं समजणाऱ्या जोशीबाईंची मला जेवढी कींव आली तेवढाच संतापही आला. अनिता-सुषमाला आता धडा शिकवलाच पाहिजे असं मी ठरवलं.

"इथेच तर आहेत सगळ्या फायली" मी म्हटलं. "तिला नीट शोधता येत नसणार. मी येवढं शिकवून फुकट."
मी पटकन 'व्ह्यू हिडन फाईल्स' कमांड वापरली. कीबोर्ड आणि माउस वापरून मी काय केलं ते जोशीबाईंना समजलंच नाही. बघता बघता समोर शंभर एक फायली दिसायला लागल्या.
"या येवढ्या फायली अनिताला सापडू नयेत हं?" मी म्हटलं. "येऊन वाचू दे तिला."
जोशीबाई अनिताला बोलवायला गेल्या. मी सगळ्या फायली परत हिडन करून निघून गेलो. नंतर दोन तास अनिता आणि सुषमा कॉम्प्यूटरसमोर बसून केस उपटत होत्या असं ऐकलं.

***

जोशीबाईंना देवाने भांडखोरपणा दिला त्याच्याबरोबर थोडी कॉमनसेन्स द्यायला हवी होती. आपण आपल्याला माहित नसलेल्या विषयांवर वादविवाद करू नये आणि वापरता येत नसलेल्या आयुधांनी युद्ध करू नये हे समजणं खूप आवश्यक असतं. बाईंना ते कधी उमजलंच नाही. माझ्याकडून कॉम्प्यूटर या विषयावर येवढा मार खाल्ल्यावर शहाणा माणूस गप्प बसला असता. बाई गप्प बसेनात.
विजय आणि निशांत कॉम्प्यूटरवर काहीतरी करत बसतात हे बाईंना खूप खुपत होतं. त्यावर त्यांनी त्यांच्या अकलेप्रमाणे रामबाण उपाय काढला.
"कॉम्प्यूटर सगळ्यांचा आहे. एकजण तो वापरत असेल तेव्हा इतरांनी तिथे मागे खुर्च्या घेऊन बसावं आणि काय चाललंय ते बघावं" बाईंनी मिटिंगमध्ये हा क्रांतिकारी विचार मांडला.

त्यावर हसायचं की रडायचं हे ठरवण्यात सगळेजण इतके व्यग्र झाले की कोणी काही बोललंच नाही.

"टीव्हीवर चालू असलेला प्रोग्राम खूप जणांनी समोर बसून बघण्यासारखीच ही गोष्ट त्यांना वाटते की काय?" निशांत माझ्या कानात कुजबुजला. बाईंनी त्याच्याकडे डोळे वटारून पाहिलं. टीव्ही लांबून दिसतो तसा कॉम्प्यूटरचा मॉनिटर लांबून नीट दिसत नाही, त्यामुळे बाईंची ही सूचना व्यवहार्य नव्हती. पण बाईंना तसं सांगणार कोण?

"आपल्याला दहा खुर्च्या स्टोअरमधून मिळाल्या की आपण हे करू" मी म्हटलं. स्टोअरमधून दहा काय, एक खुर्चीसुद्धा जोशीबाईंना बापजन्मी मिळणार नाही हे मला माहित होतं. कुठच्याही प्रकारच फर्निचर खरेदी करण्यासाठी नगरपालिकेची कार्यप्रणाली कमीत कमी तीन वर्षांची असायची. कागदोपत्री त्याला तीन वर्षं लागत असली तरी गेल्या वीस वर्षांत आमच्या हॉस्पिटलात एकही खुर्ची किंवा टेबल खरेदी झालं नव्हतं. खुर्च्या खरेदी होईपर्यंत जोशीबाईंच्या कल्पनेचे तीन तेरा झाले असते.

"आपण आपल्या ईमेल वाचणार तेव्हा पाठी बसलेले लोकसुद्धा वाचतील ना" सुषमा अनिताच्या कानात कुजबुजली. मध्ये माझा कान असल्यामुळे मीही ते ऐकलं.

"मॅडम, काही होणार नाही" अनिता कुजबुजली. "जोशीमॅडमची ही नेहमीसारखी वेडगळ कल्पना आहे."

बाईंचे कान फुंकून सगळं डिपार्टमेंट आपल्या मनासारखं चालवू पहाणारी ही बाई त्याच जोशीबाईंना वेडगळ म्हणते हे खरं तर ध्वनीमुद्रित करून त्याची कॅसेट जोशीबाईंना त्यांच्या

वाढदिवसाला भेट म्हणून द्यायला हवी होती. दुर्दैवाने ध्वनिमुद्रक हवा तेव्हा हातात नसतो, आणि असला तर चालू नसतो. त्या क्षणीही तो नव्हता.

"पण प्रत्येक जण जेव्हा कॉम्प्यूटरवर काम करतो तेव्हा त्याने काम केलेल्या फायली तिथे नंतर असल्या पाहिजेत" माझ्याकडे आणि निशांतकडे संशयाने बघत बाई म्हणाल्या.

"काय किडा आहे बाईंना" तो पुटपुटला. "आता काय करायचं?"

उत्तरादाखल मी त्याच्याकडे तोंड वळवून डोळा मारला.

"आपल्यावर लक्ष ठेवण्यासाठी मॅडमनी ही आयडिया काढली आहे" निशांत म्हणाला.

"असू दे" मी म्हटलं. तू मॉनिटरसमोर ताठ बसत जा. मागच्या कोणालाही स्क्रीन दिसता कामा नये."

निशांतने आपली कल्पना हाणून पाडली हे लवकरच बाईंच्या लक्षात आलं. शेवटी त्यांनी आम्हाला कॉम्प्यूटर काम करायला मिळू नये असं करायचं ठरवलं. जेव्हा आम्हाला मोकळा वेळ मिळायचा, तेव्हा बाई आपण स्वतः कॉम्प्यूटर चालवायला बसायला लागल्या. बाईंना उठवणार कसं, म्हणून निशांत चरफडायला लागला. मी माझ्या ऑफिसमध्ये कामात असायचो, त्यामुळे मला काही त्रास होत नव्हता.

"सर, काहीतरी करा. आपल्या वेळात बाई कॉम्प्यूटरवर काम करायला बसतात. मला तो वापरायला मिळत नाही."

"अरे, बाईंचा उत्साह चार दिवस टिकेल. मग त्या परत कॉफी, पाट्‌र्या, गॉसिप या गोष्टी करायला जातील. थोडा धीर धर. पण मला एक सांग, बाई कॉम्प्यूटरवर करतात काय?"

"पेंट प्रोग्राममध्ये फालतू चित्रं काढत बसतात" तो उद्वेगाने म्हणाला. "नाहीतर एक्सेलमध्ये कोणी कोणती ऑपरेशनं केली त्याच्या नोंदी बघत बसतात."

"ठीक आहे. आपण त्यांना धडा शिकवूया" मी म्हटलं.

त्या दिवशी बाई जेवायला गेल्या तेव्हा मी कॉम्प्यूटरचा ताबा घेतला. एक्सेलची ऑपरेशनांची फाईल उघडली. व्हिज्युअल बेसिक एडिटर सुरू केला. थोडसं कोड लिहिलं आणि सेव्ह केलं. मग एक्सेल बंद केलं. मी काय करतो ते निशांत लक्ष देऊन बघत होता, पण त्याला ते सगळं डोक्यावरून गेलं असावं.

"निशांत, आता तू आपली एक्सेलची फाईल उघड बघू" मी म्हटलं.

निशांत माझ्या जागेवर बसला. त्याने ती फाईल उघडली.

"अरे बापरे! सर हे बघा काय झालं" तो म्हणाला. काय होणार ते मला माहित होतं, कारण मीच तशी सोय केली होती. स्क्रीनवर 'धोका. तुमच्या कॉम्प्यूटरला नोझी इडियट व्हायरसची लागण झाली आहे' असा मेसेज आला होता. ओके बटणावर क्लिक केल्याशिवाय कॉम्प्यूटर पुढे जायला तयार नव्हता. ओकेवर क्लिक केलं की मेसेज जायचा आणि काही करण्यापूर्वी परत तोच मेसेज यायचा.

"आता काय करायचं?" निशांत म्हणाला. तो बऱ्यापैकी घाबरला होता.

"आता आपण जोशीबाईंची गंमत बघायची" मी म्हटलं. "घाबरू नकोस. तो खरा व्हायरस नाहीये. मी बाईंना धक्का द्यायच्यासाठी तसं करून ठेवलं आहे."

आम्ही शांतपणे निघून गेलो. जेवून खाऊन परत आलो तेव्हा जोशीबाई कॉम्प्यूटरसमोर बसल्या होत्या. त्या मेसेजबरोबर त्यांची झटापट चालू होती. बाजूला सुषमा आणि अनिता होत्या.

"हा व्हायरल इन्फेक्शनांचा सीझन आहे. शहरात डेंग्यू, स्वाईन फ्ल्यू वगैरेची साथ आहे. त्यातलाच एखादा हा व्हायरस आपल्या कॉम्प्यूटरमध्ये घुसला असणार" बाई म्हणाल्या. "इथे काम करायला बसणाऱ्यांनी नाकातोंडावर मास्क लावून बसलं पाहिजे."

बाई एचोडी आहे म्हणून तिला सहन करायचं, नाहीतर एक नंबरची इडीयट आहे असा भाव अनिताच्या चेहऱ्यावर आला. सुषमाने आपला चेहरा मोठ्या प्रयासाने निर्विकार ठेवला. आजारांचे व्हायरस आणि कॉम्प्यूटरचे व्हायरस वेगवेगळे असतात हे बाईंना माहित नव्हतं आणि त्या इतर दोघीजणी बाईंना तसं समजावून सांगायला तयार दिसत नव्हत्या.

"मला वाटतं मॅडम तुम्ही ती फाईल बंद करा आणि परत उघडा" सुषमा म्हणाली.

बाईंनी तसं केलं, पण व्हायरस काही गेला नव्हता.

"मला वाटतं मॅडम तुम्ही कॉम्प्यूटर बंद करा आणि परत सुरू करा" अनिता म्हणाली.

"तूच कर" असं म्हणून बाई उठल्या. अनिताने स्वतःची आयडिया वापरून बघितलं. व्हायरस काही गेला नाही.

"आपल्याला अँटीव्हायरस घातलं पाहिजे" सुषमा म्हणाली.

"ते कुठून आणायचं?" बाईंनी विचारलं.

"विकत मिळतं" सुषमा म्हणाली.

बाई गप्प राहिल्या. पैसे काढायचं नाव घेतल्यावर त्या अशा गप्प व्हायच्या.

मी आणि निशांत गंमत बघत मागे उभे होतो. आमच्याकडे लक्ष गेल्यावर तिघी गप्प झाल्या. तिकडे स्क्रीनवर नोझी इडियट व्हायरसचा मेसेज रुबाबात उभा होता.

"काय झालं?" मी विचारलं.

"व्हायरस आलाय" बाई तुटकपणे म्हणाल्या.

"मग तो काढून घेतला पाहिजे" मी म्हटलं. "मागे आमच्या घरीपण एक व्हायरस आला होता. मोठ्या मुश्कीलीने मी तो काढला."

"तुला व्हायरस काढता येतो? मग हा व्हायरस काढ बघू" बाईंचा आवाज एकदम गोड झाला.

"दोन-तीन दिवस काम करायला लागेल. तोपर्यंत कोणाला कॉम्प्यूटरवर बसू देऊ नका" मी म्हटलं.

बाईंनी मोठ्या कष्टाने ते मान्य केलं. मी कॉम्प्यूटररूमची चावी ताब्यात घेतली. तिघीजणी गेल्या.

"वत्सा, आता तीन दिवस तू एकट्याने कॉम्प्यूटर वापरायचा. अगदी समाधान होईपर्यंत" मी म्हटलं.

तो आनंदाने हसला. "पण सर, तुम्ही काय केलं ते काही कळलं नाही."

"जाऊ दे रे. ते खूप अवघड आहे. प्रत्येक गोष्ट कळली पाहिजे असं थोडंच आहे? विमान कसं उडतं ते माहित नसलं तरी माणसं विमानाने प्रवास करतात की नाही? हे तसंच समज."

"पण सर, तो व्हायरस, काय नोझी ...."

"नोझी इडियट. नोझी म्हणजे दुसऱ्याच्या कामात नाक खुपसणारा, इडियट म्हणजे मूर्ख. जोशीबाई, सुषमा आणि अनिता यांना उद्देशून ते नाव होतं, कळलं?"
तिसऱ्या दिवशी मी व्हिज्युअल बेसिक कोड काढून फाईल पूर्ववत केली. व्हायरस मेसेज यायचा थांबला. ते तीन दिवस निशांत मधून मधून स्वतःशीच हसत होता. एकट्याला कॉम्प्यूटर वापरायला मिळाला म्हणून तो हसत होता की त्या व्हायरसचं नाव आठवून हसत होता ते काही मी त्याला विचारलं नाही.

***

"सर, जोशीमॅडमनी मला बोलावलं होतं" निशांत म्हणाला. "आपल्या ऑपरेशन्सच्या प्रेफरन्सच्या दिवशी त्यांना स्वतःची एक केस करायची आहे. त्यांच्या ऑपरेशनच्या दिवशी त्यांना रजा घ्यायचीय. आपल्या दिवशी तुमची एक केस करा असं त्या म्हणाल्या."
"बरं" मी म्हटलं.
जोशीबाई, सुषमा आणि म्हसवानी यांची कोऑपरेटिव्ह संस्था झाली होती. सुषमाचा ऑपरेशनचा दिवस शनिवार होता. इतरांप्रमाणे तिला अर्धा दिवस घरी जायचं असायचं. मग ती शनिवारी थोडीच ऑपरेशनं ठेवायची. म्हसवानीला अप्रोची पोस्ट मिळाली आणि स्वतःचं युनिट मिळालं, पण तिला ऑपरेशनं करता येत नसत. हगल्या मुतल्याला ती सुषमाला मदतीला म्हणून बोलावून घ्यायची. त्याचा मोबदला म्हणून सुषमा आपली शनिवारी न केलेली ऑपरेशनं म्हसवानीच्या

दिवशी जाऊन करायची. जोशीबाई म्हसवानीला पाहिजे तेव्हा सुट्ट्या द्यायच्या. इतरांना विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे अर्धी व्हेकेशन मिळायची तर म्हसवानीला लागोपाठ तीन वर्षं मे महिन्याची संपूर्ण व्हेकेशन जोशीबाईंनी दयाबुद्धीने दिली होती. तिच्या जागी काम करायला त्या तिसऱ्या युनिटच्या माणसांना लावून द्यायच्या. याचा मोबदला म्हणून त्या म्हसवानीच्या ऑपरेशनच्या दिवशी स्वतःच्या केसेस ठेवायच्या. त्यांनी माझ्या दिवशी कधी गडबड करायचा प्रयत्न केला नव्हता. या वेळी म्हसवानीच्या दिवशी जमण्यासारखं नसावं.

ठरल्याप्रमाणे जोशीबाईंनी आमच्या प्रेफरन्सच्या दिवशी आपलं एक ऑपरेशन करून घेतलं. त्यांच्या ऑपरेशनच्या दिवशी आम्ही आमची केस करायला गेलो, तर त्यांचा लेक्चरर आम्हाला टेबल देईना.

"जोशीमॅडमनी आमच्या दिवशी एक केस केली आणि तुमच्या दिवशी आम्हाला एक केस करू देऊ म्हणून सांगितलं" निशांत म्हणाला.

"पण मला त्यांनी तसं सांगितलेलं नाही. मला माझ्या ओळखीच्या एका पेशंटचं एक मायनर ऑपरेशन करायचंय" तो म्हणाला.

"ते तू मायनर ऑपरेशन थिएटरात कर" निशांत म्हणाला.

"नाही. आज आमचं मेजर थिएटर आहे, आणि मला वेळ आहे. मी ते इथेच करणार."

मग माझी सटकली.

"हे बघ, आज जोशीमॅडम नाहीत, तेव्हा मीच प्रभारी विभागप्रमुख आहे. तू मला केस करू देतोस की मी तुझ्यावर ॲक्शन घेऊ?" मी त्याला दरडावलं.

तो टरकला. आम्हाला ऑपरेशन टेबल मिळालं. पण दुसऱ्या दिवशी त्याने जोशीबाईंना जाऊन काडी लावली. बाई आपण दिलेलं वचन विसरल्या. त्यांनी फतवा काढला,

'यापुढे जर कोणाला इतर युनिटांच्या दिवशी ऑपरेशन ठेवायचं असेल, तर एचोडीची पूर्वपरवानगी घेणं आवश्यक असेल.'

तेवढं लिहून त्यांचं समाधान झालं नाही. त्यांनी त्या छापील फतव्याच्या खाली स्वतः हाताने तळटीप जोडली, 'काही जणांना नियम समजत नाहीत आणि ते नियम कधीही मोडतात. त्यांनी हा नियम पाळावा."

माझ्या आणि निशांतच्या डोक्यात नेहमीप्रमाणे संताप संताप झाला.

"जोशीमॅडम दिलेल्या वचनाच्या विरुद्ध गेल्या आणि आम्ही नियम तोडतो म्हणताहेत!" निशांत म्हणाला.

"हं..." मी म्हटलं.

"आपल्याला इतर दिवशी ऑपरेशन ठेवायला त्यांच्याकडे जाऊन परवानगी मागावी लागणार. मग त्या कुजकट बोलणार" तो म्हणाला.

"हं." मी म्हटलं. "पण आपण आपली ऑपरेशनं आपल्या दिवशी संपवतो. आपल्याला इतर दिवशी जायची गरज कधीच पडत नाही."

"ते खरं आहे, सर. पण मुद्दा तत्वाचा आहे" तो म्हणाला. "आपण अन्यायाविरुद्ध लढा दिलाच पाहिजे."

"प्रतीपक्षकार, प्रतीपक्षाचा वकील आणि न्यायाधीश जोशीबाई. आपण लढा जिंकणार कसा रे?" मी विचारलं.

"सर, तुम्ही काहीतरी आयडिया काढा" तो म्हणाला.

"ठीक आहे" मी म्हटलं. "चल."

आम्ही कॉम्प्यूटर रूममध्ये पोचलो. कॉम्प्यूटर सुरू केला. त्याची तारीख आणि महिना बदलून सहा महिन्यांपूर्वीच्या आमच्या ऑपरेशनच्या दिवसाची तारीख आणि वेळ टाकली. मग एक वर्ड फाईल बनवली, आणि तिच्यात चार ओळी टाईप केल्या,

१. एचोडीला स्वतःला नियम लागू नसतात.

२. एचोडीच्या आवडत्या लोकांसाठी एक नियम असतो, तर नावडत्या लोकांसाठी दुसरा नियम असतो.

३. स्वतःच्या मर्जीप्रमाणे नियम वाकवण्याचा अधिकार फक्त एचोडीला असतो.

४. एचोडीच्या मनमानी वर्तनाच्या विरुद्ध बोलण्याचा अधिकार कोणालाही नसतो.

मग मी त्या फायलीला नियम असं नाव दिलं आणि ती सर्वसामान्य लोक आपल्या फायली माय डॉक्युमेंट्समध्ये ठेवतात तिथे न ठेवता जरा  दूर पण अनिताला सापडेल अशा ठिकाणी सेव्ह करून ठेवली. मग कॉम्प्यूटरची तारीख आणि वेळ दुरुस्त केली आणि कॉम्प्यूटर बंद केला.

"आता काय होईल सर?" निशांतने विचारलं.

"तू कुठे काही बोलू नकोस, नुसती गंमत बघत रहा" मी म्हटलं.

तीन-चार दिवस गेले आणि स्फोट झाला. मला कॉम्प्यूटरच्या खोलीत बोलावणं आलं. मी तिथे पोचलो तेव्हा तिथे संतप्त झालेल्या जोशीबाई, स्वतःवर घोर अन्याय झाल्यासारखं तोंड केलेली सुषमा, आणि स्वतःला दोन शेपट्या असल्याचा शोध लागलेल्या कुत्र्यासारखं आनंदित तोंड असलेली अनिता इतकी मंडळी हजर होती.

"काय झालं?" मी म्हटलं.

"विजय, हे तू लिहिलंस?" बाईंनी थरथरतं बोट कॉम्प्यूटरकडे रोखलं. तशी त्यांची बोटं नेहमीच थरथरायची. पण त्या दिवशी संतापामुळे ती जरा जास्तच थरथरत होती.

स्क्रीनवर नियम नावाची वर्ड फाईल उघडलेली होती. मी तिच्यात दिसणाऱ्या चार ओळी वाचल्या. त्या मी बनवली तेव्हा होत्या तशाच होत्या.

"नाही बुवा" मी म्हटलं. मी ते टाईप केलं होतं, लिहिलं नव्हतं. "तुमच्याबद्दल असं कोणी बरं लिहिलं असेल?"

"तुझ्याशिवाय डिपार्टमेंटमधलं इतर कोणीही असं लिहिणार नाही" बाई म्हणाल्या. "आज ती फाईल अनिताला सापडली. तिने ती सुषमाला दाखवली. तिला ते वाचून राग आला म्हणून तिने मला बोलावलं."

"अच्छा. पण म्हणून ते मी लिहिलं हे कसं सिद्ध होतं?"

"आणखी कोणी असं लिहिणार नाही" बाई म्हणाल्या.

"तुमचं मत हा काही पुरावा मानता येत नाही. माणसं काहीही आरोप करू शकतात. पण कॉम्प्यूटर कधीही खोटं बोलत नाही. आपण पुरावा बघूया. सुषमा, ती फाईल बंद कर बघू."

तिने ती फाईल बंद केली. 'हा आता पुरता फसलाय. काय करायचं ते करू द्यावं, कारण तो आता सुटू शकत नाही' असा तिचा आणि अनिताचा अविर्भाव होता.

"आता ती फाईल कुठे सापडली ते मला दाखव" मी म्हटलं.

तिने ती फाईल कुठे सापडली ते दाखवलं. मी त्या फायलीवर राईट क्लिक केलं आणि आलेल्या मेन्यूत प्रॉपर्टीजवर क्लिक केलं. फाईलच्या प्रॉपर्टीजचं पान उघडलं. मी फाईल बनवल्याच्या तारखेवर बोट ठेवलं.

"आता आपण कॅलेंडरवर ती तारीख कोणत्या दिवशी होती ते बघूया" मी म्हटलं.

अनिताने कॅलेंडर तपासलं. तो माझा ऑपरेशनचा दिवस निघाला.

"त्या दिवशी मी सकाळी साडेआठपासून संध्याकाळी साडेचारपर्यंत नेहमीप्रमाणे ऑपरेशन थिएटरात होतो. ज्या कोणी ही फाईल बनवली ती व्यक्ती इथे बसायला मोकळी होती. आता त्या दिवशी मोकळी असणारी युनिटं दोन - एक मॅडम तुमचं आणि दुसरं अनिताचं. म्हणजे तुमच्यापैकीच कोणीतरी ही फाईल बनवली आहे."

मंडळी अवाक झाली. फाईलच्या प्रॉपर्टीज हा प्रकार त्यांना माहितच नव्हता.

"हे बदलता येत असेल" बाईंनी आपली बाजू सावरायचा केविलवाणा प्रयत्न केला.

"बिल गेट्स साहेबांना विचारा की त्यांच्या मायक्रोसॉफ्ट विंडोजच्या फायलींच्या प्रॉपर्टीज बदलता येतात का. इतर कोणालाही विचारा. तुम्हाला येत असेल तर करून दाखवा. माझ्यावर उगाच भलतेसलते आरोप केलेले मला सहन होणार नाहीत" मी म्हटलं.

"पण त्या फायलीत नंतर कोणीतरी नवीन बदल केले असतील" सुषमा म्हणाली. तशी ती ढ नव्हती. पण तिचा सामना तिच्याहून या क्षेत्रात खूप जास्त हुशार असणाऱ्या माणसाबरोबर होता.

"अच्छा. मला असं सांगा. अनिताला ही फाईल कधी सापडली?"

"आज सकाळी" बाई म्हणाल्या.

"किती वाजता?"

"अकरा वाजता" बाई म्हणाल्या.

"आता या प्रॉपर्टीजच्या पानाकडे बघा" मी म्हटलं. "फाईल बदल्याची तारीखः ती आजचीच आहे. फाईल बदल्याची वेळः आज सकाळी अकरा वाजता! जोशीमॅडम, अनिताने आज सकाळी अकरा वाजता या फायलीत फेरफार केलेयत."

"ती असं करणार नाही" जोशीबाई चाचरल्या.

"असं तुम्ही म्हणता. मी म्हणतो त्या गोष्टीचा पुरावा इथे आहे. मला खोट्या आरोपात अडकवण्यासाठी तुम्ही मंडळींनी संगनमताने हा डाव रचलाय. आता हा पुरावा मी छापून घेतो, नाहीतर उद्या म्हणाल, तसं नव्हतंच."

"अनिताची बुब्बुळं विस्फारली होती. हे सगळं तिच्या आकलनाच्या पलिकडचं होतं. तिने तिच्या मते अपार बुद्धिमत्तेच्या जोरावर जो शोध लावला होता, त्याने तिची,

सुषमाची आणि जोशीबाईंची विश्वासार्हता धुळीला मिळवली होती. काहीतरी सनसनाटी चाललंय याची कुणकुण लागल्यामुळे तिथे डिपार्टमेंटमधल्या मंडळींची ही गर्दी झाली होती. बाईंचं वर्तन बऱ्याच जणांना आवडत नसे. हा प्रकार बघून सगळ्यांच्या चेहऱ्यांवर स्मितहास्य दिसू लागलं होतं.

"ही एक वेळ मी गप्प बसतो. लक्षात ठेवा, पुन्हा जर मला खोट्या प्रकरणात अडकवण्याचा कोणी प्रयत्न केला तर फार महाग पडेल." मी दरवाजा ढकलून संतापल्यासारखा बाहेर पडलो. इतर मंडळी पांगली. तिघी बाया आतमध्ये गप्प बसून राहिल्या. हा काहीतरी जादूटोणा असावा असं वाटत असल्यासारखी त्यांची तोंड झाली होती.

"सर, पण आज सकाळी अकरा वाजता अनिताने त्या फाईलमध्ये फेरफार केले हे दाखवायचं तुम्ही कसं जमवलंत?" निशांतने मला नंतर विचारलं.

"अरे, ती फाईल काहीही बदल न करता नुसती प्रिंट केली तरी तिच्यात फेरफार केले असं लिहून येतं. ती प्रोग्रामिंगची चूक आहे. पुरावा म्हणून अनिताने ती प्रिंट केली होती. माझं नशीब जोरावर होतं. फाईल बनवलीही त्यांनीच आणि बदललीही त्यांनीच असं मला सिद्ध करता आलं. बिल गेट्ससाहेब ऑफिसच्या पुढच्या आवृत्तीत ही चूक दुरुस्त करतीलही. आपल्याला काय? आज आपलं काम झालं ना? बस झालं."

बाईंचं त्रिकूट सुधारलं नाही, पण संभाळून वागायला लागलं. विजयने काहीतरी सॉलिड आयडिया करून तिघींना धडा शिकवला असं सगळ्या डिपार्टमेंटमध्ये झालं. आणखी काय पाहिजे?

***

लोकसेवा आयोगाचे प्रोफेसरच्या पोस्टसाठी इंटरव्ह्यू जाहीर झाले. दोन वर्षं अप्रो म्हणून काम केल्यावर सेवाज्येष्ठतेप्रमाणे मला प्रोफेसरच्या हंगामी पदावर बढती कधीच मिळाली होती. माझ्याआधी एक वर्ष निशा हलालला देसाई जनरलमध्ये आणि माझ्यानंतर दोन वर्षांनी गजलवारना राजमातात अशीच बढती मिळाली होती. पण कायमस्वरूपी प्रोफेसर बनण्यासाठी लोकसेवा आयोगाकडून नियुक्ती व्हावी लागत असे.

"काय विजय?" परवेझचा फोन आला. तो असा मधूनमधून संपर्क राखून असायचा. "प्रोफेसरच्या इंटरव्ह्यूला जातोयस म्हणे."

"होय रे."

"निशा सिनियर आहे. जपून. आणि गजलवारचा नागपूरचा इंफ्लुअन्स आहे असं ऐकतो. संभाळ."

"अरे, माझ्याकडे मेरिट सोडून काही नाहीये. अप्रोच्या इंटरव्ह्यूमध्ये मी निशाला मागे टाकलं होतं. यावेळी ती गाफील रहायची नाही. आणि नागपूर मी काय संभाळणार? परमेश्वरावर भरवसा ठेवून आहे."

"ठीक आहे. कळव काय होतं ते. बेस्ट ऑफ लक." त्याने फोन ठेवला.

इंटरव्ह्यूसाठी निशा काखोटीला सहा बाय चार इंचांची पर्स मारून आली होती. आतापर्यंत तिने जे जे काही केलं होतं ते त्या पर्समध्ये असायला हवं होते. मी बरोबर नेलेल्या दोन बॅगांकडे पाहिलं. त्यांच्यात मी लिहिलेली सतरा वैद्यकीय पुस्तकं होती, जर्नल्समध्ये प्रकाशित झालेले पन्नास

शोधनिबंध होते, आणि मी बनवलेल्या ऑपरेशन्सच्या चार व्हिडियो कॅसेट्स होत्या. दोन बॅगा भरून आपलं कर्तृत्व आहे म्हणजे आपण मेरिटवर तिच्यापुढे जायला हरकत नाही असं माझ्या मनात आलं. गजलवारांच्या हातात एक पातळशी फाईल होती. बस्स.

निशा पहिली आत गेली. पाच मिनिटांत मजेत बाहेर आली आणि निघून गेली. मी दोन बॅगा उचलून आत गेलो. देसाई जनरलच्या डीन बसल्या होत्या. निशाच्या वडिलांचे एकेकाळचे असिस्टंट खडखडे विषयाचे तज्ज्ञ म्हणून आले होते. नेमकं त्यांनाच आयोगाने बोलवावं हं? निशाचं नशीब जोरदार होतं किंवा वजन वरपर्यंत होतं. मी माझी पुस्तकं, शोधनिबंध आणि कॅसेट्स टेबलावर मांडून ठेवल्या.

"तुम्ही लेक्चररम्हणून केवळ दोन वर्षं आणि असोसिएट प्रोफेसर म्हणून चारच वर्षं काम करून प्रोफेसर झालात" देसाई जनरलच्या डीननी जालिम बद्धकोष्ठ झाल्यासारख्या तोंडाने म्हटलं. तेच शब्द कौतुकाच्या सुरात म्हटले असते तर त्यांचा वेगळा अर्थ झाला असता. मी काहीतरी खटपटी लटपटी करून ते साध्य केलं असं तरी त्यांना सुचवायचं असावं किंवा प्रमोशनची येवढी घाई कशाला असं त्यांना म्हणायचं असावं.

"थँक यू" मी स्मितहास्य करून म्हटलं. त्यांचं बद्धकोष्ठ आणखी वाढल्यासारखं त्यांनी तोंड केलं.

"तुम्ही काही संशोधन करताय का?" खडखड्यांनी विचारलं.

माझे हे पन्नास शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत" मी म्हटलं. सध्या मी कोल्पोस्कोपीत तुरटीचा वापर यावर संशोधन करतोय.

"डॉक्टर, शंभर वर्षांपूर्वी तुरटी टिश्यू जाळायसाठी वापरायचे" ते हेटाळणीच्या सुरात म्हणाले. "त्याच्यावर आज तुम्ही आज संशोधन करताय?"

तुरटी काहीही जाळायसाठी कोणीही कधीही वापरली नव्हती हे मला माहित होतं. पण तज्ज्ञाला तसं सांगणं बरं दिसलं नसतं.

"सर, माझं संशोधन तुरटीचा खडा लावून टिश्यू जाळण्यावर नाही, तर त्याचा अतिशय कमी भाग असलेला द्राव वापरून कोल्पोस्कोपीतली प्रतिमा कशी बदलते ते बघण्याचं आहे."

तज्ज्ञाने नकारार्थी मान हलवली. याच तज्ज्ञाने आयुष्यात स्वतःचा ठसा पडेल असं काहीही केलं नव्हतं हेही मला माहित होतं. पण लोकसेवा आयोग ज्याला तज्ज्ञ म्हणतो तो तज्ज्ञ नाही हे दाखवणं त्यावेळी तरी शक्य नव्हतं. मंडळींनी मला आणखी दोन प्रश्न विचारले. माझी उत्तरं ऐकली की नाही देव जाणे. 'ठीक आहे, या तुम्ही' असं ते म्हणाले तेव्हा मी माझी पुस्तकं आणि कॅसेट्स बॅगांमध्ये भरायला सुरुवात केली. माझं सामान भरून होईपर्यंत मंडळी रेल्वेतला भसाड्या आवाजात गाणारा भिकारी पुढे जाईपर्यंत प्रवासी जसा चेहरा करतात तसा चेहरा करून माझ्याकडे बघत राहिले.

इंटरव्ह्यूचा निकाल माझ्या अपेक्षेप्रमाणेच लागला. सहा बाय चार पर्सवाल्या निशा हलालला आयोगाने कायम स्वरूपी प्रोफेसर म्हणून निवडलं. माझ्या मनाची या गोष्टीला तयारी होती तरी वाईट वाटलं. मला एका इन्कम टॅक्सच्या असिस्टंट कमिशनरची आठवण आली. मी जेव्हा गाडी घेतली तेव्हा त्यांनी मला माझ्या रिटर्नसंबंधात चौकशीसाठी बोलावलं होतं.

त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं मी बरोबर दिली. मग त्याने विचारलं,

"डॉक्टर, तुमचं रिटर्न तुम्हीच भरता? सीए नाहीये का?"

"हो, मीच भरतो. सोपं असतं ते" मी म्हटलं. ते हसले. ते सोपं नसतं हे त्यांना माह्ति असावं.

"तुम्ही येवढी पुस्तकं लिह्ता. प्रकाशक त्यांचं मानधन व्यवस्थित देतात का?"

"देतात थोडंफार. पण मी ती पैशासाठी लिह्त नाही. पुस्तकं लिह्ण्यात एक आनंद असतो. झालंच तर वैद्यकीय क्षेत्रात नाव होतं. पुढे बढतीच्या वेळी त्याचा फायदा होतो."

ते हसले. "डॉक्टर, कर्तृत्व, ज्ञान वगैरे गोष्टींचा सरकारी आणि निमसरकारी क्षेत्रांत बढतीशी काही संबंध असतो कुठे?"

गृहस्थ पोळलेले दिसत होते. मी उत्तरादाखल जरासा हसलो. आपल्या ज्ञानाच्या आणि कर्तृत्वाच्या जोरावर आपण अप्रोच्या जागेपर्यंत पोचलो आणि पुढेही तसेच वर जाणार आहोत असा मला विश्वास वाटत होता. त्या विश्वासाला या इंटरव्ह्यूच्या वेळी तडा गेला. काय झालं ते मी जेव्हा परवेझला सांगितलं, तेव्हा तो आधी काहीच बोलला नाही. मग त्याने 'बेटर लक नेक्स्ट टाईम' असं म्हणून फोन ठेवला.

***

एका वर्षाने लोकसेवा आयोगाने परत प्रोफेसरची पोस्ट जाहीर केली.

"काय पाटील, परत इंटरव्ह्यूला जायला हवं" गजलवारांनी विषय काढला.

"तर काय" मी म्हटलं. नशीबाने पोस्ट ओपन कॅटेगरीतली होती, गजलवारांच्या गटासाठी राखीव नव्हती. नाहीतर ते माझ्यापुढे जाऊन बसले असते आणि जोशीबाईंनंतर माझे बॉस झाले असते.

"सर्टिफिकिटांच्या नुसत्या झेरॉक्स कॉप्या काढायलाच किती खर्च होतो" ते म्हणाले.

"हूं" मी म्हटलं.

"मला एक जण भेटला होता" त्या एकाचं नाव न घेता गजलवार म्हणाले. "तो म्हणाला, पंचवीस हजार रुपये दिलेत तर प्रोफेसर म्हणून तुमची निवड करून देतो. मी म्हटलं इथे कोणाकडे येवढे पैसे आहेत या गोष्टीसाठी? आपण सरळ मार्गाने निवडून येऊ."

गजलवारांना तो माणूस हॉस्पिटलच्या कँटीनमध्ये किंवा न्हाव्याच्या दुकानात नक्कीच भेटला नसणार. कदाचित तो त्यांना आयोगाच्या ऑफिसच्या आसपास भेटला असेल. त्यांनी आयोगाला आणि पोलीसांना सांगून त्याची अटक करवली नाही त्याचं कारण काही कळलं नाही. मला त्यांनी त्याचं नावगाव सांगितलं नाही त्याचं कारण मला लगेच कळलं. समजा मी त्याला पंचवीस हजार रुपये दिले आणि प्रोफेसर झालो तर, अशी भिती त्यांना वाटली असणार. कर्तृत्वाच्या जोरावर माझ्या पुढे जाण्याची त्यांची जिद्द मात्र वाखाणण्यासारखी होती. मागच्या इंटरव्ह्यूच्या वेळी माझी दोन बॅगाभर पुस्तकं आणि कॅसेट्स बघूनही त्यांना येवढा आत्मविश्वास वाटत होता तो कदाचित त्यांच्या नागपूरच्या कनेक्शनवर असलेल्या भरवशामुळे असेल.

मागच्या वेळेसारखा या वेळीही मी दोन बॅगा भरून लोकसेवा आयोगाच्या इंटरव्ह्यूला पोचलो. यावेळी निशा हलाल मध्ये कडमडायला नव्हती, पण गजलवारांनी काय मोर्चेबांधणी केली असेल हे सांगता येत नव्हतं. काही नवे चेहरे होते, ज्यांची कनेक्शन्स कुठे असतील याची कल्पना करून डोक्यावरचं टेन्शन वाढवण्यात अर्थ नव्हता. माझं नाव पुकारल्यावर मी आत गेलो.

"या, बसा" मी चमकून पाहिलं. माझ्या अप्रोच्या इंटरव्ह्यूला तज्ज्ञ म्हणून होते ते डॉक्टर फडके आज हजर होते. त्यांनी प्रसन्न हास्य केलं. त्यांचा हसतमुख चेहरा पाहिला आणि माझं टेन्शन कुठच्या कुठे पळून गेलं. मी स्मितहास्य केलं आणि बसलो. माझ्या पुस्तकाचं त्यांनी त्यांच्या महाविद्यालयात जाऊन केलेलं कौतुक माझ्या कानांवर आलं होतं. मी बॅगा उघडल्या आणि आतली पुस्तकं, शोधनिबंध आणि कॅसेट्स टेबलावर मांडल्या.

"अरे वा! किती पुस्तकं आहेत?"

"सतरा, सर" मी म्हटलं.

"सगळी तुम्हीच लिहिलीत?"

"होय, सर" मी म्हटलं.

"छान, छान. तुमची पुस्तकं चांगली असतात. आणि या कॅसेट्स कसल्या?"

"यांत विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी वेगवेगळी ऑपरेशनं आहेत. बाहेरगावच्या मुलांना येवढी विविध प्रकारची ऑपरेशनं बघायला मिळत नाहीत. त्यांच्यासाठी खास बनवल्या आहेत."

"छान. तुम्हाला तुमच्या विषयावर काय विचारायचं? येवढं सगळं तुम्हाला येतं. इतर कोणाला काही विचारायचं आहे का?"

इतरांनी माना हलवल्या.

"या तुम्ही" ते म्हणाले.

"थँक यू सर" असं म्हणून मी घाईघाईने बॅगा भरायला सुरुवात केली.

"सावकाश. काही घाई नाहीये" ते म्हणाले. मी इतरांची तोंडं पाहिली. रेल्वेतल्या भिकाऱ्याकडे बघतात तसं कोणीच माझ्याकडे बघत नव्हतं. वर्षापूर्वीची तीच खोली, तेच टेबल, तोच मी आणि तीच माझी पुस्तकं आणि कॅसेट्स. पण इंटरव्ह्यू घेणारी माणसं बदलली आणि किती फरक पडला. मी पंधरा किलो वजनाच्या माझ्या बॅगा उचलल्या आणि हवेत तरंगल्याच्या मानसिक अवस्थेत बाहेर पडलो.

गजलवारांचा वशिला आणि नशीब चालले नाहीत. मी प्रोफेसर म्हणून कायम झालो. जोशीबाई आणि सहकाऱ्यांनी माझं अभिनंदन केलं नाही, पण इतर सर्वांनी केलं.

"विजय, कॉन्ग्रॅट्स" परवेझचा फोन आला.

"थँक यू" मी म्हटलं.

"खरं तर हे वर्षापूर्वीच व्हायला हवं होतं" तो म्हणाला.

"तेव्हा मलापण तसंच वाटलं होतं. पण मला वाटतं देव करतो ते भल्यासाठीच. मी तेव्हा प्रोफेसर झालो असतो तर मला देसाई जनरलला एचोडी म्हणून जावं लागलं असतं. आता जोशीबाई सेवानिवृत्त होतील तेव्हा मी राजमातात एचोडी होईन. राजमाता नगरपालिकेच्या सगळ्या रुग्णालयांत नंबर

एक आहे. माझं सगळं शिक्षण इथंच झालंय. राजमाता माझं दुसरं घर आहे रे" मी म्हटलं.

"हूं. ते मी समजू शकतो. फक्त लायकी नसताना हलालबाई तुझ्या पुढे गेली त्याचं वाईट वाटतं" तो म्हणाला.

"थँक यू" मी म्हटलं. परवेझने केलेली स्तुती आणि इतरांनी केलेली स्तुती यांत बराच फरक होता याची मला जाणीव होती.

***

सुषमाचा माझ्यावर राग असण्याचं कारण मी नव्हतो हे नक्की. मला लेक्चररची पोस्ट मिळाली तेव्हा सुषमा माझ्या बऱ्याच मागे होती. पण आपल्या भाचीसाठी तत्कालीन असिस्टंट कमिशनरनी झोल केला आणि त्यांत मी चिंपोलीला पोचलो तर भाची आणि सुषमा दोघीही राजमातात पोचल्या. खरं तर माझा सुषमावर राग असायला हवा होता. जेव्हा मला राजमातात बदली करून मिळाली तेव्हा डीननी मला जोशीबाईंच्या युनिटमध्ये टाकलं, जिथे सुषमा लेक्चरर म्हणून होती. एकाच हुद्द्यावरची दोन माणसं एका ठिकाणी नेमली की भांड्याला भांडं आपटतं. त्यातून एक भांडं जास्त मजबूत असलं तर दुसऱ्या भांड्याचा आवाज फिका पडतो. सुषमाचा आवाज फिका पडायला लागला तसतशी ती माझ्यावर जळायला लागली. तिच्या आणि जोशीबाईंच्या चुका मी राउंडवर दाखवायचो त्यामुळे आगीत तेल ओतलं जायचं. पेशंटांच्या उपचारात गोंधळ होऊ नये म्हणून मला गप्प बसवत नसे. अशा प्रकारे प्रकरण चिघळत गेलं होतं.

जोशीबाईंच्या युनिटमध्ये मी लेक्चरर असताना एकदा एका गर्भार पेशंटला कळा यायचं ऑक्सिटोसिन हे औषध सलाईनमधून चालू होतं.

"हे का लावलंय?" मी आमच्या नग रजिस्ट्रार असराणीला विचारलं.

"तिच्या गर्भजलात मिकोनिअम आहे म्हणून" तो म्हणाला.

"मिकोनिअम आहे म्हणजे तिचं मूल गुदमरलेलं असणार. त्यात ऑक्सिटोसिन? तिला कळा येत नाहीयेत का?" मी विचारलं.

"येताहेत."

"जर चांगल्या कळा येत असतील तर ऑक्सिटोसिन द्यायचं नसतं. प्रमाणाबाहेर कळा आल्या तर मूल गुदमरून मरेल ना" मी म्हटलं.

"सुषमामॅडमनी ऑक्सिटोसिन लावायला सांगितलंय. त्या म्हणाल्या लवकर डिलिव्हरी करून टाक" तो म्हणाला.

"अरे तिने ढीग सांगितलं. पण तू स्वतःचं डोकं चालवायचंस ना" मी म्हटलं.

सहकाऱ्याची अक्षम्य चूक असली तरी त्याला दुखवायचं नसतं हे राजकारण मला जमत नसे. असराणीला देवाने चालवण्यासाठी डोकं दिलं नसलं तरी सत्ताकेंद्र कुठे आहे, सत्ताकेंद्राच्या मर्जीतली माणसं कोण आहेत, आणि त्यांना खूश ठेवलं तर आयुष्य आनंदमय होतं हे समजण्यायेवढं डोकं नक्की दिलं होतं. त्याला योग्य काय आणि अयोग्य काय हे शिकवल्याबद्दल त्याने माझे आभार तर मानले नाहीतच, उलट मी काय म्हटलं ते सुषमाला जाऊन सांगितलं. सुषमाला मला

जाब विचारायचं धाडस झालं नसावं, तिनं जोशीबाईंना जाऊन सांगितलं. मग रान उठलं. मी म्हटलं ते बरोबर असलं तरी मी सुषमाचा अपमान केलाच कसा या एका मुद्द्यावर सगळं रान उठलं होतं. मला त्यात आपली काही चूक झाली असं वाटत नाही असं मी ठणकावून सांगितल्यावर विषय तिथेच थांबला. विषय थांबला पण निर्माण झालेली कटुता उत्तरोत्तर वाढतच गेली.

कालपरत्वे सुषमाला स्वतःचं युनिट मिळालं. मला स्वतःचं युनिट मिळून मी बाहेर पडल्यावर रोजच्या रोज आमचं आमने सामने व्हायचं थांबलं होतं. पण झालं तर मोठा धमाका व्हायचा. एकदा काय झालं, आमच्या एका पेशंटला इमर्जन्सी सिझेरियन शस्त्रक्रिया केली नाही तर पोटातलं मूल मरेल अशी पाळी आली. वेळ सकाळची होती. सुषमाची ऑपरेशनं चालू होती. आम्हाला त्यात घुसावं लागलं. सुषमा-अनिताला त्यामुळे आनंद झाला नाही हे समजण्यासारखं होतं. पण झाल्या गोष्टीला इलाज नव्हता. मी सिझेरियन करत असताना आमचा रजिस्ट्रार धावत पळत आला.

"सर, लेबर वॉर्डात आपली निर्मलाबाई नावाची पेशंट आहे ना, तिचं मूल गुदमरतंय असं वाटतं. मी त्याचा हृदयाचा स्पंदनालेख आणलाय."

"बघू" मी ऑपरेशन करता करताच म्हटलं. त्याने सहा फूटांवरून मला तो आलेख दाखवला. आलेख एकदम खराब होता. मी म्हटलं,

"अरे, त्याला व्हेरिएबल डिसिलरेशन आहे. त्याचं ताबडतोब सिझेरियन करा."

झालं. सुषमाचं दुसरं ऑपरेशन टेबलही आमच्या पेशंटसाठी गेलं. त्यांची ऑपरेशनं बाजूला राहिली. आम्ही दोन्ही सिझेरियन पटपट करून त्यांची टेबलं मोकळी केली खरी, पण प्रकरण तिथे थांबलं नाही.

दुपारी मला जोशीबाईंचं बोलावणं आलं. मी गेलो. जोशीबाई न्यायाधीशाच्या खुर्चीवर बसल्या होत्या, तर फिर्यादीच्या जागेवर सुषमा होती.

"विजय, आज तुम्ही लोकांनी मुद्दाम सुषमाच्या ऑपरेशन थिएटरमध्ये आपले पेशंट घुसवलेत आणि त्यामुळे तिला आपली ऑपरेशनं पुढे ढकलावी लागली" न्यायाधीश म्हणाले.

"त्या पेशंटांची पोरं पोटात गुदमरली म्हणून त्यांची सिझेरियन करायला लागली. त्या पोरांना मी गुदमरवलं असं तिला म्हणायचंय का?" मी आश्चर्याने विचारलं.

"सहा फुटांपेक्षा जास्त अंतरावरून त्या मुलाच्या हृदयाचा स्पंदनालेख पाहून त्याला व्हेरिएबल डिसिलरेशन आहे असं निदान तू केलंस म्हणे" बाई आरोपाच्या सुरात म्हणाल्या. "येवढ्या लांबून बघता क्षणी तुला निदान कसं झालं?"

"सहाच काय, आठ फुटांवरूनही ते निदान झालं पाहिजे" मी म्हटलं. "व्हेरिएबल डिसिलरेशनचं वर्णन चपखल बसेल असा तो आलेख होता. तुम्ही पण बघा हवं तर."

"मी पाहिलाय तो" बाई तुटकपणे म्हणाल्या.

"तरीही तुम्हाला वाटतं की पहाताक्षणी त्याचं निदान होणार नाही?" मी म्हटलं. माझ्या आवाजातलं आश्चर्य पराकोटीचं असावं.

"हो. तू एकटाच हुशार आहेस. आम्हाला काहीच समजत नाही" त्या रागारागाने म्हणाल्या.

आपण रागारागाने जी गोष्ट म्हटली ती संपूर्ण सत्य आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली होती असं दिसत नव्हतं.

"मी हुशार असण्याला माझा काही इलाज नाही" मी म्हटलं. "आणि भले मी एका नजरेत ते निदान केलं नसेल, आधी बहिर्गोल भिंग लावून बघून निदान केलं असेल, ते पोर गुदमरलेलं होतं आणि सिझेरियन तात्काळ करण्याची गरज होती हे सत्य तर बदलत नाही?" मी म्हटलं. बाई आणि सुषमा गप्प झाल्या. दोघी माझ्यावरच्या रागाने येवढ्या ग्रासलेल्या होत्या की महत्वाची गोष्ट कोणती आणि बिनमहत्वाची गोष्ट कोणती हेही त्यांना समजेनासं झालं होतं. त्या पुढे काहीच बोलत नाहीत हे बघून मी उठलो आणि बाहेर पडलो.

***

"डॉक्टर, तुम्ही कामचुकार आहात असं जोशीमॅडमनी डीनना सांगितलं" मला सावंत म्हणाले.

"खरं की काय?" मी हसून म्हटलं. "मी येवढं काम करत असतो, तो मी कामचुकार, आणि असं म्हणतं कोण, तर एक नंबरच्या आळशी जोशीबाई!"

"तुमच्या कानावर घातलं. मी नव्या लेक्चररांच्या ऑफिस ऑर्डर्स घेऊन गेलो होतो तेव्हा ऐकलं."

"बघतो मी काय ते" मी म्हटलं. "थँक यू."

तसं पाहिलं तर गोष्ट फारशी चिंता करण्यासारखी नव्हती. पण जोशीबाईंनी नवी भानगड निर्माण केली तर ती जास्त

वाढण्यापूर्वीच खुडून टाकणं शहाणपणाचं ठरलं असतं. मी डीनच्या ऑफिसात गेलो आणि माझ्या नावाची चिठ्ठी आंत पाठवली. डीननी मला लगेच बोलावून घेतलं.

"या, बसा. काय काम आहे?"

"मॅडम, मी असं ऐकलं की आमच्या एचोडींनी तुम्हाला सांगितलं की मी कामचुकार आहे" मी म्हटलं.

"तसं म्हणाल्या खऱ्या त्या."

मी गप्पच राहिलो. बऱ्याचदा गप्प राहिलं तर समोरची व्यक्ती थोडं जास्त बोलते. माझी स्वतःची बाजू मांडण्यापूर्वी जोशीबाई काय काय म्हणाल्या ते ऐकलं असतं तर बाजू मांडणं सोपं गेलं असतं.

"त्या म्हणाल्या की तुम्ही कामावर उशीरा येता, लवकर जाता, आणि मधेमधे पळून जाता" डीन म्हणाल्या.

"पण असं का म्हणाल्या त्या? मी तर रोज अर्धा तास लवकर येतो, एक तास उशीरा जातो, आणि दिवसभर इथेच असतो. रजेत पण पेशंट जास्त असले तर येऊन ऑपरेशनं करायला मदत करतो. सगळ्यांना माहित आहे."

"मलापण माहित आहे" डीन शांतपणे म्हणाल्या. "मी त्यांना म्हटलं की लेखी तक्रार द्या, सोबत हजेरीपटाच्या नोंदी, तुम्ही गरज असताना कॉल पाठवून सापडला नसाल त्याच्या नोंदी वगैरे पुरावे जोडा. मग आपण योग्य ती कार्यवाही करू. मग त्या गप्प झाल्या. त्यांची योग्य प्रकारे तक्रार आली की मी काय करायचं ते करते. तोपर्यंत तुम्ही तुमचं काम चालू ठेवा."

"थँक यू मॅडम, गुड डे मॅडम" असं म्हणून मी बाहेर पडलो. डिपार्टमेंटला गेलो. निशांत माझी वाट बघत होता.

"काय झालं सर?"

"कुठे काय?" मी म्हटलं.

"तुम्ही डीनकडे गेला होतात ना?"

बातम्या काय वेगाने पसरतात. रुग्णांवर उपचार करताना डॉक्टर मंडळींना या इतर गोष्टींसाठी वेळ कसा मिळतो हे कोडं मला कधीच सुटलं नाही.

"मी कामावर उशीरा येतो, लवकर जातो, आणि मधेमधे पळून जातो असं जोशीबाईंनी डीनना सांगितलं" मी म्हटलं. तो हसायला लागला.

"तुम्हाला अडकवायला त्यांना आणखी काही सापडलं नाही म्हणून इतका अविश्वासार्ह आरोप करताहेत. त्यांना वेडपटच म्हटलं पाहिजे."

"तसं म्हणू नकोस, नाहीतर तुझीपण तक्रार करतील त्या" मी म्हटलं.

"त्या सेवानिवृत्त झाल्यावर तुम्ही एचोडी होऊ नये म्हणून त्या प्रयत्न करताहेत" तो म्हणाला.

"तुला कसं कळलं?"

"त्यांच्या रजिस्ट्रारने सिझेरियन करताना परवा इमर्जन्सीत सांगितलं."

"अशा गोष्टी बाई रजिस्ट्रारसमोर बोलतात? कमाल आहे."

"सर, त्या बरंच काही बोलतात. सगळ्यांना माहित आहे. तुम्ही एचोडी झालात तर शिस्त लावाल ना? गजलवार, सुषमा, म्हसवानी यांना तुम्ही एचोडी म्हणून नको आहात."

"त्यांत आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही. पण ती गोष्ट त्यांच्या हातात नाही. जर त्यांना काही करायचं होतं तर मी प्रोफेसर व्हायच्या आधीच करायचं होतं."
तो विषय तिथेच थांबला. बाईंची कटकट मात्र थांबली नाही. कटकटीमुळे फार त्रास होत नसला तरी काम करण्यातला आनंद मात्र लोपला होता. त्यातच आमच्या डीन सेवानिवृत्त झाल्या. त्या दिवशी जोशीबाईंनी घरी जाऊन आनंदोत्सव केला म्हणे. डिपार्टमेंटमध्ये त्यांनी मिटिंगच्या वेळी ज्यांची इच्छा होती त्यांना कॉफी पाजली. कॉफी पिताना मनही मोकळं केलं.
"गेल्या एकदाच्या. माझ्या एचोडीच्या कारकीर्दीची दहा वर्षं त्यांनी फुकट घालवली. काहीही मनासारखं करू दिलं नाही."
"हो ना मॅडम" सुषमा म्हणाली.
"आता दोन मे महिन्याच्या सुट्ट्या उरल्याहेत" त्या म्हणाल्या. म्हणजे त्या सेवानिवृत्त होईपर्यंत दोन सुट्ट्या उरल्या होत्या असं त्यांना म्हणायचं होतं. "त्या मी संपूर्ण दोन दोन महिने घेणार."
बाई चार महिने घरी म्हणजे चार महिने तिचा त्रास नाही असं माझ्या मनात आलं.
"आता आपण काहीतरी छानसं करूया" बाई उत्साहाने म्हणाल्या. "आपण ना, गणपतीचं प्रदर्शन भरवूया."
सगळीजणं एकमेकांकडे बघायला लागली. अगदी सुषमा आणि म्हसवानी सुद्धा चाट पडल्या.

"माझ्याकडे खूप गणपती आहेत. खूप मूर्ती आहेत, खूप चित्रं आहेत, शुभेच्छा कार्ड आहेत. आपण विद्यार्थ्यांच्या लेक्चर हॉलमध्ये त्यांचं प्रदर्शन भरवूया."

"छान कल्पना आहे. अगदी नवीनच आहे" म्हसवानी म्हणाली.

"हो ना! मी गेल्या आठवड्यात एका गणपतीच्या प्रदर्शनाला गेले होते. ते बघितल्यावर मला ही कल्पना सुचली" बाई म्हणाल्या.

म्हणजे कल्पना त्यांची स्वतःची नव्हती तर.

"पण हॉस्पिटलमध्ये गणपतीचं प्रदर्शन भरवणं काही योग्य वाटत नाही. आपल्याकडे सगळ्या धर्मांचे पेशंट येतात. शास्त्रीय उपकरणांचं प्रदर्शन भरवलं तर उपयुक्त होईल. किंवा ऑपरेशनांच्या फोटोंसकट माहिती देणारं प्रदर्शन भरवलं तरीही पेशंटांना त्याचा फायदा होईल."

बाईंनी माझ्याकडे दुर्लक्ष केलं.

"डीनची परवानगी घ्यावी लागेल" मी प्रयत्न सोडले नाहीत.

"काही गरज नाही" बाई माझ्याकडे न बघताच म्हणाल्या. "काही माणसांना कलेची आवड नसते. इतरांच्या चांगल्या कल्पनासुद्धा त्यांना खपत नाहीत."

मला थेट बोलायचं धाडस होईना म्हणून बाई माणसांबद्दल बोलल्या. माणूस म्हणजे मी हे मी समजून घ्यावं अशी त्यांची अपेक्षा होती.

"त्या दिवशी लेक्चर कुठे घ्यायचं?" मी विचारलं.

"लेक्चर नसलेला दिवस निवडीन मी" त्या तुटकपणे म्हणाल्या. मी गप्प बसलो.

म्हटल्याप्रमाणे बाईंनी खरोखर प्रदर्शन भरवलं. आपल्या युनिटच्या सगळ्यांना घरचं कार्य असल्यासारखं कामाला लावलं. भिंतींवर गणपतीची कार्ड चिकटवली, काचांवर पोस्टर्स चिकटवली, सापडेल त्या प्रत्येक सपाट पृष्ठभागावर घरून आणलेल्या गणपतीच्या मूर्ती ठेवल्या. फळ्यावर गणपतीचं स्तोत्र लिहून घेतलं. एचोडींचं प्रदर्शन म्हणून सगळे आरेमो प्रदर्शन बघून गेले. बाई स्वतः हिरवी साडी, हिरवा ब्लाउझ, केसांना हिरवी क्लिप आणि गळ्यात पाचूचा गणपती सोन्याच्या चेनमध्ये घालून आल्या होत्या.

"मॅडम, छान दिसतंय" निशांत त्यांच्या छातीवर रुळणाऱ्या गणपतीकडे नजर रोखून म्हणाला. सुषमाने हेच म्हटलं होतं तेव्हा बाई गोड हसल्या होत्या. निशांतने तेच म्हटल्यावर त्यांनी तोंड वाकडं केलं, पदर सावरला आणि छातीसमोर हातांची घडी केली.

"काय रे निशांत, येवढ्या वयाच्या बाईंना तू असं चावट बोललास?" मी त्याला नंतर दम दिला.

"आवडतं त्यांना" तो म्हणाला.

"मग त्यांनी हातांची घडी का घातली?"

"आज मूड नसेल" तो म्हणाला.

तेवढ्यात व्हिडियो शूटिंगवाले भलामोठा कॅमेरा घेऊन आले. बाईंनी पटपट साडी नीट केली, छातीवरचं लॉकेट नीट दिसेल असं केलं, केसांवर हात फिरवला. शूटिंग सुरू होणार तोच लेबर वॉर्डची सिस्टर चिंताक्रांत तोंड करून आली.

"मॅडम, सकाळपासून लेबर वॉर्डात पाणी नाहीये" ती म्हणाली. "चार बायका प्रसूत झाल्यात. सगळीकडे गर्भजल, मिकोनियम,

रक्त, भिजलेले कपडे! साफसफाई करायला अजिबात पाणी नाहीये."

"मग मी काय करू?" आपल्या कार्यक्रमात अडथळा आलेला बाईंना अजिबात आवडला नाही. "इंजिनियर्सना सांगा."

"तीन वेळा कॉल पाठवले. ते काहीच करत नाहीत" बिचारीच्या डोळ्यांत पाणी तरळलं.

"काय जमेल ते करा. मला त्रास देऊ नका" असं म्हणून बाईंनी तिच्याकडे पाठ केली, डाव्या हातावर छान दिसेल असा पदर धरला आणि आज्ञा सोडली, "चला, शूटिंग सुरू करा."

शूटिंग सुरू झालं. ती सिस्टर रडत रडत बाहेर पडली. मला तिची दया आली.

"सिस्टर थांबा, रडू नका" मी म्हटलं.

"रडू नको तर काय करू? लेबर वॉर्ड बंद पडायची वेळ आलीय. प्रसूतीसाठी नव्या बायका येतच आहेत. आणि इथे ही बाई व्हिडियो शूटिंग करतेय. ते रोम जळत असताना तो नीरो फिडल वाजवत होता ना, तसलाच हा प्रकार आहे."

त्या सिस्टरला रुग्णसेवा छान करता येत असे हे मला माहित होतं, पण नीरोचं फिडल माहित असेल असं मात्र वाटलं नव्हतं.

"जाऊ दे हो. गणपतीच्या कृपेनं तुमच्या नळांना पाणी येईल बघा. मी प्लंबरला बोलावतो. तेवढीच मदत होईल."

"तो प्लंबर जागेवर मिळेल तर ना!" ती म्हणाली. "आमचा धनकू त्याला शोधायला चार वेळा जाऊन आला. त्याचा पत्ताच नाही."

"धनकूला तो सापडला नाही तरी मला नक्की सापडेल. त्याच्या बायकोचं ऑपरेशन मी काल केलंय. वॉर्डात तिच्या बाजूला तो बसून आहे."

"घ्या!" ती चिडून म्हणाली.

"चिडू नका हो. त्याचं आपल्या बायकोवर प्रेम आहे. रोजरोज कोणाच्या बायकोचं ऑपरेशन होतं का? तुम्ही वॉर्डात जा. मी प्लंबरचं बघतो" मी म्हटलं.

सिस्टर वॉर्डात गेल्या. मी प्लंबरला त्याच्या बायकोच्या शेजारून उठवलं आणि पाण्याचं काम करायला पाठवलं. दहा मिनिटांत लेबर वॉर्डात पाणी आलं आणि प्लंबर परत बायकोच्या बाजूला स्थानापन्न झाला.

"कोणीतरी व्हाल्व बंद केला होता" तो म्हणाला. "मी व्हाल्व उघडला आणि पाणी आलं. हे पंपवाले व्हाल्व बंद करतात तो नंतर उघडतच नाहीत एकेकदा."

त्याला पंपवाल्याचा संशय आला तरी जोशीबाईंना माझाच संशय आला. दोन दिवसांनी मिटिंगमध्ये त्यांची मळमळ बाहेर पडली.

"काही माणसांना संस्कृती नावाची चीजच नसते" माझ्याकडे तिरप्या नजरेने बघत त्या म्हणाल्या. "देवाच्या कार्यात अडथळा आणण्यासाठी कोणाला सांगून पाण्याच्या टाकीचा व्हाल्व बंद करणारी माणसं असतात."

त्यांच्या कार्यात विघ्न आणण्यासाठी मी प्रसूतीसाठी हॉस्पिटलमध्ये आलेल्या स्त्रियांना त्रास होईल असं काही करेन असं त्यांना वाटलंच कसं हे मला कळेना.

"मला नाही वाटत असं कोणी जाणूनबुजून करेल" मी म्हटलं.

"मला माहित आहे. मागे हीनाच्या ऑफिसच्या दरवाजावर हत्तीचं चित्र चिकटवून खाली घाणेरड्या शिव्या लिहिल्या होत्या. त्याच माणसाने हे काम केलं असणार" बाई म्हणाल्या.
आता माझी सटकली. जुने हिशेब चुकते करायला बरा मुहूर्त होता.
"शिव्यांवरून आठवलं" मी म्हटलं. "मी ऑपरेशनांच्या फोटोंचा अ‍ॅटलास लिहिला, त्याची एक प्रत लायब्ररीला दिली. चांगला चोवीसशे रुपयांचा आहे. त्याला अहुजामॅडमनी प्रस्तावना लिहिली आहे. त्या पुस्तकाच्या आत लेखक म्हणून असलेल्या माझ्या नावाखाली आणि प्रस्तावना लिहिली म्हणून असलेल्या अहुजामॅडमच्या नावाखाली पेनाने अतिशय घाणेरड्या शिव्या लिहिलेल्या आहेत. अहुजामॅडम आणि मी असे दोघेही ज्या व्यक्तीला आवडत नाहीत अशा आपल्या डिपार्टमेंट्च्याच कोणीतरी ते लिहिलं याची मला खात्री आहे."
"मी लायब्ररीत कधी जातच नाही" जोशीबाई पटकन बोलून गेल्या. चोराच्या मनात चांदणं, असं माझ्या मनात आलं.
"आता कोणाला संस्कृती नाही ते सगळ्यांच्या लक्षात आलंच असेल" मी म्हटलं.

***

जोशीबाईंची सेवानिवृत्तीची तारीख जवळ येत चालली तसतशा त्या आपलं राज्य आता विजयच्या ताब्यात जाणार या विचाराने कासावीस व्हायला लागल्या. त्यांच्या पश्चात त्यांच्या मर्जीतल्या कोणीतरी ते चालवावं अशी त्यांची प्रबळ इच्छा होती. त्यांच्या दुर्दैवाने मी सर्वात ज्येष्ठ होतो. काहीतरी कुरापत

काढून मला एखाद्या मोठ्या चौकशीत गुंतवायचं हा त्यांचा फार दिवसांपासूनचा विचार परत उसळी घेऊन वर आला. सुषमा आणि गजलवारांची त्यांना फूस होतीच. सुषमाला मी नको होतो. गजलवारांना एचोडी व्हायचं होतं. अर्थात त्यांनी ढीग म्हटलं, बाईंनी त्यांच्या नादाला लागायला नको होतं. आतापर्यंत प्रत्येक लढाईत मी त्यांना चीत केलं होतं. पण काही माणसं अनुभवातून काहीही शिकत नाहीत हेच खरं.

मला चित्रं काढायचा नाद होता. चित्रकलेच्या दोन्ही परिक्षांत मला सी ग्रेडच मिळाली होती. पण म्हणून नाद नसावा असा काही नियम नसतो. बाई आणि त्यांच्या हुजऱ्यांनी डोकं फार पिकवलं की मी व्यंगचित्रं काढत असे. त्यामुळे माझ्या डोक्याचा ताण कुठच्या कुठे पळून जात असे. त्या सुमारास आरेमोंनी संपाची नोटीस दिली. डीननी सर्व एचोडींना बोलावून सांगितलं की आरेमोंना संपावर जाण्यापासून परावृत्त करा. इथे जोशीबाई आणि सुषमा यांनी आपापल्या आरेमोंना सांगून टाकलं की तुम्ही खुशाल संपावर जा. याचं कारण बाईंची मुलगी देसाई जनरलमध्ये आरेमो होती. त्यामुळे बाईंना आरेमोंबद्दल अकस्मात कमालीची अनुकंपा वाटायला लागली होती. आमची डिपार्टमेंटमध्ये संपानिमित्त मिटिंग झाली.

"संप झाला तर आपण काम करायला तयार राहिलं पाहिजे" बाईंनी जाहीर केलं.

आरेमोंच्या संपकाळात आम्हा फुलटायमरना सगळं काम करावं लागत असे. त्यात जोशीबाईंच्या कामाचं वेळापत्रक एकदम विलक्षण असायचं.

"ऑफिसमध्ये येणारे कागदपत्र बघण्यासाठी मी ९ ते ४ ड्यूटी करेन. तेव्हा मी माझ्या ऑफिसात असेन" बाई म्हणाल्या.
बाई दर संपात असंच करायच्या. मनात आलं तर जाऊन एखादं ऑपरेशन करून यायच्या. पण ऑपरेशनपूर्वी आणि नंतर करायच्या सगळ्या गोष्टी आम्हा इतरांनाच कराव्या लागत असत. होटेलात जाऊन तयार पदार्थ खाऊन उष्ट्या खरकट्या डिशेस टेबलावर टाकून निघून जाण्यासारखा तो प्रकार होता.
"मॅडम, माझी सुट्टी ..." सुषमाने त्यांना आठवण करून दिली.
"हो. उद्या सुषमाची काही कामानिमित्त रजा आहे. तिला काही ड्यूटी लावू नका" बाई म्हणाल्या.
म्हणजे तिच्या वाटचं काम इतरांनी करायचं. वास्तविक आरेमोंचा संप झाला की सर्वांच्या सुट्ट्या रद्द होत असत. मी तसं म्हणायला तोंड उघडलं.
"या विषयावर आणखी चर्चा नको" बाईंनी जाहीर केलं. मी तोंड बंद केलं. नाहीतरी बोलून काही फरक पडणार नव्हता. आमच्या जिवावर बाई आणि सुषमाने आरेमोंना संपावर जा असं सांगितलं होतं याचा मला प्रचंड संताप आला. त्याला उतारा म्हणून मी एक व्यंगचित्र काढलं. दोन आरेमोंसमोर एक वयस्क डॉक्टरीण दाखवली. 'तुम्ही बिनधास्त संपावर जा. मी रजेवर जाते. इतर सिनियर डॉक्टर आहेत सगळं काम करायला असं तिच्या तोंडी दाखवलं. ते निशांतला दाखवावं म्हणून मी निघालो, तर स्टाफरूमच्या दारात जोशीबाईंबरोबर माझी जवळजवळ टक्करच झाली. आता आपलं एखादं हाड मोडेल या भितीने मी एका बाजूला उडी मारली म्हणून

वाचलो. पण माझं व्यंगचित्र काही वाचलं नाही. ते बाईंच्या पायाकडे जमिनीवर पडलं. बाईंनी ते उचललं आणि बघितलं. चित्रातली बाई ओळखता येण्यायेवढी माझी चित्रकला छान नसली तरी बाईच्या तोंडच्या वाक्यावरून बाई ओळखायला फार अकलेची गरज नव्हती. जोशीबाईंनी ती बाई कोण ते आपल्या विचाराने ठरवलं. त्यांनी माझ्याकडे रोखून बघितलं. मी त्यांच्या हातातून चित्र काढून घेतलं आणि निघून गेलो. दुसऱ्या दिवशी संप झाला. जोशीबाई आणि सुषमा सोडून आम्ही इतर जणं लेबर वॉर्डात काम करायला लागलो. तिसऱ्या दिवशी दुपारी मला बाईंच्या ऑफिसात बोलावणं आलं.

"विजय, तू सुषमावर व्यंगचित्र काढलंस अशी तिची तक्रार आहे" बाईंनी आरोप जाहीर केला. शेजारी सुषमा बसली होती.

"कधी?" मी विचारलं.

"काल" बाई म्हणाल्या.

"काल तर ती रजेवर होती. संप असताना! संपाचं काम आम्ही इतरांनी केलं. बरं तिला कसं कळलं कोणी तिच्यावर व्यंगचित्र काढलं ते?"

"मी सांगितलं" बाई क्षणाचीही उसंत न घेता म्हणाल्या. "तिच्या मनाला केवढा त्रास झाला."

"तुम्ही तिला तसं सांगितलं नसतं तर तिच्या मनाला त्रास झाला नसता. तुम्ही कशाला तिला काही सांगितलं?"

मी आरोपी आणि आरोपीचा वकील दोन्ही होतो. माझा वकील एकदम स्ट्रॉन्ग दिसत होता.

"मी...अं" प्रतिपक्षाचा वकील चाचरला.

"माझ्याविरुद्ध झालेली गोष्ट मला कळली पाहिजे म्हणून त्यांनी मला ते सांगितलं" संभाषणात खंड पडतोय असं पाहून सुषमाने तोंड उघडलं.

"अच्छा. व्यंगचित्र तुझं होतं याचा काय पुरावा आहे?" मी विचारलं.

"मी पाहिलं ते तुझ्या हातातून पडलं तेव्हा" जोशीबाई म्हणाल्या.

"ते तिचंच कशावरून?" मी विचारलं.

"मला ओळखता येतं" बाई म्हणाल्या.

"कमाल आहे. चित्रकलेच्या दोन्ही परिक्षांत मी सी ग्रेडच्या वर पोचू शकलो नाही. तरीपण मी काढलेलं व्यंगचित्र तिचंच असं तुम्ही म्हणता त्याअर्थी माझी चित्रकला फार छान असणार. मला खरं तर ए ग्रेड मिळायला हवी ह्ोती असं म्हणायला हरकत नाही."

"अं..." माझी कोणतीच गोष्ट छान असं म्हणायला बाईंची जीभ वळेना.

"की मागच्या वेळी मी कॉम्प्यूटरवर तुमच्या नियमांबद्दल लिहिलं अशा बनावट आरोपाखाली मला गुंतवायला बघत होता तसंच आता करताय? तेव्हा मी तुम्हाला सांगितलं होतं की मला खोट्यानाट्या आरोपाखाली गुंतवायला बघाल तर जड जाईल." माझा वकील बाई आता सेवानिवृत्त होणार आहे हे माहित असल्यामुळे खूप फॉर्मात दिसत होता.

"माझी खात्री आहे की ते व्यंगचित्र तिचंच होतं" बाई म्हणाल्या.

"कुठे आहे ते? मला बघू द्या" मी म्हटलं.

"ते तुझ्याकडेच आहे. तुला माहिताय ते" बाईंचा आवाज आता चांगलाच चढला होता.
"म्हणजे तुमच्याकडे पुरावा म्हणून ते व्यंगचित्र नाहीच आहे? कमाल आहे. कशाच्या जोरावर येवढ्या जोरात आरोप करताय तुम्ही?" मी विचारलं. खरं तर वरिष्ठांबरोबर अशा पद्धतीने बोलणं माझ्या स्वभावात नव्हतं. पण जर मला वर्षानुवर्षं छळून झाल्यावर आता सेवानिवृत्त होतानाही बाई आपलं व्रत सोडायला तयार नव्हत्या, आणि नळावर पाण्याच्या रांगेत भांडणाऱ्या बायकांच्या सारख्या भांडत होत्या, तर त्यांना समजेल अशाच भाषेत त्यांच्याबरोबर बोलणं भाग होतं. दोन्ही बाया गप्प राहिल्या.
"ठीक आहे, तुमच्या समाधानासाठी समजा आपण ते व्यंगचित्र सुषमाला न ओळखणाऱ्या तीन व्यक्तींना दाखवलं आणि मग चार-पाच स्त्रियांबरोबर सुषमा असताना त्यांच्यातल्या कोणाचं ते व्यंगचित्र आहे ते ओळखायला सांगितलं तर? किमान दोघींनी तरी सुषमाला ओळखून काढलं तर तुमचं बरोबर, नाहीतर माझं बरोबर."
"हूं! आता ते व्यंगचित्र बदलेल" बाई फुणफुणल्या. ते व्यंगचित्र बदलणार हे मलाही माहित होतं. जरी परिक्षांमध्ये मला सी ग्रेड मिळाली असली तरी माझ्या व्यंगचित्रांतली माणसं खूपदा बरोबर ओळखता यायची. न बदलता व्यंगचित्र सादर करायला मी काही मूर्ख नव्हतो.
"मुळात व्यंगचित्र काढणं हा गुन्हा नाही हेही तुम्हाला माहित नाही असं दिसतं" मी म्हटलं. "प्रत्येक वर्तमानपत्रात व्यंगचित्रं असतात. अगदी पंतप्रधानांवरही असतात. जर सुषमावर

व्यंगचित्र बेतलेलं असेल, तर तो तिचा अपमान नाही तर बहुमान आहे."

या उत्तराने न्यायाधीश, फिर्यादी, फिर्यादीचा वकील या सर्वांचा पारा फारच चढला. टेबलावरचा फ्लॉवरपॉट मला फेकून मारला तर काय, या विचाराने मी तिथून काढता पाय घेतला. ड्यूटी संपण्यापूर्वी लेबर वॉर्डात कोणी पेशंट आलेत का ते बघायला तिथे गेलो. तिथे सगळं शांत होतं. मग वकिलीचा शीण उतरवण्यासाठी कँटीनमध्ये चहा प्यायला गेलो. जुन्या आवडत्या खिडकीच्या बाजूची जागा पकडली. चहा पितापिता बाहेर बघत होतो. मनात घडलेल्या गोष्टीचे विचार होते, तोच चहाची नशा आणि विचारांची दिशा भंगली. जोशीबाई आणि सुषमा डीनच्या ऑफिसकडून परत येत होत्या. हायकोर्टात हरल्यावर फिर्यादी सुप्रीम कोर्टात गेलेल्या दिसत होत्या. मी चहाचे पैसे दिले आणि एक्स पार्टी डिसिजन येऊ नये म्हणून डीनकडे गेलो.

"या, या, पाटील. स्त्रीरोगतज्ज्ञापासून एकदम कार्टूनिस्ट झालात अं?" डीनचे डोळे मिश्किलपणे चमकत होते.

"सर, मी एचोडी होऊ नये म्हणून डॉक्टर जोशी खूप दिवस प्रयत्न करताहेत. कसल्या न कसल्या खोट्यानाट्या आरोपात मला अडकवून माझ्या मागे चौकशी लावायचा त्यांचा प्रयत्न आहे. मी चित्र काढणं यात आक्षेपार्ह काय आहे?"

"बरोबर आहे तुमचं म्हणणं. तुम्ही एचोडी झालात तर इतरांना खूप त्रास द्याल असं त्यांचं म्हणणं आहे."

"मग?"

"मी त्यांना सांगितलं, की सेवाज्येष्ठतेनुसार तुम्हीच एचोडी होणार. तुम्हाला कोणीही थांबवू शकत नाही."
"थँक यू सर" मी म्हटलं.
"आणि ते व्यंगचित्रं काढणं पण चालू ठेवा. ज्याला कुठेही असणारा अन्याय दिसतो आणि बोचतो, तोच व्यंगचित्रं काढतो."
"थँक यू सर" मी म्हटलं.

***

हे डीन टिकले असते तर बरं झालं असतं. माझ्या व्यंगचित्रकारितेला महिना झाला असेल, स्टाफरूममध्ये बातमी आली,
"डीननी राजीनामा देतो अशी नोटीस दिलीय."
"का?"
"कोण जाणे."
"त्यांनी पंचवीस कोटी कमावले म्हणे. मिड डेत आलं होतं."
"पंचवीस कोटी? त्यावर किती शून्य असतात?"
"तू शून्यच मोजत बस."
"पण म्हणून राजीनामा द्यायचा? नगरपालिकेत सगळेचजण कमावतात. पण म्हणून कोणी राजीनामा देतं का?"
"सगळेच जण कमावतात असं नाही. आपल्या डिपार्टमेंटमधलं कोण कमावतं?"
या प्रश्नावर सगळेजण गप्प बसले. परिक्षक मुलांना पास करण्यासाठी पैसे घेतात असं ऐकिवात होतं. जोशीबाईंनी तीस हजार घेऊन एका मुलीला पास केलं असं त्यांच्या एका

वर्गमित्राने मला सांगितलेलं मला आठवलं. 'तीस हजार घेऊन त्या मुलीला पास केलं. नवरा येवढं कमावत असताना हीनाला असं करायची काय गरज होती?' हा प्रश्न तिला न विचारता त्यांनी मला विचारला त्याचं कारण त्यांना उत्तर हवं होतं असं नव्हे, तर मी ते चार लोकांना सांगावं असं असावं. मी ते कोणालाही बोललो नाही, पण मंडळींना ते इतर स्रोतातून समजलं असावं. बाईंसमोर त्याबद्दल न बोलणं शहाणपणाचं असं समजून सगळीजणं गप्प बसली येवढंच.

"मग आता डीन कोण होणार?"

"तात्पुरत्या स्वरूपात कोणाला तरी हंगामी डीन करतील" जोशीबाई म्हणाल्या.

"मॅडम, तुम्हीच व्हा डीन" म्हसवानी म्हणाली. म्हसवानीला स्वतंत्र विचारशक्ती फारशी नव्हती, किंवा असली तर ती कधीच सक्रिय झाली नव्हती. तिने ही कल्पना कुठेतरी ऐकली असणार असं माझ्या मनात आलं. कदाचित जोशीबाईंनीच तशी इच्छा म्हसवानीसमोर बोलून दाखवली असेल. त्यांनी स्वतःवर खूश असल्यासारखं मंद स्मित केलं.

बाई डीन होण्यासाठी फारच प्रयत्नशील झाल्या. त्या कमिशनरना जाऊन भेटून आल्या. त्यांच्या यजमानांचे पेशंट असणारे एक-दोन मंत्री की संत्री बाईंची शिफारस करत होते असंही ऐकलं.

"बाई डीन झाल्या तर तुम्हाला एचोडी व्हायला त्रास होईल का?" मला एकदा निशांतने विचारलं.

"सांगता येत नाही. हंगामी डीनना असं काही करण्याची पॉवर नसते" मी म्हटलं. पॉवर असली तरी असं काही करायचं तर

बिनचूक करावं लागतं, आणि तेवढं डोकं बाईंना नव्हतं. शत्रू हुशार असावा की खुनशी असावा असा पर्याय दिला तर माणसाने खुनशी शत्रू निवडावा. हुशार शत्रू खूप जास्त त्रास देऊ शकतो. त्या दृष्टीने बाई फारशा धोकादायक नव्हत्या. पण त्या डीन होणार अशी जोरदार हवा मात्र होती. बाईपण जरा जास्तच रुबाबात इकडेतिकडे फिरत होत्या. एरवी माझ्याकडे न बघणारी माणसं मला गाठून खाजगी आवाजात 'तुमच्या मॅडम डीन होणार ना?' असं विचारत होती. मी त्यांना 'असं म्हणतात खरं' असं उत्तर देत होतो.

एक दिवस हा फुगा फुटला. डीन ज्या दिवशी हॉस्पिटल सोडून गेले त्याच दिवशी देसाई जनरलच्या डीन बदली करून घेऊन आमच्याकडे डीन म्हणून आल्या. शिरस्तेबाई मूळच्या राजमाताच्या होत्या. मी विद्यार्थी असताना आमची ट्युटोरियल्स घ्यायच्या. पुढे त्या प्रोफेसर झाल्या. मी अप्रो असताना त्यांनी मला आपल्या मुलीची शिकवणी घे म्हणून गळ घातली होती. पूर्वी मी डीनच्या परवानगीने ट्यूशन घेत असे. ते डीन सेवानिवृत्त झाल्यावर जोशीबाईंनी ते परवानगीचं पत्र मागून घेतलं, नव्या डीनकडे पाठवलं, आणि नवं सर्क्युलर काढून घेऊन माझ्या ट्यूशन्स बंद पाडल्या. शिरस्तेबाई आणि जोशीबाई मैत्रिणी. मी अजून ट्यूशन्स घेतो का ते बघायला त्यांनी हा सापळा रचला असेल अशी मला शंका आली.

"मी तुमची फी देईन" शिरस्ते बाई म्हणाल्या. मला आश्चर्य वाटलं. आधीच्या दोन डीननी माझ्याकडून फुकट ट्यूशन्स घेववल्या होत्या. बाई पैसे देणार नाहीत, उलट मला कशात तरी अडकवतील असं माझ्या मनात आलं.

"नाही, प्रश्न तो नाही. ट्यूशन घेणं माझ्या तब्येतीला झेपत नाही म्हणून मी ते कधीच बंद केलंय" मी म्हटलं.
त्या शिरस्ते बाईंनी देसाई जनरलमध्ये सगळ्यांना सळो की पळो करून सोडलं होतं, त्या सूडाचं राजकारण करायच्या अशा अनेक गोष्टी आमच्यापर्यंत पोचल्या होत्या. त्यांचा दिल्लीला जबर वशिला होता असंही लोकं म्हणत असत. आता जोशीबाईंच्या सांगण्यावरून त्या मला एचोडी होताना काय त्रास देतील असा विचार मला अस्वस्थ करत होता.
माझी शंका खरी ठरली. जोशीबाई सेवानिवृत्त झाल्या, त्याच्या दुसऱ्या दिवशी शिरस्तेबाईंनी आमची मिटिंग बोलावली. मला एचोडी म्हणून काही न विचारता शेजारी बसलेल्या जोशीबाईंना विचारून कोणी काय काम करायचं ते ठरवून दिलं.
"डॉक्टर पाटील यांची तब्येत बरी नसते म्हणून आपण त्यांना जास्त काम देऊया नको" असं त्यांनी जाहीर केलं.
माझ्या तब्येतीला काय झालं अशी तोंड करून सगळ्यांनी माझ्याकडे पाहिलं. मुलीची ट्यूशन न घेण्याचं कारण बाईंनी लक्षात ठेवून आता म्हणून दाखवलं होतं हे माझ्या लक्षात आलं. मला काहीही झालेलं नाही अशा अर्थाने मी खांदे उडवून दाखवले. त्याने लोकांचं समाधान झालं. बाई सूडाचं राजकारण करणार अशी मी खूणगाठ बांधली.
बाईंनी कितीही ठरवलं तरी एचोडीला त्रास देणं सोपं नव्हतं. त्यामुळे बाई मला फार त्रास देऊ शकेनात. पण आपली पॉवर दाखवण्यासाठी म्हणा किंवा खुनशी स्वभाव म्हणून म्हणा, त्यांनी माझं एचोडीच्या नेमणूकीचं पत्र मला पाठवलं नाही.

जरी मी एचोडीचं सगळं काम करत होतो, तरी नेमणूकीचं पत्र मला मिळायला हवं होतं. मी सावंतांना जाऊन भेटलो.
"सावंत, माझ्या एचोडीच्या नेमणूकीचं पत्र अजून आलं नाही. मी सूत्रं हातात घेऊन सात दिवस झाले. काय भानगड आहे?"
"मी तुमची ऑफिस ऑर्डर डीनच्या सहीला टाकली त्याला आठ दिवस झाले. ती त्यांच्याकडून अजून परत आली नाही" सावंत म्हणाले.
"ठीक आहे" मी म्हटलं. शिरस्तेबाई माझ्या ऑफिस ऑर्डरवर बसून होत्या तर. मी सरळ त्यांनाच जाऊन भेटलो.
"मॅडम, माझ्या एचोडीच्या नेमणूकीची ऑफिस ऑर्डर आपल्या सहीला गेल्या एकतीस तारखेला टाकलीय. तुमची सही झाली नाही म्हणतात" मी म्हटलं.
"अं? मी त्याच दिवशी सही केलीय" बाई म्हणाल्या.
"पण तुमच्याकडून ती परत आली नाही असं म्हणतात ते" मी म्हटलं.
"पाटील, काळजी करू नका." बाई शांत आवाजात बोलल्या खऱ्या, पण त्यांच्या डोळ्यांत सावजाला खेळवताना हिंस्त्र श्वापदांच्या डोळ्यांत असतात ते भाव होते. "आपल्या हॉस्पिटलचा डिस्पॅच विभाग किती गलथान आहे ते माहित आहे ना तुम्हाला. एक दोन दिवसांत येईलच." डिस्पॅच विभागाचा गलथानपणा सुधारायची पॉवर डीनना होती आणि ते त्यांचंच काम होतं. तुम्ही तसं का करत नाही असं मी त्यांना विचारलं असतं तर माझी ऑफिस ऑर्डर मला कधीच मिळाली नसती. म्हणून मी तसं काही बोललो नाही.

"बरं मॅडम" असं म्हणून मी निघालो. पत्र येणार नाही हे मला माहित होतं. न आवडणाऱ्या मंडळींची पत्रं बाईंच्या ऑफिसात लुप्त होतात हे मी ऐकलेलं होतं. माझी ऑर्डर लुप्त होण्यापूर्वी मला ती ताब्यात घ्यायची होती. दोन दिवसांत ऑर्डर आली नाही तेव्हा मी परत डीनच्या ऑफिसात गेलो. डीनबाई कसल्याशा मिटिंगला गेल्या होत्या. बाईच जागेवर नाहीत तर काम कसं होणार या विचाराने मी जरासा निराश झालो.

"काय झालं साहेब?" डीनच्या ऑफिसच्या मामाने मला विचारलं. त्याच्या मुलीची प्रसूती मीच केली होती ते मला आठवलं.

"माझी ऑफिस ऑर्डर डीनच्या सहीला टाकून नऊ दिवस झालेत" मी म्हटलं. "ती सही होऊन परत आलेली नाही. हरवली तर गोंधळ होईल."

"त्या दुपारी जेवायला गेल्या की मी हळूच बघतो. तुम्ही दुपारी दोन वाजता या" तो म्हणाला.

मी दोन वाजता डीनच्या ऑफिसात पोचलो.

"साहेब, तुमची सही झालेली ऑर्डर त्यांच्या टेबलावरच्या डायरीत घालून ठेवलेली आहे. महत्त्वाचे कागद त्या डायरीत असतात."

"ठीक आहे. थँक यू" मी म्हटलं. "डीन किती वाजता जेवून येतात?"

"अडीच."

"थँक यू" मी म्हटलं.

अडीच वाजता मी परत डीनच्या ऑफिसात पोचलो. बरोबर डिपार्टमेंटच्या नूतनीकरणाचा आराखडा गुंडाळी करून नेला.

डीन नुकत्याच आल्या होत्या. मी माझ्या नावाची चिठ्ठी पाठवली. त्यांनी बोलावलं तेव्हा अदबीने आत गेलो.

"गुड आफ्टरनून मॅडम" मी म्हटलं.

"गुड आफ्टरनून. तुमची ऑर्डर मिळाली की नाही? मी डिस्पॅचला पाठवलीय" बाई म्हणाल्या.

"मग ती येईलच" मी म्हटलं. बाई इतकं बेमालूम खोटं बोलते याचं मला तेवढं आश्चर्य वाटलं नाही, जेवढं डीनच्या मानाच्या जागेवर बसून क्षुद्र राजकारण करते याचं वाटलं.

"मी आमच्या डिपार्टमेंटच्या नूतनीकरणाचा आराखडा तुम्हाला दाखवायला आणला आहे."

"हो का? बघू" बाई म्हणाल्या.

टेबलावर दोन-तीन पातळशा फायली होत्या. ती ऐतिहासिक डायरी होती. मी आराखडा उलगडला. बाईंनी फायली आणि डायरी बाजूला करून आराखडा ठेवायला जागा केली. मी आराखडा टेबलावर पसरवला. आराखड्यात कुठे काय आहे ते बाईंना दाखवायला सुरुवात केली.

"आणि आमचा लेबर वॉर्ड आहे ना, त्याच्या बाजूला या इथे आम्हाला रुग्णांच्या नातेवाईकांसाठी बसायला एक खोली हवी आहे" मी म्हटलं.

"कुठे?" त्यांनी चष्मा सावरला.

"इथे मॅडम" असं म्हणून मी आराखडा त्यांच्या दिशेला वळवला, आणि त्याच्या धक्क्याने ती डायरी खाली पडली.

"सॉरी मॅडम" असं म्हणून मी पटकन उठलो आणि ती डायरी उचलली. तेव्हा तिच्यातले कागद चुकून खाली पडले. बाईंचं तोंड कसं झालं ते बघायला वेळ नव्हता. परत एकदा सॉरी

म्हणून मी ते कागद उचलले. ऑफिस ऑर्डर कशी दिसते ते मला बरोबर माहित होतं. मी ती सगळ्यात वर ठेवली आणि कागद त्यांच्या टेबलावर ठेवले. बाई कागद ताब्यात घेणार तेवढ्यात मी ती ऑर्डर पटकन उचलली आणि आश्चर्याने म्हटलं,

"मॅडम, माझी ऑफिस ऑर्डर सापडली बघा. चुकून या जुन्या डायरीत राहून गेली होती असं वाटतं."

बाईंच्या आयुष्यात असं काही कधी घडलं नसावं.

"मी ती डिस्पॅच करून घेतो मॅडम" मी म्हटलं. "तुम्ही नका त्रास करून घेऊ."

बाईंना नाहीही म्हणवत नव्हतं आणि होयही म्हणवत नव्हतं.

"हा आराखडा बघायचा ना?" मी म्हटलं.

"अं, नको. मला आता एक मिटिंग आहे. तुम्ही तो आराखडा इथे ठेवा. मी नंतर बघते."

"थँक यू मॅडम" मी म्हटलं, आणि ज्या ऑफिस ऑर्डरसाठी हा सगळा प्रपंच रचला होता, ती ऑर्डर हृदयाच्या तुकड्यासारखी जपून हातात धरून बाहेर पडलो.

"काम झालं साहेब?" मामाने विचारलं.

"हो, ही बघा ऑर्डर."

"तुमच्या हातात दिली? असं कधी करत नाहीत" त्याने आश्चर्याने म्हटलं.

"मला दिली. घेऊन जा म्हणाल्या" मी आनंदाने म्हटलं. तो आराखडा बाई हरवणार हे मला माहित होतं. पण मला त्याची पर्वा नव्हती. माझ्याकडे त्याची एक प्रत सुरक्षित होती. बाई भविष्यात त्रास द्यायचा प्रयत्न करत रहाणार हेही मला माहित

होतं आणि त्याचीही मला पर्वा नव्हती. बाईंची नाडी मी ओळखली होती.

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. नव्याने लेखन करणाऱ्यांना एक मोठा वाचकवर्ग सहजासहजी उपलब्ध व्हावा ही आमची इच्छा. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडॆतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. वर्षाला चाळीस लाख डाऊनलोड्स जगभरातून होतात.

पण आम्ही अजिबात समाधानी नाही. जगभरातल्या १२ कोटी मराठी लोकांपैकी किमान सहा कोटी तरी वाचक व्हायला हवेत. एक मोठ्ठी चळवळ उभी रहायला हवी. चांगल्या लेखकांना कोटीभर वाचक मिळायला हवेत.

हे अशक्य नाही. आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं.